

प.प. श्री वासुदेवनंदसरस्वती (टेम्बे)
स्वामिमहाराज विरचित


# शिक्षात्रय

(कुमारशिक्षा, युवशिक्षा व वृद्धशिक्षा)
मूळ श्लोक व मराठी भाषांतर

शिक्षात्रय

# गुरु परंपरा

विश्वात्मक चैतन्यशक्ती



।। श्रीगुरुः शरणं ।।

प. प. श्री वासुदेवानंदसरस्वती (टेम्बे) स्वामिमहाराज विरचित

# शिक्षात्रय

**(कुमारशिक्षा, युवाशिक्षा व वृद्धशिक्षा)**

**मूळ श्लोक व मराठी भाषांतर**

**श्रीवासुदेव निवास, पुणे.**

**प्रकाशक :**
**श्री. शरदभाऊ ज. जोशी**
श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामिमहाराज व
श्रीलोकनाथतीर्थ स्वामिमहाराज ट्रस्ट
श्रीवासुदेव निवास, ४२/१७ एरंडवणे,
म. कर्वे पथ, पुणे ४११००४.

© **सर्व हक्क प्रकाशकाधीन**

वेबसाईट : www.vasudevniwas.org
ई-मेल : info@vasudevniwas.org

**पुनर्मुद्रण :** २०२३

**समीक्षक :**
(कै.) डॉ. गु. वा. पिंपळापुरे,
४१ मॉडर्न हौसिंग सोसायटी, प्रतापनगर,
नागपूर ४४००२२.

**मुद्रक :**
के. जोशी आणि कंपनी
भिकारदास मारुतीमंदिराजवळ, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७१४०१
ई-मेल : kjoshipress@gmail.com

मूल्य : रुपये २५०/-

# प.पू. श्रीनारायणकाका महाराजांचा आशीर्वाद.

परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती (टेम्बे) स्वामि महाराज स्वयं दत्तावतार! त्यांचे सारे चरित्र श्रीदत्तप्रभूंच्या आदेशाचे केवळ प्रतिपालन होते. प. पू. योगिराज वा. द. गुळवणीमहाराजांनी प. पू. ब्रह्मर्षी श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांच्या सहकार्याने, श्रीस्वामिमहाराजांचे सर्व वाङ्मय द्वादश खंडांत प्रसिद्ध केले. इसवी सन १९५० मध्ये विजयादशमीच्या मुहूर्तावर यांपैकी 'शिक्षात्रयम्' या प्रथम खंडाचे प्रकाशन झाले. यांत श्रीस्वामिमहाराजविरचित कुमारशिक्षा, युवशिक्षा व वृद्धशिक्षा यांचा समावेश होता. तसेच कुमारशिक्षा व वृद्धशिक्षा यांवर श्रीस्वामीमहाराजांचीं संस्कृत भाष्ये आणि तत्कालीन विद्वानांनी केलेली मराठी विवरणेही दिली होती. यांपैकी संस्कृत भाष्यांचे पुस्तक आश्रमातर्फे यापूर्वीच प्रकाशित झाले आहे. स्वामिभक्तांची व जिज्ञासू मंडळींची मागणी लक्षांत घेऊन तीनही शिक्षांचे मूळ श्लोक मराठी भाषांतरासहित छापण्याचा योग श्रीस्वामीमहाराजांच्या कृपेने आज येत आहे. श्रीवासुदेवनिवासचे विश्वस्त मंडळ याबद्दल धन्यवादास पात्र आहे.

ही भाषांतरे ५० वर्षांपूर्वींच्या भाषेंत असल्याने आज थोडी दुर्बोध वाटण्याचा संभव आहे. त्याकरिता डॉ. राजाराम ल. जोशी, निवृत्त प्राध्यापक, संगमेश्वर कॉलेज, सोलापूर यांनी लिहिलेले शिक्षात्रयांचे परिचय या आवृत्तीत देत आहोत. मूळ आवृत्तीतील प्रकाशकाचे निवेदन, म.म.श्रीराजेश्वरशास्त्री द्रविड यांची मूळ संस्कृत प्रस्तावना व तिचे भाषांतरही या आवृत्तींत समाविष्ट केले आहे.

सांप्रदायिक व इतरही जिज्ञासू मंडळींना हा ग्रंथ लाभदायक व कल्याणप्रद होवो हीच श्रीस्वामिचरणी प्रार्थना.

**नारायण य. ढेकणे**
प्रमुख विश्वस्त, श्रीवासुदेवनिवास,
४२/१७, एरंडवणे, कर्वे रोड,
पुणे ४११०५२.

श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः

# शिक्षात्रय

मूळ श्लोक व मराठी भाषांतर

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | आशीर्वाद. | प.पू. श्रीनारायणकाका महाराज | ३. |
| २. | प्रकाशकाचे निवेदन | प.पू. योगीराज वा. द. गुळवणी महाराज | ५. |
| ३. | प्रस्तावना | म.म. राजराजेश्वरशास्त्री द्रविड | ९. |
| ४. | प्रस्तावना मराठी भाषांतर | | १०. |
| ५. | शिक्षात्रय - परिचय | प्रा. डॉ. राजाराम ल. जोशी | १५. |
| ६. | कुमारशिक्षा - प्रस्तावना | पंडितप्रवर विष्णुशास्त्री खरे | ३७. |
| ७. | कुमारशिक्षा - विषयानुक्रमणिका | | ४०. |
| ८. | कुमारशिक्षा - भाषांतर | पंडितप्रवर विष्णुशास्त्री खरे | ४४. |
| ९. | युवशिक्षा - प्रस्तावना | पंडित श्रीपादशास्त्री जेरे. | ८३. |
| १०. | युवशिक्षा - विषयानुक्रमणिका | | ८६. |
| ११. | युवशिक्षा - भाषांतर | पंडित श्रीपादशास्त्री जेरे. | ९०. |
| १२. | वृद्धशिक्षा- प्रस्तावना | वे.शा.सं. पं. आत्मारामशास्त्री जेरे | १३८. |
| १३. | वृद्धशिक्षा - विषयानुक्रमणिका | | १४७. |
| १४. | वृद्धशिक्षा भाषांतर | वे.शा.सं. पं. आत्मारामशास्त्री जेरे | १५१. |

श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः

# प्रकाशकाचे निवेदन

**सत्यं ज्ञानमनन्तं सच्छक्त्येकं कारणं परम्।**
**वन्दे निरुपमं सूक्ष्मं श्रीदत्तं तमतीन्द्रियम् ।।१।।**

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानन्दसरस्वती टेंबे स्वामि महाराज यांनीं तयार केलेले शिक्षात्रय म्हणजे कुमारशिक्षा, युवशिक्षा व वृद्धशिक्षा हे तीन ग्रंथ प्रकाशित करण्याचा सुयोग, अनंतशक्तिसंपन्न प्रभूचे कृपेनेंच आज येत आहे. हे निवेदन करण्यास अत्यंत आनंद वाटत आहे. श्रीमहाराजांचे संपूर्ण ग्रंथ छापून काढावेत या उद्देशाने गत वर्षी विजया दशमीस संकल्प करून या कार्यास आरंभ केला व लवकरच सर्वांच्या संमतीनें त्या त्या प्रांतांतील श्रीमहाराजांच्या सद्भक्तांपैकीं अकरा-बारा मंडळींचे एक मंडळ स्थापून त्याच्यातर्फे एक सविस्तर उद्देशपत्रकही प्रसिद्ध करून सर्वत्र पाठविले. त्याप्रमाणे ठिकठिकाणच्या श्रीमहाराजांच्या भक्तजनांचेकडून मिळालेल्या सक्रिय साहाय्यामुळे आज हे तीन ग्रंथ प्रकाशित होत आहेत. श्रीमहाराजांच्या असंख्य भक्तजनांपैकीं काही थोड्याच लोकांना या कार्याची माहिती आजपर्यंत होऊ शकली याचें कारण विशेष प्रचार करण्याच्या दृष्टीनें आधुनिक साधनांचा उपयोग मंडळाला या अल्प व प्राथमिक कालांत करता आला नाहीं हेच होय. तथापि या अल्पकाळांतहि जनताजनार्दनाने या कार्याबद्दल पूर्ण सहानुभूति व्यक्त केल्यामुळें प्रोत्साहित होऊन हे विशाल कार्य पूर्णतेस पोंचविण्याकरितां यापुढे शक्य तितका अधिक प्रयत्न मंडळास करावा लागणार आहे.

श्रीमहाराजांचें विभूतिमत्त्व सर्वत्र प्रख्यातच असल्यानें या तीन ग्रंथांबद्दल उपयुक्ततेच्या दृष्टीनें कांहीं लिहिणें आवश्यक ठरेल असें वाटत नाहीं. तथापि चार प्रसिद्ध शास्त्रज्ञ सज्जनांनी अत्यंत तत्त्वनिष्ठेनें लिहिलेल्या प्रस्तावना या ग्रंथाच्या, सोबत छापलेल्या असल्यानें, त्यांचे अवलोकनाने शास्त्रमार्गावर श्रद्धा ठेवणाऱ्या साधकांना व जिज्ञासूंना आपापल्या अधिकारानुरूप कर्तव्याचें ज्ञान निश्चित स्वरूपात होईल, अशी आम्हांला खात्री वाटत आहे. प्रसंगाने श्रीमहाराजांच्या संप्रदायाबद्दल मात्र चार शब्द लिहून ठेवणे अप्रस्तुत होणार नाही. कारण त्यामुळें महाराष्ट्रातील निरनिराळ्या संप्रदायातील सद्भक्तांना श्रीशुकाचार्य, श्रीमच्छंकराचार्य, श्रीज्ञानेश्वर महाराज यांच्याप्रमाणे असणारा श्रीमहाराजांचा सर्वात्मभाव अवगत होऊन त्यांच्या मनात कांही शंका असल्यास त्याही दूर होतील.

दैवी प्रकृतीचे महात्मे पुरुष, ईश्वराची उपासना कोणकोणत्या प्रकाराने करतात हा विषय भगवद्गीतेंत श्रीकृष्णप्रभूंनीं, 'ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये यजन्तो मामुपासते । एकत्वेन पृथक्त्वेन बहुधा विश्वतोमुखम्' या श्लोकांत मांडलेला आहे. यावर श्रीमच्छंकराचार्यांचें विवरण पुढीलप्रमाणें आहे - 'ज्ञानयज्ञेन ज्ञानमेव भगवद्विषयं यज्ञस्तेन...तच्च ज्ञानमेकत्वेन, एकमेव परं ब्रह्मेति परमार्थदर्शनेन यजन्त उपासतो । केचिच्च पृथक्त्वेन, आदित्यचन्द्रादिभेदेन, स एव भगवान् विष्णुरादित्यादिरूपेणावस्थित इत्युपासते । केचिद्बहुधाऽवस्थितः स एव भगवान् सर्वतोमुखो विश्वतोमुखो विश्वरूप इति तं विश्वरूपं सर्वतोमुखं बहुधा बहुप्रकारेण उपासते, यांत श्रीम दाचार्यांनी ज्ञानी पुरुषांच्या भजनाचे तीन प्रकार दाखविले आहेत. पहिला प्रकार - एकमेवाद्वितीय असें परमात्मतत्त्वच सर्वत्र आहे; त्यावाचून दुसरे काहीच नाही. हे ज्ञान म्हणजेच ईश्वराची उपासना. ही ज्ञाननिष्ठा पूर्णपणे संपादन केलेल्या पुरुषाची सातवी ज्ञानभूमिका शास्त्रज्ञांनी वर्णिलेली आहे. याच अवस्थेचे वर्णन श्रीगौडपादाचार्यांनी 'न निरोधो न चोत्पत्तिर्न बद्धो न च साधकः । न मुमुक्षुर्न वै मुक्त इत्येषा परमार्थता' या कारिकेत केलेले

आहे. अध्यारोप, अपवाद व पूर्णदृष्टि या तीन दृष्टींपैकी ही पूर्ण दृष्टि होय. ज्या ठिकाणी द्वैताचा पूर्णपणे लोप होतो. दुसरा व तिसरा उपासनेचा प्रकार ज्यांचा असतो असे ज्ञानी पुरुष त्यावेळीं सर्व जगत्, नियम्यनियामकरूप असणारे, पहात असूनही हे सर्वही भगवत्स्वरूप आहे, अशी त्यांची दृष्टि असते. याच दृष्टीचा आदेश 'ईशावास्यमिदं सर्वम्' या मंत्राने साधकांना दिलेला आहे. ही दृष्टि पूर्ण बाणली असता बंधक असणाऱ्या मनोमय द्वैताचा पूर्णपणे विलोप झालेला असतो. त्यामुळें बाह्य द्वैत हें त्याला बंधक होऊ शकत नाही. या स्थितीला पोचलेल्या जिवाचे वर्णन सर्वसंकल्पसंन्यासी, योगारूढ अशा शब्दांनी श्रीभगवान् करतात. या तीन प्रकारांपैकी मधला प्रकार म्हणजे जगत्कार्य करणाऱ्या सर्व हिरण्यगर्भादि विभूति एकाच ईश्वराची स्वरूपे आहेत ही अभेददृष्टि उत्पन्न होणें हा मोठा योग आहे. यांचेच वर्णन श्रीगणेशगीतेंत श्रीगणेशांनी 'शिवे विष्णौ च शक्तौ च सूर्ये मयि नराधिप । याऽभेदबुद्धिर्योगः स सम्यग्योगो मतो मम ।।' या श्लोकानें केलेले आहे. यालाच शास्त्रज्ञ पुरुष तत्पदार्थशुद्धि असे म्हणतात. पण हे ईश्वराद्वैत बाणण्याकरितां प्रथम कोणत्या तरी विशिष्ट स्वरूपाबद्दल प्रेमनिष्ठा पराकोटीला जावी लागते आणि याकरिताच त्या त्या महात्म्यांनी, ही प्रेम निष्ठा व्यक्त करून भिन्न भिन्न संप्रदायांच्या स्वरूपाने पूर्वोक्त अद्वैतनिष्ठेचा साधनमार्गच साधक जिवाकरिता प्रगट करून ठेवला आहे. या दृष्टीने विचार केला असता वास्तविक कोणत्याही संप्रदायाचा आत्यंतिक विरोध संभवत नाही. हे व्यक्त करण्याकरितांच श्रीशंकराचार्य महाराजांनी सर्वही उपासना मार्गांची पंचायतनपूजनपद्धतीने स्थापना केली. श्रीज्ञानेश्वर महाराजप्रभृति संत मंडळींनी सर्व सुखाचे आगर अशा रखुमादेवीवराच्या भक्तिमार्गाचा प्रसार केला. श्रीमहाराजांनींही याच दृष्टींने श्रीदत्तसंप्रदायाचें विशेष आविष्करण केलें. पण त्यांची अभेददृष्टि ही कायम होती हे त्यांच्या ग्रंथावरून कोणाच्याही लक्षात येईल. 'श्रीवैष्णवैशगाणेशसौर्यशाक्त्यादिरूपधृक् । दत्तात्रेयोऽस्त्वजोऽनन्तः सदा मे हृदि सद्गुरुः ।।' इत्यादि त्यांची पुष्कळ वचनें याबद्दल निदर्शन

म्हणून दाखवितां येतील. वृद्धशिक्षेत, सर्व उपनिषदांचा प्रतिपाद्य विषय भगवान् श्रीदत्तात्रेयच आहेत, हे केलेले वर्णन तर श्रीमहाराजांच्या, वरील अद्वैत दृष्टीला पूर्णपणें पोषक ठरेल. श्रीमहाराजांच्या स्तोत्रसंग्रहांत समाविष्ट न झालेला असा एकही देव राहिलेला नाही. श्रीमहाराजांची ही अभेददृष्टि नित्य जागृत असल्यामुळेच ते ज्या ज्या गांवी गेले त्या त्या गांवच्या सीमेवर ते येताच त्यांना त्या त्या ग्रामदेवतेचें दर्शन होत असे, असे त्यांच्या चरित्रात वर्णन आहे. याप्रमाणे जसे जसे श्रीमहाराजांच्या दिव्यचारित्र्यहीरकाचे परीक्षण करावे तशी तशी त्याची उज्ज्वलता अधिकच प्रत्ययाला येते. अशा या महापुरुषांचे, संपूर्ण शास्त्रसार व्यक्त करणारे हे तीन ग्रंथ असल्याने, यांचे तत्परतेने मनन झाल्यास सर्वही सांप्रदायिक साधक जनतेला अत्यंत उपयोग होणार आहे. याच उद्देशाने श्रीमहाराजांच्या अनेक ग्रंथांपैकी हे तीन ग्रंथच प्रथम मुद्रित केले आहेत. ग्रंथ मूळ टीकात्मक संस्कृत भाषेमध्यें असून कुमारशिक्षा व वृद्धशिक्षा या दोन ग्रंथांवर श्रीमहाराजांचीच सुबोध अशी संस्कृत टीका आहे. संस्कृत भाषेचें विशेष ज्ञान नसणाऱ्या जिज्ञासू जनांना अंशतः तरी उपयोग व्हावा या हेतूने शिक्षात्रयाच्या मूळ श्लोकावर उत्तम शास्त्रज्ञ पंडितांनी केलेले मराठी भाषांतरही सोबत जोडले आहे. साधन मार्गाच्या ज्ञानाविषयी अंतःकरणपूर्वक कळकळ व तदनुसार प्रयत्न झाल्यास या तीन ग्रंथांवरूनच वैदिक संस्कृतीचें निश्चित स्वरूप जिज्ञासूंना कळून आपापल्या साधनावस्थेतील अधिकारभूमिकाही कळून येतील यांत शंका नाही.

शिक्षात्रयाचें मुद्रण करण्याचा संकल्प प्रथम श्रीमज्जगद्गुरू श्रीशंकराचार्य श्रीशिरोळकर स्वामिमहाराज मठ संकेश्वर करवीर यांचे चरणांजवळ निवेदन केला. त्यावेळी लगेच श्रीचरणांनी एकशे एक रूपये देऊन या कार्यास आशीर्वाद दिला. या शुभाशीर्वाद प्रभावानेच हें कार्य एक वर्षाचे आंतच तडीस गेले, हे कृतज्ञता बुद्धीनें व्यक्त करण्यास आम्हाला अत्यंत समाधान वाटत आहे. अशीच, कृपाकूर्मदृष्टि या कार्याकडे असावी अशी

श्रीचरणसन्निध प्रार्थना आहे. अमरापूर येथील श्रीवासुदेवानन्दसरस्वतीपीठ या संस्थेच्या सर्व विश्वस्तांनींही या कार्याबद्दल पूर्ण सहानुभूति व्यक्त केली. त्यांच्या सत्संकल्पाचेंच हे मूर्तफल आज दिसून येत आहे, असें म्हणण्यास हरकत नाही. याबद्दल त्या सर्व विश्वस्तांचे आम्ही अत्यंत आभारी आहोंत.

या शिक्षात्रयावर पंडितराज राजेश्वरशास्त्री द्रवीड यांनी आमच्या विनंतीप्रमाणे रहस्योद्बोधक अशी संस्कृत प्रस्तावना लिहून दिली. तसेच पंडितप्रवर आत्मारामशास्त्री जेरे यांनी वृद्धशिक्षेचें, पं. श्रीपादशास्त्री जेरे यांनी युवाशिक्षेचे व पं. विष्णुशास्त्री खरे यांनी कुमारशिक्षेचे मराठी भाषांतर व प्रस्तावनाही लिहून दिली. या चौघा पंडितवर्यांचें, सर्व जनतेप्रमाणे आम्ही अत्यंत ऋणी आहोत; तसेच पुणे येथील वैदिक संशोधन मंदिराचे कार्यवाह श्री. नारायणराव सोनटक्के यांनी तर अत्यंत आत्मीयतेने; कागद मिळवून देणे, प्रुफे तपासणे, वेळोवेळी कार्याची चौकशी करून योग्य तो सल्ला देणें इत्यादि विविध प्रकारांनी साहाय्य करून हे कार्य पार पाडले याबद्दल त्यांचे व समर्थभारत प्रेसचे मालक श्री. सरदेसाई यांनीही हे मुद्रणकार्य अत्यंत आत्मीयपणाने करून दिले याबद्दल त्यांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत. वास्तविक या सर्वांना उपयुक्त अशा संतकार्यात 'स्तवावे ते कवणे कवणालागी' अशी स्थिती आहे. तथापि ज्यांनीं ज्यांनीं या कार्याबद्दल सहानुभूति व्यक्त केली त्या सर्वांचेही आभार मानणें आम्ही आमचे कर्तव्य समजतों.

श्रीमहाराजांच्या अवशिष्ट ग्रंथांचे मुद्रणकार्यहि जनता जनार्दनाच्या पाठिंब्याने लवकरच पार पडो अशी दिव्य शक्तिसंपन्न श्रीमहाराजांचे चरणाजवळ प्रार्थना करून हे अल्पसे निवेदन पुरे करतो.

श्रीचरणानुगृहीत

**वामन दत्तात्रेय गुळवणी,**

(२०, नारायण पेठ, पुणे २)

# ।। शिक्षात्रय प्रस्तावना ।।

श्रीगुरुःशरणम् ।

अथेयं प्रकाश्यते शिक्षात्रयी- कुमारशिक्षा, युवशिक्षा, वृद्धशिक्षेति प्रसिद्धा परमपूज्यपादानां अस्मत्परमगुरूणां कृतिः।'आप्तोपदेशः शब्दः' इति हि-शब्दप्रमाणलक्षणमनुसृत्येयं श्रीचरणान्तेवासिनां प्रमाणमूर्धन्यतामवलम्बते।

एतेषां चरणानामाप्ततमत्वं तु अस्य शिक्षात्रयस्यालोचने प्रमाणानुसारित्वेन स्पष्टं विद्योतत एवान्याप्तसाधारणं यथा, तथा धर्मविज्ञानवैराग्यैश्वर्यातिशययोगादपि साक्षात्कृततच्चरित्रेषु विद्योतितमासीत् आसेतुहिमाचलमित्यस्ति महान् विशेषः। श्रीचरणैर्ब्रह्मचर्यावस्थायां वेदाध्ययनकाले एव मन्त्रसिद्धिरधिगता शापानुग्रहसामर्थ्यं च यथाविधी वेदाध्ययनमात्रेणेत्यपरो महान् विशेषः। एतद्ग्रन्थप्रामाण्ये कारणान्तरम्।

आदर्शभूतं ब्रह्मचर्यमादर्शभूतं गार्हस्थ्यं तथाभूतं संन्यासानुष्ठानं च श्रीचरणैः प्रकटितमभूत् । तदेवात्र शिक्षात्रये पुरः परिस्फुरति । प्रथमाश्रमे यथाविधी सेवामात्रेण ईशोपलब्धिर्भवतीत्यत्र निदर्शनतया कुमारशिक्षायां, शिरोलपत्तनवृत्तं ब्राह्मण्याश्चरित्रं, प्रसङ्गाद्वेदप्रामाण्ये-श्वरास्तित्वादिकं शास्त्रीयप्रमेयजातम्; द्वितीयाश्रमे च सगुणोपासनायां यथाविधी कृतायां, भगवदुपलब्धिर्नारायणस्वामिनां चरितोपन्यासेन, तत्प्रसङ्गात् मीमांसशास्त्रसम्मतविधिभेदा, अर्थवादादिभेदा, वेदान्तसम्मतोपासनाभेदाश्च युवशिक्षायां प्रदर्शिताः। वृद्धशिक्षायां, ज्ञानोपलब्धौ सत्यां स्वोपास्यभगवद्दत्तरूपतापत्तिः वर्तमानतच्चरित्र - प्रकटनेन, तत्प्रसङ्गात् वेदान्तसम्मततत्त्वज्ञानविशदीकरणेन सह प्रदर्शिता । निदर्शनभूतं चरित्रत्रयमप्येतत् करालतमेऽपि कलिकाले शिष्टैः प्रत्यक्षतयोपलब्धिमस्तीति अयमपरो महान् विशेषो ग्रन्थत्रयस्यास्य प्रामाण्ये महत्कारणमस्ति ।

**'यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा ।**
**तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसम्भवम् ।।'**

इति गीतावचनानुसारेण श्रीचरणानामीश्वरावतारत्वे सिद्धे, राम कृष्णादितनूनां कलेः प्रागेवान्तर्हितत्वोक्त्या, भगवद्दत्तात्रेयमूर्तेश्च वर्तमान तोक्त्या सगुणभगवद्दत्तात्रेयरूपत्वं श्रीचरणानामवेद्यत इति रहस्यतमं वस्तु प्रकाशयामः।।

वैदिकाचारप्रतिष्ठापकमिदं रूपं श्रीचरणानां, युवशिक्षायां, ब्राह्मणानां श्रीभास्कररायदीक्षितप्रभृतिसमुन्नीतस्यापि तन्त्रमार्गस्य पञ्चमकारघटितस्य परिहार्यतां यद्व्यनक्ति, तत्र त्वपूर्वार्थत्वात् स्वातन्त्र्येण प्रामाण्यमाटीकते श्रीचरणानां कृतित्रयमिदम् । एतन्निर्माणे श्रीभगवद्दत्तात्रेयादेश कारणमि त्यत्रैवोल्लेखदर्शनात्, प्रत्यक्षीकृतेश्वराणां श्रीचरणानां माहात्म्यविशेषोऽपि दर्शितो भवति । एतेषां पाण्डुरङ्गाश्वत्थामकृष्णानर्मदाप्रभृतिदेवतादर्शनसंवादादिकं तु तच्चरित्रे विस्तृतमिति नात्र वितन्यते ।

**' यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।। '**

इति गीतावचनानुसारेण नूतनावतारप्रयोजनं दर्शितं भवति । श्रीचरणानां चरित्रविस्तरस्तु स्वतंत्रतया मुद्रितेन तच्चरित्रेण विदित एव शिष्टैः। अतः तद्विषये नात्र पुनर्विलिख्यते । एतदुपदेशानुगृहीततयोद्धृतेषु परस्सहस्रेषु दीनेषु दुरपनेयव्याधिशतपरिखिन्नदेहोऽयमप्येको दीनो लेखको रक्षितः श्रीचरणानुगृहीतैर्गुरुवरश्रीगोविन्दरावपण्डितयोगिवर्यैर्गुरुभिरुपदिष्ट्या योगकलयेत्येतावदेवं तु निवेदयामि । एवंविधस्य युगवाणीरूपस्य ग्रन्थत्रयरत्नस्य पुनः प्रकाशनं सुप्रसिद्धमाहात्म्यैः श्रीगुळवणीमहाशयैः समूहनिर्माणपुरस्सरं यत् कृतं तत्राधमर्णं धार्मिककुलमिति सामोदमावेदयाम च ।

**श्रीराजेश्वरशास्त्री द्राविडः**

श्रावण शु।।२ शनौ सं.२००८
साङ्गवेदविद्यालयः रामघाट, काशी.

## प्रस्तावना

(पंडितराज राजेश्वरशास्त्री द्रविड यांनीं शिक्षात्रयावर लिहिलेल्या संस्कृत प्रस्तावनेचा अनुवाद)

श्रीगुरूः शरणम् ।

आज कुमारशिक्षा, युवशिक्षा, वृद्धशिक्षा ही शिक्षात्रयी, अत्यंत पूज्य अशा आमच्या परमगुरूंची कृति, प्रकाशित केली जात आहे. 'आप्ताचा उपदेश म्हणजे शब्द' या शब्दप्रमाणाच्या लक्षणास अनुसरून ही त्रयी श्रीमहाराजांच्या भाविक शिष्यवर्गास अत्यंत प्रमाणभूत आहे.

हे शिक्षात्रय प्रमाणानुसार असल्याने यावरून श्रीमहाराज हे, इतर आप्तांप्रमाणे श्रेष्ठ आप्त आहेत हे जसे स्पष्टपणे कळून येते, तसेच ते अनेक लोकांनी प्रत्यक्ष पाहिलेल्या अशा धर्म, ज्ञान, वैराग्य व ऐश्वर्य या दिव्य गुणांनी युक्त, श्रीमहाराजांच्या विशुद्ध चारित्र्यावरूनही आसेतुहिमालयापर्यंत स्पष्ट झालेले आहे हा एक मोठा विशेष आहे. श्रीमहाराजांनी ब्रह्मचर्यावस्थेंत यथाविधी वेदाध्ययन करून त्या वेदाध्ययनाच्या काळांतच मंत्रसिद्धि व शापानुग्रहाचे सामर्थ्य मिळविले होते हा एक दुसरा मोठा विशेष, या ग्रंथाच्या प्रामाण्याचे दुसरे कारण आहे.

आदर्शभूत ब्रह्मचर्य, आदर्शभूत गृहस्थाश्रम व तसेच संन्यासाश्रमाचे अनुष्ठान श्रीमहाराजांनी करून दाखविले आहे. तेच या शिक्षात्रयांत स्पष्ट दिसत आहे. प्रथमाश्रमांत यथाविधी केवळ सेवेनेही ईश्वरदर्शन होऊं शकते, याबद्दल दृष्टांत म्हणून शिरोळ गांवातील एका ब्राह्मण स्त्रीचे चरित्र, व प्रसंगाने, वेदांचे प्रामाण्य, ईश्वरास्तित्व इत्यादि विविध शास्त्रीय प्रमेयांचे

वर्णन कुमारशिक्षेंत केले आहे. युवशिक्षेमध्यें, गृहस्थाश्रम घेतल्यावर यथाविधी सगुणोपासना केली असतां, भगवत्प्राप्ति होते, याबद्दल उदाहरण म्हणून श्रीनारायणस्वामींचे चरित्र सांगितले असून, प्रसंगाने मीमांसाशास्त्राला सम्मत असे वेदांतील विधीचे व अर्थवादाचे प्रकार आणि वेदान्तशास्त्राला सम्मत असणारे उपासनेचे प्रकारही दाखविले आहेत.

ज्ञानप्राप्ति झाली असतां, उपासक हा उपास्यदत्तरूप होतो असे दाखवून श्रीदत्ताचे सध्याचे चरित्रही दाखविले आहे व वेदान्ताला सम्मत अशा तत्त्वज्ञानाचे विशदीकरणही केले आहे; इतके विषय वृद्धशिक्षेंत दाखविले आहेत. निदर्शन म्हणून वर्णन केलेली ही तीनही चरित्रे, या घोर असणाऱ्याही कलिकालांत शिष्टजनांनी प्रत्यक्ष पाहिलेली अशी आहेत हा आणखी एक मोठा विशेष, या तीन ग्रंथाच्या प्रामाण्यास पोषक असे प्रबल कारण आहे.

**'यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा । तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम्'** या गीतेच्या वाक्यावरून श्रीमहाराज हे ईश्वरावतार आहेत हे सिद्ध झाले असतां, रामकृष्णादिक अवतार हे कलियुगाच्या पूर्वीच गुप्त झाले आणि भगवान् दत्तात्रेय हे मात्र आजही आहेत या वर्णनावरून श्रीमहाराज हे साक्षात् भगवान् दत्तात्रेयस्वरूप आहेत ही अत्यंत रहस्यभूत गोष्ट आज आम्ही प्रकाशित करीत आहोंत.

वैदिक आचारांची प्रतिष्ठा करण्याकरितां हे श्रीमहाराजांचे रूप आहे. म्हणून, श्री भास्करराय दीक्षित प्रभृति मंडळींनीं उचलून धरलेला असाही तंत्रमार्ग हा पंचमकारयुक्त असल्याने ब्राह्मणांना त्याज्य आहे; असा श्रीमहाराजांनी युवशिक्षेत जो अभिप्राय व्यक्त केला आहे; त्याविषयी तर, हे श्रीमहाराजांचे ग्रंथत्रय अर्थाच्या अपूर्वतेमुळे, स्वतंत्रपणे प्रमाणच ठरत आहे. हे ग्रंथ निर्माण करण्यास भगवान् श्रीदत्तात्रेयांचा आदेशच कारण आहे असा उल्लेख या ग्रंथातच श्रीमहाराजांनी केलेला आहे. यावरून ज्यांना ईश्वराचे प्रत्यक्ष दर्शन घडले आहे, अशा श्रीमहाराजांचे विशेष माहात्म्यही

दाखविल्यासारखे होत आहे. श्रीमहाराजांना, पांडुरंग, अश्वत्थामा, कृष्णा, नर्मदा इत्यादि देवतांचे दर्शन घडून त्यांच्याबरोबर संभाषणादि प्रसंगही लाभला हे त्यांच्या चरित्रांत विस्तृतपणे आले असल्याने या ठिकाणी त्याबद्दल आम्ही जास्त विवेचन करीत नाही.

**'यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत । अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्'** या गीतेच्या वचनास अनुसरून नवीन अवतार घेण्याचे कारणही दाखविले गेले आहे. श्रीमहाराजांच्या चरित्राचा विस्तार, स्वतंत्र मुद्रित झालेल्या त्यांच्या चरित्रावरून शिष्टजनांना विदित झालेलाच आहे. म्हणून त्याविषयीं येथें आम्ही पुनः कांही लिहीत नाही.

श्रीमहाराजांच्या उपदेशाने हजारों दीन जनांचा उद्धार झाला आहे; त्यांपैकीच हाही एक दीन लेखक असाध्य अशा अनेक व्याधींनीं ग्रस्त झाला असतां, श्रीमहाराजांच्या अनुग्रहाने संपन्न अशा योगिश्रेष्ठ श्रीगोविंदराव पंडित गुरूवर्यांनीं, महाराजांनीं सांगितलेल्या योगकलेच्या सामर्थ्याने, त्याचे त्या व्याधीपासून रक्षण केले एवढेंच मी निवेदन करतो.

याप्रमाणे युगवाणीरूप असे हे ग्रंथत्रय, आज न मिळणारे, त्याचे पुनः प्रकाशन, ज्यांचे माहात्म्य अत्यंत प्रसिद्ध आहे असे श्री. गुळवणी महाशय हे एक मंडळ स्थापून करीत आहेत; त्याबद्दल सर्व धार्मिक जनता त्यांची ऋणी आहे, हे अत्यंत संतोषाने मी कथन करतो.

श्रावण शु॥२ शनिवार सं.२००८
साङ्गवेद विद्यालय, रामघाट, काशी.

**श्रीराजेश्वरशास्त्री द्राविड**

# शिक्षात्रयम्

**गजाननमहं वन्दे कार्यकारणमानुषम् ।**
**शेगाववासिनं नित्यं सर्वकार्यार्थसिद्धये ।।१।।**
**वामनं वासुदेवं च नौमि वाक्यार्थसिद्धये ।**
**यैरेव मानुषं जन्म सत्कर्तुं चोदना कृता ।।२।।**
**कवीश्वरगुरून् वन्दे दत्तात्रेयाभिधापरान्।**
**येषां कटाक्षपातेन कृतार्थो जायते नरः ।।३।।**

प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामिमहाराजांच्या 'शिक्षात्रयम्' या ग्रंथाचा प्रास्ताविक परिचय, या ग्रंथाचे महत्त्व, त्याची उपयुक्तता याचे विवेचन संस्कृतचा विशेष अभ्यास नसणाऱ्या साधकांकरिता करण्याचा पू. गुरुचरणांचा आदेश झाल्याने 'यथाधीतं' 'यथामति' या सूतांच्या उक्तीप्रमाणे या ठिकाणी प्रयत्न केला आहे. प. प. श्रीस्वामिमहाराजांच्या वाङमयाचे महत्त्व अनेकविध आहे. अनेक साहित्यिक गुणांनी मण्डित असलेलें, अद्वैतवेदान्त सिद्धांताची सूक्ष्म बैठक असलेले, अदृष्टप्राप्ति व चित्तशुद्धी प्राप्त करून देणारे हे वाङ्मय पी.एच.डी. परीक्षेचा विषय बनलें यात आश्चर्य नाही. या वाङ्मयाची उपासनेद्वारा होणारी उपयुक्तता दृष्टीआड करून चालणार नाही. स्वामिमहाराजांच्या संप्रदायात प्रसिद्ध असलेल्या प्रश्नावलीतून अनेकांना जी साधने मिळतात त्यात 'शिक्षात्रयाचे सार्थ वाचन' असे एक साधन आहे. या साधनाचे अनुष्ठान करणाऱ्या उपासकांना हे विवेचन, मननासाठी उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो.

'शिक्षात्रयम्' या ग्रंथाचे कुमारशिक्षा, युवशिक्षा व वृद्धशिक्षा असे तीन पोटभाग असून त्यांचे विवेचन क्रमशः करू.

# कुमारशिक्षा -परिचय

हाती घेतलेला ग्रंथ निर्विघ्नपणे पूर्ण व्हावा, यासाठी वेदानुसारी ग्रंथकार मङ्गलश्लोक लिहितात. या परंपरेनें स्वामिमहाराजांनी पहिल्या श्लोकात श्रीदत्तात्रेयांना वंदन केले आहे. केवळ वंदनात्मक असलेल्या श्लोकातूनसुद्धा जो अर्थ सूचित होतो, तो अपेक्षितच आहे. एवढेच नव्हे तर दत्तसंप्रदायाच्या प्रत्येक जागृत साधकाला तो माहीत असणे आवश्यक आहे, एवढे याचे महत्त्व आहे. आपण ज्यांना दत्तात्रेय किंवा दत्तमहाराज म्हणून संबोधतो ते म्हणजे प्रत्यक्ष जगताच्या उत्पत्ति-स्थिति-लयाचे अंतिम कारण असणारे परमात्मतत्त्वच होय. ते अतिसूक्ष्म, म्हणूनच अतीन्द्रिय आहे. कुंभार हा घटाचे निमित्त-कारण असून माती ही उपादानकारण आहे. परमात्मतत्त्व हे जगताचे निमित्तकारण व उपादानकारण असे दोन्ही प्रकारचे कारण आहे. मातीत जसा बदल घडतो तसा या परमात्म तत्त्वांत बदल घडत नाही. म्हणजेच ते निर्विकार असूनही उपादानकारण असणे हे फक्त विवर्तवादातच संभवते. सर्वव्यापकाला कारणत्व हे सुद्धा विवर्तवादांतच होऊ शकते. त्या परमतत्त्वाने मायेच्या आश्रयाने निरनिराळे अवतार घेतले. त्यातील एक अवतार दत्तात्रेयांचा होय.

सत्य-ज्ञान-अनंत हेच स्वरूप दत्तात्रेयांचे म्हणजेच परमात्म्याचे असून तेच वस्तुतः जिवाचेही स्वरूप होय, हा वेदान्ताचा अपूर्व म्हणजे इतरत्र कोठेही न आढळणारा सिद्धांत बालवयापासून मनावर बिंबवण्यासाठी,(कौमार आचरेत् प्राज्ञ धर्मान् भागवतानिह। भागवत धर्माचे आचरण बाल्यावस्थेतच केले पाहिजे. (भागवत ७:६:१) या कारणाकरिता ही कुमारशिक्षा दयार्द्र बुद्धीने श्रीस्वामिमहाराजांनी लिहिली आहे. या शिक्षेतील चिंतनाने स्वस्वरूप

मिळविण्याचा प्रयत्न - निदान त्यासाठी प्रारंभ - प्रत्येकाने करून कृतकृत्य व्हावे एवढीच वाजवी अपेक्षा श्रीस्वामिमहाराजांची असणार. कुमारशिक्षा केवळ बालांनाच नव्हे, तर बालवयात तसे संस्कार न झालेल्या सर्वांनाच उपयोगी पडणार आहे.

या परमेश्वराचे अस्तित्व कोणीही नाकारू शकत नाही. त्याचे वर्णन परम आप्त असलेल्या वेदांनीच केलेले आहे. वेद हे अपौरुषेय आहेत, म्हणजे कोणीही जाणीवपूर्वक ते उत्पन्न केलेले नाहीत. या वेदांवर नितान्त श्रद्धा असणे आवश्यक आहे. त्या वेदांचे अनुसरण करणारी निरनिराळी शास्त्रे हीही प्रमाणभूतच आहेत. त्यांना स्मृतिग्रंथ म्हणतात. वेदांना श्रुति म्हटले जाते. श्रुति व स्मृति हे माणसाच्या दोन डोळ्यांप्रमाणे आहेत. सर्व ज्ञान प्राप्त करून घेण्याचे साधन म्हणजेच श्रुति व स्मृति. या श्रुति-स्मृतींनी मनुष्याला सत्कर्माकडे प्रवृत्त व असत्कर्मापासून निवृत्त करण्याचा प्रयत्न केला. म्हणून श्रुति-स्मृतींचा अभ्यास यावच्छक्य सद्गुरूच्याकडून करणे आवश्यक आहे. हे अध्ययन करीत असता तर्काचा अवलंब करणे जरूरीचें आहे. परंतु तो तर्क शुष्क नसावा. वेदानुकूल असाच तर्क असावा. केवळ आपल्या बुद्धीने वेदमंत्रांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करू नये. प्रकरण, इतर वेदान्तवाक्ये व वेदानुकूलतेच्या साहाय्याने मंत्रांचा अर्थ लावावा. कर्मे करीत असताना अनेक संशय उत्पन्न होणे स्वाभाविक आहे. अशा वेळी जाणकार, सदाचार-संपन्न ब्राह्मणांना विचारून संशयाचे निरसन करून घेणे आवश्यक आहे. श्रीस्वामिमहाराज हे वेदोक्त कर्ममार्गाविषयी अत्यन्त आस्था बाळगणारे होते. लोकांची पळवाट काढण्याची वृत्तीही त्यांना ठाऊक होती. त्यामुळे त्यांनी असा स्पष्ट अभिप्राय दिला आहे की, **संकटकालीच फक्त गौण मार्गाचा अवलंब केला पाहिजे.**

संकटकाल नसताना 'आद्य कल्पाने' म्हणजे मुख्य प्रकाराने, म्हणजे जसे सांगितले आहे, तसेच कर्म केले पाहिजे. अशा प्रकारे ईश्वरार्पणबुद्धीने जर धर्मानुष्ठान केले तर पाप नाहीसे होते, म्हणजेच चित्तशुद्धी होते. ज्या

चित्तशुद्धीची सर्वत्र वेदान्तात अपरिहार्यता वर्णन केली आहे. ती चित्तशुद्धी कशी होते, हे स्वामिमहाराजांनी सहजपणे सांगून त्याद्वारा ब्रह्मज्ञान-मोक्ष, प्राप्त होत असल्याचे सांगितले आहे. असे संपूर्ण शास्त्रसिद्धान्त तात्पर्यरूपाने प्रतिपादन करण्याचे महाराजांचे कौशल्य हे असामान्य आहे. ईश्वरार्पणबुद्धीने कर्तृत्वाभिमान उत्पन्न होत नाही व त्यामुळे जन्म-मरण परंपरेला कारण ठरणारी वासनाच निर्माण होत नाही. याचाच अर्थ, कर्म हे बंधनकारक होत नाही. अशा प्रकारे संपूर्ण गीतेचे सार या ठिकाणी आले आहे. अशा प्रकारची कर्मे फलाची अभिलाषा सोडून केल्यास 'मुमुक्षुत्व'- मोक्षप्राप्तीची तीव्र इच्छा उत्पन्न होते. वेद अध्ययनाने ऋषिऋण, यज्ञयागादिकांनी देवऋण व संतति निर्माण करून पितृऋण, अशा तीन ऋणांतून मुक्त झाल्यानंतर जर कोणी कर्म सोडून मोक्षमार्गाला गेला, तर त्याला कोणतेही विघ्न उत्पन्न होत नाही. कर्म मुळीच न करणे किंवा कर्म हेच शेवटपर्यंत आत्यंतिक कल्याणाला कारण होते असे मानणे, हे दोन्ही प्रकार चुकीचे आहेत. प्रथम कर्म करणे हेही आवश्यक व नंतर तें सोडणे हेही आवश्यक (त्यजतैव हि तज्ज्ञेयम्) चित्तशुद्धीपर्यंत कर्म केलेच पाहिजे. दीर्घकालापर्यंत कर्म करूनही शम-दमादिक उत्पन्न झाले नाहीत, म्हणजेच चित्तशुद्धी झाली नाही, तरीही मरेपर्यंत कर्मे करावीतच. त्यांची फले पुढल्या जन्मी मिळाल्याशिवाय राहणार नाहीत. या जन्मात आवश्यक तीं कर्मे न करताच चित्तशुद्धि झालेला एखादा मनुष्य दिसून येतो. त्याने पूर्वजन्मी तशी कर्मे केली असली पाहिजेत, हे अनुमान करण्यास काहीही हरकत नाही. कारण, कारणाशिवाय कार्य घडूच शकत नाही व (नाभुक्तं क्षीयते कर्म - देवीभागवत) केलेल्या कर्माचे फळ (चांगले किंवा वाईट) उपभोगावेच लागते, या सिद्धान्ताप्रमाणे या जन्मी उपभोग न घेतलेल्या कर्माचे फल पुढच्या जन्मी प्राप्त होतच असते. भारतीयांचा हा कर्मसिद्धान्त अनन्यसाधारण आहे. त्याचे मर्म बाल्यावस्थेपासूनच जाणून घेतले पाहिजे अशी स्वामिमहाराजांची अपेक्षा आहे. साधकाने हे सर्व जाणून, अत्यंत दक्षतेने अनाचार व अतिचार यांच्या

टोकाला न जाता कर्म केले पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे.

अशा प्रकारें सदाचाराने धर्म, धर्माचरणाने संपत्ति, धर्माशी विरोध येणार नाही अशा प्रकारे विषयोपभोगांची प्राप्ती, नंतर मोक्षप्राप्तीही होऊ शकेल. एका सुभाषितात 'धनाद्धर्मं' म्हणजे धनाच्या द्वारा धर्मप्राप्ती होते असे म्हटले आहे. इथे धर्माचरणाने संपत्ति (धर्मेण अर्थं च साधयेत । कुमार १६) असे त्याच्या उलट म्हटले आहे. परंतु यांचा विरोध नाही. संपत्तीमुळे धर्माचरण करता येते व धर्माचरणामुळे संपत्ती प्राप्त होते असे अनुभवास येते. (बीजाङकुरवत् अन्योन्याश्रयो न दोषाय।)

हे धर्माचरण करीत असतां सत्संग अत्यंत आवश्यक आहे. दुर्जनांच्या सहवासात आपला बुद्धिभेद होण्याची शक्यता जास्त असते. चित्तशुद्धि होईपर्यंत कोणालाही कर्माचा त्याग करून संन्यास घेता येत नाही. स्वतःची योग्यता किती आहे हे प्रत्येकाने स्वतःच जाणले पाहिजे, दुसऱ्याला ती पूर्णांशाने जाणता येत नसते. शुभेच्छा, विचारणा, तनुमानसा, सत्त्वापत्ति, असंसक्ति, पदार्थाभावना व तुर्यगा अशा ज्ञानाच्या सात भूमिका आहेत. त्यातील पहिली भूमिकाही प्राप्त न झालेल्या माणसाचा एकदम वरच्या पायरीवर जाण्याचा प्रयत्न जसा हास्यास्पद आहे, तसेच चित्तशुद्धि न होता कर्मत्याग करणे हे हास्यास्पद आहे. केवळ हास्यास्पद नव्हे, तर ते क्लेशदायक ठरेल; असा स्पष्ट इशारा स्वामिमहाराजांनी दिला आहे. आपली योग्यता नसताना संन्यास किंवा अष्टांगयोग यांच्या प्राप्तीची इच्छा करण्यापेक्षा प्रत्येक साधकाने प्रथम अभयादि दैवी-संपत्ती मिळविण्याचा प्रयत्न करणे अधिक उपकारक ठरणारे आहे.

प्रसंगाने देवतांच्या स्वरूपाविषयी विचार मांडला आहे. मीमांसकांच्या मते देवता म्हणजे मंत्रच, त्यांना स्वतंत्र शरीर नसते. या मताचा स्वीकार न करता स्वामिमहाराजांनी श्रुती व स्मृती यांच्या आधाराने इंद्र-शंकरादि देवतांना विग्रह म्हणजे शरीर असते, हे अद्वैतवेदान्तानुसार उत्तर दिले. शरीर असूनही या देवता एकाच वेळी अनेक यज्ञात आहुती घेण्यास योगी

पुरुषाप्रमाणे अनेक शरीरे धारण करून जाऊं शकतात व सूक्ष्मरूपाने तेथील हविर्भाग घेतात, असा युक्तिवाद महाराजांनी केला आहे.

कर्म करण्याकरता देहाच्या ठिकाणी अहंबुद्धि असणे आवश्यक असते आणि ती असेपर्यंत ज्ञान उत्पन्न होऊ शकत नाही. अशाप्रकारे ज्ञान व कर्म यांच्यामध्ये अत्यंत विरोध असल्यामुळे त्यांचा समुच्चय म्हणजे एकाच वेळी दोहोंचे अस्तित्व संभवत नाही. असे ईशावास्योपनिषद् मंत्रांचा उल्लेख करून त्यांनी प्रतिपादन केले आहे.

वेदांची व ईश्वराची अवज्ञा करणे हे नास्तिकपणाचे लक्षण असून असा मनुष्य जिवंत असून मेल्यासारखाच समजावा. तो नरकातच पडेल असे कुमारशिक्षेत स्पष्ट बजावले आहे. उलट ईश्वराचे अस्तित्व मानणारा व वेदोक्त कर्माविषयी आस्था बाळगणारा मोक्षाला जातो असे सांगून केनोपनिषदातील एक आख्यायिका या विवेचनाच्या संदर्भात सांगितली आहे. कुमारांच्या प्रमाणेच इतर सर्वांनाही अतिशय मनोवेधक व उद्बोधक अशी वाटणारी असून ती कथा पुढीलप्रमाणे आहे -

देव व असुर यांच्यामध्ये एकदा भीषण संग्राम झाला. असुरांचा प्रचंड संहार करून ईश्वराने देवांना जय मिळवून दिला. या जयामुळे देवांची भावना अशी झाली की, आपणच हा विजय मिळवला. परमेश्वराने आपल्याला विजय मिळवून दिला असे त्यांना वाटेनासे झाले. अहंकार हा आत्मविनाशाला कारण होतो, म्हणून देवांना झालेली ही अहंकारबाधा दयाघन प्रभूला पाहवली नाही, त्याने अतिशय मोहक रूप धारण केले व तो त्यांच्या समोर प्रकट झाला. ते रूप अत्यंत तेजस्वी होते. असे तेज देवांच्या पैकी कोणी यापूर्वी पाहिले नव्हते. म्हणून देवांनी आपल्यामधील अतिशय चतुर असलेल्या अग्नीला त्या अपूर्व रूपाला ओळखण्यासाठी त्याच्याकडे पाठविले. त्या तेजाने, तू कोण आहेस व तुझ्यात काय सामर्थ्य आहे?, हे अग्नीला विचारले असता अग्नीने सांगितले की, पृथ्वीवरील सर्व पदार्थ जाळून टाकण्याचे आपले सामर्थ्य आहे. त्याची परीक्षा पाहण्यासाठी ईश्वराने

त्याच्यापुढे गवत ठेवले व ते त्याला जाळण्यास सांगितले. सर्व शक्ति पणाला लावून अग्नीने ते जाळण्याचा प्रयत्न केला, परंतु तो गवत जाळू शकला नाही. अग्नि खजील होउन देवांच्याकडे परत गेला व हे काही आपल्याला कळू शकत नाही असे त्याने कबूल केले. नंतर देवांनी या कामगिरीवर वायुदेवाला पाठविले. अग्निप्रमाणेच वायूला त्या 'यक्ष'रूप धारण केलेल्या ईश्वराने 'तू कोण?' 'तुझे सामर्थ्य काय ?' हा प्रश्न विचारला असता वायूने उत्तर दिले की, 'मी आकाशसंचारी वायु असून पृथ्वीवरील सर्व वस्तु उडवून देण्याचे माझे सामर्थ्य आहे'. ते ऐकून ईश्वराने ते गवत त्याच्यापुढे ठेवून उडविण्यास सांगितले. वायू ते उचलूही शकला नाही. लज्जित होउन हे रूप म्हणजे नक्की काय आहे, हे आपल्याला ओळखता येत नाही अशी कबुली त्याने दिली. नंतर देवांनी इंद्राला ते रूप जाणून घेण्याच्या कामगिरीवर पाठविले. इंद्र येत असतानाच ते रूप अंतर्धान पावले. हजार डोळ्यांच्या इंद्राला सुद्धा ते रूप दिसेना म्हणून तो खिन्न होऊन तिथेच राहिला. तो ईश्वरचिंतन करू लागला. त्याला अकस्मात् अतिशय सुंदर अशा उमादेवीचे दर्शन झाले. अंतराळात उभ्या असलेल्या तिला इंद्राने विचारले की, 'मी समोर आताच बघितलेले (यक्षरूप) कोणी धारण केले होते?' तिने सांगितले 'तो सर्वांच्या अंतःकरणात निवास करणारा प्रत्यक्ष परमेश्वरच असून तुमचा अहंकार नाहीसा करण्यासाठी प्रगट झाला होता'. इंद्राने सर्व देवांसह ईश्वराची स्तुति केली, अशा रीतीने देवांचा अहंकार नाहीसा झाला. सर्व देवतांना शरीर असते हे या आख्यानाचे तात्पर्य असल्याचे स्वामींनी सांगितले आहे.

या कथेचे आणखीही एक महत्त्वाचे तात्पर्य आपल्या दृष्टीने आहे, ते म्हणजे देवांना सुद्धा अहंकार असतो; नसल्यास केव्हाही उत्पन्न होऊ शकतो. तो वाढल्यास विनाशालाच कारणीभूत होतो. तसा होऊ नये अशी काळजी हृदंतरवासी परमेश्वरच घेत असतो. म्हणूनच आपल्या जीवनात संकटे, अडचणी, अपयश ही उत्पन्न होत असतात. त्यामुळे

आपला कर्तृत्वाचा अहंकार नाहीसा होऊन, ''विपदः सन्तु नः शश्वत्।'' या कुन्तीदेवीच्या मागणीप्रमाणे परमेश्वराची आराधना आपल्या हातून घडते.

धर्मशास्त्र, इतिहास, पुराणे इत्यादि ग्रंथांतून असे प्रतिपादन केले आहे की, ईश्वर हा एकमेवाद्वितीय असा असला, तरी मायेच्या आश्रयाने तो देवी, गणपति, विष्णु, शंकर व सूर्य अशी पाच रूपे, भक्तांवर अनुग्रह करण्याकरिता धारण करतो. पूर्वी त्याने कश्यपादिकांना वरदान देऊन अवतार घेतला. सध्या कलियुगांतही कृष्णातीरी तो जागृत असल्याची ग्वाही महाराजांनी दिली आहे. भक्तांचा विश्वास दृढ होण्यासाठी स्वामि महाराजांसारख्यांची आश्वासने उपयोगी पडतात; नव्हे ती आवश्यकच आहेत. कृष्णातीरी जागृत असलेल्या, भगवान् दत्तात्रेयांचा अवतार धारण केलेल्या परमेश्वराची एक लीला कुमारशिक्षेच्या शेवटी सांगितली आहे. सर्वांच्या परिचयाची असलेली कथा थोडक्यात अशी आहे. कोल्हापूर जिल्ह्यात कृष्णानदीच्या उत्तरेला शिरोळ नावाचे एक गाव आहे. तेथे श्रीनृसिंहसरस्वतीस्वामिमहाराज भिक्षेकरिता दत्तभक्त अशा दांपत्याच्या घरी गेले. लक्ष्मीपति असूनही संन्यासधर्माचे आचरण कसे असते हे आपल्या आचरणाने इतरांना दाखविण्यासाठीच श्रीगुरू भिक्षा मागण्यासाठी तेथे गेले. यतिधर्माला अनुसरून दंड घेऊन, किडा-मुंगीही मरणार नाही अशा रीतीने पावले टाकीत ते त्या ठिकाणी आले. श्रीगुरूंनी भिक्षा मागितल्यावर ब्राह्मण पत्नीने त्यांचे स्वागत केले. श्रीगुरू हातपाय धुऊन आसनावर बसले. त्या साध्वीने महाराजांचे चरणोदक घेतले, त्यांची पूजा केली. 'आपणासारखे महात्मे देवापेक्षाही श्रेष्ठ असतात; त्यांच्या केवळ दर्शनानेही पापराशींचा नाश होतो' असे म्हणून त्यांची स्तुति केली. तिने अशीही प्रार्थना केली, 'आपण प्रत्यक्ष विष्णुस्वरूप आहात, आपल्याला भोजन दिल्याने संपूर्ण त्रैलोक्यानेच भोजन केल्यासारखे होते, माझे पति बाहेर गेले आहेत, तरी ते परत येईपर्यंत आपण थांबावे व भोजन करूनच जावे'. 'ते येण्यापूर्वीच भिक्षा घाल' असे म्हणालात, तर तसेही करीन. श्रीगुरूंनी तिला सांगितले,

"आपण क्षुधापीडित असल्याने ताबडतोब भिक्षा वाढावी. चांगले-वाईट, कमी-जास्त असा विचार मी अन्नाच्या बाबतीत करीत नसतो, कारण मी रसनेन्द्रियावर जय मिळविला आहे. तेव्हा जे असेल ते ताबडतोब वाढ." श्रीगुरूंनी असे म्हणण्याचा हेतु असा होता की, तिच्या पतीची अद्यापि गुरुदर्शनाची योग्यता नव्हती. घरी पत्रावळ नव्हती. पत्रावळीसाठी पाने आणण्यासाठी ती बाहेर जाणार तेवढ्यात श्रीगुरूंनी अंगणातून एक मोठी शिळा आणून जमिनीवर पाण्याने चौकोनी मंडळ काढून, त्यावर प्रोक्षण करून ती ठेवली. तिच्यावर ॐकारयुक्त आठ पाकळ्यांचे कमळ काढून भिक्षा वाढण्यास तिला सांगितले. तिनेही त्या पवित्र पात्रात जोंधळ्यांच्या कण्यांची भिक्षा वाढली. पोटभर खाण्याची विनंती केली. त्यांनी ती मान्य करून यथाशास्त्र भिक्षा केली. 'विदुराच्या कण्यांप्रमाणे आपण आमच्या कण्या गोड मानून खाल्ल्या.' अशी तिने श्रीगुरूंची स्तुती केली.

कण्यारूपी हविर्द्रव्याने सर्वात्मस्वरूप असलेल्या भगवंताला संतुष्ट करून, अग्निहोत्री ब्राह्मणाला सुद्धा न मिळणारे पुण्य, त्या साध्वीने मिळविले. या विधानाचे स्पष्टीकरण करताना स्वामिमहाराज म्हणतात, अग्निहोत्री जे अर्पण करतो, ते तो प्रत्यक्ष परमेश्वराला अर्पण करू शकत नाही, तर अग्नीच्या द्वाराच अर्पण करू शकतो आणि तेही मर्यादितच. इथे तर या साध्वी ब्राह्मणीने साक्षात् परमात्म्यालाच आणि तेही पोटभर वाढल्याने तिचे पुण्य अग्निहोत्र्याच्या पुण्यापेक्षा अधिकच होय.

भगवान् त्या कण्या खाऊन संतुष्ट होऊन तिथून अंतर्धान पावले. श्रीगुरूंनी ब्राह्मण-पत्नीला काही आशीर्वाद दिलाच नाही. प्रत्यक्ष परमात्माच संतुष्ट झाल्यावर निराळ्या आशीर्वादाची आवश्यकता नसते. तो दत्तभक्त ब्राह्मण नंतर घरी परत आला. त्याला सर्व वृत्तान्त कळला. श्रीगुरुमहाराजांची बोटे उमटलेले ते शिळापात्र पाहून त्याला आनंद झाला. आपल्याला श्रीगुरूंचे दर्शन झाले नाही, त्याबद्दल त्याला खेदही झाला. स्त्रियांना संध्यादि आचार नाही, जपादि अनुष्ठान नाही. परंतु अशा प्रकारचा परमेश्वराचा अनुग्रह

त्यांच्यावर होऊ शकतो, हे त्याच्या लक्षात आले. आपल्याला अशी भार्या मिळाल्याबद्दल त्याला धन्यता वाटली. आपल्या पूर्व पुण्याईने घडलेल्या या घटनेमुळे आता आपला भविष्यकाळ उज्ज्वल असल्याची त्याची खात्री झाली. त्या भोजनपात्राची दररोज पूजा करून तो कृतकृत्य झाला. त्याला सर्वविध ऐश्वर्य प्राप्त झाले. या आख्यायिकेचा मुख्य भावार्थ असा आहे की, अतिथी कसाही असला तरी त्याचा सत्कार करावा, अवमान करू नये. आणखी एक सूचित अर्थ या कथेतून कळतो, तो सांप्रत अधिक उपयोगाचा आहे. 'पुरुषांनी करावयाची सर्व अनुष्ठाने स्त्रियांनी करण्यास काय हरकत आहे?' या शंकेचें उत्तर मिळतें.

पुरुषाच्या बरोबरीने सर्व काम करण्याचा हक्क व योग्यता असलेल्या सध्याच्या काळात अमुक एखादे अनुष्ठान किंवा ग्रंथवाचन स्त्रियांनी करू नये असे म्हटल्यावर त्यात स्त्रियांच्या बाबतीत अनुदार दृष्टिकोनाचा वास लोकांना येत असतो. वस्तुतः तसे म्हणणे, तशी विचारसरणी मुळीच नाही. स्त्रीच्या उत्कर्षाचा विचार कधीही डोळ्याआड केला गेला नाही. प्रस्तुतच्या कथेवरूनही हेच स्पष्ट दिसून येते की, सर्व काही करण्याचा हक्क किंवा अधिकार असलेल्या ब्राह्मणाला जे भगवद्दर्शन झाले नाही ते वेदाध्ययनाचा अधिकार नसलेल्या त्याच्या पत्नीला झाले. अतीन्द्रिय ज्ञान असलेल्या महर्षींनी घालून दिलेले नियम केवळ लौकिक व्यवहाराच्या फूटपट्टीने मोजून चालणार नाहीत. त्यातून अन्तिम हित होऊ शकणार नाही. उलट अकल्याण होण्याचीच शक्यता अधिक असते. अशा प्रकारे कुमारांना अल्प खाद्याप्रमाणे असलेली ही कुमारशिक्षा प.प. श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामि महाराजांनी कार्तिकस्वामींच्या पर्वतावर असताना, शास्त्रसिद्धान्ताचे अध्ययन न केलेल्या साधकांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी लिहिली.

**डॉ. रा. ल. जोशी**
निवृत्त प्राध्यापक
संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर

# युवशिक्षा परिचय

कुमारशिक्षेत सांगितलेल्या साधनांचे अनुष्ठान केलेल्या साधकाला उपासनामार्गाचा उपदेश करण्यासाठी ही युवशिक्षा लिहिली आहे. कुमार-शिक्षेप्रमाणे युवशिक्षेचाही प्रारंभ, श्रीदत्तात्रेय गुरूंना वंदन करूनच केला आहे. वंदनरूप असलेल्या मंगल श्लोकात श्रीदत्तात्रेय हे धर्माचे रक्षण करणारे, भक्त कैवारी, सर्व पातकांचा नाश करणारे, जितेन्द्रिय व अतिशय शान्ति-संपन्न असल्याचे वर्णन केले आहे. आपणही आपल्या पातकांचा नाश होऊन आपला उद्धार होण्यासाठी, श्रीदत्तात्रेयांचा आश्रय केला पाहिजे. आपलाही कैवार श्रीदत्तात्रेयांनी घ्यावा अशी इच्छा असेल तर आपणही खरे भक्त झाले पाहिजे; अशा प्रकारचा उपदेश या मंगलश्लोकात केला आहे. दत्तात्रेयांच्यासारखी शांति प्राप्त करून घ्यावयाची असेल तर जितेंद्रिय व्हावेच लागेल, हेही यातून शिकता येते. श्रीदत्तात्रेय हे भक्तपक्षपात का करतात याचे उत्तर असे की, त्यांचा अवतार धर्मरक्षणासाठी असल्यामुळे धर्माचरण करणाऱ्या भक्तांची बाजू घेणे अपरिहार्यच ठरते. भक्ताची चित्तशुद्धि करून त्याला ते ज्ञान देत असल्यामुळे त्याचे 'सुशिक्ष' असे या श्लोकात वर्णन केले आहे. 'अशा प्रकारच्या दत्तात्रेयांचे मी भजन करतो' असे म्हणून श्रीस्वामिमहाराजांनी या 'युवशिक्षा' ग्रंथाचा विषय भजन म्हणजेच उपासना आहे, हेही सूचित केले आहे. या उपासनेचे पर्यवसान ईश्वरप्रसादात व्हावयाचे असल्याने, हे प्रयोजनही सांगितल्यासारखे होते.

भगवंताचे भजन किंवा त्याची उपासना करण्यासाठी त्याचे स्वरूप सांगून, तो फलदाता असल्याचे वर्णन केले आहे. तो जगताच्या उत्पत्ति-स्थिति-लयाला कारण आहे. मात्र तो नित्य असल्याने त्याचे कोणीही कारण

नाही. तो फलदाता आहे, परंतु प्रत्येक जिवाच्या कर्माला अनुसरूनच फल देतो; स्वतंत्रपणे नाही. त्यामुळे त्याला वैषम्य व नैर्घृण्य हे दोष येत नाहीत. अन्यथा कोणाला सुखी व कोणाला दुःखी करीत असल्यामुळे विषमतेचा दोष, व सृष्टीचा संहार करीत असल्यामुळे निर्घृणतेचा दोष त्याच्यावर आला असता. याचाच अर्थ तो फल देणारा आहे; पण फल देण्याच्या बाबतीत तो स्वतंत्र नसून, जिवाच्या कर्मावर अवलंबून आहे.

ईश्वराचे अस्तित्व न मानणाऱ्यांना तर अगदी सहज पटू शकेल अशा स्पष्ट व रोकड्या शब्दात श्रीस्वामींनी असे सांगितले आहे, की आपल्याला प्राप्त होणारी सुखदुःखे आपल्या आधीन नसतात; पण आपल्याला प्राप्त होतात, त्या अर्थी ती सुख-दुःखे देणारा ईश्वर मान्य करणे भाग आहे. तो नाही हे म्हणणे, म्हणजे आपली आई वंध्या आहे, असे म्हणण्यासारखे आहे. त्या ईश्वराच्या कृपाप्रसादानेच मनुष्य मुक्त होऊ शकतो. हा कृपाप्रसाद प्राप्त होण्यासाठी शास्त्र-विहित कर्माचे आचरण करणे आवश्यक असते. जोपर्यंत देहाच्या ठिकाणी 'अहंबुद्धि' असते तोपर्यंत कर्माचरण सोडणे योग्यच नाही तर तें आवश्यकही आहे. या शास्त्रविहित नित्यकर्मामुळे दोष-परिहार होत असल्याने, ती सोडण्याचा अविचार करू नये. शास्त्र-विहित कर्माचरणा-मुळे ईश्वर संतुष्ट होतो. फलासक्ति व कर्तृत्व-अहंकार सोडून केलेले कर्म, चित्तशुद्धीद्वारा मोक्षालाही कारण होत असते. असा कर्माचा दुहेरी उपयोग होत असल्याचे ब्रह्मसूत्र भाष्याच्या आधारे स्वामींनी प्रतिपादन केले आहे. वेद ईश्वरकर्तृक असूनही पौरूषेय नाहीत असे सुस्पष्ट विवेचन केले आहे. ईश्वराने वेद हे स्वतंत्ररीत्या रचलेले नसून श्वासाप्रमाणे अनायासे उत्पन्न झाले असल्याने अपौरूषेय आहेत, असे म्हणता येते.

या वेदांचे स्वरूप व इतर प्रमाणांपेक्षा त्यांचे श्रेष्ठत्व कसे आहे याचेही विवेचन केले आहे. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद यांची लक्षणे व वेदातील विधींच्या अर्थाविषयीचा मतभेद, यांविषयीचा विचार युवशिक्षेत केला आहे. तो समजण्यासाठी पूर्वमीमांसा-शास्त्राचे अध्ययन आवश्यक

आहे. पूज्य श्रीस्वामिमहाराजांच्या कालामध्ये सामान्यपणे सर्व शास्त्रांचे प्राथमिक-ज्ञान युवावस्थेत होत असल्याने या शिक्षेत त्यातील सिद्धान्त अगदी थोडक्यात सांगितले आहेत.

हे विवेचन आपल्याला कळण्यासारखे नाही, म्हणून आपण ते कशाकरता वाचावे; असा विचार आपण करू नये. श्रीमहाराजांचे ग्रंथ मंत्रात्मक असून ते अदृष्टोत्पत्तिद्वारा आपले कल्याणच करतील; असा द दृढ विश्वास ठेवून आपण ते वाचावेत. आपल्याला इष्टप्राप्ति झाल्याशिवाय राहणार नाही.

या नंतर वेदांचे प्रयोजन कोणते असा विचार केला आहे. ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद हे यज्ञाकरिता उपयोगी आहेत. यज्ञातील 'होता' हा ऋग्वेदी, अध्वर्यु हा यजुर्वेदी आणि उद्गाता सामवेदी असतो. अथर्व वेदाचा उपयोग यज्ञात नसला तरी शांतिकर्म, पुष्टिकर्म इत्यादि कर्मात त्याचा उपयोग होतो. वेदांतवाक्ये ही परमात्म्याचे ज्ञान करून देण्याच्या बाबतीत 'स्वतःप्रमाण' आहेत, म्हणजेच त्यांचे प्रामाण्य दुसऱ्या कशावरही अवलंबून नाही. ही वेदान्तवाक्ये अनुष्ठान-पद्धती सांगत नसल्यामुळे विधिरूप नाहीत व दुसऱ्या कशाचेही अंग नसल्यामुळे अर्थवाद-रूपही नाहीत. 'न समजलेला पदार्थ समजून देणे', अशा प्रकारचे प्रामाण्य वेदान्त वाक्यांना आहे. इतर म्हणजे प्रत्यक्षादि प्रमाणांनी वेदान्त-वाक्यरूप शब्द-प्रमाणाचा बाध होऊ शकत नाही. त्रिकालाबाधित आत्मतत्त्वाचा बोध हा फक्त वेदान्त-प्रमाणानेच होत असतो; इतर कोणत्याही प्रमाणाने तो होत नसल्यामुळे वेदान्ताला तात्विक-प्रमाण असे म्हणतात. म्हणून त्याचा बाध इतर प्रमाणांनी होत नाही. वेदान्तामध्ये निरनिराळ्या अधिकाऱ्यांना उद्देशून निरनिराळ्या उपासना सांगितल्या आहेत. सद्योमुक्ति व क्रममुक्ति असे मुक्तीचे दोन प्रकार असून सद्योमुक्ति करिता निर्गुण उपासना व क्रममुक्तीसाठी सगुण उपासना सांगितली आहे. निर्गुण उपासनेचा अधिक विचार वृद्धशिक्षेत केला आहे.

वैराग्य नसलेल्या मनुष्याने काम्य परंतु श्रुत्युक्त उपासना करण्यास

हरकत नाही. वाम-मार्गातील उपासना मात्र कधीही करू नयेत. कारण त्यांचा आदर, पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा यापैकी कोणीही केलेला नाही. शिवाय वाममार्गांतील उपासनांमध्ये सांगितलेले सुरा-मद्य इ. चे सेवन शिष्टसंमत तर नाहीच; उलट त्यासाठी देहान्त प्रायश्चित्त सांगितले आहे. त्यामुळे ब्राह्मणाने या मार्गाचा मुळीच आश्रय करू नये, असे स्वामिमहाराजांनी कळकळीने सांगितले आहे.

या नंतर ८६ व्या श्लोकापासून स्वामिमहाराजांनी मूर्ति-पूजेसंबंधी विस्ताराने विवेचन केले आहे. ईश्वराच्या प्रतिमेची उपासना पूर्वमीमांसा किंवा उत्तरमीमांसा यांमध्ये सांगितलेली नाही. परंतु स्मृतिग्रंथात व पुराणग्रंथात ती मानलेली आहे. त्याचप्रमाणे वेदानुसारी सदाचार-संपन्न अशा शिष्टांनीही मूर्ति-उपासनेचा स्वीकार केलेला आहे. इतकेच नव्हे, तर या मूर्ति-उपासने-मुळे ऐहिक उत्कर्ष व पारलौकिक सिद्धि प्राप्त होते, असा अनुभवही येतो. या सर्व कारणांमुळे मूर्ति-पूजा किंवा उपासना ही वेदोक्त नसूनही ग्राह्य आहे.

ईश्वर मुळात निराकार असूनही तो उपासकाच्या तपश्चर्येमुळे, अर्चनेमुळे व प्रतिमेशी असलेल्या स्वतःच्या तंतोतंत सादृश्यामुळे आणि त्यामुळेच उत्पन्न झालेल्या सौंदर्यामुळे मूर्तीमध्ये राहतो. ही मूर्ति-पूजा विशेषेकरून मंदबुद्धीच्या लोकांसाठी सांगितलेली आहे. ही सगुणोपासना उपासकाचे चित्त शुद्ध करून त्याला जितेन्द्रिय बनवते व ईश्वरानुग्रहामुळे त्याला निर्गुणसाक्षात्कार होतो. वस्तुतः मोक्षप्राप्तीसाठी साधनचतुष्ट्यां-तील वैराग्य हे तीव्र असले पाहिजे अशी अपेक्षा आहे. परंतु स्वामीमहाराज इथे असे सांगतात की मन्द वैराग्य असले तरी परमेश्वराला अनन्य-शरण जाऊन त्याचे पूजन केल्यास भगवान् संतुष्ट होऊन ज्ञानप्राप्तिद्वारा त्याला मोक्ष देतो. या सर्व कारणांमुळे, प्रतिमापूजा त्याज्य आहे, हे मत सर्वथा अयोग्य आहे.

देवतेला शरीर आहे ही गोष्ट वेदप्रामाण्यावरून सिद्ध होते. श्रीसमर्थ

रामदासस्वामींनी भगवान् रामचंद्रांच्या प्रतिमेची उपासना करून अपरोक्ष साक्षात्काररूप मोक्ष प्राप्त करून घेतला असल्याचे सर्वांना ज्ञात आहेच. मूर्तिपूजेच्या प्रामाण्यासाठी श्रीसमर्थांचा दाखला दिल्यानंतर, मूर्तिपूजा ही कशी सफल आहे हे दाखवण्यासाठी, श्रीनारायणस्वामींचे चरित्र शेवटच्या बारा श्लोकात (८९-१००) संक्षेपाने सांगितले आहे. त्याचा सारांश असा विधुरावस्थेत असलेले श्रीनारायणस्वामी आपल्या दोन मुलींना बरोबर घेऊन कर्नाटकातून नृसिंहवाडीस आले आणि सतत श्रीदत्तगुरूंचे चिन्तन, पूजन करू लागले. निरंतर केलेल्या चिंतन-स्मरणामुळे श्रीदत्तगुरू प्रसन्न झाले व त्यामुळे श्रीनारायणस्वामींना समाधिसिद्धि प्राप्त झाली. एकदा श्रीनारायणस्वामींनी रात्री आपल्या मुलींना पेज पाजवून निजवले व स्वतः समाधि अवस्थेत राहिले. त्या लहान मुली पहाटे शौचास उठल्या असता श्रीदत्तगुरूंनी श्रीनारायणस्वामींचे रूप घेऊन, त्यांना दिवा दाखवून, स्वच्छ करून स्वामींची समाधि उतरेपर्यंत त्यांचे रक्षण करण्याचे काम केले. श्रीनारायणस्वामींना हे वृत्त समाधीतून उठल्यावर समजले. ते सद्गदित झाले. या घटनेमुळे त्यांना तीव्र वैराग्य प्राप्त झाले. मुलींची लग्ने करून ते पूर्णपणे संसारापासून विरक्त झाले. आपल्याला संन्यासाश्रम मिळावा अशी श्रीदत्तप्रभूंच्याकडे ते अनन्यभावे सतत प्रार्थना करू लागले. त्याचा योग्य तो परिणाम होऊन श्रीदत्तप्रभूंनी त्यांना प्रैष व दण्ड देऊन स्वतः संन्यास दिला. एवढी मोठी योग्यता केवळ मूर्ति पूजनाने श्रीनारायण स्वामींना प्राप्त झाली. अशा प्रकारे श्रीसमर्थ यांच्यासारखी उदाहरणे असल्यामुळे कोणीही मूर्तिपूजा निरर्थक किंवा अशास्त्रीय मानू नये, असे प्रतिपादन श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामिमहाराजांनी युवशिक्षेच्या शेवटी केले आहे. अशा प्रकारे ही युवशिक्षा अत्यंत मननीय व अभ्यसनीय झाली आहे.

**डॉ. रा. ल. जोशी**
निवृत्त प्राध्यापक
संगमेश्वर महाविद्यालय, सोलापुर

# वृद्धशिक्षा - परिचय

हा एक प्रकरण ग्रंथ असून वेदान्तातील सर्व विषय अत्यंत सूक्ष्म रूपाने यांत आलेले आहेत. या ग्रंथाचे महत्त्व प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामींनी प. प. दीक्षितस्वामींना लिहिलेल्या एका पत्रावरून कळून येते. '......जशी नामस्मरणा करिता स्मरणी तशी उपनिषत्-सूत्र स्मरणार्थ ही (वृद्धशिक्षा) स्मरणी जाणावी. तुम्ही स्वतः वृद्धशिक्षा समयाप्रमाणे पहावी व पहिल्या श्लोकात सांगितल्याप्रमाणे प्रणवोपासना ठेवावी. प्रणवाभ्यासाकडे चित्तवृत्ति ठेवल्याने चित्त शांत होईल....प्रणवोपासनाच तारील'.

अशा प्रकारे साधकाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या अशा वृद्धशिक्षेच्या पहिल्या श्लोकात, चित्तस्थैर्याकरिता प्रणवोपासना सांगून, साधनचतुष्टय संपन्न नसलेल्या परंतु भगवद्भक्त असलेल्या, मंदवैराग्ययुक्त संन्याशालासुद्धा ज्ञानप्राप्ति होते हा विशेष सिद्धान्त सांगितला आहे. श्रवणमननादिकांची लक्षणे, षड्विधतात्पर्य लक्षणे, प्रयोजन, महत्त्व, तत्त्वंपदार्थविवेचन, महावाक्यार्थ-निरूपण, दशोपनिषत्तात्पर्य, जीवन्मुक्ताचा आचार प्रतिपादन करणारे दत्तमाहात्म्यादि ग्रंथांचे साररूप दत्तचरित्र यात आले असून, त्यामुळे उपनिषदे व ब्रह्मसूत्रे यांची उजळणी करणारा वृद्धशिक्षा हा ग्रंथ असल्याचे स्वामींनी यथार्थच म्हटले आहे.

ॐकाराने सगुण व निर्गुण अशा उभयविध दत्तस्वरूपाचा बोध होतो, तो दत्तपरमात्मा आपले रक्षण करो, असे मंगल स्तवन करून ग्रंथाला प्रारंभ केला आहे. या दत्तपरमात्म्याचा आश्रय केल्याने साधन-चतुष्टय-संपत्ति नसली तरी सुद्धा सर्वस्वाचा त्याग करून शरण आलेल्या भक्ताला दत्तस्वरूपप्राप्ति म्हणजेच मोक्ष प्राप्त होतो. तीव्र वैराग्य नसले तरी एकवेळ

चालेल, मन्दवैराग्य व तीव्र भक्ति-भाव असलेला संन्यासी परमपद प्राप्त करून घेऊ शकतो असे भक्तीचे माहात्म्य प्रतिपादन केले आहे. याकरिता एका गोष्टीची मात्र आवश्यकता आहे. अशा संन्याशाने भिक्षाटन, भगवंताचे नामस्मरण, स्नान, बाह्य व आन्तरिक शुद्धि, देवपूजा व ध्यान ही सहा कर्मे आवश्यक म्हणून केली पाहिजेत. त्याचप्रमाणे

**मञ्चकं शुक्लवस्त्रं च स्त्रीकथा लौल्यमेव च ।**
**दिवास्वापश्च यानं च यतीनां पतनानि षट् ।।**

म्हणजे पलंग, शुभ्र वस्त्र, स्त्रियांविषयी चर्चा, इंद्रियाचे लाड पुरवणे, दिवसा झोपणे व वाहन ही संन्याशाच्या अध:पतनाला निमित्त असणारी सहा कारणे आहेत. शास्त्रनिन्द्य असलेल्या या सहा कर्मांचा त्याग मुमुक्षूने केलाच पाहिजे.

भक्तीचे माहात्म्य अगदी सहजगत्या मंगलश्लोकातच सांगितले आहे. जन्मत:च मनुष्याला प्राप्त होणाऱ्या देवऋण, ऋषिऋण व पितृऋण या तीन ऋणांतून मुक्त झाल्याशिवाय मोक्ष मिळत नाही. हा सामान्य नियम दत्तभक्त असलेल्या संन्याशाला लागू नाही; असा सिद्धान्त अधिकारवाणीने श्रीस्वामीमहाराजांनी सांगितला आहे.

जीव हा कर्ता नसतानाही कर्ता वाटतो; तो भोक्ता असल्याचेही आपल्याला अनुभवाला येते, तसेच आत्मे अनेक आहेत असेही व्यवहारात दिसते. परंतु हा सर्व अनुभव परमार्थत: बरोबर नाही. केवळ उपाधिमुळे म्हणजे दुसऱ्या पदार्थाशी झालेल्या दृढ संबंधामुळे तसा प्रत्यय येत असतो. जसे आकाश हे एकच असताना घट, मठ इत्यादि पदार्थांच्या संबंधामुळे ते भिन्न भासते, त्याप्रमाणेच विज्ञानमय कोशाशी म्हणजे बुद्धीशी एकरूप झाल्यामुळे आत्मा हा कर्ता भासतो; तर आनंदमय कोशाशी एकरूप झाल्यामुळे तो भोक्ता भासतो. जास्वंदीचा लालपणा ज्याप्रमाणे त्याच्या जवळ ठेवलेल्या स्फटिकावर भासतो त्याचप्रमाणे देहादिक उपाधींच्यामुळे आत्मा त्या त्या कर्तृत्वादिगुणांनी युक्त भासतो. हे सर्व जग अनित्य आहे

असा दृढ निश्चय करून, कितीही प्रिय वाटला, तरी प्रवृत्तिमार्ग सोडून शिष्योद्धार करण्यास समर्थ अशा ब्रह्मनिष्ठगुरूंचा आश्रय घेतला पाहिजे. शब्दब्रह्मांत म्हणजे पुस्तकी ज्ञानात ते गुरू निष्णात असून दृष्टान्ताद्वारा पटवून देण्याचे कौशल्य त्यांच्याजवळ असले पाहिजे. त्याचबरोबर ज्ञानाची अनुभूति-अनुभवात्मक ज्ञानहि, त्यांच्यापाशी असले पाहिजे. अशाप्रकारच्या गुरूंच्या ठिकाणी आत्यंतिक श्रद्धा, म्हणजे तो प्रत्यक्ष परमेश्वरच आहे; अशी भावना असली पाहिजे. अशा भावनेने त्यांच्या मार्गदर्शनाने श्रवण, मनन, निदिध्यासन करावे. शिष्याच्या ठिकाणी श्रद्धालुत्व, आत्यंतिक निष्ठा, जितेन्द्रियत्व हे गुण असले पाहिजेत. सामान्यपणे ज्ञानाच्या बाबतीत असे म्हटले जाते की, शाब्द-ज्ञानाचा काही उपयोग नाही; अपरोक्ष साक्षात्काररूप ज्ञानाचीच आवश्यकता आहे. याविषयी इथे मुद्दाम असे स्पष्ट सांगितले आहे की, परोक्ष ज्ञान म्हणजे शाब्द ज्ञान, ते त्याज्य नाही. गुरुमुखाने केलेल्या वेदान्त श्रवणाने ज्ञान-प्रतिबंधक असलेले पाप नाहीसे होते. बुद्धिपूर्वक केलेले पातक सुद्धा नाश पावते. केवळ परोक्ष ज्ञानाने सुद्धा आत्मा देहाहून भिन्न आहे का नाही, अशाप्रकारचे संशय नाहीसे होतात. परोक्ष ज्ञानाचे हे महत्त्व नाकारता येणार नाही. (या ज्ञानाने अहंकार उत्पन्न होतो, असे म्हणतात व व्यवहारात तसे अनेक ठिकाणी दिसूनही येते. अर्थात हा दोष परोक्ष ज्ञानाचा नसून त्या त्या व्यक्तीचा असतो) या परोक्ष-ज्ञानाचे साधन असलेले श्रवणादिक मुमुक्षूने अवश्य करावे, असे सांगितले आहे. या शाब्द-ज्ञानानंतरच अपरोक्ष साक्षात्काररूप ज्ञान होत असून त्या अपरोक्षसाक्षात्काररूप ज्ञानाने शोक-मोहादिक व कोणत्याही प्रकारचा संशय शिल्लक राहात नाही. या ज्ञानाचे स्वरूप असे आहे की, जीव आणि ब्रह्म वेगळे नसून एकच आहेत व या अवस्थेत दृश्य जगत् परमात्म-स्वरूपच असल्याचा अनुभव येतो. जीव व परमात्मा किंवा ईश्वर यांच्यात भेद असल्याचे श्रुतीत सुद्धा काही ठिकाणी सांगितलेले आढळून येते. अशा परिस्थितीत द्वैत रूपाने म्हणजे भिन्नत्वाने केलेला जीव व आत्मा यांचा

उल्लेख खरा, का त्यांचा अभेद-रूपाने केलेला श्रुतीतील उल्लेख खरा; असा संशय उत्पन्न होतो. त्याचे निराकरण असे केले आहे की, भेद हा उपाधिमुळे होत असतो. त्याला व्यावहारिक सत्ता म्हणजे अस्तित्व आहे; पारमार्थिक सत्यत्व नाही. भेद प्रतिपादनाने काहीही फल प्राप्त होत नाही. अभेद प्रतिपादनाने मात्र मोक्षरूपी फल सांगितले असल्यामुळे **'फलवत्संनिधौ अफलं तदंगम्।'** या न्यायाने सर्व श्रुतींचे तात्पर्य अभेदप्रतिपादनातच मानणे योग्य आहे. उपक्रम-उपसंहार, अभ्यास, फल, अर्थवाद व उपपत्ति या सहा प्रमाणांनी सर्व वेदान्त वाक्यांचे तात्पर्य एकमेवाद्वितीय ब्रह्म-प्रतिपादनातच मानणे योग्य आहे, असे छांदोग्योपनिषदातील श्वेतकेतूला त्याच्या पित्याने केलेल्या उपदेशावरून स्पष्ट होते. अशा प्रकारचा तात्पर्य-निश्चय म्हणजेच श्रवण. या श्रवणाने बुद्धि सुसंस्कृत झाली म्हणजे तिच्यामुळे अपरोक्ष म्हणजे अनुभवात्मक किंवा साक्षात्काररूप ज्ञान उत्पन्न होत असते. बुद्धीने त्या परमात्म्याचे ज्ञान होऊ शकत नाही. असे जे अनेक ठिकाणी म्हटले आहे त्याचा अर्थ इतकाच की, श्रवणाचे संस्कार नसलेल्या बुद्धीने आत्म्याचे ज्ञान होऊ शकत नाही. किंवा अधिक शास्त्रीय परिभाषेत मांडावयाचे झाल्यास, असे म्हणता येईल की, वाणीने किंवा मनाने आत्मतत्त्व जाणले जात नाही, असा जो निषेध केला आहे, तो निषेध 'फलव्याप्तीचा' असतो म्हणजे तो आत्मा चिदाभासाने प्रकाशित होत नाही; या अर्थाने केला आहे. म्हणूनच 'दृश्यते त्वग्र्ययाबुद्धया' म्हणजे सूक्ष्म किंवा श्रवण-संस्कारयुक्त बुद्धीने या आत्मतत्त्वाचे ज्ञान होते, असेही इतरत्र म्हटले आहे. त्या ठिकाणी वृत्तिविषयत्व म्हणजे अज्ञानाचे आवरण घालविण्याकरिता तदाकार-वृत्तीचा ते (ज्ञान) विषय होते; असे सांगितले आहे. असे स्पष्टीकरण केल्याने 'दृश्यते' व 'न दृश्यते' या विधानांचा विरोध उत्पन्न होत नाही.

एकमेवाद्वितीय ब्रह्म हेच अंतिम सत्य आहे, असे म्हटल्यावर जग हे 'सत्' 'असत्' किंवा 'सदसत्' असे मानताच येणार नाही. जगाचे हे तीन प्रकारचे स्वरूप तीन निरनिराळ्या शास्त्रकारांनी मानले असून त्यांनी

एकमेकांचे खण्डन केले आहे. त्यामुळे जग हे अनिर्वचनीय म्हणजे सत्, असत् किंवा सदसत् या शब्दांनी ज्याचे निर्वचन करता येत नाही अशा प्रकारचे आहे, असे अद्वैत-मतच सिद्ध होते.

ईश्वराच्या अपेक्षित सर्वगुणसंपन्न भक्ताला गुरूने महावाक्यांचा उपदेश एकदा जरी केला तरी तो स्वतःच्या यथार्थ स्वरूपाचा, सच्चिदानंद स्वरूपाचा, अनुभव घेऊ शकतो. त्याला जर काही प्रतिबंध असतील तर त्या प्रमाणात कमी-अधिक वेळाही उपदेश करावा लागतो.

जीव हा जागृत, स्वप्न व सुषुप्ती या तिन्ही अवस्थांचा साक्षी आहे. म्हणूनच तो त्यांच्यापासून भिन्नच आहे. त्याचप्रमाणे घट-पटादिक पदार्थांहून त्यांना प्रकाशित करणारा दिवा जसा भिन्न असतो त्याप्रमाणे स्थूलदेहादि दृश्य पदार्थांहून, प्राण, इन्द्रिये, मन, बुद्धि, अहंकार यांच्याहून त्यांना प्रकाशित करणारा जीव भिन्न असून तो स्वयंप्रकाशी आहे. देहादिकांशी जिवाचा जो संबंध आलेला दिसतो तो आध्यासिक म्हणजे कल्पित होय. मूलतः तो निर्विकार कूटस्थ असा आहे.

जगातील कोणतीही वस्तु आपल्याला जी प्रिय होत असते, तिचे कारण म्हणजे ती आत्म्याला प्रिय होते. कोणत्याही वस्तूच्या ठिकाणी निरपेक्ष, निरुपाधिक-प्रेम नसते. आत्म्याला ती अनुकूल असल्यामुळेच तिच्या ठिकाणी प्रेम उत्पन्न होत असते. आत्महत्या करणारा मनुष्यसुद्धा तो देह आत्म्याला प्रतिकूल असल्यामुळे त्याचा त्याग करीत असतो. अशाप्रकारे निरपेक्ष प्रेमाचा विषय असलेले आत्मस्वरूप हे जिवाचे म्हणजे 'तत्त्वमसि' या महावाक्यातील 'त्वं' पदार्थाचे वास्तविक स्वरूप आहे. जिवाचे वास्तविक स्वरूप 'परमात्मा' हेच असून, तो परमात्मा निर्गुण असला तरी शून्यरूप नाही. सजातीय, विजातीय व स्वगत भेदरहित असा तो आहे. म्हणजे त्याच्याहून वेगळे काहीच नसल्यामुळे कोणताही भेद त्याच्या ठिकाणी संभवत नाही. भूक तहान इत्यादि कोणताच धर्म नसलेले, पंचमहाभूतांहून व त्यांच्या कार्याहून पूर्णपणे विलक्षण, ज्याचे कोणी कारण नाही व जे

कोणाचे वास्तविक कारण नाही; असे सच्चिदानंदघनरूप परमात्मतत्त्व हा त्या महावाक्यातील 'तत्' पदाचा अर्थ आहे. तत्त्वमसि या महावाक्यातील 'तत्-पद' व 'त्वं-पद' यांचा संबंध 'अखंड-तादात्म्य' अशा प्रकारचा आहे. सामान्यपणे व्यवहारात अनुभवाला येत असलेला संसर्ग किंवा विशिष्ट असा वाक्यार्थ या ठिकाणी होत नाही. संसर्ग म्हणजे वाक्यातील पदार्थांचा संबंध हा काही ठिकाणी वाक्यार्थ असतो. उदा. नील-कमल या ठिकाणी नीलवर्ण व कमळ यांचा संबंध वक्त्याला अभिप्रेत असतो. क्वचित् एका पदार्थाने विशिष्ट दुसरा पदार्थ हा वाक्यार्थ असतो. उदाः- नील कमल याच ठिकाणी नीलवर्णाने युक्त कमल असा एक पदार्थ-विशिष्ट दुसरा पदार्थ, असा वाक्यार्थ अभिप्रेत असतो. तसा संसर्ग किंवा विशिष्ट असा वाक्यार्थ या महावाक्याच्या बाबतीत होत नाही.

'तत्त्वमसि' या महावाक्यात 'त्वं' शब्दाचा वाच्यार्थ म्हणजे अन्तःकरणाशी तादात्म्य पावलेला अल्पज्ञ, अल्पशक्तिमान् असा जिवात्मा व 'तत्' पदाचा वाच्यार्थ सर्वज्ञ, सर्वशक्तिमान् असा ईश्वर हा आहे. या दोन वाच्यार्थांचा विरोध असला, तरी दोन्ही पदांचा लक्ष्यार्थ 'शुद्धचैतन्य' एवढाच असल्याने त्यांचे ऐक्य होण्यात कोणताही विरोध नाही. वाच्यार्थातील विरूद्ध असणारा भाग सोडणे व काही घेणे(न सोडणे) अशाप्रकारची जहदजहल्लक्षणा स्वीकारून दोन्ही पदांचे किंवा तत्-त्वं पदांचे ऐक्य सिद्ध होते.

या महावाक्यांच्या श्रवणाने अधिकारी मुमुक्षूला ब्रह्मसाक्षात्कार झाला म्हणजे तो कृतकृत्य होतो. कृतकृत्य किंवा कृतार्थ होतो याचा अर्थ जाग्रत, स्वप्न व सुषुप्ति या तीनही अवस्थांचा व सर्व बाह्य विषयांचा त्याग करून स्वरूपानंदातच निमग्न होऊन राहतो, विशुद्ध ज्ञानस्वरूप अशा आत्म रूपानेच राहतो तो खरा कृतार्थ. त्याला स्वार्थ असा काहीच नसल्यामुळे केवळ दयार्द्रबुद्धीने परोपकाराकरिता त्याचे जीवन असते.

जगाच्या उत्पत्तिविषयी नैयायिकांचा आरंभवाद व सांख्यांचा परिणामवाद हे मुख्यतः दोन सिद्धान्त आहेत. नैयायिकांच्या आरंभवादात

दोन अवयवांच्या संयोगापासून, त्या दोहोहून वेगळा असा तिसराच पदार्थ निर्माण होत असतो. उदा. तंतु-संयोगापासून पट. सांख्याच्या परिणाम वादात मृत्तिकेचा परिणाम होऊन घट होत असतो. यापैकी आरंभवादात संयोगासाठी दोन सत्य वस्तूंची आवश्यकता असते. वेदान्तमतात अद्वितीय असे एकच एक आत्मतत्त्व असल्याने या सिद्धान्ताचा स्वीकार करता येत नाही. परिणामवादातही परिणाम पावणारी वस्तु ही सावयव, विकारी व जड अशी असते. आत्मा तर निर्विकार, निरवयव, चेतन आहे त्यामुळे आत्म्यापासून जगाची उत्पत्ति, परिणामवादाप्रमाणेही होऊ शकत नाही. यासाठी विवर्तवादाचा अंगीकार करून मायायुक्त ब्रह्मापासून जग निर्माण होते; असे श्रुतीतील ऊर्णनाभि म्हणजे कोळी-किड्याच्या दृष्टान्तावरून अद्वैत वेदान्त्यांनी मानले आहे.

तात्पर्यनिर्णायक षड्विध-लिंगाचे छांदोग्योपनिषदाच्या ६व्या प्रपाठकावरून पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण केले आहे.

१) **उपक्रमोपसंहारः-** आत्म्यापासून जगाची उत्पत्ति, त्याच्यातच स्थिति व लय होत असतो; असे आत्मतत्त्व एकमेवाद्वितीय आहे, असा प्रारंभ करून शेवटही 'यतो वा इमानि...' या श्रुतीने केला आहे.

२) **अभ्यासः-** पुनः पुन्हा तेच सांगून 'श्रवण केलेला अर्थ मनात दृढ करणे .... स आत्मा तत्त्वमसि हे श्वेतकेतो।' असे पुनः पुन्हा सांगितले.

३) **अपूर्वताः-** जीवब्रह्मैक्यविषयक सिद्धान्त श्रुतिशिवाय इतर कोणत्याही प्रमाणांनी समजू शकत नाही त्यामुळे अपूर्वता हे लिंग उत्पन्न होते.

४) **फलः-** आत्मतत्त्वाचा यथार्थज्ञानाने अज्ञान व अज्ञानजन्य शोक-मोह यांचा नाश व आत्यन्तिक आनन्द असे फल, हे चौथे प्रमाण.

५) **अर्थवादः-** आत्म्यापासून उत्पत्ति, स्थिति, प्रलय व आत्म्याचा

सृष्टीत प्रवेश आणि आत्म्याने केलेले सृष्टीचे नियंत्रण अशा पाच प्रकारचा अर्थवाद हे पाचवे तात्पर्य-निर्णायक प्रमाण होय.

६) **उपपत्तिः-** जे जे म्हणून दृश्य आहे, ते ते सर्व मिथ्या आहे. इंद्रियांचा विषय नसलेले सत् तत्त्वच फक्त खरे आहे. अशा प्रकारचा विचार म्हणजे उपपत्ति हे सहावे प्रमाण होय.

या सहा प्रमाणांनी अद्वितीय ब्रह्माच्या ठिकाणी सर्व वेदान्तवाक्यांचे तात्पर्य आहे; असा निर्णय करणे याला श्रवण असे म्हणतात. या श्रवणाने सर्व संशय नाहीसे होतात. युक्तिपूर्वक केलेले चिंतन म्हणजे मनन. त्या मननाने, अल्पज्ञ जीव सर्वज्ञ कसा होऊ शकेल, अशा कल्पनांचा निरास होतो. चित्ताला स्थिर करण्याने 'अहं ब्रह्मास्मि' या अनुभवाच्या आड येणाऱ्या देहात्मैक्य अनुभवाचा बाध होऊन सतत ब्रह्माकार वृत्तीच अनुवृत्त होत असते. यालाच निदिध्यासन असे म्हणतात. यामुळे सविकल्प समाधि सिद्ध होते. ही अवस्था एकदा प्राप्त झाल्यावर, समाधि उतरल्यावरही साधकाची आत्मनिष्ठा जात नाही.

ज्ञानाचे मुख्य साधन असलेले हे श्रवणादिक ज्याला जमत नाही त्या मुमुक्षूने निरंतर भगवान् दत्तात्रेयांचे भजन करावे. ते त्याला कृतार्थ केल्याशिवाय राहणार नाहीत. ईशादि दशोपनिषदांमध्ये व स्मृतींतही तसेच दत्तस्वरूप परमात्मतत्त्वाचेच वर्णन केलेले आहे. ही समाधिअवस्था एकदा प्राप्त झाल्यावर ती नाहीशी करण्यास कोणीही समर्थ होत नाही. ही अवस्था प्राप्त होण्यासाठी अष्टांग योग उपयोगी पडतो. परंतु अष्टांग योगाने प्राप्त झालेली ही आनंदावस्था समाधि कालातच असते, समाधि उतरल्यावर म्हणजे व्युत्थान दशेत रहात नाही. श्रवणादिकाने प्राप्त झालेल्या ज्ञानाने उत्पन्न झालेल्या समाध्यवस्थेतील निरतिशय आनंद कधीही नाहीसा होणारा नसतो.

आपल्या भक्तांना संतोष देणारा व त्यांचे सर्व अनर्थ नाहीसे करणारा प्रभु दत्तात्रेय सर्व उपनिषदांप्रमाणेच स्मृतींनीही प्रतिपादन केला

आहे. भजन, पूजन आदि न करता केवळ स्मरणाने संतुष्ट होणारी अशी कोणती अन्य देवता आहे? या दत्तात्रेयांनीच सकाम भक्ति करणाऱ्या आयुराजालासुद्धा त्याची कामना पूर्ण करून मोक्षही प्राप्त करून दिला. प्रल्हाद, मदालसापुत्र अलर्क, विष्णुदत्त-ब्राह्मण, पिङ्गलनाग, कार्तवीर्यार्जुन, साध्यदेव, दलादन ऋषि, रेणुका यांना निरनिराळ्या प्रकारे उपदेश करून श्रीदत्तात्रेयांनी त्यांचा उद्धार केला आहे. अत्यंत दूर असूनही केवळ स्मरणाने संतुष्ट होणाऱ्या प्रभू दत्तात्रेयांची लोकोपकारक चरित्रे शेवटच्या दहा श्लोकात वर्णन करून वृद्धशिक्षा समाप्त केली आहे.

**डॉ. रा. ल. जोशी**
निवृत्त प्राध्यापक
संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर

# कुमारशिक्षा

(मूळश्लोक)
मराठी भाषान्तरासहित

**भाषान्तरकार**

पण्डितप्रवर विष्णुशास्त्री खरे, न्यायवेदान्ताध्यापक
अद्वैतवेदान्तविद्यापीठ, सातारा.

## ।। श्रीदत्तः प्रसन्नोऽस्तु ।।

### प्रस्तावना

ॐ नमो श्रीवासुदेव महायोगी । अवीट ब्रह्मानंद भोगी ।
मति लावावी सन्मार्गी । स्फूर्ति द्यावी सेवेची ।।१।।
संस्कृत भाषा रत्नकरंडक । त्या माजीं कुमारशिक्षा माणिक ।
झळके प्रकाश अलौकिक । अज्ञानांधकारनाशक ।।२।।
तो करंडक उघडोन । माणिकदर्शनें संतोषवी जन।
ऐसें आज्ञापिती गुरूचरण । म्हणोनि कार्यी प्रवर्तलों ।।३।।
यथामति केला अर्थ । साधावया निजपरमार्थ ।
मुदित व्हावा भाविक सार्थ । हीच आस धरिली मनीं ।।४।।
मंद मध्यम उत्तम चित्त । त्रिविध जीव जगीं विलसत ।
मंद जिवासी सत्पथ । दावाया उपदेशी वासुदेव ।।५।।
बुद्धि अजाण ही बाला । न कळे निजहित तिजला ।
तोचि अर्थ दाविला । वासुपदें सज्जन हो।।६।।
सन्मार्ग प्रकाशी बालेशी । यालागीं स्वामिरायासी ।
भाविक प्रेमें संबोधिति । वासुदेव नामेंकरोनि ।।७।।
उत्तमासी ज्ञानाधिकार । मध्यमा उपासना साचार ।
जे कां मंद पामर । त्यासी कर्माधिकार नेमिला ।।८।।
वेदमातेचा हा प्रेमळभाव । यथार्थ लक्षोनि श्रीवासुदेव ।
कुमार युव वृद्ध शिक्षा नांव । तीन मजली निर्मोन उपदेशी ।।९।।
जेवीं अजाण निजसुता । माडीवरी चढूं लागता ।
कळवळोनि धरोनि हाता । माता निवारी पडशील म्हणोनि ।।१०।।
तेवी करुणाघन श्रुतिमाता । बुझावी निजमंदसुता ।
ज्ञानोपासनेचा हट्ट करितां । उगाच पतन पावशील ।।११।।
वृथा कुशंकांचे सद्न । पांडित्यगर्व, नास्तिक दुर्जन ।

तरी त्या दूर सारून । निष्काम कर्म भावें करी ॥१२॥
जेथें राग द्वेष वसत । ते मानव केवल आप्त ।
परि रागद्वेषरहित । परम आप्त श्रुतिमाता ॥१३॥
ती सांगे, साधनसोपान । निष्कामकर्म उपासना ज्ञान ।
यथाक्रम आरोहण । केल्या निजधाम पावशील ॥१४॥
निरहंकार निरभिलाष राहून । भोळ्याभावें कर्माचरण ।
करितां, प्रसन्न लक्ष्मीरमण । होऊनि दासा मुक्त करी ॥१५॥
ज्ञानमदें पतन । निरहंकारें आत्मज्ञान ।
समजाविलें हें उत्तम विधान । ब्राह्मणीकथा सांगोन ॥१६॥
वर्णधर्म नांवेही शोभती । मग स्नानसंध्येची कोण गती ।
ऐशा उन्मत्त जनांप्रति । कळवळोनि म्हणे श्रीगुरूराय ॥१७॥
तुमचें कल्याणसाधन । धर्म बोलिला नारायण ।
त्यातें त्यागिता, कवण । शरण तुम्हां घोरभवीं ॥१८॥
जा जा विद्वानासी शरण । समजोनि घ्या धर्म गहन ।
तदनुसारें वर्तोन । पिपीलिकामार्गे मोक्ष साधा ॥१९॥
ग्रंथ छापणें उत्तम । क्रिया करणें उत्तमोत्तम ।
यास्तव वासुदेव भक्तजन । परिसोत माझी विनंति जी ॥२०॥
श्रीवासुदेव गुरुचरण । आवडे त्या गायत्री पुरश्चरण ।
गुप्तरूपें घरी येऊन । भिक्षा नित्य हीच मागें ॥२१॥
प्रीतीची भिक्षा घालून । त्याची मिळवा कृपा पूर्ण ।
ना तरी विमुख जाऊन । तुम्हा तो शापील दारूण ॥२२॥
श्रीवासुदेव पदसन्निधानीं । अर्पियली सेवा कमलिनी ।
साक्षात्काराची भीक मागुनी । विरतव्यापारा ही लेखनी ॥२३॥

**विष्णुशास्त्री खरे**
न्यायवेदांताध्यापक
अद्वैतवेदान्त विद्यापीठ, सातारा

विजयादशमी १८७३

# अनुक्रमणिका


| श्लोक | पृष्ठांक | विषय |
|---|---|---|
| १ | ४४. | श्रीदत्तात्रेय नमनरूप मंगलाचरण. |
| २ | ४५. | ईश्वर हा आप्त व त्याचें वाक्यश्रुति हें प्रमाण आहे. |
| ३ | ४६. | श्रुति व स्मृति ह्या ईश्वराच्या आज्ञा आहेत. |
| ४ | ४७. | श्रुति व स्मृति काय करतात? |
| ५ | ४७. | सद्गुरूकडून श्रुतिस्मृतींचें ज्ञान मिळवून तदुक्त कर्में ईश्वरसंतोषार्थ करावींत. |
| ६ | ४८. | मन्त्राचा अर्थ कसा लावावा? |
| ७ | ४९. | चांगल्या स्थितींत धर्माचरण कसें करावें? |
| ८ | ४९. | धर्माचरणाचें फल. |
| ९ | ५०. | कर्माचरण कोणी किती कालपर्यंत करावें? पुढे काय करावें? |
| १० | ५०. | संन्यासाश्रम केव्हां घ्यावा? |
| ११ | ५१. | कर्मासक्त व कर्महीन दोघांची गति. |
| १२ | ५२. | कर्म कोणतें करावें? त्याची मर्यादा व फल. |
| १३ | ५२. | फल दिसलें नाही तरी यावज्जीव कर्म करावें. |
| १४ | ५३. | या जन्मांत कर्मानुष्ठान न करतांही क्रोधादि विकाररहित असणें, हें पूर्वजन्मांतील यावज्जीव कर्मानुष्ठानाचें फल. |
| १५ | ५३. | कर्म करण्याची पद्धत. |
| १६ | ५४. | धर्म, अर्थ व काम यांचें मोक्षोपयोगी परस्पर सहकारित्व. |

| | | |
|---|---|---|
| १७ | ५४. | धर्मत्याग, अनिष्ट धर्माचरण हें ईश्वरप्रीतींचें मुख्य साधन. |
| १८ | ५४. | धर्माचरण करूं इच्छिणाऱ्यानें कोणाची संगति सोडावी? |
| १९. | ५५. | हृदय शुद्ध झाल्यावाचून संन्यास घेणें अनिष्ट. |
| २०.२१ | ५६. | चित्त शुद्ध नसतां संन्यास करणाऱ्याबद्दल दृष्टांत. |
| २२.२३ | ५६. | योग्यता आल्यावाचून संन्यास घेणाऱ्याची होणारी अवस्था व त्याला होणारें ईश्वराचें शासन |
| २४. | ५७. | यथाविधी कर्म करावें. |
| २५. | ५७. | चित्तशुद्धि होण्यापूर्वी ज्ञान व कर्म यांचें सहानुष्ठान कां होऊं नये? |
| २६. | ५७. | समुच्चय सांगणाऱ्या श्रुतीचा अभिप्राय. |
| २७. | ५८. | देवतांना शरीर नाही. |
| २८. | ५८. | देवतांना शरीर आहे याबद्दल युक्ति. |
| २९. | ५९. | ईश्वराचा व त्याच्या वचनाचा अवमान करूं नये. |
| ३०. | ५९. | नास्तिक म्हणजे कोण? त्याची गति. |
| ३१. | ५९. | आस्तिकाचें स्वरूप व त्याची गति. |
| ३२. | ६०. | ईश्वरास्तित्वाबद्दल प्रमाण. |
| ३३. | ६०. | ईश्वरास्तित्वाबद्दल केनोपनिषदांतील कथेचा आरंभ. |
| ३४-३५ | ६०-६१. | देवदैत्यांच्या युद्धाचें वर्णन. |
| ३६. | ६१. | जय मिळाल्यामुळें देवांना झालेला गर्व. |
| ३७. | ६१. | देवांचा गर्व दूर करण्याकरितां परमेश्वर सुंदर रूप घेऊन त्यांच्यासमोर येतात. |
| ३८. | ६१. | ईश्वरस्वरूपाचें वर्णन. |
| ३९. | ६२. | ईश्वरस्वरूप पाहून देवांना आश्चर्य वाटलें व त्यांनी चौकशीकरितां अग्नीस पाठविलें. |
| ४०. | ६२. | अग्नीनें आपलें नांव ईश्वरास सांगितलें. त्याचें बल |

काय? असा ईश्वराचा प्रश्न.

४१. ६२. अग्नीनें आपली शक्ति सांगितल्यावर ईश्वरानें एक गवताची काडी त्याच्यासमोर ठेवली.

४२. ६२. अग्नीला ती गवताची काडी जाळतां न आल्यानें तो लाजून परत गेला.

४३. ६३. देवांनीं वायूला ईश्वराचे परीक्षेकरितां पाठविलें.

४४. ६३. दोघांचा संवाद व वायूच्या बलासंबंधीं ईश्वाराचा प्रश्न व वायूचें उत्तर.

४५. ६३. गवताची काडी वायूला हलवितां न आल्यानें तो लाजून परतला..

४६. ६४. देवांनीं इंद्राला पाठविलें, तें पाहून ईश्वर गुप्त झाले.

४७. ६४. इंद्र खिन्न होऊन तेथेंच थांबला. त्याला उमेचें दर्शन झालें.

४८. ६४. उमेच्या स्वरूपाचें वर्णन.

४९. ६५. इंद्रानें ईश्वराबद्दल उमेस प्रश्न केला.

५०. ६५. उमेनें इंद्राला ईश्वरस्वरूपाची ओळख करून दिली.

५१. ६५ ईश्वरास्तित्त्वाबद्दल व त्याला शरीर असल्याबद्दल अनेक श्रुति प्रमाण आहेत.

५२. ६६. एकच ईश्वर भक्तांच्याकरिता पांच रूपांनीं प्रकट झाला.

५३. ६६. पूर्वयुगांत व या युगांत ईश्वराचें अस्तित्त्व.

५४. ६६. कृष्णातीरावर होणाऱ्या प्रभूच्या लीला.

५५. ६७. ब्राह्मण स्त्रीला प्रभुदर्शन झालें या कथेला सुरुवात.

५६. ६७. शिरोळ गांवांत श्रीगुरु भिक्षेला गेले.

५७. ६७. त्या गांवांतील एका दरिद्री ब्राह्मण स्त्रीचा उद्धार करण्याकरितां गेले.

५८. ६७. यतींनीं भिक्षा मागावी हें स्वतःच्या आचारानें दाखविलें.

| | | |
|---|---|---|
| ५९. | ६८. | श्रीगुरूंच्या स्वरूपाचें वर्णन. |
| ६०. | ६८. | भिक्षेचा शब्द ऐकून घरमालकीण बाहेर येऊन नम्रतेनें बोलूं लागली. |
| ६१. | ६८. | विप्रस्त्रीचें स्वागतपर भाषण. |
| ६२. | ६९. | श्रीमहाराजांनीं काय केलें ? |
| ६३-६४ | ६९. | विप्रस्त्रीची मनःस्थिति व तदनुसार कृति. |
| ६५-७६ | ६९-७३. | अतिथीबद्दल गृहस्थाश्रमी माणसाची वृत्ति कशी असावी हें दर्शविणारें व श्रीगुरूंविषयीं अत्यंत श्रद्धा असणारें असें विप्रस्त्रीचें सविस्तर भाषण. |
| ७७-७८ | ७३. | श्रीगुरूंनीं केलेला विचार. |
| ७९-८२ | ७४. | यतिवृत्ती व गृहस्थाश्रमाचें कर्तव्य सुचविणारें श्रीगुरूंचें भाषण. |
| ८३. | ७५. | वैश्वदेव झाला नसल्यास त्याकरतां अन्न काढून ठेवून अतिथीस भिक्षा द्यावी. |
| ८४. | ७५. | घरांत भोजन घालण्यास पात्र नाहीं असें स्त्रीचें भाषण. |
| ८५-८६ | ७५. | श्रीगुरूंनीं बाहेरून एक मोठा चौकोनी दगड आणून तो धुवून त्यावरच वाढण्यास सांगितलें. |
| ८७. | ७६. | विप्र स्त्रीनें त्या शिलापात्रावर जोंधळ्याची पेज वाढली. |
| ८८. | ७६. | भिक्षुरूपी भगवंतांनीं भोजनास आरंभ केला. |
| ८९. | ७६. | विप्र स्त्रीच्या कृतीवर केलेलें यज्ञकर्माचें रूपक. |
| ९०-९२ | ७७. | विप्र स्त्रीनें अत्यंत प्रेमपूर्वक केलेली प्रभूंची प्रार्थना. |
| ९३-९४ | ७८. | अग्निहोत्र कर्म करणाऱ्यापेक्षां विप्र स्त्रीचें श्रेष्ठत्व. |
| ९५. | ७८. | तृप्त झालेले श्रीहरि गुप्त झाले. |
| ९६. | ७९. | अतिथीची तृप्ति किंवा पीडा यांचें आपोआप मिळणारें फल. |
| ९७-९९ | ७९. | घरमालक बाहेरून घरीं आल्यावर त्याला सर्व समजतें. |

तें ऐकून त्याला वाटणारी धन्यता.
१००. ८०. गृहस्थाश्रमाचें मुख्य कर्तव्य अतिथीचा सत्कार.
१०१.१०२.८०. श्रीगुरूंच्या भोजनपात्राची त्या गृहांत निरंतर पूजा व त्यामुळें त्या वंशास मिळालेलें फळ.
१०३ ८१. ग्रंथ करण्याचें कारण व स्थान.
१०४ ८१. ग्रंथाचे अधिकारी.

॥श्रीगणेशदत्तगुरूभ्यो नमः॥

# कुमारशिक्षा

**सत्यं ज्ञानमनन्तं सच्छक्त्येकं कारणं परम् ।**
**वन्दे निरुपमं सूक्ष्मं श्रीदत्तं तमतीन्द्रियम् ॥१॥**

अन्वय :- सत्यं ज्ञानं अनंतं एकं सच्छक्ति कारणं परं अतीन्द्रियं सूक्ष्मं निरुपमं तं श्रीदत्तं वंदे ।

अर्थः- ॐ वासुदेवानंदपूर्वा दयासान्द्रा सरस्वती । कुमारशिक्षारूपेयं पूज्यते डिम्भलीलया ॥ त्रिकालाबाधित, ज्ञान - स्वरूप, सर्वव्यापक, अखंड ज्ञान, इच्छा व क्रिया या शक्तींनीं युक्त असलेला, जगाची उत्पत्ति, पालन व संहार करणारा, निरुपम अतींद्रिय व सूक्ष्म असा जो प्रसिद्ध श्रीदत्तमहाराज त्याला मी वंदन करितो.

भावार्थः- 'अनंतकोटि ब्रह्मांडनायक राजाधिराज दत्तात्रेय महाराजकी जय', असा जयघोष आपण नेहमी करितो. याचा अर्थ समजून घेणे जरूर आहे. त्याकरितां दयानिधि श्रीमहाराजांनी हे मंगल केले आहे. श्रीदत्त अतींद्रिय म्हणजे डोळ्यांनी अगर इतर इंद्रियांनीं समजणे शक्य नाही, पण तो नाही असे नाही. त्याच्या अस्तित्वाचे प्रमाण जग आहे. अनेक प्रकारांनी नटलेले हे जग आपोआप उत्पन्न होणे शक्य नाही. अर्थात् ज्याच्या सत्तेने ते उत्पन्न होते, ठराविक काळ राहाते, त्यानंतर नाहीसे होते तो दत्तराज म्हणजे परमेश्वर. जगाची घडामोड होऊनहि देवाच्या स्वरूपांत बदल होत नाही. तो निर्विकार=पर असतो. म्हणजेच तो विवर्तोपादान कारण आहे.

दोरीवर साप भासतो, कांही वेळ राहातो व तेथेंच मावळतो म्हणजे सर्पाचे दोरी हे विवर्तोपादान आहे. तसाच ईश्वर जगाचे विवर्तोपादान या प्रकाराचे कारण आहे. हे ईश्वराचे तटस्थलक्षण होय. वस्तु आहे हे दाखविण्याकरितां जें वर्णन, ते तटस्थलक्षण जाणावे. यानंतर परमेश्वर कसा आहे हे सांगण्याकरितां त्याच्या स्वरूपाचे जें वर्णन, ते स्वरूपलक्षण होय. तेच 'सत्यं ज्ञानं अनंतं' या शब्दांत महाराजांनी सांगितले.

ईश्वर नित्य आहे म्हणून कालाची मर्यादा त्याला नाही. तो सर्वव्यापक असल्याने अमक्या स्थली नाही असे म्हणतां येत नाही. म्हणजे देशाने त्याची मर्यादा (परिच्छेद) ठरत नाही. सर्व वस्तूंच्या रूपाने तोच नटलेला आहे = सर्वात्मा आहे म्हणून कोणत्याहि वस्तूने तो मर्यादित (परिच्छिन्न) होत नाही. तात्पर्य, तो अनंत आहे. ज्ञानरूप तो आहे = प्रत्येक पदार्थाचे स्फुरण हेच त्याचे स्वरूप आहे. सत्य, त्रिकालाबाधित आहे. कोणत्याहि प्रमाणाने त्याचा बाध होत नाही. परमेश्वर नाही हे विचारांतीं ठरतच नाही. दोरी नसती तर सर्पहि भासला नसता, तद्वतच परमात्मा नसता तर संसारच झाला नसता. सर्प खोटा म्हणून दोरी जशी सत्य, त्याच प्रमाणे जग खोटें म्हणून परमात्मा सत्य. जग जड, परमात्मा ज्ञानरूप, जग मर्यादित तर परमात्मा सदा सर्वत्र भरलेला, अमर्याद. एवंच सत्य, ज्ञान, अनंतरूप परमात्मा आपले स्वरूप असून ते मिळविण्याचा प्रयत्न करणे हेच मुख्य कर्तव्य. या कर्तव्याचा ओनामा सांगण्याकरितांच कुमारशिक्षा महाराजांनीं लिहिली. ॥१॥

परंतु परमात्माच नाही, कारण त्याविषयीं प्रमाण कांही नाही असे कोणी म्हटल्यास त्याचे समाधान असे....

**आप्तवाक्यं प्रमाणं न आप्त ईशोऽत्र वर्णभूः।**
**निःश्वासवदनायासात्तस्माज्ञाता श्रुतिः सती ॥२॥**

अन्वयः- नः आप्तवाक्यं प्रमाणं (अस्ति) अत्र आप्तः वर्णभूः ईशः। तस्मात् निःश्वासवत् अनायासात् सती श्रुतिः जाता ।

अर्थः- आपल्याला आप्तवाक्य हे प्रमाण आहे. या जगांत आप्त, कल्याणांचा उपदेश करणारा, जो ब्राह्मणादिकांची उत्पत्ति करितो असा ईश्वर आहे. त्या ईश्वरापासून श्वासोच्छ्वासाप्रमाणे अनायासाने निर्दोष वेद उत्पन्न झाले.

भावार्थः- आपल्या कल्याणाचा मार्ग जो सांगतो त्याला आप्त = हितचिंतक असे आपण समजतो व त्याच्या शब्दांवर विश्वास ठेवतो. सर्व जगाचा खरा (आप्त) हितचिंतक ईश्वरच आहे. कारण तो सर्वज्ञ असल्यामुळे वेदाच्या रूपाने लोकांना बिनचूक साधनांचा उपदेश करितो. सृष्टीची उत्तम व्यवस्था चालू राहण्यासाठीं त्याने ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र असे चार वर्ण उत्पन्न केले व ब्रह्मचर्य, गृहस्थ इत्यादि आश्रमांची मर्यादा घालून त्यांना क्रमाने वेदाध्ययन, अग्निहोत्र, तपश्चर्या व आत्मचिंतन असे धर्म सांगितले. धर्माचा उपदेश वेदांमध्यें आहे. वेद अपौरूषेय आहेत. आपला श्वासोच्छ्वास जसा अनायासे स्वाभाविक चालू असतो, त्या प्रमाणे सृष्टीच्या आरंभी ईश्वराला पूर्व कल्पांतील वेद जसेच्या तसे स्मरतात. वेदांमध्ये 'यः सर्वज्ञः सर्ववित्' (जो सर्वज्ञ आहे, सर्ववेत्ता आहे) इत्यादि वाक्यांत ईश्वराचे वर्णन आहे. वेद हे निर्दोष असल्यामुळे त्यांवर विश्वास ठेवण्यांत कल्याण आहे. मग वेदांनी ईश्वर आहे, त्याच्या सेवेने तो प्रसन्न होतो व दर्शन देतो, असे सांगितले असल्यामुळे 'अतींद्रिय ईश्वर आम्ही मानीत नाही' असे म्हणणे म्हणजे, आपली पाठ दिसत नाही म्हणून ती नाही असेच म्हणण्यासारखे आहे. श्रीस्वामिमहाराजांनीं युवशिक्षेत याच युक्तीने ईश्वरसिद्धि केली आहे. तात्पर्य, वेद हे आप्तवाक्य असल्याने त्यांवर विश्वासून ईश्वर आहे अशी दृढ भावना धरून त्याची आज्ञा पाळली पाहिजे. ॥२॥

मात्र, वेद प्रमाण (कल्याणाचा खरा मार्ग सांगणारे आहेत) येवढ्यावरून कल्पसूत्रें व धर्मशास्त्रें खोटी आहेत असे मानूं नये; तर त्यांवरहि विश्वास ठेवावा, असे सांगतात.

**सा षडङ्गा च तदनुसारिणी स्मृतिरीशितुः ।**
**उभे आज्ञे च विमले लोचने हि द्विजन्मनाम् ।।३।।**

अन्वयः- षडंगा सा च तदनुसारणी स्मृतिः उभे ईशितुः आज्ञे, च द्विजन्मानां विमले लोचने (स्तः) हि ।

अर्थः- सहा अंगांसहित तो वेद व वेदानुसारी मनुस्मृति इ. धर्मशास्त्रें या दोनहि परमेश्वराच्या आज्ञा आहेत व द्विजांचे ते निर्दोष डोळे आहेत ही गोष्ट प्रसिद्ध आहे.

भावार्थः- शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद व ज्योतिष अशीं वेदांची अंगें आहेत. या अंगांसहित वेदांचे व धर्मशास्त्रांचे अध्ययन करणारा खरा डोळस (उत्तम विद्वान) समजला जातो. यांचे अध्ययन करण्याचा अधिकार द्विजांना (ब्राह्मणादिकांच्या कुलांत जन्म घेणे व उपनयन संस्कार असे दोन जन्म असलेल्यांना) म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या तीन वर्णांना आहे. राजाज्ञेचे उल्लंघन केले असतां, जसे शासन भोगावे लागते; त्याप्रमाणे अनंतकोटि ब्रह्मांडनायकमहाराज ईश्वराची वेद, स्मृति या रूपांत असलेली आज्ञा न मानल्यास आसुरी योनींत जन्म पावण्याची शिक्षा भोगावी लागते. शूद्राला मात्र वेदाचा अधिकार नाही. कारण त्याची मुंज होत नाही. ।।३।।

वेद, स्मृति या ईश्वराच्या आज्ञा काय करतात ते सांगतात.

**उभे विधिनिषेधाभ्यां निवर्त्याधिकृतं नरम् ।**
**अनर्थात्परमार्थे ते नियोजयत आदरात् ।।४।।**

अन्वयः- उभे अधिकृतं नरं विधिनिषेधाभ्यां अनर्थात् निवर्त्य आदरात् परमार्थे नियोजयतः ।।४।।

अर्थः- त्या श्रुतिस्मृति, कर्माधिकारी पुरुषाला विधिनिषेधांच्या योगाने अनर्थकारक कर्मांपासून परावृत्त करून कल्याणाच्या मार्गाकडे प्रेमळ उपदेशाने प्रवृत्त करतात.

भावार्थः- 'अहरहः संध्यां उपासीत' रोज संध्या करावी, खरे बोलावे इत्यादि कर्तव्यांच्या उपदेशाला विधी म्हणतात. विधीने मनुष्य परमार्थाकडे

वळतो. 'न हिंस्यात् सर्वाभूतानि' कोणालाहि पीडा देऊं नये इत्यादि उपदेशाला निषेध म्हणतात. निषेधाने मनुष्य वाईट मार्गापासून परावृत्त होतो. चुकलेल्या वाटसरूला योग्य मार्ग जसा आपण सांगतो, त्याप्रमाणे कर्तव्यपराङ्मुख जनांना सन्मार्गी लावणे हे श्रुतिस्मृतीचे कार्य।।४।।

**संस्कृतेन द्विजेनातो विधिवत्सद्गुरोर्मुखात् ।**
**लब्ध्वा ते स्वक्रिया कार्या तदुक्तेश्वरतुष्टये ।।५।।**

अन्वयः- अतः संस्कृतेन द्विजेन विधिवत् सद्गुरोः मुखात् ते लब्ध्वा ईश्वरतुष्टये तदुक्ता स्वक्रिया कार्या ।।५।।

अर्थः- म्हणून (संस्कृत) उपनयन झाल्यावर ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांनी यथाशास्त्र सद्गुरुकडून श्रुतिस्मृतींचे अध्ययन करावे. नंतर ईशसंतोषासाठी श्रुतिस्मृतींनीं सांगितलेले आपापले कर्म करावे.

भावार्थः- उपनयन झाल्यावर वेद पढण्याकरितां गुरूंच्या आश्रमांत रहावयाचे असते. गुरुजींनीं बोलावल्यावर त्यांच्याकडे जावे. आचमन करून दर्भाचे पवित्रक घालून प्राणायाम करावा. गुरुजींना नमस्कार करावा व वेद पढावा. उपनयन जरी तीनहि वर्णांचे होते तरी पढविण्याचा अधिकार सदाचारी ब्राह्मणालाच आहे. स्नानसंध्या न करणाऱ्या गुरूकडे अध्ययन केल्यास कांही उपयोग नाही. सर्वांचे शरीर एकसारखेच असले, तरी परमेश्वराने सृष्टीच्या वेळी गुण व कर्म या रूपाने केलेला आनुवंशिक फरक मात्र निरंतर कायम राहिला आहे. त्यामुळे क्षत्रियाने अगर वैश्याने वेद कां शिकवूं नये ही शंका बरोबर नाही. नाहीतर शूद्राचे शरीर इतरांसारखेच असल्याने त्याची मुंज करावी लागेल. धर्माचे स्वरूप गहन असल्याने त्याविषयीं वात्रटपणा बरा नाही. पाप लागेल. श्रुतिस्मृतींच्या आज्ञेबरहुकूम निष्काम देवाची सेवा करावी. त्यांतच खरे कल्याण आहे. ।।५।।

'अर्थज्ञानं साधनीयं द्विजैः श्रेयोर्थिभिस्ततः' कल्याणेच्छु द्विजांनीं मंत्रांचा अर्थ समजून घ्यावा, असें वचन आहे. म्हणून श्रुत्यनुकूल तर्कादिकांच्या सहाय्यानें तो जाणावा, असें सांगतात.

**अनुकूलेन तर्केण श्रुत्यन्तरसहायतः ।**
**मन्त्रः प्रकरणाच्चापि निर्वक्तव्यो नान्यथा ।।६।।**

अन्वयः- अनुकूलेन तर्केण श्रुत्यंतरसहायतः अपि च प्रकरणात् मंत्रः निर्वक्तव्यः । अन्यथा न हि ।।

अर्थः- वेदाला अनुकूल अशा तर्काने इतर वेदवाक्यांच्या आधारे, शिवाय प्रकरणाचा विचार करून मंत्राचा अर्थ लावावा. याच्या व्यतिरिक्त मनास पटेल असा (अर्थ) लावूं नये.

भावार्थः- वेदमंत्र फार गहन अर्थाचे असल्याने त्यांविषयीं स्वतंत्र कल्पना करूं नये. उदाहरणार्थ - 'दधिक्राव्णो' असा मंत्र आहे. दधिक्रावा म्हणजे इंद्राचा घोडा. यांत दह्याचा संबंध नाही. पूजेंत तर दधिस्नानाला हा मंत्र म्हणतात. याचप्रमाणे अनेक मंत्र भलत्याच ठिकाणी म्हटले जातात, अशी शंका घेऊं नये. सर्वज्ञ मुनींवर विश्वासून त्यांनीं सांगितल्याप्रमाणे अनुष्ठान करावे. अर्थ समजून घेणे अशक्य असले तरी मंत्रांचे ऋषि, छंद व देवता यांचे ज्ञान आवश्यक आहे. नाहीतर कर्म फुकट जाते व फार पाप लागते. ।।६।।

कर्माचे वेळी संशय येतात. त्याकरितां काय करावे हे सांगतात.

**धर्मेहात् संशयं छित्वा विप्राच्छ्रद्धान्वितः शुचिः।**
**अनापद्याद्यकल्पेन निजधर्मं चरेद्द्विजः ।।७।।**

अन्वयः- धर्मेहात् विप्रात् संशयं छित्वा श्रद्धान्वितः शुचिः द्विजः अनापदि आद्यकल्पेन निजधर्मं चरेत् ।।७।।

भावार्थः- संसारी द्विजाला अडचणीचे प्रसंग अपरिहार्यच आहेत. त्या वेळी कर्मानुष्ठानाविषयीं कांही शंका येतात. तेव्हां कल्पनेने कांही पळवाट शोधूं नये. शिष्ट विद्वानांना विचारावे व ते सांगतील तसे करावे. 'यदि ते कर्मविचिकित्सा' इ. श्रुतींत हेच सांगितले. श्राद्धांत 'द्वौ दैवे' देवांच्या जागी दोन व पितरांच्या जागी तीन ब्राह्मण बसवावे असा मुख्य प्रकार सांगितला. आपत्ति नसतां तसेच केले पाहिजे. अडचणीच्या वेळी

गौण पक्ष घेतला तरी हरकत नाही. विनाकारण इच्छेनुसार कर्म केल्यास निष्फळच होते. ||७||

धर्मानुष्ठानाचे फळ सांगतात -

**धर्मेणेशार्पितेनाशु जायते पापसंक्षयः।**
**उत्पद्यते ततो ब्रह्मज्ञानं मोक्षस्ततो भवेत् ||८||**

अन्वयः- ईशार्पितेन धर्मेण आशु पापसंक्षयः जायते। ततः ब्रह्मज्ञानं उत्पद्यते । ततः मोक्षः भवेत् ||८||

अर्थः- ईश्वरार्पण केलेल्या धर्माने लागलीच पापांचा पूर्ण नाश होतो. त्यानंतर परमात्म्याचा साक्षात्कार होतो व मग मोक्ष मिळतो.

भावार्थः- पुरूषोत्तम अंतर्यामी कर्म करणारा आहे अशी भावना कर्मकाली करावी. हेच ईश्वरार्पण होय. याने 'मी कर्ता' हा अभिमान सुटतो. अभिमान टाकून कर्म केल्यास, पुनर्जन्माचे कारण जी वासना, ती उत्पन्न होत नाही. जसे मेण लावलेल्या कागदावर ठसा उमटत नाही तसा ईश्वरार्पणाची भावना दिलेल्या मनावर वासनांचा ठसा उमटत नाही. त्यामुळे चित्तशुद्धि होते. चित्तशुद्धीच्या योगें मी देह इत्यादि अहंकार व मी ईश्वर, ब्रह्म असणे अशक्य आहे अशी कल्पना, ही दोन्ही नाहीशीं होतात. मग गुरूपदेशाने 'मी परमात्मा आहे' असा अनुभव अनायासे होऊन मोक्ष मिळतो. जन्ममरणपरंपरा कायमची संपते. ||८||

कर्मे करण्याची मर्यादा किती समजावी ते सांगतात -

**कर्मारुरुक्षुणा कार्यं फलासक्तिविवर्जितम् ।**
**आरूढः कर्म संन्यस्य शमादीनाश्रयेद्बुधः ||९||**

अन्वय :- आरुरुक्षुणा फलासक्तिविवर्जितं कर्म कार्यम् । आरूढः बुधः कर्म संन्यस्य शमादीन् आश्रयेत् ||९||

अर्थः- ईश्वरसाक्षात्कार व्हावा असे इच्छिणाऱ्याने फळाची आशा सोडून धर्मानुष्ठान करावे. योगारूढ विवेकी साधकाने कर्माचा संन्यास करावा व संन्यास घेऊन शमादि अंतरंग साधने अंगी बाणविण्याचा प्रयत्न सुरू करावा.

भावार्थः- ईश्वरसाक्षात्कार व्हावा, मोक्ष मिळावा अशी इच्छा केव्हां तरी होते. पण रात्रंदिवस तशी तळमळ वाटत नाही. ती तशी वाटणे म्हणजे मुमुक्षा अथवा आरुरुक्षा. यासाठींच, तीव्र तळमळ लागण्याकरतां फळाचा अभिलाष सोडून कर्म करावे. त्यायोगें विषयवासना कमी होऊन साधक योगारूढ (जितेन्द्रिय) बनतो. ज़ितेन्द्रिय झाल्यावर संन्यास घ्यावा व नित्यानित्यविवेक, वैराग्य, शम, दम इत्यादि साधने अंगवळणी पडण्याचा अभ्यास सुरू करावा. कोणत्याहि पदार्थाचा मोह मनास न होणे ही इन्द्रियजयाची खूण आहे. 'यदा हि नेन्द्रियार्थेषु' असे गीतेत याचे वर्णन आहे. ।।९।।

'मनुष्य मोक्षमार्गांत गेलेला देवांना रुचत नाही. ते अनेक विघ्ने उत्पन्न करतात' असे श्रुतींत वर्णन आहे. मग कर्मे कशीं सोडावीत, अशी भीति वाटण्याचे कारण नाही, हे सांगतात -

**ऋणत्रयमपाकृत्य विरक्तः प्रव्रजेच्छमी ।**
**न तस्य कर्मसंबन्धो देवस्तं न जिघांसति ।।१०।।**

अन्वयः- ऋणत्रयं अपाकृत्य शमी विरक्तः (सन्) प्रव्रजेत् । तस्य कर्मसंबंधः न । देवः तं न जिघांसति ।

अर्थः- तीन ऋणे फेडून शांत व विरक्त साधकाने संन्यास घ्यावा. विरक्ताला कर्मानुष्ठानाचे बंधन नाही. देव त्याला विघ्न करीत नाहीत.

भावार्थः- वेदाध्ययनाने ऋषींचे, यज्ञयाग करून देवांचे, पुत्रोत्पादनाने व दर्शश्राद्ध वगैरे करून पितरांचे ऋण फेडणे हे द्विजाचे कर्तव्य आहे. पण हे कर्तव्य बजावून ज्याची विषयवासना कमी झाली त्याला तेच चर्वितचर्वण करण्याचे कारण नाही. अर्थात् तो पुढच्या मार्गाला मोकळा झाला म्हणजे मोक्ष साधनांचा अधिकारी बनला. त्याने कर्मे सोडली तरी तो देवांना अप्रिय होत नाही. मात्र एखाद्या आळश्याने कर्म सोडल्यास देव विघ्न करतात व त्या विषयलंपट पशूला संसाराच्या गोठ्यांत अडकवून टाकतात. तीव्र वैराग्य चित्ती असल्यावर कसलीच भीति नाही. ।।१०।।

'चातुर्मास्य याग केला असतां अक्षय पुण्य मिळते' इत्यादि वर्णनावरून जन्मभर कर्मेच करावीं, संन्यास नको, अशी भ्रांति असलेल्यांना सांगतात

**यः श्रेयो मनुते कर्म मृत्योर्मृत्युं स गच्छति ।**
**कर्महीनो मनोऽशुद्धयास्वर्ब्रह्म च न गच्छति ।।११।।**

अन्वयः- यः कर्म श्रेयो मनुते स मृत्योर्मृत्युं गच्छति । कर्महीनः मनोऽशुद्धया स्वः च ब्रह्म न गच्छति ।।

अर्थः- जो कर्म हेच कल्याणाचे साधन आहे असे मानितो तो जन्ममरणाच्या फेऱ्यांत सापडतो. जो मुळीच कर्म करीत नाही त्याचे मन अशुद्धच (विषयलंपट) राहिल्याने तो स्वर्ग व परब्रह्म स्वरूपाला प्राप्त होत नाही.

भावार्थः- वेदांतील मोघम उपदेशाचे मर्म लक्षांत न घेतां विषयाभिलाष धरून कर्मे केली तर संसारातून सुटका मुळीच होत नाही. कांही वेडे लोक कर्म करून मग सोडण्यापेक्षां कर्म अजिबात न करणे चांगले असे म्हणतात. पण हे तर अगदीच वाईट; कारण अशांना ऐहिक सुख व मोक्ष दोनहि न मिळतां नरकाची प्राप्ति मात्र होते. श्रीकृष्णाने स्पष्ट म्हटले आहे -- 'नायं लोकोऽस्त्यज्ञस्य कुतोऽन्यः कुरुसत्तम्' कर्म न करणाऱ्याला इहलोक सुद्धां नाही; मग परलोक कुठून मिळणार? ।।११।।

**नित्यं नैमित्तिकं तस्मात्प्रत्यवायजिघांसया ।**
**शमाद्युत्पत्तिपर्यन्तं कर्तव्यं स्वाश्रमोचितम् ।।१२।।**

अन्वयः- तस्मात् प्रत्यवायजिघांसया शमाद्युत्पत्तिपर्यन्तं स्वाश्रमोचितं नित्यं नैमित्तिकं (च) कर्तव्यम् ।।

अर्थः- म्हणून पापक्षय करण्यासाठी शमदमादिक उत्पन्न होईपर्यंत आपापल्या आश्रमास सांगितलेले नित्य, नैमित्तिक, संध्या, श्राद्ध इत्यादि कर्म केले पाहिजे.

भावार्थः- सांप्रत कर्तव्यकर्मांचे ज्ञान लोपले आहे. ते समजावून

दिले पाहिजे. बा! तूं ब्राह्मण आहेस, तुझी शाखा अमुक आहे, तुझें उपनयन (मुंज) झाले आहे. आतां गुरूजवळ वेद पढ. शरीराच्या पावित्र्याकरितां लघुशंका वगैरे केल्यावर हात पाय धुवून आचमन करावे. संध्या करावी. गुरूची आज्ञा पाळावी. इत्यादि प्रकारे त्या त्या आश्रमींनीं त्यांचे धर्म जाणून घेतले पाहिजेत. पण ते कसे होणार? गायत्री मंत्र सुद्धां येत नाही व यावा अशी तळमळ नाही अशा धटिंगणांपुढें काय रडावे!! तरी पण दयाळू श्रीमहाराज सांगत आहेत इकडे लक्ष दिल्यास कल्याण होईल. ।।१२।।

पुष्कळ दिवस कर्म करूनहि शमादिक उत्पन्न झाले नाहीत तर काय करावे, हे सांगतात -

**शमाद्युत्पत्त्यभावेऽपि यावज्जीवं तदाचरेत् ।**
**कर्म चोपासनमपि फलिष्यन्ति भवान्तरे ।।१३।।**

अन्वयः- शमाद्युत्पत्त्यभावेऽपि तत् यावज्जीवं आचरेत् । कर्म च उपासनं भवान्तरे फलिष्यन्ति ।।

अर्थः- या जन्मी कर्म करूनहि इन्द्रियनिग्रह इत्यादि साधने उत्पन्न जरी झाली नाहीत; तरी मरेपर्यंत कर्म करावेच. कारण नित्यकर्मांचे व उपासनेचे फळ जन्मांतरी निश्चित मिळेल.

भावार्थः- 'अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम्' अनंत जन्मीं ची पुण्याई सांठूनच चित्तांतील विषयवासना कमी होणार. एका जन्मांतच ते होणार नाही. याकरितां साधकाने उताविळी न करितां ईश्वरावर विश्वासून निष्काम कर्म करीत राहावे; हे उत्तम ।।१३।।

पण हे समजावे कसे, असे म्हटल्यास सांगतात-

**दृश्यते शुद्धसत्त्वोऽत्र यः कर्मानुष्ठितिं विना ।**
**भवान्तरे कृतं तेन क्रोधादिर्यत्र नैव हि ।।१४।।**

अन्वयः- यः अत्र कर्मणामनुष्ठितिं विना शुद्धसत्त्वः दृश्यते । तेन भवान्तरे कृतं । हि यत्र क्रोधादिः न एव ।

अर्थः- जो या जन्मात कर्म न करितांच निर्मळ अंतःकरणाचा

दृष्टीस पडतो, त्याने पूर्व जन्मांत कर्म केलेले असते. कारण त्याचे ठिकाणी कामक्रोधादि विकार मुळीच नसतात.

भावार्थः- कोणी बालपणापासूनच अगदी शान्त, निर्मळ मनाचे असतात व स्वरूपानुसंधानांत निमग्न असतात. असे महात्मे कर्म करीत नाहीत; हे बघून पामराने त्यांचे प्रमाणे न वागतां, आपल्यालाहि असे शांतिसुख मिळविले पाहिजे अशी इच्छा धरून श्रद्धापूर्वक कर्मेच करावीं. ।।१४।।

शास्त्राज्ञेचे यत्किंचितहि उल्लंघन न करतां अत्यंत दक्षतेने कर्म आचरावे असे सांगतात

**कृतमप्यकृतं न स्याद्धीनत्वं न यथा भवेत् ।**
**तथा कर्माचरेद्युक्तो विचाराचारसंयुतः।।१५।।**

अन्वयः- कृतं यथा अकृतम् न स्यात्, हीनत्वं यथा न भवेत्, तथा विचाराचारसंयुतः युक्तः कर्म आचरेत् ।।

अर्थः- कर्म करूनहि न केल्यासारखे होणार नाही, कांही कर्मांतील भाग (हीन) चुकीने करावयाचा रहाणार नाही अशा पद्धतीने दक्षतेने अनुष्ठान चालू ठेवून (युक्तः) साधकाने कर्म करावे.

भावार्थः- मन शुद्ध असल्यावर बाह्य थोतांड कशाला असे कल्पून गळ्यांत जानवे नसतां, शेंडी मोकळी ठेवून, कासोटा न घालतां कर्म केल्यास त्याचा कांही उपयोग नाही. 'अनाचारस्तु मालिन्यं अत्याचारस्तु मूर्खता ।। विचाराचारसंयुक्तः कर्म कुर्वन् सुखी भवेत् ।।' आचार मुळीच न पाळल्यास अपावित्र्य येते. सोवळ्या ओवळ्याचे फाजील स्तोम माजवणे मूर्खपणा आहे. म्हणून तारतम्य बघून शिष्टाचाराप्रमाणे कर्म करावे, असे वचन आहे. रेशमी वस्त्र किड्याची विष्ठा आहे, लोकरीचे वस्त्र प्रेतावरील लोकरीचे असते, त्यापेक्षां कापडच वापरणे चांगले हे बोलणे शिष्टाचाराला धरून नाही. गूळसुद्धां धुऊन घेतला पाहिजे हा आचरटपणा आहे. या दोनहि गोष्टी टाळून कर्म करावे. ।।१५।।

आचाराचा काय उपयोग, ते सांगतात-

**आचारप्रभवो धर्मो धर्मेणार्थं च साधयेत् ।**
**कामं तदविरोधेन मोक्षोऽतः सुकरो भवेत् ॥१६॥**

अन्वयः- धर्मः आचारप्रभवः । धर्मेण अर्थं साधयेत् । तदविरोधेन च कामम् । अतः मोक्षः सुकरो भवेत् ।

अर्थः- धर्म वर्णाश्रमाला विहित कर्मे करण्याने उत्पन्न होतो. धर्माला अनुसरून संपत्ति मिळवावी. धर्म न सोडतां विषयोपभोग घ्यावा. अशा वागण्याने मोक्ष मिळविणे सोपे होते. ॥१६॥

**धर्मं सनातनं मृत्यौ प्राप्तेऽपि न परित्यजेत् ।**
**धर्मार्चितो यथा तुष्येदीश्वरो न तथाऽन्यथा ॥१७॥**

अन्वयः- मृत्यौ प्राप्तेऽपि सनातनं धर्मं न परित्यजेत् । धर्मेण अर्चितः ईश्वरः यथा तुष्येत् तथा अन्यथा न ।

अर्थः- मरणप्रसंग ओढवला असतांहि ऋषिमुनींच्या परंपरेने चालत आलेला धर्म सोडूं नये. कारण, धर्म ही ईश्वराची आज्ञा आहे. ती पाळल्याने ईश्वराची जशी कृपा होईल, तशी दुसऱ्या कोणत्याहि प्रकाराने होणार नाही.

**औषधाशी यथाऽपथ्यं प्रजहातीह कर्मकृत्।**
**तथा त्यजेद् दुर्व्यसनिपाखण्डालससंगतिम् ॥१८॥**

अन्वयः- औषधाशी अपथ्यम् यथा प्रजहाति । तथा इह कर्मकृत् दुर्व्यसनी, पाखण्डालससङ्गतिम् च त्यजेत् ।

अर्थः- औषध घेणारा जसे अपथ्य वर्ज्य करितो त्याप्रमाणे कर्म करणाऱ्याने दुर्व्यसनी, पाखंडी व आळशी लोकांची संगत टाळावी.

भावार्थः- प्रातःस्नान बाधणार, भांग घ्यावी, इ. दुर्व्यसनींचे प्रलाप असतात. सजीव तुळशीपत्र तोडून हिंसा घडते व ते शाळिग्रामाच्या दगडावर वाहिल्याने पुण्य कसे मिळणार इ. पाखंडी बरळतात. केवळ 'राम' येवढ्या नांवाने सकल पातकें नष्ट होतात मग स्नानसंध्येची काय जरूर, असे आळशी लोक बकतात. यांच्या संगतीने बुद्धिभेद होऊन पाप मात्र लागते.

याकरितां असल्या लबाडांच्या वाऱ्यालाहि राहू नये. ॥१८॥

'कर्माने, संततीने व संपत्तीने मोक्ष मिळत नाही. संन्यासानेच तो मिळतो.' अशी श्रुति असली तरी विषयलंपट पामराला तसे करतां येत नाही, हे सांगतात.

**ज्ञानायाशुद्धहृत्कर्मसंन्यासं कर्तुमिच्छति।**
**स वृद्धिं कल्पवृक्षस्य काङ्क्षन्मूलं निकृन्तति ॥१९॥**

अन्वयः- अशुद्धं हृत् ज्ञानाय कर्मसंन्यासं कर्तुं इच्छति । स कल्पवृक्षस्य वृद्धिं काङ्क्षन् मूलं निकृन्तति ।

अर्थः- जो मलिन अंतःकरणाचा असूनहि अधिकार नसतांना, ज्ञानप्राप्तीच्या लोभाने कर्मे सोडण्याची इच्छा करितो, तो कल्पवृक्ष जोरांत फुटावा म्हणून मूळच कापून टाकणारा शुंठ आहे असे निश्चित जाणावे. ॥१९॥

**अधःसोपानगः षष्ठसोपानं ह्यारुरुक्षति ।**
**तथाऽप्राप्तज्ञानभूमिः षष्ठीं गामारुरुक्षति ॥२०॥**

अर्थः- तळपायरीवर असणारा पुरुष सहाव्या पायरीवर उडी मारण्याची जशी इच्छा करितो, त्याप्रमाणे शुभेच्छा नामक ज्ञानभूमीला प्राप्त न झालेला पुरुष सहाव्या पदार्थाभावना नांवाच्या भूमिकेवर एकदम जाण्याची इच्छा करितो.

भावार्थः- शुभेच्छा, विचारणा, तनुमानसा, सत्वापत्ति, असंसक्ति, पदार्थाभावना व तुर्यगा अशा ज्ञानाच्या सात भूमिका आहेत. एका भूमिकेचा पूर्ण अभ्यास झाल्यावर पुढची भूमिका प्राप्त होत असते. पदार्थाभावना ही सहावी भूमिका आहे. 'आभ्यंतराणां बाह्यानां पदार्थनामभावनात् । परप्रयुक्तेन चिरप्रयत्नेनावबोधनम् । पदार्था भावना नाम षष्ठी भवति भूमिका' (सर्ववेदांतसिद्धांतसार संग्रह ९४६-४७ श्लोक) असे श्रीमच्छंकराचार्यांनी तिचे स्वरूप वर्णिले आहे. कोणत्याही पदार्थाचे स्मरण, (निरंतर आत्मानंदांत निमग्न झालेल्या ज्ञान्याला) या अवस्थेंत होत नाही ॥२०॥

**हित्वा जिघत्सुः परिविष्टमन्नं यथेहतेऽरं परमान्नमस्वः।**
**हित्वा तथाऽज्ञो निजकर्म योगं ज्ञानं च वाञ्छत्यविशुद्धचित्तः॥२१॥**

अन्वयः- जिघत्सुः अस्वः परिविष्टं अन्नं हित्वा अरं परमान्नं यथा ईहते, तथा अविशुद्धचित्तः अज्ञः निजकर्म हित्वा योगं ज्ञानं च वाञ्छति।

अर्थः- भुकेलेला दरिद्री, वाढलेले अन्न टाकून भरपूर पंचपक्वान्नाची जशी इच्छा करितो, त्याप्रमाणे मलिन अंतःकरणाचा अज्ञानी मनुष्य आपले कर्म सोडून अष्टांग योग व ज्ञान यांची हाव धरितो. ॥२१॥

**औत्सुक्यान्मन्दवैराग्यात्संन्यासं प्रकरोति यः ।**
**भूत्वा स उभयभ्रष्ट उभयत्र सुदुःखभाक् ॥२२॥**

अन्वयः- औत्सुक्यात् मन्दवैराग्यात् यः संन्यासं करोति स उभयादूभ्रष्टः (सन्) उभयत्र सुदुःखभाक् (भवति)।

अर्थः- सज्जन आपला सत्कार करतील अशा उत्सुकतेने वैराग्य अगदीं कमी असूनहि जो संन्यास करितो तो इहपरलोकी अत्यंत दुःख भोगणारा होतो. ॥२२॥

**निन्दन्तीह तमात्मघ्नं लोका असुरमीश्वरः।**
**क्षिपत्यसुर्यलोकेषु हीनेषु च ततः परम्॥२३॥**

अन्वयः- लोकाः असुरं तं निन्दन्ति। ईश्वरः आत्मघ्नं तं असुर्यलोकेषु ततः परं च हीनेषु क्षिपति ।

अर्थः- लोक (असुषु, प्राणांच्या ठिकाणी, रमते, रमणारा) विषयविलासी अशा त्या पुरुषाची निंदा करितात, व ईश्वर त्या आत्म घातक्याला असुर्य नांवाच्या नरकांत टाकतो व त्यानंतर वृक्ष पाषाणादिकांच्या जन्मांत घालतो ॥२३॥

**विधिना त्रिविधेनातो यथाकालं यथोदितम् ।**
**दैवीसंपत्तियुक्तेन कर्तव्यं कर्म जानता ॥२४॥**

अन्वयः- अतो त्रिविधेन विधिना यथाकालं यथोदितं कर्म दैवीसंपत्तियुक्तेन जानता कर्म कर्तव्यम् ।

अर्थः- म्हणून कायिक, वाचिक व मानसिक या तीन प्रकारांनी शास्त्रांत सांगितलेल्या वेळी व शास्त्राच्या आज्ञेप्रमाणे अभय, मनाचा सरळपणा इ. दैवी गुणांनी युक्त असावे व कर्मानुष्ठानाची पूर्ण माहिती घेऊन नित्यनैमित्तिक कर्मे करावी ॥२४॥

**अविपक्वकषायाणां संन्यासो माऽस्तु कर्म च ।**
**ज्ञानं सह च कर्तव्यमिति चेन्न घटेत तत् ॥२५॥**

अन्वयः- अविपक्वकषायाणां संन्यासो मा अस्तु। कर्म च ज्ञानं सह कर्तव्यं इति चेत् ? तत् न घटेत ।

अर्थः- ज्यांचे राग, लोभ इ. विकार नष्ट झाले नाहीत अशा लोकांना संन्यासाचा अधिकार नसूं दे. 'मी ब्रह्म आहे' असा अनुभव असतांनाच त्यांनी कर्मे करावी. (ज्ञानकर्मसमुच्चयाने त्यांना मोक्ष मिळेल ) असे कोणी म्हटल्यास, ते बरोबर नाही. एकाच साधकाचे ठिकाणी कर्माधिकार व 'मी ब्रह्म आहे' असा अनुभव एका वेळी असणे शक्य नाही. ॥२५॥

'विद्यां च अविद्यां' या श्रुतीमध्यें ज्ञानकर्मसमुच्चयाने मोक्ष मिळतो असे कसे सांगितले? या शंकेचे समाधान सांगतात.

**ये समुच्चयवादिन्या विद्याविद्ये मते तु ते ।**
**अविरोधाद्देवसंवित्क्रिये फलविशेषदे ॥२६॥**

अन्वयः- समुच्चयवादिन्याः (श्रुतेः) मते ये विद्याविद्ये ते तु विशेषफलदे देवसंवित् क्रिया (भवतः) अविरोधात् ।

अर्थ :- समुच्चय सांगणाऱ्या श्रुतीला ज्या विद्या व अविद्या (कर्म) संमत आहेत (असे वाटते त्या आत्मज्ञान व कर्म नसून) विशेषफळ देणारीं उपासना व कर्म अशी साधने आहेत कारण त्यांचा विरोध नाही.

भावार्थः- आत्मज्ञानी, मी कर्ता नाही व फळे भोगणारा नाही असे समजत असतो. कर्मठ, मी हे कर्म करीत आहे व परलोकी याचे फळ मी भोगीन असे मानीत असतो. तेव्हां मी कर्ता नाही; अशी ज्याची खात्री आहे, तो कर्मानुष्ठानाला आवश्यक असलेला' मी कर्ता आहे इ. अभिमान

कसा करणार? काळोख व प्रकाश जसे एका ठिकाणी राहत नाहीत तसेच आत्मज्ञान व कर्माचा अधिकार एका साधकाच्या ठिकाणी असणे शक्य नाही. यास्तव 'विद्यां च अविद्यां' या श्रुतीतील शब्दांचा, विद्या म्हणजे आत्मज्ञान व अविद्या म्हणजे कर्म असा अर्थ करणे बरोबर नाही. विद्या म्हणजे. उपासना, अविद्या म्हणजे कर्म असा केला पाहिजे व तो जुळतोही. कारण कर्माच्या देवतेचे मनाने ध्यान (उपासना) करून कर्म करितां येते. तोंडाने गायत्री मंत्र आपण जपतो व त्याच वेळी ध्यानहि करतो. याप्रमाणे उपासना व कर्म यांचा विरोध नसलेने साधकाला एका वेळी तीं दोनही करितां येतात. म्हणून ज्ञानकर्मसमुच्चयाची शंका बरोबर नाही ॥२६॥

मंत्र म्हणजेच देवता. देवतेची स्वतंत्र मूर्ति नसते, या मताचे खंडन करितात.

**देवता मन्त्ररूपान्या न विग्रहवतीति यत् ।**
**कैश्चिदुक्तं न तत्सत्यं प्रत्यक्षादिविरोधतः ॥२७॥**

अन्वयः- देवता मन्त्ररूपा (अस्ति) अन्या विग्रहवती न, इति यत् कैश्चित् उक्तं । तत् प्रत्यक्षादिविरोधतः न सत्यं ।

अर्थः- इन्द्र, शंकर इ. देवतांना शरीरच नसते, मंत्र म्हणजेच देवता होय असे जें कोणी म्हटले आहे ते (त्यांचे मत) प्रत्यक्ष म्हणजे श्रुति व अनुमान म्हणजे स्मृति या दोन प्रमाणांच्या विरोधी असल्यामुळे खरे नाही.

भावार्थः- शास्त्रांत श्रुति व स्मृति यांचा उल्लेख प्रत्यक्ष व अनुमान या शब्दानेही करीत असतात. ॥२७॥

देवतेला शरीर असते असे मानल्यास एका वेळी अनेक यज्ञांत आहुति घेण्यास ती कशी येणार? या शंकेचे उत्तर देतात.

**या काऽपि देवताऽऽहूता यत्र तत्राशु तावतीः।**
**कृत्वा मूर्तीर्योगिवत्सा प्राप्यान्तर्हिता हविः ॥२८॥**

अन्वयः- या का अपि देवता यत्र आहूता, सा तत्र, योगिवत् तावतीः मूर्तीः कृत्वा, आशु प्राप्य, अन्तर्हिता सती हविः (अत्ति) ।

अर्थः- जी कोणतीहि देवता ज्या यज्ञांत (तिचा मंत्र म्हणून) बोलाविली असेल ती त्या (सर्व) यज्ञांत, एखादा योगी जशी अनेक रूपें धारण करतो, त्याप्रमाणे अनेक मूर्ति धारण करते व ताबडतोब येते आणि गुप्तरूपाने हविर्द्रव्याचा स्वीकार करते ॥२८॥

**अतो ध्यात्वेशवचसा देवेभ्यो ददते हविः।**
**ईश्वरं योऽवमन्येत तद्वचश्च पतेदधः॥२९॥**

अन्वयः- अतः ईशवचसा ध्यात्वा देवेभ्यः हविः ददते। यः ईश्वरं वेदं च तद्वचं अवमन्येत् सः अधः पतेत् ॥२९॥

अर्थः- देवतेला मूर्ति असते म्हणूनच वेदमंत्र म्हणून तिचे ध्यान करितात व तूप वगैरे हविर्द्रव्याची आहुति देतात. (असा शास्त्रार्थ असूनहि) जो ईश्वराचा व (तद्वचः) वेदाचा अपमान करील तो नरकांत पडेल. ॥२९॥

**नास्तीश इति यो वेद वेदमुज्झित्य नास्तिकः ।**
**कर्मानुष्ठानहीनोऽसावधो यास्यन्नसन्भवेत् ॥३०॥**

अन्वयः- ईशः नास्ति, इति यः वेद असौ वेदं उज्झित्य कर्मानुष्ठान हीनः नास्तिकः अधः यास्यन् असन् भवेत् ।

अर्थः- ईश्वर नाही असे जो समजतो, तो वेदाचा त्याग करितो; त्यामुळेच कोणतेहि कर्म आचरीत नाही. धर्म, परलोक इत्यादि कशावरच त्याचा विश्वास नसल्याने तो नास्तिकच होय. शेवटीं तो (अधो यास्यन्) नरकांतच पडणारा व (असन्) जिवंत असूनहि मृतवतच समजावा ॥३०॥

'अस्ति ब्रह्मेति चेद्वेद संतमेनं ततो विदुः' या श्रुतीचा अर्थ सांगतात.

**अस्तीश इति यो वेद वेदप्रोक्तक्रियादरम् ।**
**तमाहुरास्तिकं सन्तं स च मोक्षं गमिष्यति ॥३१॥**

अन्वयः- ईशः अस्ति इति यः वेद तं वेदप्रोक्तक्रियादरं आस्तिकं सन्तं आहुः । स च मोक्षं गमिष्यति ।

अर्थः- ईश्वर आहे असे जो जाणतो तो वेदांमध्यें सांगितलेल्या कर्माविषयीं आदर बाळगीत असल्याने आस्तिक आहे व साधु आहे असे

त्यास विद्वान् म्हणतात; व तो मोक्षाला जातो ।।३१।।

**श्रुत्यां स्मृतिषु चास्तित्वमीश्वरस्यावगम्यते ।**
**छन्दोगानां श्रुतौ तावदीश्वरास्तित्वमुच्यते ।।३२।।**

अन्वयः- श्रुत्यां स्मृतिषु ईश्वरस्य अस्तित्वमवगम्यते । तावत् छन्दोगानां श्रुतौ तावत् ईश्वरास्तित्वं उच्यते ।

अर्थः- श्रुतींत व स्मृतींमध्यें ईश्वर आहे हे वर्णिले आहे. साम-वेदाच्या केन या नांवाच्या उपनिषदांत ईश्वर आहे हे एका आख्यायिकेच्या रूपाने सांगितले आहे. ।।३२।।

ती आख्यायिका (गोष्ट) अशी

**देवदैत्यरणे दैत्यान्मारयामास चेश्वरः ।**
**केचिद्द्विधा कृता देवैः केचिन्मध्ये विदारिताः ।।३३।।**

अन्वयः- ईश्वरः देवदैत्ययोः रणे दैत्यान् मारयामास । देवैः केचित् द्विधा कृताः । केचित् मध्ये विदारिताः ।

अर्थः- ईश्वराने देवदैत्यांच्या संग्रामांत दैत्यांना मारिले. देवांनी कांही दैत्यांची चिरफाड केली. कांहीच्या कंबरा मोडल्या. ।।३३।।

**केचिन्निकृत्तशिरसः केचिच्छिन्नपदाङ्घ्रयः।**
**हस्तिवीतिरथस्थास्ते घातिता भुवि पातिताः।।३४।।**

अन्वयः- केचित् निकृत्तशिरसः । केचित् छिन्नपादांघ्रयः । हस्तिवीतिरथस्थाः ते घातिताः भुवि पातिताः ।

अर्थः- कोणाची मुंडकी तोडली. कित्येकांचे पाय तोडले. हत्तीवर, घोड्यावर व रथांत बसलेल्या दैत्यांना ठार मारून रणभूमीवर लोळविले।।३४।।

**एकपादांसनयनाः शेरते स्म द्विधाकृताः ।**
**शोणितौघा ववुर्नद्यो रणसीम्नि भयङ्कराः ।।३५।।**

अन्वयः- एकपादांसनयनाः द्विधाकृताः रणसीम्नि शेरते स्म भयंकराः शोणितौघाः नद्यः रणसीम्नि ववुः।

अर्थः- नेमके मध्यभागी घाव घालून एक पाय, एक खांदा व

एक डोळा राहील असे दोन, कांही दैत्यांचे तुकडे केले. रक्ताच्या भयंकर नद्या समरांगणात वाहूं लागल्या ॥३५॥

**एवं सर्वान्रणे वीरान्घातयित्वेश्वरो जयम्।**
**देवेभ्यः प्रददावज्ञास्त ऊचुर्जयिनो वयम्॥३६॥**

अन्वयः- एवं सर्वान् वीरान् रणे घातयित्वा ईश्वरः देवेभ्यः जयं प्रददौ। अज्ञाः ते वयं जयिनः इति ऊचुः ।

अर्थः- याप्रमाणे सर्व शूर दैत्यांचा संग्रामांत वध करून परमेश्वराने देवांना विजय मिळवून दिला. परंतु मूढ देव आम्हीच दैत्यांना जिंकले, असे म्हणाले ॥३६॥

भावार्थः- पापी दैत्य धारातीर्थी मरण येऊन सद्गतीला जावेत अशा दयार्द्र दृष्टीने ईश्वराने त्यांच्याशी विरोध केल्यामुळे तो पक्षपाती असे म्हणतां येत नाही ॥३६॥

**सर्वज्ञो भगवान् गर्वं तेषां हर्तुं कृपाकरः ।**
**धृत्वाऽऽसेचनकं रूपं देवानामग्रतः स्थितः ॥३७॥**

अन्वय :- कृपाकरः सर्वज्ञः भगवान् ईश्वरः तेषां गर्वं हर्तुं आसेचनकं रूपं धृत्वा देवानां अग्रतः स्थितः ।

अर्थ :- दयाळू, सर्वज्ञ, षड्गुणैश्वर्यसंपन्न ईश्वर त्यांचा गर्व नाहीसा करण्यासाठी मनमोहन रूप घेऊन त्यांच्या समोर प्रगट झाला ॥३७॥

**न शिखोर्ध्वाग्निवत्तिर्यङ्नार्कवद्यस्य चाभितः ।**
**दीप्तं यन्नवतां याति मनोहारि क्षणे क्षणे ॥३८॥**

अन्वयः- यस्य शिखा अग्निवत् ऊर्ध्वा न, च अर्कवत् तिर्यक् न। अभितः दीप्तं मनोहारि यत् क्षणे क्षणे नवतां याति स्म ।

अर्थः- ज्या स्वरूपाचे तेज अग्नीप्रमाणे वर पसरत नव्हते व सूर्याप्रमाणे वांकडें जाणारे नव्हते. सभोवर देदीप्यमान, मनोहर असे जें तेज क्षणोक्षणी नवनवीनच दिसत होते ॥३८॥

**अदृष्टपूर्वमालोक्य किमेतद्यक्षमित्यमूः ।**
**देवाताश्चकिता जाता ज्ञातुं तं वह्निमीरयन् ।।३९।।**

अन्वयः- अदृष्टपूर्वं आलोक्य अमूः देवताः चकिताः जाताः । एतत् यक्षं किमिति तत् ज्ञातुं वह्निं ईरयन् ।

अर्थः- पूर्वी कधी न बघितलेले ते स्वरूप बघून त्या देवांना आश्चर्य वाटले व हे कोणते दैवत असावे असे मनांत येऊन त्याला ओळखण्यासाठी त्यांनी अग्नीला तिकडे पाठविले. ।।३९।।

**पप्रच्छागतमग्निं तं कोऽसीतीशोऽग्निराह तम् ।**
**जातवेदा अहं वह्निः सोऽपृच्छत्तव किं बलम् ।।४०।।**

अन्वयः- ईशः तं आगतं अग्निं कः असि इति पप्रच्छ । अग्निः तं आह जातवेदाः वह्निः अहं अस्मि । तव किं बलं इति सः अपृच्छत् ।

अर्थः- ईश्वराने त्या आलेल्या अग्नीला तूं कोण आहेस? असे विचारले. अग्नि त्याला म्हणाला की, अत्यंत चतुर व देवांना हविर्भाग पोंचविणारा वह्नि मी आहे. तुझ्यात काय सामर्थ्य आहे, असे देवाने त्याला विचारले ।।४०।।

**अग्निराह पृथिव्यां यद्दहेयं सर्वमेव तत् ।**
**तच्छ्रुत्वेशो दधौ तत्र तृणं प्राह दहेति तम् ।।४१।।**

अन्वयः- अग्निः आह पृथिव्यां यत् तत्सर्वं दहेयम् । ईशः तत् श्रुत्वा तत्र तृणं दधौ । दह इति तं प्राह ।

अर्थः- अग्नि म्हणाला, पृथ्वीवरील सर्व पदार्थ मी जाळूं शकतो. ते ऐकून ईश्वराने त्याच्यापुढें वाळलेले गवत ठेवले व हे जाळ, असे त्यास सांगितले ।।४१।।

**तद्दग्धुं न शशाकाग्निः सर्वशक्त्याऽपि लज्जितः ।**
**निवृत्येशात्सुरानेत्य प्राह यक्षं न वेद्मि तत् ।।४२।।**

अन्वयः- सर्वशक्त्या अपि अग्निः तत् दग्धुं न शशाक । लज्जितः (सन्) ईशात् निवृत्त्य सुरान् एत्य तत् यक्षं किं न वेद्मि (इति) प्राह ।

अर्थः- सर्व शक्ति एकवटून सुद्धां अग्नीला ते गवत जाळतां आले नाही. त्यामुळे तो लज्जित झाला व देवांकडे येऊन ते दैवत मला समजत नाही असे म्हणाला ।।४२।।

**वायुमूचुः सुरा एतज्ज्ञानीहीति तथेति सः ।**
**ईशं ययावपृच्छत्तमीशस्तं कोऽसि मे वद ।।४३।।**

अन्वयः- एतज्ज्ञानीहि इति सुराः वायुं ऊचुः । सः तथेति, ईशं ययौ। ईशः तं अपृच्छत्, कः असि इति मे वद ।

अर्थः- त्या दैवताला ओळख, असे देव वायूला म्हणाले. ठीक, असे बोलून तो ईश्वराकडे गेला. ईश्वराने त्याला विचारले, तूं कोण आहेस ते मला सांग ।।४३।।

**स प्राह मातरिश्वाऽहं वायुरीशोऽवदत्पुनः।**
**किं ते बलं स आहेदमादास्ये यद् भुवि स्थितम् ।।४४।।**

अन्वयः- सः प्राह, अहं मातरिश्वा वायुः (अस्मि)। ईशः पुनः अवदत्, ते बलं किम्? स आह, यत् भुवि स्थितं इदं आदास्ये ।

अर्थः- तो म्हणाला, मी आकाशांत खेळणारा वायु आहे. ईश्वर मग म्हणाला, तुझें सामर्थ्य काय? तो म्हणाला, पृथ्वीवरील सर्व वस्तु उडवून नेईन ।।४४।।

**आदत्स्वेति तृणं सोऽदादादातुं नाशकत्स तत्।**
**ऱ्हीतो वायुः सुरान्प्राह यक्षं ज्ञातुं हि नाशकम् ।।४५।।**

अन्वयः- आदत्स्व इति सः तृणं अदात् । सः तत् आदातुं न अशकत्। (अतः) वायुः ऱ्हीतः (सन्) सुरान् प्राह यक्षं ज्ञातुं न अशकं हि।

अर्थः- उचल, असे म्हणून ईश्वराने गवत दिले. पण ते वायु उचलूं शकला नाही. त्यामुळे वायु लज्जित होऊन देवांना म्हणाला, त्या दैवताला ओळखण्यास मी समर्थ नाही ।।४५।।

**ततस्ते प्रेरयन्निन्द्रं स तस्यागच्छतः सतः ।**
**तिरोदधेऽपि तत्रेन्द्रः खिन्नस्तस्थौ सहस्रदृक् ।।४६।।**

अन्वयः- ततः ते इंद्रं प्रैरयन् । सः तस्य आगच्छतः सतः तिरोदधे। इन्द्रः सहस्रदृक् अपि खिन्नः तत्र (एव) तस्थौ ।

अर्थः- नंतर ते देव इंद्रास पाठविते झाले. पण तो इन्द्र येत असतांच ईश्वर गुप्त झाला. इन्द्र हजार डोळे असूनहि, देव दिसेना म्हणून खिन्न होऊन तेथेंच उभा राहिला, व भक्तिभावाने दर्शन होण्यासाठी ईश्वराचे चिंतन करूं लागला ।।४६।।

भक्तिभावाने ईश्वरदर्शनाच्या इच्छेने इन्द्र उभा राहिला असतां त्यास उमादेवीचे दर्शन झाले असे सांगतात.

**नेत्रविनिर्जितशारदपद्मां नूपुरहंसरणत्पदपद्माम्।**
**वक्त्रविनिर्जितनिर्मलसोमां तत्र ददर्श वृषा सहसोमाम् ।।४७।।**

अन्वयः- तत्र नेत्रविनिर्जितशारदपद्मां, नूपुरहंसरणत्पद - पद्मां, वक्त्रविनिर्जितनिर्मलसोमां उमां सहसा वृषा ददर्श।

अर्थः- त्या ठिकाणी इन्द्राला अकस्मात् उमादेवीचे दर्शन झाले. शरदऋतूंतील कमलापेक्षां तिचे नेत्र सुंदर होते. पायांमधील हंसाकृति पैंजणांचा मंजुळ आवाज होत होता व मुखाचे सौन्दर्य निष्कलंक चंद्राहून अधिक होते ।।४७।।

**वरां वधूनामपि सत्तमानां श्रिया समानां सुरदत्तमानाम् ।**
**स्वाङ्गैः समानां विधुतारिमानां विभ्राजमानां बहुशोभमानाम् ।।४८।।**

अन्वयः- सत्तमानां वधूनां अपि वरां, श्रिया समानां, सुरदत्तमानां, स्वांगैः समानां विधुतारिमानां विभ्राजमानां बहु शोभमानाम्।

अर्थः- सुंदर स्त्रियांमध्येंहि श्रेष्ठ व लक्ष्मीसारखी ती होती. देव तिची स्तुति करीत होते. सर्व अवयव अगदी रेखीव होते. महिषासुरादि शत्रूंचा गर्व तिने नाहीसा केला होता. लावण्याची प्रभा सर्वत्र पसरत होती व त्यामुळे ती फारच शोभत होती. ।।४८।।

**गङ्गाप्रवाहाभकुचाद्रिहारां दिव्याम्बरां तां स नभोविहाराम् ।**
**पप्रच्छ शक्रोऽत्र मया समक्षं दृष्टं किमेतत्कथयाम्ब यक्षम् ।।४९।।**

अन्वयः- गंगाप्रवाहाभकुचाद्रिहारां दिव्यांबरां नभोविहारां तां सः शक्रः पप्रच्छ । हे अंब मया अत्र समक्षं दृष्टं यक्षं किं एतत् कथय ।

अर्थः- पुष्ट वक्षस्थळावर मोत्यांचा हार गंगाप्रवाहाप्रमाणे शोभत होता. दिव्य वस्त्र ती नेसली होती. अंतराळी उभी होती. तिला इन्द्राने विचारले,'हे अंब, मी येथें समक्ष बघितलेले दैवत कोण होते ते सांग।।४९।।

**साहेश्वरो वो बलगर्वहारि दृश्योऽभवद्योऽखिलहृद्विहारी।**
**इत्युक्त इन्द्रः सह दैवतैस्तं तुष्टाव तद्गर्व इयाय चास्तम् ।।५०।।**

अन्वयः- सा आह - यः दृश्यः अभवत्, स अखिलहृद्विहारी ईश्वरः वः बलगर्वहारी (अस्ति) इत्युक्त इंद्रः दैवतैः सह तं तुष्टाव च तद्गर्वं अस्तं इयाय ।

अर्थः- ती उमादेवी म्हणाली, आता जें दैवत तुम्हाला दिसले तो सर्वांच्या हृदयांत वास करणारा ईश्वर आहे. तो तुमचा सामर्थ्याचा अभिमान नाहीसा करणारा आहे. देवीने हे सांगितल्यावर इन्द्राने सर्व देवांसह ईश्वराची स्तुति केली. बलवंतांना बल देणाऱ्या ईश्वरापुढें आम्हां पामरांचे सामर्थ्य किती असणार असे वाटून त्या सर्वांचा गर्व नाहीसा झाला ।।५०।।

या आख्यानाचे तात्पर्य सांगतात.

**एतेन मूर्तिमत्यस्ता देवता ईश्वरास्तिता ।**
**स्फुटीकृता मता मान्यैरेवमन्यश्रुतिष्वपि ।।५१।।**

अन्वयः- एतेन ता देवताः मूर्तिमत्यः (इति सिद्धम्) मान्यैः मता, ईश्वरास्तिता स्फुटीकृता । अन्यश्रुतिषु अपि एवं अस्ति ।

अर्थः- वरील श्रुतींतील इतिहासावरून सर्व देवतांना शरीर असते हे निश्चित झाले. विद्वान् लोकांनी स्वीकारलेले ईश्वराचे अस्तित्व आम्ही सिद्ध केले. इतर श्रुतींतही याचप्रमाणे ईश्वरास्तित्व वर्णिले आहे. वरील श्रुतींतच देवांना ब्रह्मसाक्षात्कार झाला असे सांगितले आहे. त्यामुळे ही नुसती स्तुति (अर्थवाद) आहे, असे म्हणतां येत नाही ।।५१।।

**एवं स्मृतीतिहासादावुक्तमेकोऽपि पञ्चधा ।**
**भूत्वा स्वाननुगृहणाति स्वेच्छोपात्ततनुः प्रभुः ॥५२॥**

अन्वयः- एकः अपि स्वेच्छोपात्ततनुः प्रभुः पञ्चधा भूत्वा स्वान् अनुगृहणाति एवं स्मृतीतिहासादौ उक्तं (अस्ति)।

अर्थः- सर्वशक्ति ईश्वर एक, अद्वितीय असला तरी भक्ताच्या इच्छेला अनुसरून लीलाविग्रह धारण करितो. देवी, गणपति, विष्णु, शंकर व सूर्य अशीं पंचायतन देवतांची रूपें घेतो व भक्तांवर कृपा करितो, असे धर्मशास्त्र, महाभारत व पुराणे यांमध्यें वर्णिले आहे ॥५२॥

**पूर्वे स कश्यपादिभ्यो वरान्दत्वाऽप्यवातरत् ।**
**रूपान्तरेण जागर्ति कलौ कृष्णातटेऽपि सः ॥५३॥**

अन्वयः- सः पूर्वं कश्यपादिभ्यः अपि वरान् दत्वा अवातरत् । सः कलौ अपि कृष्णातटे जागर्ति ।

अर्थः- ईश्वराने पूर्वकाली कश्यप, अत्रि इत्यादिकांना 'मी तुझा पुत्र होईन' असा वर दिला व अवतार घेतला. तो सांप्रत कलियुगांतहि कृष्णातीरीं जागृत आहे ॥५३॥

**स्वप्ने कथयति स्वेभ्यो यत्तत्सत्यत्वमेति च ।**
**पिशाचाः पितरश्चापि गतिं यान्ति यदाश्रमे ॥५४॥**

अन्वयः- (सः) स्वप्ने स्वेभ्यः यत् कथयति तत् सत्यत्वं एति । यदाश्रमे पिशाचाः अपि च पितरः गतिं यान्ति ।

अर्थः- नृसिंहसरस्वती रूपाने अवतरलेला ईश्वर स्वप्नांत भक्तांना जे दृष्टांत देतो, ते खरे होतात. त्याच्या पवित्र क्षेत्रांत पिशाच्चे व दुर्गतीला गेलेले पितर सद्गतीला जातात.

भावार्थः- एखाद्याच्या शरीरांत प्रवेश करणे, लोकोत्तर चेष्टा करणे व झाडाला झपाटल्याचे कारण सांगून मुक्ति घेणे, इत्यादि पिशाचांच्या चेष्टांवरून शास्त्रांतील वर्णनाचा प्रत्यक्ष अनुभव येतो. जन्मांतराबद्दल निश्चय होतो. इतकें सर्व प्रत्यक्ष दिसूनहि श्राद्ध वगैरे सगळे थोतांड आहे असे

बकणाऱ्या नास्तिकंमन्यांना काय म्हणावे हे समजत नाही. आस्तिकांनी मात्र यावर विश्वासून श्राद्धादिकर्मे करावी ॥५४॥

**ददातीष्टं स्वभक्तेभ्यः स चाद्यापि कलौ युगे ।**
**भक्ताया गोचरो जातो ब्राह्मण्या एतदुच्यते ॥५५॥**

अन्वयः- स च कलौ युगे अद्यापि स्वभक्तेभ्य इष्टं ददाति । भक्तायाः ब्राह्मण्याः गोचरो जातः एतत् उच्यते ।

अर्थः- तो ईश्वर कलियुगामध्यें सांप्रतहि भक्तांचे मनोरथ पूर्ण करितो. याविषयी, भक्त असलेल्या एका ब्राह्मणाच्या पत्नीवर अनुग्रह केल्याची कथा मी पुढें सांगणार आहे ॥५५॥

**कृष्णाया उत्तरे तीरे करवीराख्यपत्तने ।**
**शिरोलसंज्ञकं ग्रामं भिक्षार्थं श्रीगुरुर्ययौ ॥५६॥**

अन्वयः- कृष्णाया उत्तरे तीरे करवीराख्यपत्तने शिरोलसंज्ञकं ग्रामं श्रीगुरुः भिक्षार्थं ययौ ।

अर्थः- कृष्णा नदीच्या उत्तरेला कोल्हापूर संस्थानांत शिरोळ नांवाचे गांव आहे. तेथें श्रीनृसिंहसरस्वती भिक्षेला गेले ॥५६॥

**तत्रैको विधनो विप्रो दत्तभक्तिपरायणः ।**
**तथाविधाऽपि तद्भार्या तामुद्धर्तुं ययौ प्रभुः ॥५७॥**

अन्वयः- तत्र दत्तभक्तिपरायणः एक विधनः विप्रः आसीत् । तद्भार्या अपि तथाविधा । तां उद्धर्तुं प्रभुः ययौ ।

अर्थः- त्या गांवांत दत्तभक्तिपरायण एक दरिद्री ब्राह्मण राहात असे. त्याची पत्नीही दत्तभक्त होती. तिचा उद्धार करण्यासाठी श्रीनृसिंहसरस्वती भिक्षेला गेले ॥५७॥

**भिक्षावृत्तिर्यतेरित्थं स्वाचारेण प्रदर्शयन् ।**
**स्वयं श्रीशोऽपि भिक्षुः सन्भिक्षार्थं ग्राममाविशत् ॥५८॥**

अन्वय :- यतेः इत्थं भिक्षावृत्तिः, (इति) स्वाचारेण प्रदर्शयन् स्वयं श्रीशः अपि भिक्षुः सन् भिक्षार्थं ग्रामं आविशत् ।

अर्थः- (लोकैषणा, वित्तैषणा व पुत्रैषणा टाकलेल्या) यतीलाहि याप्रमाणे भिक्षा हेच उपजीविकेचे साधन असते, असे आपल्या आचरणाने दाखविण्याकरितां, स्वतः लक्ष्मीरमण असूनही संन्यासी होऊन भिक्षेकरितां गांवात गेले ॥५८॥

**पञ्चमुद्राङ्कितं दण्डं दक्षहस्तेन भाजनम् ।**
**दधानोऽन्येन शांतः स विप्रगेहं शनैर्ययौ ॥५९॥**

अन्वयः- दक्षहस्तेन पंचमुद्रांकितं दंडं, अन्येन भाजनं दधानः शांतः सः शनैः विप्रगेहं ययौ ।

अर्थः- उजव्या हातांत ब्रह्म, धेनु, नाग, शंख व परशुमुद्रा या पांच मुद्रा बांधलेला दंड व डाव्या हातांत भिक्षापात्र घेऊन शांत असे श्रीगुरू, किडा-मुंगी मरू नये म्हणून हळूहळू समोर नजर देऊन पावले टाकीत ब्राह्मणाच्या घरीं गेले ॥५९॥

**ॐ ३ हिमित्यारवं श्रुत्वा बहिरेत्याशु गेहिनी ।**
**ऊर्ध्वमुत्क्रामतः प्राणान्पुनर्लब्धुमिदं जगौ ॥६०॥**

अन्वयः- ॐ ३ हिम् इति आरवं श्रुत्वा गेहिनी आशु बहिः एत्य ऊर्ध्वं उत्क्रामतः प्राणान् पुनः लब्धुं इदं जगौ ।

अर्थः- संन्याशाने भिक्षा मागतांना, 'ॐ हिम्' असा मंत्र म्हणावा असे उपनिषदांत आहे; तदनुसारे श्रीगुरूंनी 'ॐ हिम्' असे म्हटले. तो शब्द ऐकल्याबरोबर ब्राह्मणपत्नी बाहेर आली. यतीच्या दर्शनाने वर येणारे प्राण पुनः मिळविण्याकरितां (महाराज आलेले बघून धांदलीने लागलेली धाप सावरून) पुढीलप्रमाणे म्हणाली ॥६०॥

**आगच्छतागच्छताद्य भवतां स्वागतं बृसी।**
**दत्तैषोपविशन्त्वेतत्पाद्यं सत्प्रतिगृह्यताम् ॥६१॥**

अन्वयः- आगच्छत, आगच्छत । अद्य भवतां स्वागतम् । एषा बृसी दत्ता । अत्र उपविशंतु । एतत् सत् पाद्यं प्रतिगृह्यताम् ।

अर्थः- आपण यावे. यावे. आज या घराला आपले पाय लागले,

आम्ही धन्य झालों. हे दर्भासन दिले आहे. यावर बसावे. हे पवित्रजल (पाद्य) पाय धुण्याकरितां ठेविले आहे याचा स्वीकार व्हावा. ॥६१॥

**यतिः प्रक्षाल्य पादौ स्वौ सुपूताद्भिः कमंडलुम् ।**
**आपूर्याचम्य विधिवद्दत्तासन उपाविशत् ॥६२॥**

अन्वयः- यतिः स्वौ पादौ प्रक्षाल्य, सुपूताद्भिः कमंडलुं आपूर्य, विधिवत् आचम्य दत्तासने उपाविशत् ।

अर्थः- श्रीगुरुमहाराजांनी पाय धुतले. पवित्र पाण्याने कमंडलू भरला. विधिपूर्वक आचमन केले व दिलेल्या आसनावर बसले ॥६२॥

**पादावनेजनीर्भिक्षोरप आदाय सा सती ।**
**अभ्यर्च्याभ्युक्ष चात्मानं पीत्वा याता कृतार्थताम् ॥६३॥**

अन्वयः- सा सती भिक्षोः पादावनेजनीः अपः आदाय, अभ्यर्च्य आत्मानं अभ्युक्ष्य पीत्वा कृतार्थतां याता ।

अर्थः- त्या पतिव्रतेने श्रीमहाराजांचे चरणतीर्थ घेतले, त्यांची पूजा केली. अंगावर ते तीर्थ शिंपडले. नंतर तीर्थ पिऊन कृतार्थ झाली. ॥६३॥

**स्तिमितेक्षणपात्राभ्यां यतेस्त्रैलोक्यसुंदरम् ।**
**रूपमापीय सुचिरं साऽतृप्तापीदमब्रवीत् ॥६४॥**

अन्वयः- सा स्तिमितेक्षणपात्राभ्यां यतेः त्रैलोक्यसुंदरं रूपं सुचिरं आपीय अपि अतृप्ता इदं अब्रवीत् ।

अर्थः- त्या स्त्रीने श्रीगुरूमहाराजांचे त्रैलोक्यसुंदर स्वरूप तटस्थ दृष्टीने बराच वेळ न्याहाळून बघितले, पण तरीहि तिचे समाधान झाले नाही. मग ती असे बोलू लागली ॥६४॥

**साधूनामागमोऽस्माकं क्षेमायासक्तचेतसाम्।**
**गृहान्धकूपमग्नान्नोऽनुगृह्णन्ति भवादृशः॥६५॥**

अन्वयः- साधूनां आगमः आसक्तचेतसां अस्माकं क्षेमाय (भवति) भवादृशः गृहान्धकूपमग्नान् नः अनुगृह्णन्ति ।

अर्थः- ईश्वरसाक्षात्कारी साधुजनांची पायधूळ झडण्याने आमच्या

सारख्या विषयलंपट पामरांचे कल्याण होते. आपणासारखे साधु घरादारांत गुरफटलेल्या आम्हांवर अनुग्रह करीत असतात ॥६५॥

**गोदोहमात्रं साधूनां वसतिर्गृहमेधिनाम् ।**
**गृहेष्वाश्रमशुद्ध्यर्थं नित्यं संतृप्तचेतसाम् ॥६६॥**

अन्वयः- गृहमेधिनां गृहेषु नित्यं संतृप्तचेतसां साधूनां गोदोहमात्रं वसतिः अश्रमशुद्ध्यर्थं भवति ।

अर्थः- गृहस्थाश्रम्यांच्या घरीं, सदा संतुष्ट असलेल्या साधूंचे(गोदोह मात्रं) अगदीं थोडावेळहि वास्तव्य, आश्रमास पवित्र करणारे असते ॥६६॥

**देवेभ्योऽपि गरीयांसः साधवो दीनवत्सलाः ।**
**वसन्ति तेषु ते देवास्तुष्यन्ति च तदर्चनात् ॥६७॥**

अन्वयः- दीनवत्सलाः साधवः देवेभ्यः अपि गरीयांसः। (यतः) तेषु ते देवा वसंति । तदर्चनात् तुष्यन्ति च ।

अर्थः- दीन दयाळू महात्मे देवांपेक्षांहि फार श्रेष्ठ असतात. देव साधूंच्या ठिकाणी राहतात, त्यामुळे ते साधूंच्या पूजेने संतुष्ट होतात ॥६७॥

**साधूनां दर्शनादेव क्षीयन्ते पापसंचयाः ।**
**प्रणामान्मङ्गलप्राप्तिः पूजनादव्ययं पदम् ॥६८॥**

अन्वयः- साधूनां दर्शनात् एव पापसंचयाः क्षीयन्ते । प्रणामात् मंगलप्राप्तिः। पूजनात् अव्ययं पदं (लभ्यते)।

अर्थः- सत्पुरुषांच्या दर्शनानेच पापाच्या राशी नाश पावतात. नमस्काराने कल्याण होते. पूजा केली असतां अविनाशी ब्रह्मस्वरूपाची प्राप्ति होते ॥६८॥

**साधुपादरजांस्याधिव्याध्यापत्तिहराणि नः ॥**
**संपत्प्रदानि संसारहराणीष्टप्रदानि च ॥६९॥**

अन्वयः- साधुपादरजांसि नः आधिव्याध्यापत्तिहराणि, संपत्प्रदानि, संसारहराणि च इष्टप्रदानि भवन्ति ।

अर्थः- सत्पुरुषांची पायधूळ आमच्या मानसिक व शारीरिक

दु:खाचा व दारिद्र्याचा नाश करते, संपत्ति देते, जन्ममरण नाहीसे करिते व आमचे मनोरथ पूर्ण करिते ॥६९॥

**विप्राः श्रेष्ठाः नृषु ततः कर्मिणोऽतोऽप्युपासकाः ।**
**भवादृशास्ततः प्राज्ञाः साक्षाद्विष्णुस्वरूपिणः॥७०॥**

अन्वयः- नृषु विप्राः श्रेष्ठाः ततः कर्मिणः अतः अपि उपासकाः, ततः भवादृशाः साक्षात् विष्णुस्वरूपिणः प्राज्ञाः (श्रेष्ठाः भवन्ति)।

अर्थः- मनुष्यांमध्यें ब्राह्मण श्रेष्ठ, त्यांच्यापेक्षां कर्मनिष्ठ श्रेष्ठ, त्यांच्यापेक्षाहि उपासक थोर. त्यांहून आपणांसारखे साक्षात् विष्णुस्वरूप आत्मज्ञानी मोठे असतात ॥७०॥

**विष्णोर्भगवतः साक्षाच्चरा मूर्तिर्यतिः खलु ।**
**संभोजनेन भवतां त्रैलोक्यं भोजितं भवेत् ॥७१॥**

अन्वयः- यतिः भगवतः विष्णोः साक्षात् चरा मूर्तिः खलु। भवतां संभोजनेन त्रैलोक्यं भोजितं भवेत् ।

अर्थः- संन्यासी म्हणजे षड्गुणैश्वर्यसंपन्न श्रीविष्णुची प्रत्यक्ष चालती बोलती मूर्तीच (असे शास्त्र सांगते). आपणांला नैवेद्य अर्पिल्याने त्रैलोक्यांतील सर्व प्राण्यांनाच नैवेद्य केल्यासारखा होत असतो. 'यतिर्यस्य गृहेभुंक्ते तत्र भुंक्ते हरिः स्वयम् । यस्मिन्गृहे हरिर्भुंक्ते तत्र भुंक्ते जगत्त्रयम्।' ज्याच्या घरी यति भोजन करितात तेथें स्वतः श्रीहरीच भोजन करितो. श्रीहरीने जेथें भोजन केले तेथें त्रैलोक्य भोजन करिते या वचनाला अनुसरून हे सुवासिनीचे वाक्य आहे ॥७१॥

**यतः पराङ्मुखो याति यतिस्तद्भवनं वनम् ।**
**सर्वथा तस्य हानिर्यद्गृहेऽनश्नन्वसेद्यतिः ॥७२॥**

अन्वयः- यतिः यतः पराङ्मुखः याति तत् भवनं वनम् । यद्गृहे यतिः अनश्नन् वसेत् तस्य सर्वथा हानिः (भवेत्)।

अर्थः- संन्यासी ज्या घरांतून भिक्षा न मिळाल्यामुळे पराङ्मुख जातो ते घर म्हणजे अरण्यच होय. ज्याच्या घरीं यति (अनश्नन्) उपाशी

राहील त्या गृहस्थाचा सर्वस्वी घात होतो ।।७२।।

**पक्कान्नभिक्षुकस्याग्र्यौ वर्णिभिक्षू तयोरपि।**
**भिक्षुर्यस्मा अपि स्वल्पं दत्तं भवति तन्महत् ।।७३।।**

अन्वयः- पक्कान्नभिक्षुकेषु वर्णिभिक्षू अग्र्यौ । तयोरपि भिक्षुः। यस्मै स्वल्पं अपि दत्तं, तत् महत् भवति।

अर्थः- पक्कान्नाची (शिजविलेल्या अन्नाची) भिक्षा मागणाऱ्यांमध्यें ब्रह्मचारी व संन्यासी (अग्र्यौ) मुख्य समजावे. प्रवासी, दरिद्री, विद्यार्थी, गुरूंचे पोषण करणारा, ब्रह्मचारी व यति असे सहाजण पक्कान्नभिक्षेचे अधिकारी आहेत. त्यांतही यति व ब्रह्मचारी यांचाच मुख्य अधिकार आहे. ब्रह्मचारी व यति यांमध्येही यति हा मुख्य अधिकारी, कारण त्याला अगदी थोडी भिक्षा वाढली तरी अधिक पुण्यकारक असते. (शास्त्र असेच आहे. 'यतिहस्ते जलं दद्याद्भिक्षां दद्यात्पुनर्जलम् ।। तदन्नं मेरूणा तुल्यं तज्जलं सागरोपमम्।।' यतीच्या हातावर पाणी घालून मग भिक्षा घालावी व पुनः पाणी घालावे. ते अन्नदान मेरूदानाइतकें व जलार्पण समुद्रार्पणाइतकें श्रेष्ठ होय.) ।।७३।।

**एताभ्यामप्रदत्वान्नं प्रत्यवायी भवेद्गृही ।**
**एतत्सर्वं विदित्वाऽपि प्रार्थयाम्यल्पधीरहम् ।।७४।।**

अन्वयः- एताभ्यां अन्नं अप्रदत्त्वा गृही प्रत्यवायी भवेत् । एतत् सर्वं विदित्वा अपि अल्पधीः अहं प्रार्थयामि ।

अर्थः- ब्रह्मचारी व यति या दोघांना भिक्षा न वाढल्यास गृहस्थाश्रम्याला पाप लागते हे सर्व माहित असूनहि मज (माझी) मन्दबुद्धीची विनंति आपणांस अशी आहे कीं, ।।७४।।

**बहिर्गतानां कार्यार्थं भक्तानां गृहमेधिनाम् ।**
**आश्वागमो भवेत्तावत्तिष्ठन्त्वत्र दयालवः।।७५।।**

अन्वयः- कार्यार्थं बहिर्गतानां भक्तानां गृहमेधिनां आशु आगमः भवेत् तावत् दयालवः तिष्ठन्तु ।

अर्थः- (ह्यांचे) कांही कामानिमित्त बाहेर जाणे झाले आहे. अतिथीचे ते पूर्ण भक्त आहेत व ते गृहस्थाश्रमी (माझे पति) लवकर परत येतील. यास्तव ते परत येईपावेतो कृपाळू महाराजांनीं येथें थांबावे. यति आल्याबरोबर भिक्षा वाढणे योग्य; तथापि माझी विनंति आहे. ॥७५॥

**लक्ष्यते भवतां वृत्तिर्नैव माधुकरीत्यतः।**
**प्रार्थितं रोचते यद्वत्तद्भवन्तो ब्रुवन्तु माम् ॥७६॥**

अन्वयः- भवतां वृत्तिः माधुकरी न एव इति लक्ष्यते । अतः प्रार्थितम् । यत् वः रोचते तत् भवंतः मां ब्रुवन्तु ।

अर्थः- आपणांकडे बघितल्यावर, निर्वाहाकरितां माधुकरी हे साधन आपले असेल असे वाटतच नाही. म्हणून मी थांबण्याची विनंति केली. त्यांतून आपली इच्छा असेल ते सांगा. ते घरीं येण्यापूर्वी भिक्षा घाल, अशी आज्ञा झाल्यास तसेहि मी करीन. ॥७६॥

**इति श्रुत्वा यतिर्वाचं सौष्ठवौदार्यशालिनीम् ।**
**अस्या मद्दर्शनार्हत्वं नाधुना भर्तुरागतम् ॥७७॥**

अन्वयः- यतिः इति सौष्ठवौदार्यशालिनी वाचं श्रुत्वा अस्या भर्तुः मद्दर्शनार्हत्वं अधुना नागतम् ।

अर्थः- श्रीगुरुमहाराजांनीं याप्रमाणे, प्रेमळ व उदार असे साध्वीचे भाषण ऐकले व हिच्या नवऱ्याला माझ्या दर्शनाची योग्यता अजून आलेली नाही;..॥७७॥

**इति मत्वा यतिः साक्षाद्धरिर्लोकगुहाशयः ।**
**श्रीदत्तो भगवान् साध्वीमिदं वचनमब्रवीत् ॥७८॥**

अन्वय :- इति मत्वा लोकगुहाशयः साक्षात् हरिः भगवान् श्रीदत्त साध्वीं इदं वचनं अब्रवीत् ।

अर्थ :- असा विचार करून लोकांच्या हृदयांत वास करणारे प्रत्यक्ष श्रीहरिरूप भगवान् - दत्तमहाराज - त्या पतिव्रतेला पुढीलप्रमाणे म्हणाले ॥७८॥

**मध्याह्ने बाधते नः क्षुद्व्याधिस्तस्य चिकित्सकः ।**
**गृह्यालयस्ततो दैवलब्धभिक्षा न औषधम् ।।७९।।**

अन्वयः- मध्याह्ने क्षुद्व्याधिः नः बाधते । तस्य चिकित्सकः गृह्यालयः । ततो दैवलब्धभिक्षा नः औषधम् ।

अर्थः- दुपारच्या वेळी भुकेचा व्याधि आम्हांला उपद्रव देतो. त्याचा वैद्य म्हणजे गृहस्थाश्रम्याचे घर आहे; म्हणून दैवाने मिळालेली भिक्षा हेच आमचे औषध आहे ।।७९।।

**शरीरं व्रणवत्साध्वि भिक्षान्नं तस्य लेपनम् ।**
**नेक्षे जितरसोऽस्वादु स्वाद्वल्पं वाऽन्नमप्युत ।।८०।।**

अन्वयः- हे साध्वि शरीरं व्रणवत् । भिक्षान्नं तस्य लेपनम् । जितरसः अन्नं अस्वादु उतापि स्वादु वा अल्पं इति न ईक्षे ।

अर्थः- हे साध्वि, शरीर हे व्रणासारखे असून भिक्षान्न हाच त्याचा लेप आहे. मी रसना जिंकली असल्याने, अन्नाविषयीं, हे नीरस आहे, मिष्ट आहे किंवा अगदीं थोडें आहे इत्यादि विचार करीत नसतो ।।८०।।

यास्तव,

**क्षुधितोऽस्मि भवद्गेहे पाको जातः कथंचन।**
**भवत्यन्नं ददात्वाशु पक्वान्नस्वामिनो वयम् ।।८१।।**

अन्वयः- अहं क्षुधितः अस्मि । भवद्गेहे कथंचन पाको जातः। अतः भवती आशु अन्नं ददातु । यतः वयं पक्वान्नस्वामिनः।

अर्थः- मी भुकेलेला आहे. तुझ्या घरांत कसा तरी स्वयंपाक तयार आहे म्हणून तूं लवकर मला भिक्षा वाढ. कारण आम्ही पक्वान्नाचे अधिकारी आहोंत ।।८१।।

**यत्किञ्चिदन्नमन्यद्वा गृहिण्या दत्तमुत्सृजेत् ।**
**असंतुष्टो यतिर्भिक्षुवृत्तिहा स पतेदधः ।।८२।।**

अन्वयः- असंतुष्टः यतिः गृहिण्या दत्तं यत्किञ्चित् अन्नं वा अन्यत् उत्सृजेत् । सः भिक्षुवृत्तिहा, अधः पतेत् ।।

अर्थः- असंतोषी यतीने एखाद्या गृहिणीने वाढलेला, अन्न अगर इतर कोणचाहि पदार्थ जर टाकला, तर तो यति संन्याशाच्या धर्माचे उल्लंघन करणारा ठरतो व त्यामुळे अधोगतीला जातो ॥८२॥

श्रीयतिमहाराजांनीं आपली इच्छा दर्शविल्यानंतर,

**साऽऽह सूनादोषहरवैश्वदेवः कृतो न हि ।**
**तथापि वैश्वदेवार्थमुद्धृत्यान्नं ददामि वः ॥८३॥**

अन्वयः- सा आह । सूनादोषहरवैश्वदेवः कृतः नहि । तथापि वैश्वदेवार्थं अन्नं उद्धृत्य वः ददामि ॥

अर्थः- ती श्रीगुरुमहाराजांना म्हणाली, कांडणे, दळणे, चूल पेटविणे, पाणी आणणे व केर काढणे या पांच कारणांनीं घडणाऱ्या ज्या पांच हिंसा त्यांचा दोष घालविण्याकरितां वैश्वदेव केला पाहिजे. पण तो झाला नाही. तथापि वैश्वदेवाकरितां अन्न वेगळे काढून, आपणाला भिक्षा वाढते ॥८३॥

**यावनालयवागूर्मे कृता पात्रं गृहे न हि ।**
**क्षणं भवन्तस्तिष्ठन्तु पत्राण्याश्वाहराम्यहम् ॥८४॥**

अन्वयः- मे यावनालयवागूः कृता । गृहे पात्रं न हि । भवन्तः क्षणं तिष्ठन्तु । अहं पत्राणि आहरामि॥

अर्थः- मी जोधळ्यांच्या कण्या शिजविल्या आहेत. घरांत पत्रावळ नाही. आपण क्षणभर थांबा. मी लवकर पत्रावळीला पाने घेऊन येते॥८४॥

**तच्छ्रुत्वानीय देहल्या यतिरेकां महाशिलाम् ।**
**मण्डलं कारयामास चतुष्कोणं गृहेऽम्भसा ॥८५॥**

अन्वयः- तत् श्रुत्वा यतिः देहल्याः एकां महाशिलां आनीय गृहे अम्भसा चतुष्कोणं मंडलं कारयामास ॥

अर्थः- ते साध्वीचे भाषण ऐकून, अंगणांतून एक मोठी शिळा श्रीगुरूंनी आणिली. घरांत पाण्याने चौकोनी मंडल (जमिनीवर) करवून घेतले ॥८५॥

**संस्थाप्य प्रोक्षितां तत्र कमण्डलुजलेन ताम्।**
**लिखित्वाऽष्टदलं तत्र सतारं ब्राह्मणी जगौ ।।८६।।**

अन्वयः- तत्र कमंडलुजलेन प्रोक्षितां तां संस्थाप्य, सतारं अष्टदलं लिखित्वा ब्राह्मणी जगौ ।।

अर्थः- त्या मंडलावर प्रोक्षण केलेली शिळा ठेविली. तिच्या मध्यें ओंकारयुक्त आठ पाकळ्यांचे कमळ काढले व ब्राह्मणीला म्हणाले।।८६।।

**सत्पात्रे भवती भिक्षां ददात्विति सती वचः।**
**श्रुत्वा चक्रे शिलापात्रे यवागूपरिवेषणम् ।।८७।।**

अन्वय :- सत्पात्रे भवती भिक्षां ददातु सती, इति वचः श्रुत्वा शिलापात्रे यवागूपरिवेषणं चक्रे ।।

अर्थ :- या पवित्र पात्रांत भिक्षा वाढ. सतीने त्यांची आज्ञा ऐकून शिलापात्रांत जोंधळ्याच्या कण्या वाढल्या. ।।८७।।

**गृहीतापोशनो भिक्षुरूपी स भगवान् स्वयम्।**
**प्राणाग्निहोत्रपूर्वं तां यवागूं भोक्तुमारभत् ।।८८।।**

अन्वयः- गृहीतापोशनः भिक्षुरूपी स्वयं भगवान् सः तां यवागूं प्राणाग्निहोत्रपूर्वं भोक्तुं आरभत ।।

अर्थः- आपोशन घेऊन, संन्याश्याच्या रूपांत असलेल्या साक्षात् भगवान् दत्तात्रेयाने पात्रांत वाढलेली यवागू खाण्यास आरंभ केला ।।८८।।

**यजमानाऽपि साऽध्वर्युरायसस्रुवधृग्जगौ ।**
**याज्यानुवाक्यासुबृहत्सामप्रतिनिधीनमून् ।।८९।।**

अन्वयः- यजमाना सा ब्राह्मणी अपि अध्वर्युः (भूत्वा) आयसस्रुवधृक्, याज्यानुवाक्यासुबृहत्सामप्रतिनिधीन् अमून् जगौ ।।

अर्थः- (जणुं अतिथि) यज्ञ करणारी ती ब्राह्मणीसुद्धां अध्वर्यु नांवाच्या ऋत्विजासारखी बनून, लोखंडाची पळी घेऊन, याज्या, अनुवाक्या व बृहत्साम यांच्याप्रमाणे असलेले पुढील तीन श्लोक म्हणती झाली ।।८९।।

**उपविश्य सुखं स्वस्थचित्तैश्चापेक्षितेद्दशी ।**
**ग्राह्या यवागूर्भोक्तव्या कामं त्याज्याऽनपेक्षिता ।।९०।।**

अन्वयः- स्वस्थचित्तैः सुखं उपविश्य ईद्दशी अपेक्षिता यवागूः ग्राह्या, कामं भोक्तव्या । अनपेक्षिता त्याज्या ।।

अर्थः- शान्त मनाने व आनंदाने बसून या असल्या कण्या भरपूर घ्याव्या. पोटभर खाव्या. नकोशा झाल्यास पानांत राहूं द्याव्या ।।९०।।

**भवन्तः क्व दरिद्राः क्व वयमस्मिन्दिने त्वियम् ।**
**यवागू रचिताऽथापि स्वीकुर्वन्तु कृपाकराः।।९१।।**

अन्वयः- भवन्तः क्व? वयं दरिद्राः क्व? अस्मिन् दिने तु इयं यवागूः रचिता । अथापि कृपाकराः स्वीकुर्वन्तु ।।

अर्थः- याज्येप्रमाणे हा श्लोक आहे - आपणांसारखे सत्पुरुष कुणीकडे! व आमच्यासारखे दरिद्री कुणीकडे! त्यांतूनहि आजच योगायोगाने अशा नीरस कण्या मी केल्या. मी आज या करण्याला व आपणासारखे सत्पुरुष येण्यास एकच गांठ पडली. वाईट वाटते ! तरी पण दयाळू आपण माझी गरीबाची ही सेवा गोड करून घ्या ।।९१।।

हा (दुसरा) श्लोक बृहत्सामासारखा आहे.

**विदुरस्य गृहेऽपि तन्मुदे कमलेशोऽपि कणान्नमाददे ।**
**स यथाद्य तथा मयाऽर्पितं सुकदन्नं भगवद्भिराद्दतम् ।।९२।।**

अन्वयः- विदुरस्य अपि गृहे तन्मुदे सः कमलेशः अपि यथा कणान्नं आददे। तथा मया अर्पितं सुकदन्नं भवद्भिः आदृतम् ।।

अर्थः- विदुराच्याहि घरीं (दुर्योधनाच्या श्रीमंती थाटाच्या भोजनाचा त्याग करून) त्या रूक्मिणीरमणानेसुद्धां भक्ताला समाधान वाटण्याकरितां जशा कण्या खाल्ल्या, त्याप्रमाणे मीं अर्पिलेले हे अत्यंत रूक्ष अन्न आपण स्वीकारले ।।९२।।

**श्रुत्वैवं साऽऽदरेणादाच्छश्वद्भगवते हविः ।**
**तया संपादितं यत्तदाहिताग्नेः सुदुष्करम् ।।९३।।**

अन्वय :- सा एवं स्तुत्वा आदरेण शश्वत् हविः भगवते अदात् । तया यत् संपादितं तत् आहिताग्नेः अपि सुदुष्करम् ।।

अर्थः- ब्राह्मणपत्नीने अशी स्तुति करून आदराने, पुनःपुनः कण्या हेच हविर्द्रव्य सर्वात्मा भगवंताला वाढले. त्या साध्वीने श्रीगुरुमहाराजांना नैवेद्य वाढून जे पुण्य संपादिले, तितके पुण्य अग्निहोत्री ब्राह्मणाला सुद्धां संपादणे अशक्य आहे ।।९३।।

तेच स्पष्ट करितात -

**यद्याहिताग्निः प्रमितां यवागूः ददाति तर्ह्यग्निमुखेभ्य एव ।**
**साक्षान्न विष्णोर्वदने त्वियं तु साक्षात्प्रकामं परमाय चादात् ।।९४।।**

अन्वय :- यदि आहिताग्निः ददाति, तर्हि अग्निमुखेभ्य एव । प्रमितां च यवागूं ददाति । साक्षात् विष्णोः वदने न ददाति । इयं तु परमाय प्रकामं अदात् ।।

अर्थः- अग्निहोत्र्याने जरी पेज अर्पण केली तरी ती अग्निसूर्य इत्यादि इतर देवांनाच अर्पिली जाते. ती सुद्धां (स्रुक्- प्रमिता) एक पळीभरच व एकदाच पर्वाचे (इष्टीचे) दिवशीच; प्रत्यक्ष विष्णूच्या मुखांत नाही. पण या भाग्यशाली साध्वीने मात्र देवाधिदेव श्रीविष्णुला, तो पुरे पुरे असे म्हणेपर्यंत पोटभर वाढली. मग असा भाग्याचा दिवस अग्निहोत्र्याचे आयुष्यांत एखादा तरी येतो का? नाही. म्हणून आम्हीं पूर्वीच्या श्लोकांत 'अग्निहोत्र्यालाहि दुर्लभ पुण्य हिने मिळविले' असे म्हटले ।।९४।।

**तृप्तो हरिः शुद्धकरास्यपाद आचम्य तत्रान्तरधान्न वेद।**
**वेदोऽस्य चेष्टां जयतीष्टकर्ता स सेवकस्यारमरिष्टहर्ता ।।९५।।**

अन्वयः- हरिः तृप्तः, शुद्धकरास्यपादः आचम्य तत्र अन्तरधात् । वेदः अपि अस्य चेष्टां न वेद । सः सेवकस्य अरं इष्टकर्ता, अरिष्टहर्ता जयति ।

अर्थः- श्रीहरि भिक्षा सेवून तृप्त झाला. त्याने हात, पाय, तोंड धुतले, आचमन केले व तेथेंच अंतर्धान पावला. वेदालासुद्धां याच्या लीला समजत नाहीत. (मग ब्राह्मणपत्नीला तरी त्याची अगम्य लीला कशी

कळणार!) त्या भक्ताचे मनोरथ (अरं=) तत्काल पुरविणाऱ्या व अरिष्ट हरण करणाऱ्या श्रीहरीचा जयजयकार आहे ॥९५॥

अनंतकोटिब्रह्मांडनायक भक्तवत्सल श्रीदत्तात्रेय महाराज की जय !!

अहो पण! भिक्षा घेऊन तृप्त झालेला श्रीनृसिंहसरस्वती ब्राह्मणपत्नीला वर न देतांच कसा गुप्त झाला।? सांगतो -

**अतितृप्तस्य भुक्तस्य किं प्रयोजनमाशिषः।**
**पीडितस्यापि शान्तस्य किं प्रयोजनमुद्रुषः ॥९६॥**

अन्वय :- भुक्तस्य अतितृप्तस्य आशिषः प्रयोजनं किम्? शान्तस्य अपि पीडितस्य उद्रुषः प्रयोजनं किम्?

अर्थ :- प्रत्यक्ष श्रीहरि अतिथि आला. भोजन करून पूर्ण संतुष्ट झाला. यांत सर्व प्रकारचे कल्याण झाले. मग स्वतंत्र आशीर्वाद देण्याची आवश्यकताच काय? जसे - एखाद्या सहनशील शांत साधूला पीडा दिली असतां त्याचा पडताळा येतोच. मग (उद्रुषः) शापवाणीच्या रूपाने त्याचा कोप प्रकट होण्याची जरूरी असते काय? ॥९६॥

**गृहमेत्य गृहेशोऽथ सर्वं श्रुत्वा विलोक्य तत्।**
**करशाखांकितं पात्रं हृष्टोऽपि स्वमगर्हयत् ॥९७॥**

अन्वयः- अथ गृहेशः गृहं एत्य, सर्वं श्रुत्वा, करशाखाङ्कितं तत् पात्रं विलोक्य हृष्टः अपि स्वं अगर्हयत् ।

अर्थः- नंतर (गृहेशः) त्या साध्वीचा पति घरी आला. सर्व वृत्तांत त्याने ऐकिला. श्रीदत्तात्रेयमहाराजांची बोटे उमटलेले ते महाशिळापात्र बघून प्रत्यक्ष श्रीदत्त आपल्या घरीं भिक्षा घेऊन गेले, याचा त्याला हर्ष झाला. तरी पण त्यांच्या दर्शनाचा लाभ झाला नाही म्हणून 'अहो! मी करंटा आहे, धिक्कार असो मला,' असे म्हणूं लागला ॥९७॥

**अहा ! स्त्रीणां कुहाचारः क्वाधीतं क्वाप्यनुष्ठितिः।**
**अथापीशप्रसादोऽभूद्धन्योऽहं हीदृशा स्त्रिया ॥९८॥**

अन्वयः- अहो स्त्राणां आचारः कुह? अधीतिः क्व? अनुष्ठितिः क्व?

अथापि ईशप्रसादः अभूत् । अहं ईदृशा स्त्रिया धन्यः।।

अर्थः- काय आश्चर्य हे! स्त्रियांना स्नानसंध्यादि कोठें आहे? वेदाध्ययन कोठें आहे? जप इ. तरी कोठे आहे? इतकें असून माझ्या पत्नीवर ईश्वराची कृपा झाली. असो. मला जरी ईश्वरदर्शन घडले नाही, तरीं माझ्या अर्धांगीला झाल्यामुळे हिच्या योगाने मीहि धन्य झालो ।।९८।।

**प्राक्पुण्येन महद्दृष्टिर्जाताद्यानंदवर्धिनी ।**
**भावि श्रेय इतोऽग्रेऽपि या त्रिकालेष्टसूचिका ।।९९।।**

अन्वयः- महादृष्टिः प्राक्पुण्येन जाता । सा अद्य आनंदवर्धिनी । इतः अग्रे अपि श्रेयः भावि । या त्रिकालेष्टसूचिका ।।

अर्थः- महात्म्यांचे दर्शन पूर्वजन्मीच्या पुण्याईने झाले. ते सांप्रत तर आनंद देणारे आहेच; पण यानंतरच्या काळीहि आमचे कल्याण होणार आहे. कारण संतांचे जें दर्शन होते, ते भूत, भविष्य व वर्तमान काली सर्वदा आपले मंगल आहे, याचे सूचक असते ।।९९।।

भावार्थ :- कोणीहि अतिथि आला तरी 'तो देव आहे' या भावनेने त्याचा सत्कार करावा.

**घ्नन्तं शपन्तं परुषवाचमप्यतिथिं मुदा।**
**अर्चेदीशधियाऽतुष्टमपीशस्तेन तुष्यति ।।१००।।**

अन्वयः- घ्नन्तं, शपन्तं, परुषवाचं अतुष्टं अपि अतिथिं ईशधिया अर्चेत्। तेन अपि ईशः तुष्यति ।।

अर्थः- मारणाऱ्या, शाप देणाऱ्या, निष्ठुर बोलणाऱ्या व जळफळणाऱ्याही अतिथीचा, तो परमेश्वर आहे, असे समजून सत्कार करावा. त्याच्या सत्कारानेही ईश्वर संतुष्ट होतो ।।१००।।

**इत्युक्त्वा धाम्नि तत्पात्रं सोऽभ्यर्च्याप्यभवत्कृती ।**
**अद्यापि तत्र तत्पात्रमस्तीशाङ्गुलिचिन्हितम् ।।१०१।।**

अन्वयः- इति उक्त्वा सः अपि धाम्नि तत् पात्रं अभ्यर्च्य कृती अभवत् । अद्यापि ईशाङ्गुलिचिह्नितं तत् पात्रं तत्र अस्ति ।

अर्थः- असे तो ब्राह्मण म्हणाला. त्यानंतर त्या ब्राह्मणानेहि दररोज आपल्या घरीं त्या भोजनपात्राची पूजा केली व कृतकृत्य झाला. सांप्रत भगवंताची बोटें उमटलेले ते भोजनपात्र ब्राह्मणाच्या वंशजांकडे आहे॥१०१॥

**ततःप्रभृति तद्वंशो रमाक्रीडो बभूव ह।**
**एवमद्यापि तद्वाचा भजतां गोचरः प्रभुः ॥१०२॥**

अन्वय :- ततः प्रभृति तद्वंशः रमाक्रीडः बभूव । एवं अद्यापि प्रभुः तद्वाचा भजतां गोचरः ॥

अर्थ :- तेव्हांपासून त्या ब्राह्मणाच्या वंशावर (रमाक्रीडः) लक्ष्मीची पूर्ण कृपा आहे. सर्व कथानकाचे तात्पर्य श्रद्धालूंनीं लक्षांत ठेवावे व संध्या न करितांहि नुसतीं गुरूचरित्राची पारायणे करूं नयेत; तर निदान दोनही वेळ कमींतकमी १०८ गायत्री जप तरी करावा. अशा कळकळीने दयाघन श्रीवासुदेवानन्दसरस्वतीमहाराज भक्तांना सांगतात --- याप्रमाणे, अजूनहि वेदाने सांगितलेली कर्मे करून निष्काम सेवा करणाऱ्या भक्तांना श्रीपरमेश्वर दर्शन देईल. विश्वास व तळमळ मात्र पाहिजे ॥१०२॥

**श्रीदत्तप्रेरितमतिर्वासुदेवसरस्वती ।**
**कुमारशिक्षां पौरस्त्यां कुमारस्य धरेऽकरोत् ॥१०३॥**

अन्वय :- श्रीदत्तप्रेरितमतिः वासुदेवसरस्वती पौरस्त्यां कुमारशिक्षां कुमारस्य धरे अकरोत् ॥

अर्थ :- अंतर्यामीस्वरूप श्रीदत्ताने बुद्धीला प्रेरणा केली. तदनुसारे श्रीवासुदेवसरस्वतीने 'शिक्षा' या नांवाच्या इतर ग्रंथात पहिला कुमारशिक्षा नांवाचा ग्रंथ श्रीकार्तिकस्वामीच्या पर्वतावर रचला ॥१०३॥

**पदवाक्यप्रमाणज्ञा नित्यं पक्वान्नभोजिनः ।**
**तावत् कुमारशिक्षेयं बालानां प्रातराशवत् ॥१०४॥**

अन्वय :- पदवाक्यप्रमाणज्ञाः नित्यं पक्वान्नभोजिनः । इयं कुमार शिक्षा तावत् बालानां प्रातराशवत् ॥

अर्थ :- व्याकरण, न्याय व मीमांसा या शास्त्रांत पारंगत असलेले विद्वान् नेहमीं पक्काने सेवीत असतात. (विद्वानांना शास्त्रसार उत्तम समजले असलेने साधनमार्गाचा निर्णय अनायासे होतो. ज्यांना शास्त्रज्ञान नाही ते भोळेभाळे लोक साधनाचा आरंभ कसा करावा हे न समजल्याने गोंधळून जातात. अशा बालबुद्धि साधकांना ही कुमारशिक्षा उत्तम मार्गदीपिका आहे.) ही कुमारशिक्षा लहान मुलांच्या सकाळच्या न्याहरीप्रमाणे भोळ्याभाळ्या लोकांना उपयोगी आहे ॥१०४॥

**भार्गवीबाहुनद्योः संगमो यत्र यत्र च ।**
**तीर्थं हत्याहरं चापि तत्रेश्वरगदाधरौ ॥१॥**
**तत्रेयं रचिता टीका कुमाराणां हिताय वै ।**
**अनेन प्रीयतां देवो भगवानत्रिनन्दनः ॥२॥**

श्रीमहायोगी श्रीमद्वासुदेवानंदसरस्वतीयतितल्लजकृता
कुमारशिक्षा समाप्ता.

॥ इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यश्रीवासुदेवानन्दसरस्वतीप्रणीता
कुमारशिक्षा समाप्ता ॥

**श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥**

## ।। श्रीदत्तः प्रसन्नोऽस्तु ।।

# प्रस्तावना

या जगामध्यें आपआपल्या बुद्धीस अनुसरून प्रज्ञाप्रकर्षशाली मानवांचे अविरत प्रयत्न चालू असतांना परमध्येयाची सिद्धि झालेली दिसत नाही. परमसौख्यरूप ते ध्येय लोकोत्तर साधनाने सत्पुरूषास प्राप्त झाल्याचे इतिहासावरून दिसून येते. सत्पुरुषांच्या वचनांचा साकल्याने विचार केला असतां ईश्वरभजन हेच ते लोकोत्तरसाधन असे सिद्ध होते. श्रीकृष्ण भगवान् गीतेमध्ये 'अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम्' या वाक्याने हाच अर्थ स्पष्ट सांगत आहेत. तेव्हा ईश्वराचे व भजनाचे स्वरूप काय, याचा विमर्श क्रमप्राप्त होतो. तो करीत असतां मानवबुद्धि कुंठित होते; म्हणून वेदानेच या उभयतांचे स्वरूप प्रतिपादन केले आहे. परंतु वेदाच्याच प्रामाण्याबद्दल संदेह प्राप्त होईल म्हणून पूर्वाचार्यांनीं साधकबाधक विचार करून प्रामाण्य सिद्ध केले आहे. अनेक युक्तींनीं सर्वथा प्रमाणभूत असलेल्या वेदावरून ईश्वराचे स्वरूप, भजनाचे प्रकार व प्रयोजनपरंपरा यांच्याविषयीं सिद्धांत, शास्त्रामध्ये प्रस्थापित केले आहेत. त्यांचे ज्ञान संपादन करून, शास्त्रोक्त मार्गाचा अवलंब करून, अनेकांनी इष्ट सिद्धीहि मिळविली आहे. परंतु शास्त्राचे गूढ व गंभीर ज्ञान सामान्य जनतेस अल्पायासाने होणे कठीण आहे. प्रज्ञानाधीन प्रवृत्ति व प्रवृत्यधीन इष्टसिद्धि असल्यामुळे ज्ञान संपादन अवश्य आहे. ते ज्ञान लोकोत्तर प्रभावसंपन्न व पूर्ण अधिकारी पुरूषापासून मिळाल्यास निःसंदिग्ध व कार्यक्षम होते यांत संदेह नाही. म्हणूनच केवळ कारूण्यभावाने प्रेरित झालेले पूर्णाधिकारी, ज्ञानवैराग्यादिसंपन्न, संयमीसम्राट्, श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानन्दसरस्वती-स्वामिमहाराज यांनी शिक्षात्रयीची निर्मिति केली आहे.

प्रमाणसिद्ध ईश्वर भजनाचे प्रकार - कर्म, उपासना व ज्ञान असे तीन आहेत. त्यांतील कर्ममार्ग कुमारशिक्षेमध्ये स्पष्ट केला आहे.

वृद्धशिक्षेमध्यें ज्ञानमार्ग विशद केला आहे. या युवशिक्षेमध्यें सांग उपासनामार्ग सुव्यवस्थित सांगितला आहे. यांत उपास्य ईश्वराचे स्वरूप, वेदाचे प्रामाण्य व अपौरुषेयत्व सुलभ रीतीने प्रतिपादन केले आहे. समग्र वेदाची व्यवस्था थोडक्यामध्यें सुंदर प्रदर्शित केली आहे. वेदाचे मंत्र व ब्राह्मण असे दोन भाग आहेत. ब्राह्मणाचे विधि, अर्थवाद व विध्यर्थवाद विलक्षण, असे तीन प्रकार असून विधी व अर्थवाद, प्राधान्येकरून कर्मव्यवस्थापक आहेत. तृतीय भाग, ज्ञानमार्गार्थ उपयुक्त झाला आहे व उभयांत उपासनेचे स्वरूप सांगितले आहे. कर्माचे स्वरूप, गौण, मुख्य प्रकार व अंगादिकांचा विचार करून, आवश्यक कर्मानुष्ठानप्रकार दाखविला आहे. तदाश्रित श्रौतोपासनेचे स्वरूप सांगून काही विशिष्ट प्रकार दाखविले आहेत व फलपरंपरेचे सोपपत्तिक विवेचन केले आहे. आणि प्रसंगाने वाममार्गीय उपासनेचे निराकरण केले आहे. प्रचलित प्रतिमोपासनेविषयीं दुर्मताचा निरास करून प्रामाण्य स्थापन केले आहे. श्रीसमर्थांसारख्या महानुभाव पुरुषानीं या प्रतिमोपासनेचा अवलंब करून लोकोत्तर सामर्थ्य व परमध्येय संपादन केले आहे. यावरून प्रतिमोपसना परंपराप्राप्त व सफल असल्याचे सिद्ध केले आहे. सांप्रतकालीहि या उपासना कशा फलद्रूप होतात व फलपरंपरा कशी असते हे नारायणस्वामींच्या संक्षिप्त चरित्राने स्पष्ट करून ग्रन्थाचा उपसंहार केला आहे. असा हा सुंदर उपासनामार्ग, सप्रमाण, सोदाहरण, सोपपत्तिक, सुलभ रीतीने सामान्यजनांस सुद्धां समजेल अशा रमणीय पद्धतीने महाराजांनी या ग्रंथामध्यें प्रतिपादन केला आहे. महाराजांची योग्यता प्रायः सर्वजनांस विदितच आहे. महाराज सर्व शास्त्रांमध्यें निष्णात्, व्यवहारामध्यें विचक्षण, आचारामध्ये दक्ष, उपासनेमध्यें निपुण, योगामध्यें प्रवीण, वैराग्यामध्यें पूर्ण व ज्ञानामध्यें अप्रतिम किंबहुना सकलगुणगणचक्रवर्ती साक्षात् दत्तावतार हे प्रसिद्ध असल्यामुळे त्यांच्याबद्दल व हा त्यांचा ग्रन्थ रसभरित विवेचनपटु, प्रसादपूर्ण, व सर्वशिष्टसंमत असल्यामुळे त्याच्याबद्दलहि अधिक लेखनाची आवश्यकता नाही. आदराने त्याचे ज्ञान संपादन करून, प्रयत्नपूर्वक त्या मार्गाचा अवलंब करून मानवाने कृतार्थ व्हावे, इतकेंच लिहून ही अल्प प्रस्तावना पूर्ण करतो.

**श्रीपादशास्त्री जेरे**
नृसिंहवाडीकर

# अनुक्रमणिका


| श्लोक | पृष्ठांक | विषय |
|---|---|---|
| १. | ९०. | श्रीदत्तात्रेयस्मरणरूप मंगलाचरण. |
| २. | ९१. | ईश्वरभजनास अपेक्षित असे ईश्वरस्वरूप व भजनाचे फल. |
| ३. | ९१. | ईश्वराचे ठिकाणी विषमता व निर्दयता हे दोनही नाहीत. |
| ४. | ९२. | युक्तीने ईश्वरसिद्धी. |
| ५. | ९२. | मुमुक्षूने स्वकर्माचरण करून ईश्वरास संतुष्ट करावे. म्हणजे त्याला मुक्ति मिळते. |
| ६. | ९३. | कर्माचरण किती काळ करावे याची मर्यादा. |
| ७. | ९३. | कर्माचे विशिष्ट उद्देशामुळे मिळणारे फळ. |
| ८. | ९४. | कर्म हे परंपरेने मुक्तीस कारण आहे; साक्षात् नाही. |
| ९. | ९४. | कर्म करण्याची पद्धति व मर्यादा. |
| १०. | ९५. | वेद म्हणजे काय? |
| ११. | ९५. | वेद हे उत्पन्न झालेले आहेत किंवा स्वतःसिद्ध आहेत. |
| १२. | ९६ | वेद पौरुषेय नाहीत. |
| १३-१५ | ९६. | वेद ईश्वरापासून उत्पन्न झाले असले तरी ते अपौरुषेय आहेत. त्यांचा विभाग. |
| १६-१७ | ९७. | मंत्र म्हणजे काय? ऋचा म्हणजे काय ? |
| १८. | ९८. | साममंत्र व यजुर्मंत्र यांची लक्षणे. |
| १९ | ९८. | यजुर्मंत्रांत अंतर्भूत होणारा निगद नांवाचा मंत्रभाग. ब्राह्मण ग्रंथांचे विभाग तीन. |
| २०-२१ | ९८. | विधी म्हणजे काय? याबद्दलची तीन मते. |

विधीचे प्रकार.
२२ ९९. उत्पत्तिविधीचे लक्षण.
२३-२४ १००. उत्पत्तिविधीचे उदाहरण,
अधिकारविधीचे लक्षण व उदाहरण.
२५ १०१ विनियोगविधीचे लक्षण व उदाहरण.
२६ १०१. प्रयोगविधीच्या स्वरूपाबद्दल विचार.
२७ १०२ विधिज्ञानाचा उपयोग, कर्माचे दोन प्रकार.
२८ १०२ गुणकर्म व अर्थकर्म अशा दोन कर्मांपैकीं गुणकर्माचे
लक्षण व त्याचे चार प्रकार.
२९-३० १०३ गुणकर्माच्या चार प्रकारांपैकीं उत्पत्ति व विकृति या दोन
कर्मांची उदाहरणे.
३१ १०३ संस्कृतिकर्माची उदाहरणे.
३२-३३ १०४ आप्तिकर्माची उदाहरणे; ही चारहि गुणकर्मे
प्रधानयागाची अंगें आहेत.
३४ १०५ अर्थकर्माचे लक्षण व त्याचे दोन प्रकार.
३५ १०५ अंगकर्म व प्रधानकर्म अशा दोन अर्थकर्मांची लक्षणे.
अंगकर्मांचे दोन प्रकार.
३६ १०६ सन्निपत्योपकारक व आरादुपकारक अशा
दोन अंगकर्मांची लक्षणे व उदाहरणे.
३७ १०६ कर्माची पुनः प्रकृति, विकृति व या दोघांहूनही भिन्न
असे तीन प्रकार.
३८ १०७ वेदांतील ब्राह्मणभागांपैकीं अर्थवादभागाचे लक्षण,
त्याचे प्रकार व त्यापैकीं गुणानुवादाचे लक्षण.
३९ १०८ अर्थवादांतर्गत अनुवाद या भागाचे लक्षण व उदाहरण.
४० १०८ अर्थवादाचा तिसरा प्रकार जो भूतार्थवाद त्याचे लक्षण
व उदाहरण.

| | | |
|---|---|---|
| ४१ | १०९ | भूतार्थवादाची प्रामाण्यसिद्धि. |
| ४२ | १०९ | चारहि वेदांचा उपयोग. |
| ४३ | ११० | शाखा भिन्न भिन्न असल्या तरी कर्म एकच. वेदान्तवाक्यें ही विधी व अर्थवाद यांहून निराळी. |
| ४४ | ११० | वेदांतभाग विधी किंवा अर्थवाद कां मानूं नये, याबद्दल युक्ति. |
| ४५-४६ | १११ | वेदान्तभाग हा स्वतःच्या प्रतिपाद्य अर्थाबद्दल प्रमाण आहे. सर्व विधिभाग वेदान्तालाच पोषक म्हणून त्याचा शेष आहे. |
| ४७ | ११२ | वेदान्ताचे अबाधित प्रामाण्य. |
| ४८ | ११२ | वेदान्तांत सांगितलेल्या तीन सगुणोपासनांची नांवे व त्यांचे फल. |
| ४९ | ११३ | वेदान्तांतील चौथी निर्गुणोपासना, तिचे फल व तिचे प्रतिपादन करणाऱ्या स्वतःच्या पुढील ग्रंथाचा उल्लेख. |
| ५० | ११३ | क्रममुक्ति देणाऱ्या तीन उपासनांपैकीं पहिल्या अंगावबद्धोपासनेचे स्वरूप |
| ५१ | ११४ | दुसऱ्या प्रतीकोपासनेचे स्वरूप. |
| ५२-५३ | ११४ | तिसऱ्या अहंग्रहोपासनेचे स्वरूप आणि तिची दुर्लभता. |
| ५४-५५ | ११४ | अंगावबद्धोपासना कशी करावी. |
| ५६ | ११५ | अंगावबद्धोपासनेचे फल. |
| ५७ | ११५ | अंगावबद्धोपासनेचे फल मुमुक्षूला अग्राह्य आहे. |
| ५८ | ११६ | उपासना मुमुक्षूने मोक्षाकरतांच करावी. |
| ५९ | ११६ | अंगावबद्धोपासना मुमुक्षूने कशी करावी? याबद्दल प्रमाण व उपासनेचे फल. |
| ६० | ११७ | प्रतीकोपासनेपासून मुमुक्षूला चित्तशुद्धीच्या तारतम्याने मिळणारे फळ. |

| | | |
|---|---|---|
| ६१ | ११७ | नानाशाखेतहि सदातीय उपासना एकच आहे. |
| ६२ | ११७ | उपासकाने स्वतःच्या शाखेत नसलेले उपास्याचे गुण इतर शाखेतूनहि घेऊन उपासना करावी. |
| ६३ | ११८ | श्रद्धेने प्रतीकोपासना आमरण केल्याने मिळणारे फळ. |
| ६४ | ११८ | अहंग्रहोपासना त्रिविध आहेत; त्यांपैकीं कोणतीहि एकच आमरण करावी. काम्य उपासनांना हा नियम लागूं नाही. |
| ६५-६६ | ११९ | अहंग्रहोपासना करणाऱ्यास मिळणारे ब्रह्मलोकरूप फल. |
| ६७-६८ | ११९ | ब्रह्मलोकाचे सामान्य वर्णन. |
| ६९ | १२० | ब्रह्मलोकांत गेलेला उपासक स्वेच्छेने कसे फळ भोगतो? |
| ७०-७१ | १२० | तो उपासक ब्रह्मदेवाबरोबर शेवटीं मुक्त होतो. |
| ७२-७४ | १२१ | इतर उपासनांपेक्षां अहंग्रहोपासनेचे महत्त्व, तिचे दुर्लभत्व व उपसंहार. |
| ७५ | १२१ | वरील श्रौत उपासनाच दोनही मीमांसशास्त्रांना मान्य आहेत. वाम उपासना मान्य नाहीत. |
| ७६ | १२२ | वाम उपासना सांगणारा आगम प्रमाण कां नाही याची कारणे. |
| ७७-७८ | १२२ | मद्यादियुक्त वामोपासनेचा अधिकार ब्राह्मणाला नाही याबद्दल सोपपत्तिकविवेचन. |
| ७९-८० | १२३ | भास्कररायप्रभृति प्रसिद्ध वामोपासना करणाऱ्यांचा याबद्दल खरा अभिप्राय. |
| ८१ | १२३ | वामोपासनारूप धर्माभास त्याज्य आहे. |
| ८२ | १२३ | प्रतिमोपासना ग्राह्य असल्याबद्दल विचारारंभ. |
| ८३-८४ | १२४ | अमूर्त ईश्वरही मूर्तिमध्यें कसा येतो, व त्याच्या मूर्तीच्या उपासनेचे फल. |
| ८५ | १२४ | मूर्तिपूजकाने कशी भावना ठेवावी. |
| ८६-८७ | १२५ | मूर्तिपूजेविरुद्ध असणाऱ्या आक्षेपकांचे संक्षिप्त खंडन. |

| | | |
|---|---|---|
| ८८ | १२५ | श्रीसमर्थांना मूर्तिपूजेनेच या युगांतच फल मिळाले. |
| ८९ | १२६ | प्रतिमापूजन हे सप्रमाण व सफल आहे. याबद्दल दृष्टांत म्हणून श्रीनारायणस्वामींच्या चरित्रास आरंभ. |
| ९० | १२६ | श्रीनारायणस्वामी, पूर्वाश्रमांत पत्नी गेल्यावर मुलींना घेऊन नरसोबाचे वाडीस येतात. |
| ९१ | १२७ | ईश्वरानुग्रहाने श्रीनारायणस्वामींना समाधियोगाची सिद्धि झाली. |
| ९२-९४ | १२७-२८ | आपल्या प्रिय भक्ताकरतां श्रीदत्तप्रभूंनीं श्रीनारायण स्वामींच्या मुलींची केलेली सेवा. |
| ९५ | १२८ | श्रीनारायणस्वामींना श्रीदत्तप्रभूंनीं स्वतः संन्यासदीक्षा दिली. |
| ९६-९७ | १३० | श्रीनारायणस्वामींना संन्यास कोणी दिला हे प्रथम न कळल्यामुळे मठाधिपति इत्यादिकांकडून त्यांना झालेला त्रास व शेंवटीं सर्वांचा शिष्यभाव. |
| ९८ | १३० | ईश्वरप्रसादाने श्रीनारायणस्वामींना अपरोक्ष साक्षात्कार झाला. त्यांचे अर्चन अजून श्रीदत्तमहाराजांच्या अगोदर होते. हे प्रतिमोपासनेचे महत्त्व. |
| ९९ | १३१ | श्रीनारायणस्वामींचा निर्याणसमय. |
| १०० | १३१ | श्रीनारायणस्वामींच्या लोकोत्तर चारित्र्याचे कांही दिग्दर्शन. |
| १०१ | १३५ | कलियुगांतहि उपासना उत्तमफलदायक आहे याबद्दल उपसंहार. |

||श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः||

# युवशिक्षा

**भजेऽम्बुजाक्षं सततं जिताक्षं दग्धाघकक्षं धृतभक्तपक्षम् ।**
**भैक्षान्नभक्षं कृतधर्मरक्षं दक्षं सुशिक्षं सुतितिक्षयक्षम् ।।१।।**

अन्वयः- सुतितिक्षयक्षं सुशिक्षं दक्षं धृतभक्तपक्षं दग्धाघकक्षं जिताक्षं भैक्षान्नभक्षं अंबुजाक्षं सततं भजे ।

अर्थः- परमशांतिसंपन्न परमात्मा सुशिक्षणरूप सम्यग् ज्ञानदान करणारा, जगद्व्यापाराविषयी कुशल, (म्हणूनच) धर्म रक्षण करणारा, भक्तपक्षपाती, पापरूपी तृणाचा दाह करणारा, जितेन्द्रिय, भिक्षान्नसेवी, कमलनयन, अर्थात् परम सौंदर्यसंपन्न भगवान् श्रीदत्तात्रेय त्यास मी सतत भजतो.

भावार्थः- ज्या वैदिक मार्गाचा अवलंब करून भगवद्रूप होतां येते असा प्रमाणसिद्ध व अनुभूत मार्ग सर्वांस मिळून मानवांनीं कृतार्थ व्हावे, अशा केवल वात्सल्याने श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यवर्य श्रीवासुदेवानन्दसरस्वतीस्वामि-महाराज यांनीं कुमारशिक्षाग्रंथद्वारां प्राथमिक कर्ममार्गाचा उपदेश केला व तदुक्त साधनाचे अनुष्ठान करून युव झालेल्या जनांस अनुलक्षून सांग उपासना तत्त्वाचा उपदेश करण्याकरितां हा युवशिक्षा नामक ग्रंथ लिहिला आहे. याची निर्विघ्न परिसमाप्ति व प्रसिद्धि होण्याकरितां श्रीदत्तात्रेयभजनरूप मंगल केले आहे.

भगवान् श्रीदत्तात्रेयाच्या भजनाने सर्व पातकांचा नाश होत असल्यामुळे समाप्तिप्रतिबंधक पातकाचा नाश सहजसिद्ध आहे; कारण भगवान् दत्तात्रेय हा स्मरण - कीर्तन - नमनादिकांनीं भक्तांच्या पातकांचा

नाश करणारा आहे, म्हणून यास भक्तपक्षपाती म्हणतात. जगद्व्यापाराविषयीं कुशल असलेल्या भगवंतास सृष्टि-स्थितीस कारणीभूत असे धर्मरक्षण अवश्य प्राप्त होते व तदर्थ ईश्वर अवतार धारण करीत असल्यामुळे त्यास धर्माचरण प्रिय आहे, ते भक्ताकडून होत असल्यामुळे भक्तपक्षपातहि योग्यच आहे. भगवान् केवळ भक्तांच्या पातकांचाच नाश करतो असे नसून सतत भजनाने प्रसन्न होऊन आत्यंतिक कल्याणास साधन असणारे असे तत्त्वज्ञानहि देतो. म्हणून यास सुशिक्ष असे म्हणतात. भगवान् परम शांतिसंपन्न अर्थात् दयाघन असल्याने, स्वभावतः दोषबहुल मानवासहि भजनाने ईश्वरप्रसाद संपादन करतां येतो असे सुतितिक्षयक्षपदाने सूचित केले आहे. यावरून या ग्रंथाचा विषय भजन अपरपर्याय उपासना, ईशप्रसाद हे प्रयोजन, ईशप्रसादेच्छु हा अधिकारी व प्रतिपाद्य प्रतिपादकभावसंबंध असे अनुबंधचतुष्टयहि व्यक्त होते ॥१॥

भगवद्भजन, भगवत्स्वरूप व फलसापेक्ष आहे म्हणून भगवत्स्वरूप व फल यांचे निरूपण दोन श्लोकांनी करतात.

**सृष्ट्यादिहेतो वरधर्मसेतो स्वयं त्वहेतो कृतभूरिमन्तोः ।**
**नान्यो नियन्तोद्गतिदश्च जन्तोः सन्तोऽत्र तत्साक्षिण उच्चकेतो॥**

अन्वयः- सृष्ट्यादिहेतो वरधर्मसेतो स्वयं तु अहेतो कृतभूरिमंतोः जन्तोः नियन्ता, उद्गतिदश्च न अन्यः, अत्र तत्साक्षिणः सन्तः।

अर्थः- सृष्टिस्थितिलयास कारण, सनातन धर्मधारक, स्वतः कारणरहित अर्थात् अनादि उत्कृष्ट कीर्तिरूपध्वजशाली (अशा भगवंता) विपुल अपराध करणाऱ्या जनांचा नियामक व प्राणिमात्रांस सद्गति देणारा (तुजवाचूंन) दुसरा कोणी नाही, याविषयीं उत्कृष्ट साक्षी असे हे साधुजन आहेत.

भावार्थः- अनादि जगज्जन्मादिकर्ता, सनातन धर्ममर्यादेचे परिपालन करणारा, विश्वविख्यात कीर्तिमान्, इत्यादि पदांनीं प्रतीयमान भगवत्स्वरूप असून सद्गति हे भजनाचे फल आहे. भजनाचा त्याग करून अन्यथा

आचरण करणाऱ्यांस शासन आहे. यांची उदाहरणे क्रमाने साधुजन व असाधुजन समजावींत ।।२।।

**लीलाकैवल्यमीशस्य सर्वज्ञस्यांशकर्मणाम् ।**
**सापेक्षत्वाच्च वैषम्यनैर्घृण्ये फलदस्य न ।।३।।**

अन्वयः- फलदस्य सर्वज्ञस्य ईशस्य (इदं जगत्) लीलाकैवल्यं, च अंशकर्मणां सापेक्षत्वात् वैषम्यनैर्घृण्ये न ।

अर्थः- सर्व कर्मांचे फल देणारा, सर्व जाणणारा, सर्वांचे नियमन करणारा अशा ईश्वराची केवळ लीला म्हणजे सर्व जगत् होय. (अर्थात् सर्वशक्तिमान्) ईश्वर जीवकर्मांच्या अपेक्षेने (शुभाशुभ फल देत असल्यामुळे) त्यास विषमता व निर्दयता हे दोष प्राप्त होत नाहीत.

भावार्थः- ईश्वर सर्वज्ञ, सर्वशक्तिमान्, सर्वकर्म फलदाता व सर्वदोषरहित असल्यामुळे सर्वांस सेव्य आहे ।।३।।

अशा ईश्वराविषयीं साशंक असणाऱ्यांस अनुमानप्रमाण दाखवितात.

**दृष्टे स्वस्याप्यनीशत्वे सुखादे पारतंत्र्यतः ।**
**न सर्वज्ञेश इत्युक्तिर्माता वंध्या ममेतिवत् ।।४।।**

अन्वयः- सुखादेः पारतंत्र्यात् स्वस्य अनीशत्वे दृष्टे अपि सर्वज्ञेशः न इत्युक्तिः मम माता वंध्या इतिवत् ।

अर्थः- सुखादिकांच्या पारतंत्र्यावरून आपल्यास अनिश्वरत्व सिद्ध असतांना (सुखादिदाता) ईश्वर नाही असे म्हणणे, म्हणजे माझी माता वंध्या आहे या उक्तीप्रमाणे आहे.

भावार्थः- स्वाधीन नसणाऱ्या सुखदुःखादिकांचा आपल्यास अनुभव येतो, यावरून सुखदुःखादि देणारा ईश्वर सिद्ध होतो. आपल्या अस्तित्वामुळे आपली माता वंध्या नसून पुत्रवती जशी सिद्ध आहे, त्याप्रमाणे ईश्वर सिद्ध असल्यामुळे नाही म्हणणे हास्यास्पद आहे ।।४।।

नित्यसिद्ध ईश्वरकृपेनेच मानवास आत्यंतिक दुःखनिवृत्ति, परम सुखाप्तिरूप मुक्ति लभ्य होते असे सांगतात.

**अचिन्त्यरचनाभिज्ञा यच्छक्तिस्तं स्वकर्मभिः ।**
**तोषयेत्तत्प्रसादाद्धि विमुक्तः स विमुच्यते ॥५॥**

अन्वयः- यच्छक्तिः अचिन्त्यरचनाभिज्ञा तं स्वकर्मभिः तोषयेत् हि तत्प्रसादात् सः विमुक्तः विमुच्यते ।

अर्थः- ज्याची शक्ति अचिंत्य घटना करण्यामध्यें निपुण आहे त्या ईश्वरास स्वकर्मांनी संतुष्ट करावे; कारण त्याच्या प्रसादामुळे पुरुष कामादि दोषरहित होऊन मुक्त होतो.

भावार्थः- प्रभूचे सामर्थ्य अचिंत्य आहे. त्याने आपणांस वेदादिद्वारां जी आज्ञा केली आहे, तिचे परिपालन केल्यास तो सुप्रसन्न होऊन आपल्यास मुक्तीपर्यंत फल देतो, यांत शंका नाही. व्यवहारांतील राजा, आज्ञेच्या परिपालनाने संतुष्ट होऊन आपल्या ऐश्वर्याप्रमाणे फल देतो, तर अनंत कोटि ब्रह्मांडनायक प्रभु सुप्रसन्न झाल्यावर काय अलभ्य आहे? 'किम लभ्यं भगवति प्रसन्ने श्रीनिकेतने' हे वचन प्रसिद्धच आहे. त्याच्या आज्ञेचे परिपालन, म्हणजे वर्णाश्रमास अनुसरून शास्त्राने सांगितलेले स्वकर्माचरण होय ॥५॥

ते कर्माचरण किती काळ करावे याची मर्यादा सांगतात.

**तावत्कर्माचरेद्यावद्देहादौ माययात्मधीः ।**
**आपाततः स नियतं प्रत्यवायजिहासया ॥६॥**

अन्वयः- आपाततः देहादौ मायया आत्मधीः स यावत्, तावत् नियतं कर्म प्रत्यवायजिहासया आचरेत् ।

अर्थः- सामान्यतः देहादिकांच्या ठिकाणी मायेने आत्मबुद्धि जोंपर्यंत असते तोपर्यंत नित्यकर्म, दोषपरिहाराच्या इच्छेने करावे.

भावार्थः- देह - पुत्र - वित्तादिकांच्या ठिकाणी अहं-मम अशी बुद्धि जोंपर्यंत पुरुषास असते तोपर्यंत नित्यकर्म - संध्यावंदनादि (ज्याचे अनुष्ठान केल्याने चित्त शुद्ध होते व न केल्याने प्रत्यावायरूप दोष उत्पन्न होतो अशा कर्मांस नित्य असे म्हणतात) दोषपरिहारार्थच करावे; अन्य

फलाच्या इच्छेने करूं नये. अर्थात् ज्ञानोद्देशाने करावे ॥६॥

तादृश कर्माचे फल सांगतात.

**अग्निहोत्रादिकर्म स्वःसाधनीभूतमेव तत् ।**
**ज्ञानोद्देशकृतं ज्ञानसाधनीभूतमक्षयम् ॥७॥**

अन्वयः- (यत्) स्वःसाधनीभूतं, अग्निहोत्रादि कर्म, तत् एव ज्ञानोद्देशकृतं ज्ञानसाधनीभूतं अक्षयं भवति ।

अर्थः- स्वर्गास कारण असलेले अग्निहोत्रादि कर्म तेच ज्ञानार्थ केले असतां ज्ञानाचे साधन होते व अक्षयफलास देणारे होते.

भावार्थः- ज्ञानाकरतां नित्यकर्म केले असतां प्रत्यवाय परिहार होतो व ज्ञान उत्पन्न होऊन नित्य मोक्षाचा लाभ होतो. या रीतीने कर्माचे फल अक्षय होते म्हणून ज्ञानार्थच कर्म करावे ॥७॥

**अग्नीन्धनाधिकरणे ज्ञानं कर्मानपेक्षकम् ।**
**उक्तमन्यत्र तु परंपरया मुक्तिसाधनम् ॥८॥**

अन्वयः- सरळ आहे.

अर्थः- 'अतएव चाग्नीन्धनाद्यनपेक्षा' ह्या ब्रह्मसूत्रामध्यें ज्ञान हे मुक्तिफल देण्याकरितां कर्माची अपेक्षा करीत नाही; परंतु अन्यत्र 'सर्वापेक्षा च यज्ञादिश्रुतेरश्ववत्' ह्या सूत्रामध्यें कर्म हे ज्ञानास जनक असल्यामुळे ज्ञानद्वारा मोक्षसाधन आहे असे सिद्ध केले आहे.

भावार्थः- (विषय, संशय, पूर्वपक्ष, प्रयोजन व संगति यांच्या विचारास अधिकरण म्हणतात) 'अतएव चाग्नीन्धनाद्यनपेक्षा' ह्या सूत्रावर केलेल्या विषयादिकांच्या विचारास अग्नींधनाधिकरण म्हणतात. याप्रमाणे अन्यत्र समजावे. ज्ञान उत्पन्न झाल्यानंतर त्यास मोक्षफलाकरतां इतर कशाचीहि अपेक्षा नाही. परंतु ज्ञानोत्पत्तीस कर्मादिकांची अपेक्षा आहे, असे दुसऱ्या अधिकरणामध्यें सिद्ध केले असल्यामुळे कर्माने ज्ञान व ज्ञानाने मुक्ति असा क्रम असल्यामुळे कर्म, परंपरेने मुक्तिसाधन आहे असे सिद्ध होते॥८॥

**ततःप्रमाणबलतो मुमुक्षुर्नियतं चरेत् ।।**
**ईशप्रीत्या अनासक्त्या तद्योगारुढतावधि ।।९।।**

अन्वयः- ततः प्रमाणबलतः अनासक्त्या ईशप्रीत्यै मुमुक्षुः नियतं चरेत्, तत् योगारूढतावधि ।

अर्थः- कर्म मोक्षसाधन आहे ह्याविषयीं ते प्रसिद्ध वेदरूप प्रमाण असल्यामुळे, फलासक्ति सोडून ईश्वरप्रीतीकरतां मुमुक्षूने नित्य कर्म करावे. ते कर्म योगारूढ होईपर्यंत करावे.

भावार्थः- वेदप्रामाण्याने ज्ञानास कर्म कारण आहे असे सिद्ध असल्यामुळे मुमुक्षूने ज्ञानोद्देशाने कर्म करावे. फलेच्छा सोडून ईश्वरप्रीतीकरतां कर्म केले असतां ते ज्ञानार्थ होते. असे कर्म योगारूढ होईपर्यंत करावे. (विषयासक्ति व कर्मासक्ति नष्ट होऊन मानसिक संकल्पहि नको वाटतात व ध्यानयोगाची उत्सुकता ज्या वेळेस निर्माण होते त्या वेळी योगारूढ संज्ञेस पुरुष प्राप्त होतो)।।९।।

**अपौरुषेयं यद्ब्रह्म सद्धर्मप्रतिपादकम् ।।**
**महाभूतसमुत्पन्नं प्रमाणं वेद उच्यते ।।१०।।**

अन्वयः- यत् ब्रह्म अपौरुषेयं सद्धर्मप्रतिपादकं महाभूतसमुत्पन्नं (तत्) वेदः प्रमाणं उच्यते ।

अर्थः- कारण, वेद अपौरूषेय आहे, ब्रह्माचे व धर्माचे प्रतिपादन करतो व सर्वज्ञ, सर्वशक्तिमान् अशा परमात्म्यापासून आविर्भूत झाला आहे म्हणून वेद स्वतः प्रमाण आहे.

भावार्थः- पुरुषसंबंधरहित वेदामध्यें अप्रामाण्यास कारण असलेले भ्रमप्रमादादि पुरुषदोष नाहीत. अन्य प्रमाणांनीं प्रतिपादित अर्थामध्यें अनुवादरूप अप्रामाण्य येते ते वेदामध्यें नाही. कारण अन्य प्रमाणांनीं प्रतिपादन न केलेल्या सच्चिदानंद ब्रह्माचे व धर्माचे वेदांनीं प्रतिपादन केले आहे. व सर्वदोषरहित व सर्वगुणसंपन्न ईश्वरापासून वेद प्रादुर्भूत झाल्यामुळे कोणताही दोष वेदांस नसल्यामुळे त्यांचे स्वतः प्रामाण्य निरपवाद आहे ।।१०।।

उत्पत्तीमुळे वेदांस अनित्यत्व प्राप्त होते व वेदवाक्यांनीं नित्यत्व सांगितले असल्यामुळे विरोधाची शंका करतात.

**विरोधो वाचा विरूपनित्ययेति गिरेति चेत् ।**
**न हि सा गीर्मता गौणी नित्यत्वं पूर्वसाम्यतः ।।११।।**

अन्वयः- वाचा विरूपनित्यया इति गिरा विरोध इति चेत् न, हि सा गौणी मता, पूर्वसाम्यतः नित्यत्वम् ।

अर्थः- वेदवाणी नित्य आहे, एतदर्थक वेदवाक्याचा विरोध आहे, असे म्हणाल तर नाही. कारण ते वाक्य गौण आहे. पूर्व साम्याने नित्यत्व सांगितले आहे. म्हणजे पूर्वकल्पी जो आनुपूर्वीचा प्रकार तोच प्रकार याही कल्पामध्यें आहे.

भावार्थः- पूर्वकल्पाप्रमाणे याही कल्पामध्यें वेद प्रादुर्भूत होत असल्यामुळे त्यास प्रवाहनित्यत्व प्राप्त होते व ते या वचनाने सांगितले आहे म्हणून विरोध नाही; कारण प्रवाह उत्पन्न होतो हे सिद्ध असतांना तो सारखा चालूं असल्यास नित्य असे म्हणतात. त्याप्रमाणे वेदांविषयीं समजावे।।११।।

उक्त रीतीने विरोध नाही. तथापि ईश्वरापासून उत्पत्ति असल्यामुळे वेदांस पौरुषेयत्व प्राप्त होते अशी शंका करतात.

**अथापि पौरुषेयत्वं प्रवक्तुं नैव शक्यते ।**
**तस्योपलभ्य रचितत्वानङ्गीकारतः खलु ।।१२।।**

अन्वयः- अथापि उपलभ्य रचितत्वानङ्गीकारतः खलु तस्य पौरुषेयत्वं प्रवक्तुं नैव शक्यते ।

अर्थः- पौरुषेयत्व शंका आली असताही प्रमाणांतरांनीं अर्थ संपादन करून रचना केली आहे, असा स्वीकार केला नसल्यामुळे पौरुषेयत्व प्राप्त होते असे म्हणतां येत नाही.

भावार्थ :- अन्य प्रमाणांनी अर्थ मिळवून रचना करणे हे पौरुषेयत्वाचे लक्षण आहे. वेद ईश्वरापासून निर्माण जरी झाले तरी प्रमाणंतरांनीं अर्थ संपादन करून ईश्वराने वेद रचले असे मानण्याचे कारण नाही. त्यामुळे

पौरुषेयत्वाचे लक्षण वेदामध्यें येत नाही ॥१२॥

अपौरुषेयत्वाचा उपसंहार करतात.

**अर्थवादपरत्वात्तु वाचेति नित्यताश्रुतेः ।**
**अपि सूत्रकृता वेदोत्पत्तिश्रुत्यनुरोधतः ॥१३॥**
**शास्त्रयोनित्वादितीशसर्वज्ञत्वेऽपि सूत्रितम् ।**
**निःश्वासवदनायासाद्वेद ईशाद्विनिर्गतः ॥१४॥**
**अपौरुषेयो विज्ञेयः प्रमाणं तद्धि नो महत् ।**
**वेदः स चेदृशो मंत्रब्राह्मणात्मक उच्यते ॥१५॥**

अन्वयः- वाचेति नित्यताश्रुतेः तु अर्थवादपरत्वात्, वेदोत्पत्ति श्रुत्यनुरोधतः सूत्रकृता अपि शास्त्रयोनित्वात् इति ईशसर्वज्ञेऽपि सूत्रितम्। ईशात् निःश्वासवत् अनायासात् वेदः विनिर्गतः (तस्मात्) अपौरुषेयः विज्ञेयः, न तद्धि प्रमाणं महत् च ईदृशः वेदः सः मंत्रब्राह्मणात्मकः उच्यते ।

अर्थः- 'वाचा विरूपनित्यया' ही श्रुति अर्थवादरूप असल्यामुळे, वेदांची उत्पत्ति वेदांनी सांगितली असल्यामुळे (आणि) सूत्रकार व्यासांनीसुद्धां 'शास्त्रयोनित्वात्' हे सूत्र ईश्वर सर्वज्ञ आहे हे सांगण्याकरतां रचले आहे, (म्हणून) ईश्वरापासून श्वासाप्रमाणे अनायासाने वेद उत्पन्न झाले आहेत म्हणून अपौरूषेय जाणावेत. आम्हांस ते वेदरूप प्रमाण, सर्व प्रमाणांपेक्षा श्रेष्ठ आहेत आणि असे ते वेद मंत्र व ब्राह्मणरूप आहेत.

भावार्थः- 'वाचा विरूपनित्यया' ह्या वेदवाक्याचे नित्यत्वामध्यें तात्पर्य नाही. 'तस्माद्यज्ञात्..' ह्या श्रुतिवाक्याने वेदांची उत्पत्ति सांगितली आहे. भगवान् सूत्रकारांनीं ऋग्वेदादि शास्त्रांस ईश्वर कारण असल्यामुळे ईश्वर सर्वज्ञ आहे असे प्रतिपादन केले आहे. त्यामुळे श्वासाप्रमाणे अनायासाने ईश्वरापासून वेदांची उत्पत्ति आहे असे सिद्ध होते व पूर्वी सांगितलेले पौरुषेयत्वाचे लक्षण वेदांमध्यें येत नाही म्हणून वेद अपौरुषेय आहेत व त्यामुळे वेदप्रमाण इतर प्रमाणांनी अबाध्य म्हणून आम्हांस मान्य आहेत ॥१३-१५॥

**स्मृतं ब्राह्मणकांडान्तर्गतमारण्यकं तथा ।**
**अनुष्ठानहेतुभूतद्रव्यदेवप्रकाशका: ॥१६॥**
**मंत्रा ऋगादिभेदेन विविधाः परिकीर्तिताः ।**
**स्युः पादबद्धगायत्र्यादिछंदोलक्षिता ऋचः ॥१७॥**

अन्वयः- तथा आरण्यकं ब्राह्मणकांडान्तर्गतं स्मृतम् । अनुष्ठान हेतुभूतद्रव्यदेवप्रकाशकाः मंत्राः ऋगादिभेदेन त्रिविधाः परिकीर्तिताः। पादबद्धगायत्र्यादिछंदोलक्षिताः ऋचः स्युः।

अर्थः- त्याप्रमाणे आरण्यक, ब्राह्मण भागांमध्यें अंतर्भूत आहे. अनुष्ठानास कारणीभूत द्रव्यदेवतादिकांचा प्रकाश करणारे मंत्र ऋग् - यजु - सामभेदांनीं तीन प्रकारांचे आहेत. पादघटित, गायत्र्यादिछंदांनीं युक्त असलेल्या मंत्रास ऋक् असे म्हणतात.

भावार्थः- अनुष्ठानकाळामध्यें द्रव्यदेवतादिकांचे स्मरण करून देणे हे मंत्राचे लक्षण आहे व छंदोयुक्त असणे हे ऋचांचे लक्षण आहे. आठ अक्षरांचे तीन पादांस गायत्री, अकरा अक्षरांच्या चार पादांस त्रिष्टुप् इत्यादि छंदांची लक्षणे आहेत ॥१६॥ ॥१७॥

**ज्ञेया गीतिविशिष्टास्ता एव सामानि शिक्षया ॥**
**यजूंषि तूभयविलक्षणानीह विचक्षणैः ॥१८॥**

अन्वयः- ता एव शिक्षया गीतिविशिष्टाः सामानि ज्ञेयाः, इह विचक्षणैः यजूंषि तु उभयविलक्षणानि ।

अर्थः- त्या छंदोयुक्त ऋचाच सामनियमाने गायनविशिष्ट पठन केल्यास सामसंज्ञक होतात. मीमांसेमध्यें निपुण असणाऱ्या पुरुषांनीं यजु, ऋक्सामविलक्षण समजावेत.

भावार्थः- गायनविशिष्ट ऋक् सामाचे लक्षण, ऋक् व साम भिन्न मंत्र यजूचे लक्षण समजावे ॥१८॥

**संबुद्धिरूपा निगदा यजुरन्तर्गता अपि ।**
**ब्राह्मणं त्रिविधं तत्र प्रथमं विधिरूपकम् ॥१९॥**

अन्वयः- संबुद्धिरूपाः निगदाः अपि यजुरंतर्गताः। ब्राह्मणं त्रिविधं, तत्र प्रथमं विधिरूपकम् ।

अर्थः- 'अग्नीदग्नीन् विहर' इत्यादि प्रेषरूप निगदभाग यजूमध्यें अंतर्भूत होतात. (असे मंत्रविभाग सांगून ब्राह्मण विभाग सांगतात) ब्राह्मण नांवाच्या वेद भागामध्यें तीन प्रकार आहेत ; त्यांतील प्रथम प्रकार विधिरूप आहे ॥१९॥

**द्वितीयमर्थवादाख्यं तृतीयं तद्विलक्षणम् ।**
**भाट्टा आहुर्विधिं शब्दभावनां च नियोगकम् ॥२०॥**
**प्राभाकरास्तार्किकाद्या इष्टसाधनतेति च ।**
**उत्पत्तिरधिकारश्च विनियोगः प्रयोगकः ॥२१॥**

अन्वयः- द्वितीयं अर्थवादाख्यं, तृतीयं तद्विलक्षणं, भाट्टाः शब्द भावनां विधी आहुः, च प्राभाकराः नियोगकं, तार्किकाद्याः इष्ट साधनता इति च, उत्पत्तिः अधिकारः विनियोगः च प्रयोगकः ।

अर्थः- दुसरा प्रकार अर्थवादरूप व तिसरा, विधि-अर्थवाद-विलक्षण, समजावा. (त्यांतील विधीचे स्वरूप सांगतात) भट्टपादानुयायि मीमांसक प्रवर्तनारूप शब्दभावनेस विधी म्हणतात. प्राभाकर, अपूर्वरूप नियोगास व तार्किकादिक इष्ट साधनतेस विधी म्हणतात. (त्या विधीचे) उत्पत्ति, अधिकार, विनियोग व प्रयोग असे चार प्रकार आहेत.

भावार्थः- विधीच्या अर्थाविषयी प्राभाकर, तार्किक व भाट्ट अशीं तीन मते आहेत. त्यांत प्राभाकर अपूर्वास विधी मानतात. परंतु हा अर्थ अलौकिक आहे. म्हणून त्यास विधिरूपता मानणे गौरवावह आहे. केवळ इष्टसाधनताज्ञान प्रवृत्तीस कारण नसून कृतिसाध्यतादिज्ञानही कारण मानावे लागते. म्हणून ज्ञायमान इष्ट साधनता हा तार्किक पक्षही परिष्कृत केल्यास गुरू होतो आहे म्हणून शब्दभावना अपरपर्याय-प्रवर्तना म्हणजे पुरुष प्रवृत्तीला जनक असा शब्दाचा व्यापारविशेष. हा भट्टपक्ष लघु असल्यामुळे ग्राह्य आहे ॥२०॥॥२१॥

चतुर्विध विधीचे फल व स्वरूप सांगतात

**एवं चतुर्विधो ज्ञेयो विधिर्ज्ञातुरभीष्टदः ।**
**देवताकर्मस्वरूपमात्रबोधक एव यः॥२२॥**

अन्वयः- एवं चतुर्विधः विधिः ज्ञातुः अभीष्टदः ज्ञेयः यः एव देवताकर्मस्वरूपमात्रबोधकः।

अर्थः- असा चार प्रकारचा विधी ज्ञात्यास इष्ट फळ देणारा आहे असे समजावे. जो विधी कर्मस्वरूप, द्रव्य व देवता यांचाच बोध करतो (तो उत्पत्ति विधी म्हणावा असा पुढील श्लोकांशी संबंध समजावा.)

भावार्थ :- उत्पत्ति, अधिकार, विनियोग व प्रयोग या चार विधींच्या ज्ञानाचे फळ अभीष्ट सिद्धि आहे. त्याचा क्रम, विधीचे ज्ञान कर्मानुष्ठानामध्यें प्रवृत्त करते व अनुष्ठानाने इष्ट सिद्धि होते असा समजावा. त्यांतील उत्पत्ति विधीचे लक्षण केवळ कर्माचे स्वरूप प्रतिपादन करणे असे आहे. द्रव्य व देवता अशीं कर्माची दोन रूपें आहेत. याचेच केवल प्रतिपादन करणारा विधी उत्पत्ति विधी होय ॥२२॥

**आग्नेयोष्टाकपालो हीत्यादिरुत्पत्तिरुच्यते ।**
**सेतिकर्तव्यताकस्य करणस्याधिकारकः ॥२३॥**
**यागादेः फलसंबंधबोधकस्तदुदाहृतिः ।**
**स्वर्गकामो दर्शपूर्णमासाभ्यां यजतीति हि ॥२४॥**

अन्वय :- (सः) उत्पत्तिः उच्यते, तदुदाहृतिः आग्नेयोष्टा- कपालो हीत्यादिः, सेतिकर्तव्यताकस्य यागादेः करणस्य फलसंबंध-बोधकः अधिकारकः, तदुदाहृतिः स्वर्गकामो दर्शपूर्णमासाभ्यां यजतीति हि ।

अर्थः- तो उत्पत्ति विधी समजावा. त्याचे उदाहरण अग्निदेवताक अष्टाकपाल पुरोडाशद्रव्यक याग व याच्यासारखे अन्य याग होय. इतिकर्तव्यतायुक्त यागादि साधनाचा फलसंबंध कथन करणारा विधी अधिकारविधी समजावा. दर्शपूर्णमासाभ्यां स्वर्गकामो यजेत हे त्याचे उदाहरण प्रसिद्ध आहे.

भावार्थः- अग्निदेवतेस उद्देशून आठ कपालावर संस्कृत केलेला पुरोडाश हे द्रव्य व दर्शपूर्णमास काळ ज्या यागास सांगितला आहे, त्या यागास अग्निदेवताक अष्टकपाल पुरोडाशद्रव्यक याग म्हणतात. अशा यागामध्यें द्रव्य व देवताच सांगितले असल्यामुळे उत्पत्ति विधीचे लक्षण येते. याग करावा असे सांगितले असतां तो कसा करावा अशी जिज्ञासा निर्माण होते व त्याच प्रकरणामध्यें प्रयाज, अनुयाज प्रभृति अंगसमूह सांगितला आहे. ह्यास फलाची आकांक्षा असते. याप्रमाणे यागास व अंगसमूहास साकांक्षता असल्यामुळे उभयांचा संबंध होऊन प्रयाजादि अंगांनीं युक्त याग करावा असा बोध होऊन याग करण्याचा प्रकार आपल्यास समजतो (कर्म करण्याच्या प्रकारास इतिकर्तव्यता म्हणतात.) इतिकर्तव्यता प्रयाजादिक होय. अशा इतिकर्तव्यतेने युक्त अशा यागादि साधनांचे फल ज्या वाक्यांनीं सांगितले जाते त्यास अधिकारविधी म्हणतात. असे लक्षण 'दर्शपूर्णमासाभ्यां स्वर्गकामो यजेत' या वाक्यामध्यें येते, म्हणून ते उदाहरण होय।।२३-२४।।

**विनियोगोऽङ्गसंबन्धबोधकस्तदुदाहृतिः ।**
**समिधो यजतीत्यादिः प्रयोगश्च चतुर्थकः ।।२५।।**

अन्वयः- अंगसंबन्धबोधकः विनियोगः, तदुदाहृतिः समिधो यजति इत्यादिः, च चतुर्थकः प्रयोगः।

अर्थः- प्रधानाचा व अंगाचा संबंध सांगणारा विधी विनियोगविधि. त्याचे उदाहरण समिधो यजति इत्यादि वाक्यांनी सांगितलेले याग आणि चवथा विधी प्रयोग (त्याचे लक्षण पुढील श्लोकामध्यें प्रतिपादन करतात.)

भावार्थः- ज्याचे साक्षात् फल असते त्यास प्रधान म्हणतात व त्याचेजवळ फलरहित जें कर्म सांगितलेले असते त्यास अंग असे म्हणतात. अशा प्रधानाचा व अंगाचा संबंध ज्याने समजतो त्या विधीस विनियोग संज्ञा आहे. समिधो यजति या वाक्याने सांगितलेल्या यागास समिद्याग म्हणतात. तो दर्शपूर्णमास प्रकरणांमध्यें पठित आहे. दर्शपूर्णमासास फल सांगितलेले आहे व समिद्यागास फल सांगितले नाही म्हणून त्यांस अंगसंज्ञा

व दर्शपूर्णमासास प्रधान संज्ञा आहे. फळ कसे संपादन करावे अशी प्रधानास इति कर्तव्यताकांक्षा असून समिदादियागास फळाची आकांक्षा आहे म्हणून उभय आकांक्षारूप प्रकरण प्रमाणांनीं उभयांचा संबंध होऊन दर्शपूर्णमासाचे अंगत्व समिद्यागास प्राप्त होते ॥२५॥

**अङ्गप्रधानाख्यकर्मप्रयोगैक्यावबोधकः ।**
**विधित्रयान्वितः श्रौतमूचुः कल्पं च केचन ॥२६॥**

अन्वयः- अंगप्रधानाख्यकर्मप्रयोगैक्यावबोधकः विधित्रयान्वितः (तं) केचन श्रौतं कल्पं ऊचुः ।

अर्थः- अंगकर्म व प्रधानकर्म यांचे अनुष्ठानामध्यें ऐक्य सांगणारा म्हणजे सहभावरूप साहित्य सांगणारा विधी प्रयोगविधी होय. उत्पत्ति, अधिकार व विनियोग अशा तीन विधींचे मेलन रूप हा आहे. त्यास कोणी श्रौत, कोणी कल्पसूत्र असे म्हणतात ।

भावार्थः- अंग व प्रधान यांची एकवाक्यता होऊन सांगप्रधानाचे अनुष्ठान एक करावे असे सिद्ध होते. एक अनुष्ठान म्हणजे अंग व प्रधान यांचे सहानुष्ठान; ते एक कालामध्यें करणे संभवत नाही म्हणून अविलंबाने करणे प्राप्त हाते. यासच साहित्य असे म्हणतात. असे साहित्य प्रतिपादन करणारा प्रयोग विधी, अविलंबाने अनुष्ठान नियतक्रमाशिवाय घडत नसल्यामुळे नियतक्रमाचेही विधान करतो, हा सर्व अर्थ एकवाक्यतापन्नविधित्रयाचाच असल्यामुळे प्रयोगविधी हा स्वतंत्र नसून विधित्रयाचे ऐक्य होय. यास श्रौत व कल्प अशा संज्ञा आहेत ॥२६॥

**इमं विद्वान् तथा कर्मस्वरूपं फलभाग् भवेत् ।**
**कर्मस्वरूपं द्विविधं गुणकर्मार्थकर्म च ॥२७॥**

अन्वयः- इमं तथा कर्मस्वरूपं विद्वान् फलभाक् भवेत् गुणकर्म च अर्थकर्म (इति) कर्मस्वरूपं द्विविधम् ।

अर्थः- ह्या विधिचतुष्टयास जाणणारा व तसेच कर्मस्वरूप जाणणारा फलभागी होतो. गुणकर्म व अर्थकर्म असे कर्मस्वरूप दोन प्रकारचे आहे ।

भावार्थः- विधिचतुष्टयाचे ज्ञान व कर्मस्वरूपाचे ज्ञान संपादन करून कर्म केल्यास कर्माचे फल मिळते म्हणून विधिस्वरूपाचे निरूपण आतांपर्यंत केले. यापुढें कर्मस्वरूपाचे निरूपण लक्षण व उदाहरण देऊन करतात ॥२७॥

**ऋतुकारक युक्तं यद्विहितं गुणकर्म तत् ।**
**चतुर्धोत्पत्तिविकृतिसंस्कृतिप्राप्तिभेदतः ॥२८॥**

अन्वयः- ऋतुकारकयुक्तं विहितं यत् तत् गुणकर्म, उत्पत्ति विकृतिसंस्कृतिप्राप्तिभेदतः चतुर्धा ।

अर्थः- यज्ञसाधनीभूत द्रव्य देवतादिकांच्या उद्देशाने विहित जें असते ते गुणकर्म. ते उत्पत्ति, विकृति, संस्कृति व प्राप्ति अशा भेदांमुळे चार प्रकारचे आहे ॥२८॥

त्याची उदाहरणे क्रमाने देतात -

**यूपं तक्षत्यादधीत वसन्तेऽग्नीनितीह तु ।**
**तक्षणाधानसंस्काराख्यविशेषविशिष्टता ॥२९॥**
**यूपाग्न्यादेः स्मृतोत्पत्तिरेवमुन्नेयमन्यतः ।**
**सोमं सुनोति व्रीहींश्च वहन्ति विकृतिस्त्विह ॥३०॥**

अन्वयः- यूपं तक्षति वसंतेऽग्नीन् आदधीत इति इह तु यूपाग्न्यादेः तक्षणाधानसंस्काराख्यविशेषविशिष्टता उत्पत्तिः स्मृता एवं अन्यतः उन्नेयम् । (सोमं सुनोति या चरणाचा अन्वय पुढील श्लोकाशीं आहे.)

अर्थः- यूपाचे तक्षण करावे, वसंत काळामध्यें अग्नीचे आधान करावे, या वाक्यांत यूप व अग्नि यांना क्रमाने तक्षण व आधान नांवाचे संस्कार सांगितले आहेत. त्यांना ते संस्कार केले असतां संस्कारविशिष्टता येते. हीच उत्पत्ति समजावी. याप्रमाणे अन्य ठिकाणी समजावे.

भावार्थः- यज्ञामध्यें पशुबंधनार्थ असलेल्या स्तंभविशेषास यूप म्हणतात. तो औदुंबर, खदिरादि विशेष वृक्षाचा करावयाचा असून तक्षणादि विशेष संस्कार त्याचेवर केल्यानंतर शास्त्रीय यूप अशी संज्ञा त्यास प्राप्त

होते. अर्थात् तक्षणादि संस्काराने यूपाची उत्पत्ति मानावी लागते. याप्रमाणे अग्निहोत्री यांचे अग्नि, आधान नावाचे कर्म विशेषे करून संस्कृत करावे लागतात. नंतरच त्यास आहवनीय, गार्हपत्य व दक्षिणाग्नि अशा संज्ञा प्राप्त होतात; म्हणून ते आधानादि संस्कारानेच उत्पन्न होतात असे सिद्ध होते. याप्रमाणे यज्ञसाधन यूप व अग्नि यांचे उद्देशाने तक्षण व आधान सांगितल्यामुळे त्यास उत्पत्ति गुणकर्म म्हणतात ।।२९।। ।।३०।।

**तयोः क्रमादभिषवावघाताभ्यां प्रकीर्तिता ।**
**व्रीहीन् प्रोक्षति पत्न्याज्यं वीक्षते त्विह चानयोः ।।३१।।**

अन्वयः- सोमं सुनोति व्रीहीश्चावहन्ति इह तु क्रमात् तयोः अभिषवावघाताभ्यां विकृतिः प्रकीर्तिता (व्रीहीन् प्रोक्षति या चरणाचा अन्वय पुढें आहे.)

अर्थः- सोमाचा अभिषव करावा. व्रीहीचे अवहनन करावे. या ठिकाणी क्रमाने सोमाची व व्रीहीची अभिषव व अवघात यांनीं विकृति सांगितली आहे. हे विकृति गुणकर्म होय.

भावार्थः- यज्ञांग सोमरसाकरतां सोमाचा अभिषव व यज्ञांग पुरोडाशाकरतां व्रीहीचे अवहनन सांगितले आहे; अर्थात् यज्ञसाधनोद्देशाने अभिषव व अवहनन विहित असल्यामुळे गुणकर्माचे लक्षण उभयामध्यें आहे व अभिषव व अवहननांनीं क्रमाने सोमाची व व्रीहीची विकृति होत असल्यामुळे विकृति गुणकर्माचे उदाहरण समजावे ।।३१।।

**प्रोक्षणेक्षणतः प्रोक्ताः विशिष्टा संस्कृतिः खलु ।**
**गां पयो दोग्धि स्वाध्यायोऽध्येतव्योऽत्राप्तिरुच्यते ।।३२।।**

अन्वयः- व्रीहीन् प्रोक्षति च पत्नी आज्यं वीक्षते इह तु अनयोः खलु प्रोक्षणेक्षणतः विशिष्टा संस्कृतिः प्रोक्ता । (गां पयो दोग्धि याचा अन्वय पुढे आहे.)

अर्थः- व्रीहीचे प्रोक्षण करावे आणि पत्नीने आज्य अवलोकन करावे. या ठिकाणी व्रीही व आज्य यांची प्रोक्षण व ईक्षण यांनीं विशिष्ट

संस्कृति सांगितली आहे.

भावार्थ :- प्रोक्षणांनी व्रीहीचे स्वरूप उत्पन्न होत नाही व विकृति, आप्ति यांचा संभव नाही म्हणून प्रोक्षणाने व्रीहीचे ठिकाणी एक प्रकारचा विशेष संस्कार होतो असे सिद्ध होते, म्हणून यास संस्कृति गुणकर्म म्हणावे. याप्रमाणे पत्नीकर्तृक ईक्षणाने आज्याच्या ठिकाणी संस्कार होत असल्यामुळे तेही संस्कृति गुणकर्म समजावे ।।३२।।

**दोहनाध्ययनाभ्यां च पयआदेः सतो मता ।**
**एतच्चतुष्टयं त्वङ्गमङ्गिनः कथितं क्रतोः ।।३३।।**

अन्वयः- गां पयो दोग्धि, स्वाध्यायः अध्येतव्यः, अत्र आप्तिः उच्यते (सा च) सतः पयआदेः दोहनाध्ययनाभ्यां मता अंगिनः क्रतोः एतच्चतुष्टयं तु अंगं कथितम्।

अर्थः- गाईपासून दुग्ध दोहन करावे, स्वशाखेचे अध्ययन करावे; या ठिकाणी आप्ति समजावी आणि ती विद्यमान दुग्धादिकांची दोहनादिकाने मान्य आहे. प्रधानभूत यज्ञाचे हे चतुष्टय अंग सांगितले आहे.

भावार्थः- गाईच्या कासेमध्यें असलेले दूध दोहनाने प्राप्त होते म्हणून यास आप्ति गुणकर्म म्हणतात व याप्रमाणे गुरूचे ठिकाणी असलेला वेद अध्ययनाने शिष्यास प्राप्त करतां येतो म्हणून तेही आप्ति कर्म समजावे (आपल्या वेदास स्वाध्याय अथवा स्वशाखा म्हणतात) असे हे चार प्रकारचे गुणकर्म प्रधान क्रतूचे (यज्ञाचे) अंग समजावे ।।३३।।

**यत्कारकाण्यनाश्रित्य विहितं चार्थकर्म तत् ।**
**अङ्गं प्रधानमिति च द्विविधं परिकीर्तितम् ।।३४।।**

अन्वयः- कारकाणि अनाश्रित्य च यत् विहितं तत् अर्थकर्म च अंगं प्रधानं इति द्विविधं परिकीर्तितम् ।

अर्थः- यज्ञ साधनाचा आश्रय न करतांच जें विहित असते ते अर्थकर्म समजावे आणि ते अंग व प्रधान असे दोन प्रकारचे सांगितले आहे.

भावार्थः- यज्ञांगसाधनाचा आश्रय न करतां विहित असणे हे

अर्थकर्माचे लक्षण आहे. आत्मसमवेत अपूर्वाच्या उत्पत्तीस कारण असेही त्याचे लक्षण आहे. अर्थकर्माचे अंग व प्रधान असे दोन भेद आहेत. नित्य, नैमित्तिक, काम्य असे याचे तीन प्रकार व ऐहिक, आमुष्मिक व ऐहिकामुष्मिक असे पुनः त्याचे तीन प्रकार आहेत ॥३४॥

प्रधान व अंग यांचे लक्षण व अंगाचे भेद सांगतात -

**अनन्यार्थं प्रधानं चान्यार्थमङ्गं च तद्द्विधा ।**
**सन्निपत्योपकार्यारादुपकारकभेदतः ॥३५॥**

अन्वयः- अनन्यार्थं प्रधानं च अन्यार्थं अंगं तत् सन्निपत्योपकार्यारादुपकारकभेदतः द्विधा ।

अर्थः- अन्याकरतां जें नसते ते प्रधान व अन्याकरतां जें ते अंग समजावे; ते अंग सन्निपत्योपकारक व आरादुपकारक अशा भेदाने दोन प्रकारचे आहे.

भावार्थः- ज्या कर्माने अन्यकर्माची सिद्धि होत नसून अन्य कर्माने ज्याची सिद्धि होते ते प्रधानकर्म व ज्या कर्माने अन्यकर्माची सिद्धि होते ते अंगकर्म. क्रमाने दर्शपूर्णमास व प्रयाज ही उदाहरणे समजावीत ॥३५॥

**आद्यं प्रधानस्वरूपनिर्वाहकमिति स्मृतम् ।**
**संप्रोक्षणावघातादि फलोपकार्यथापरम् ॥३६॥**

अन्वयः- प्रधानस्वरूपनिर्वाहकं आद्यं स्मृतम् संप्रोक्षणावघातादि इति (उदाहृतिः) अथ फलोपकारि अपरम् ।

अर्थः- प्रधानयागाचे स्वरूप निर्माण करणारे कर्म, सन्निपत्योपकारक समजावे. त्याचे संप्रोक्षण अवघातादि उदाहरण होय. यागापासून उत्पन्न होणाऱ्या फलास उपकारक जें कर्म ते आरादुपकारक समजावे.

भावार्थः- संप्रोक्षण अवघातादि संस्कार करून संस्कृत झालेल्या व्रीहीच्या पुरोडाशानेच आग्नेयादि प्रधान याग केल्यास याग स्वरूप निष्पन्न होते, अन्यथा होत नाही; म्हणून संप्रोक्षणादिक प्रधानस्वरूपोत्पत्तीस कारण होतात. अशा रीतीने प्रधान स्वरूपनिर्वाहकत्व हे सन्निपत्योपकारकाचे लक्षण

प्रोक्षणादिकामध्यें येते. याप्रमाणे यागस्वरूप निष्पन्न होऊन अपूर्व निर्माण होते. त्या अपूर्वापासून होणाऱ्या फलास कारण जें होते ते आरादुपकारक. त्याचे उदाहरण पुढें देतात ॥३६॥

**प्रयाजाद्येवं पूर्णाङ्गंयुग्विधिः प्रकृतिर्मता ।**
**दर्वीहोमस्तदुभयविलक्षणविधिर्मतः ॥३७॥**

अन्वयः- प्रयाजादि (उदाहरणं) एवं पूर्णांगयुक् विधिः प्रकृतिः मता, तदुभयविलक्षणविधिः दर्वीहोमः मतः।

अर्थः- प्रयाज - अनुयाजादि, आरादुपकारकाचे उदाहरण समजावे. याप्रमाणे समग्र अंगांनी युक्त विधीस प्रकृति म्हणतात. अर्थात् समग्र अंगांनी रहित विधीस विकृति संज्ञा सूचित होते. एखादा विधी प्रकृति - विकृति - विलक्षण असतो त्याचे उदाहरण दर्वीहोम समजावे.

भावार्थः- प्रधान दर्शपूर्णमासजन्य अपूर्व व आरादुपकारक प्रयाजादि जन्य अपूर्व यापासून फलापूर्व निर्माण होऊन फल निर्माण होते. याप्रमाणे प्रयाजादिक फलोपकारक असल्यामुळे आरादुपकारकाचे उदाहरण होते. याप्रमाणे अपेक्षित संपूर्ण अंगांनी युक्त विधी दर्शपूर्णमासासारखे प्रकृति व संपूर्ण अंगाचा उपदेश जेथे नसतो असे सौर्ययागादिक विकृति. जो प्रकृति नाही व जो विकृति नाही असा उभय विलक्षण दर्वीहोम, याप्रमाणे विधी व्यवस्था आहे ॥३७॥

ब्राह्मणाचे तीन प्रकार पूर्वी सांगितले आहेत; त्यापैकीं विधीचे निरूपण झाले. द्वितीय प्रकार अर्थवाद; त्याचे निरूपण करतात -

**त्रिधार्थवादोऽत्र विधिशेषभूतं हि वाक्यकम् ।**
**प्रमान्तरविरुद्धार्थबोधको गुणवादकः ॥३८॥**

अन्वयः- अत्र विधिशेषभूतं हि वाक्यकं अर्थवादः (स च) त्रिधा, प्रमांतरविरुद्धार्थबोधकः गुणवादकः।

अर्थः- ब्राह्मणात्मक वेदामध्यें विधिशेषभूत वाक्यास अर्थवाद म्हणतात. (तो) तीन प्रकारचा आहे. अन्य यथार्थ ज्ञानाशीं विरूद्ध असलेल्या

अर्थाचा बोध करणारा गुणवाद.

भावार्थः- ब्राह्मणांतर्गत विधिवाक्याचे सन्निध अथवा निषेधवाक्याचे सन्निध असलेल्या वाक्यास अर्थवाद संज्ञा आहे व गुणवाद, अनुवाद, भूतार्थवाद असे त्याचे तीन भेद आहेत. विधिवाक्याशी त्याची एकवाक्यता होऊन विधेयप्राशस्त्याचा अर्थवादांनीं बोध होतो व विधीमध्यें प्रवृत्ति होते. याप्रमाणे अर्थवाद सप्रयोजन असतो. निषेधसमभिव्याहृत अर्थवाद निषेध्यनिंदा प्रतिपादन करून निषेध्यापासून निवृत्त करणारा असल्यामुळे तोही सफल आहे. प्राशस्त्य अथवा निंदाप्रतिपादक विधिशेषभूत वाक्य हे अर्थवादाचे लक्षण आहे व प्रमाणांतरविरूद्धार्थप्रतिपादकत्व हे गुणवादाचे लक्षण आहे ॥३८॥

**आदित्यो यूप इत्यादिर्द्वितीयस्त्वनुवादकः ।**
**प्रमान्तराप्तार्थबोधी यथाऽग्निर्हिमभेषजम् ॥३९॥**

अन्वयः- आदित्यो यूप इत्यादिः, द्वितीयः तु प्रमांतराप्तार्थबोधी अनुवादकः, यथा अग्निः हिमभेषजम् ।

अर्थः- गुणवादाचे उदाहरण आदित्यो यूपो भवति हे आहे. दुसरा, अन्ययथार्थ ज्ञानाने प्राप्त असलेल्या अर्थांचे प्रतिपादन करणारा अनुवाद समजावा. त्याचे उदाहरण अग्नि हा थंडीचे औषध आहे.

भावार्थः- यूपास आदित्यरूपता प्रत्यक्ष विरूद्ध आहे म्हणून युपास आदित्यरूपतेचे प्रतिपादन यूपप्रशंसार्थ असून यूपविधीशीं त्याची एकवाक्यता होते व तद्द्वारा ते वाक्य सप्रयोजन होते, परंतु आपाततः प्रमाणांतरविरूद्ध असल्यामुळे त्यास गुणवाद म्हणतात. प्रमाणांतराने ज्ञात असलेल्या अर्थाचे प्रतिपादन करणारा अनुवाद असून अग्निर्हिमस्य भेषजं हे त्याचे उदाहरण आहे. थंडीचे निवारण वन्हीने होते हे प्रत्यक्ष सिद्ध आहे. तोच अर्थ या अर्थवादाने कथन केला असल्यामुळे प्रमाणांतरावगतार्थप्रतिपादकत्व हे अनुवादाचे लक्षण तेथें समन्वित होते ॥३९॥

**मानान्तरविरोधाप्तिविहीनो गुणबोधकः ।**
**भूतार्थवाद इन्द्रोऽस्त्र वृत्राय प्राहिणोदिति ।।४०।।**

अन्वयः- मानान्तरविरोधाप्तिविहीनः, गुणबोधकः, इन्द्रोऽस्त्रं वृत्राय प्राहिणोत् इति भूतार्थवादः।

अर्थः- मानांतरविरोध व मानांतर प्राप्तिरहित कर्माचे प्राशस्त्य बोधित करणारा भूतार्थवाद समजावा. इंद्र वृत्रासुरावर वज्रास्त्र सोडता झाला हे त्याचे उदाहरण होय.

भावार्थः- या उदाहरणामध्यें अन्य प्रमाणाचा विरोध नाही व अन्य प्रमाणांनीं हा अर्थ प्राप्तही नाही म्हणून भूतार्थवादाचे लक्षण समन्वित होते ।।४०।।

**विधिस्तुतिपरत्वे तु समानेऽपि तृतीयकः ।**
**देवाधिकरणन्यायात्स्वतः प्रामाण्यरूपकः ।।४१।।**

अन्वयः- विधिस्तुतिपरत्वे समानेपि तृतीयकः तु, देवताधिकरण न्यायात् स्वतःप्रामाण्यरूपकः।

अर्थः- सर्व अर्थवादाचे विधिस्तुतीमध्यें तात्पर्य समान असतांनाही तृतीय भूतार्थवाद हा देवताधिकरण न्यायावरून स्वार्थाविषयींही प्रमाण आहे.

भावार्थः- गुणवाद व अनुवाद यांचे स्वार्थामध्यें तात्पर्य मानतां येत नाही. गुणवादामध्यें प्रमाणांतराचा विरोध असतो व अनुवादामध्यें अन्य प्रमाणांनी तो अर्थ सिद्ध असतो; म्हणून अनधिगताबाधितार्थ प्रतिपादकत्वरूप प्रामाण्य स्वीकारतां येणे शक्य नाही. तसे भूतार्थवादामध्यें नाही. त्याचा अर्थ प्रमाणांतराने प्राप्त नसून प्रमाणांतरविरूद्धही नसतो, म्हणून त्याचे प्रतीयमान अर्थामध्यें प्रामाण्य अबाधित असते हा अर्थ भगवान् बादरायणांनी देवताधिकरणामध्यें सिद्ध केला आहे ।।४१।।

वेदाचे प्रयोजन प्रकारांतराने सांगतात.

**त्रय्या हौत्रादिभेदेन प्रयोगास्त्रिविधा मताः ।**
**यज्ञानुपयुक्तोऽप्यथर्वा शान्त्यादिबोधकः ।।४२।।**

अन्वयः- त्रय्याः होत्रादिभेदेन त्रिविधाः प्रयोगाः मताः यज्ञाद्यनुपयुक्तः अपि अथर्वा शांत्यादिबोधकः।

अर्थः- ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद या वेदत्रयीचे हौत्र, आध्वर्यव व औद्गात्र अशा भेदाने तीन प्रकारचे प्रयोग मान्य आहेत. यज्ञादिकास उपयोगी नसलेलाही अथर्ववेद शांतिक पौष्टिकादि कर्मांचा बोध करतो.

भावार्थः- मंत्रब्राह्मणात्मक द्विविध वेदाचे प्रयोजन, मंत्र, विधी व अर्थवाद अशा रूपाने आतांपर्यंत सांगितले. सामान्यरूपाने ऋग्वेदाचे हौत्रकर्म, यजुर्वेदाचे आध्वर्यकर्म व सामवेदाचे औद्गातृकर्म असे असून या कर्मत्रयाचा अंतर्भाव एका यज्ञक्रियेमध्यें असतो; म्हणून यज्ञकर्म हे वेदत्रयाचे प्रयोजन आहे. अथर्ववेद यज्ञामध्यें उपयुक्त नसून त्याचे शांत्यादिकर्म हे सामान्य प्रयोजन आहे ॥४२॥

अथर्ववेदाचे कर्म भिन्न आहे त्याप्रमाणे शाखाभेदाने कर्मभेद शंकेचा परिहार करतात -

**शाखाभेदेऽपि कर्मैक्यं प्रतिवेदमिति स्थितिः ।**
**वेदान्तवाक्यजातं विध्यर्थोभयविलक्षणम् ॥४३॥**

अन्वयः- प्रतिवेदं शाखाभेदेपि कर्मैक्यं इति स्थितिः, वेदान्तवाक्यजातं विध्यर्थोभयलक्षणम् ।

अर्थः- प्रत्येक वेदामध्यें शाखा अनेक असल्या तरी कर्म एक असा सिद्धांत आहे. वेदांतवाक्यसमूह विधी व अर्थवादरूप नसून तद्भिन्न आहे.

भावार्थः- वेदामध्यें शाखा भिन्न-भिन्न असून त्यांमध्यें कांही कर्मप्रयोगही भिन्न दिसतात. एका वेदाच्या सर्व शाखांमध्यें असलेल्या कर्मांचे अनुष्ठान एकास अशक्य आहे. केवळ आपल्याच शाखेचे अनुष्ठान केल्यास विकल होते की काय अशी शंका येते, परंतु कर्म एकच आहे. शाखाभेद कर्मभेदक होऊं शकत नाही. कारण ते कर्मभेदक प्रमाण नव्हें; म्हणून आपल्या शाखेचेच अनुष्ठान करावे. कर्म एकच असल्यामुळे इतर शाखांतील गुणांचा संग्रह करतां येतो ॥४३॥

ब्राह्मणाच्या तीन भागांपैकी विधी व अर्थवाद यांची व्यवस्था सांगितली. तद्भिन्न वेदांतवाक्यसमूहाची व्यवस्था सांगतात ।

**अज्ञातज्ञापकत्वेऽप्यनुष्ठानात्प्रतिपादनात् ।**
**न विधिस्तत्स्वयं स्वार्थे ज्ञानानन्दपरात्मनि ॥४४॥**

अन्वयः- तत् अज्ञातज्ञापकत्वेऽपि अनुष्ठानप्रतिपादनात् न विधिः स्वार्थे ज्ञानानन्दपरात्मनि स्वयं (प्रमाणम्)।

अर्थः- ते वेदांत वाक्यजात, अज्ञात अर्थाचे ज्ञापन करीत असतांहि अनुष्ठान सांगत नसल्यामुळे विधिरूप नव्हे (व अन्य शेष नसल्यामुळे अर्थवादरूपही नव्हे); तथापि ते आपल्या सच्चिदानंद परमात्मारूप अर्थाविषयीं स्वतः प्रमाण आहे.

भावार्थः- अज्ञातज्ञापकत्वरूप प्रामाण्य वेदांतवाक्यास आहे. त्यांनी सांगितलेल्या सच्चिदानंदस्वरूपाचे ज्ञान संपादन केल्यास परमपुरूषार्थ सिद्धि होते, म्हणून त्यास विधी व अर्थवाद द्वारा प्रयोजन सांगण्याचे कारण नाही. ॥४४॥

त्यास विध्यर्थवादरूपता संभवत नसून त्याचे तात्पर्य स्वार्थामध्येंच आहे असे दाखवितात.

**उपक्रमादिषड्लिङ्गबलवत्त्वेन च स्वतः ।**
**प्रमाणभूतमप्यन्यान्सर्वानपि विधीन् स्वयम् ॥४५॥**
**आपादयत्येव बुद्धिशुद्धिद्वारा स्वशेषताम् ।**
**तस्यान्यशेषत्वाभावान्नार्थवादत्वमीरतम् ॥४६॥**

अन्वयः- उपक्रमादिषड्लिङ्गबलवत्वेन स्वतः प्रमाणभूतं, अपि च अन्यान् सर्वान् अपि विधीन् बुद्धिशुद्धिद्वारा स्वशेषतां एव आपादयति, अन्यशेषत्वाभावात् तस्य तस्य अर्थवादत्वं न ईरितम् ।

अर्थः- वेदांतवाक्यजात, उपक्रमादि सहा लिंगांच्या सामर्थ्याने युक्त असल्यामुळे स्वार्थामध्येंच प्रमाण आहे आणि ते स्वतः, अन्य सर्व विधिनिषेधास स्वतःचे अंगत्वच आपादान करते. ते दुसऱ्याचे अंग होत

नसल्यामुळे त्यास अर्थवादरूपता संभवत नाही.

भावार्थः- उपक्रमोपसंहार, अभ्यास, अपूर्वता, फल, अर्थवाद व उपपत्ति ही सहा लिंगें तात्पर्यनिर्णय करणारीं आहेत. वेदांताचे तात्पर्य लिंगषट्‌काने सच्चिदानंद परमात्म्यामध्यें आहे असे सिद्ध होते. 'सदेव सौम्येदमग्रआसीत्' या वचनाने सच्चिदानंदाचा उपक्रम् व 'ऐतदात्म्यमिदं सर्वं' याने उपसंहार केला आहे. तत्त्वमसि असा नऊ वेळां अभ्यास केला आहे. हा अर्थ अपूर्व आहे. मुक्तिफल सांगितले आहे. जगाचे सृष्टि, स्थिति, लय यांचेपासून असा अर्थवाद व मृत्तिकादि दृष्टांताने उपपत्ति सांगितली आहे. याप्रमाणे षड्विधतात्पर्ययुक्त वेदांत वाक्यजात प्रबळ होऊन स्वार्थाविषयीं प्रमाण होते व इतर सर्व विधिनिषेधास अंगत्व प्रतिपादन करते. सर्व विधिनिषेधात्मक कर्म चित्तशुद्धीस कारण आहे. त्यापासून साधनचतुष्टय प्राप्त होते. तदनंतर वेदांतवाक्य विचाराने परमात्मज्ञान व त्याने मोक्ष अशा क्रमाने सर्व कर्म चित्तशुद्धिद्वारा ज्ञानाचे अंग होते. ज्ञानानंतर कृतकृत्यता आहे म्हणून ज्ञान हे इतरांचे अंग नसून सर्वांचे अंगी अथवा प्रधान आहे. त्यामुळे त्यास अर्थवादरूपता संभवत नाही ॥४५॥ ॥४६॥

वेदांताचा अर्थ प्रत्यक्षादि प्रमाणांनीं बाधित असल्यामुळे प्रमाण नाही अशी शंका येते. त्याविषयीं परिहार सांगतात.

**अबाधिताविज्ञातार्थज्ञापकं ह्येतदेव हि ।**
**बलिष्ठत्वात्सदितरैः प्रमाणैर्न विहन्यते ॥४७॥**

अन्वयः- एतदेव हि अबाधिताविज्ञातार्थज्ञापकं हि सत् बलिष्ठत्वात् इतरैः प्रमाणैः न विहन्यते ।

अर्थः- वेदांतवाक्यजातच अबाधित व अविज्ञात अर्थाचे प्रतिपादन करते म्हणून ते तात्त्विक आहे. तात्त्विकत्वाने ते प्रबल असल्यामुळे इतर प्रमाणाने बाधित होत नाही.

भावार्थः- कालत्रयामध्यें बाधित न होणारे व इतर प्रमाणाने ज्ञात न होणारे असे परमात्मतत्त्व एका वेदांतानेच प्रतिपादन केले आहे. असा

अर्थ अन्य कोणत्याही प्रमाणाने प्रतिपादन केलेला नाही, म्हणून वेदांत हे तात्त्विक प्रमाण अशी प्रसिद्धि आहे. इतरांस व्यावहारिक प्रामाण्य आहे. व्यावहारिकापेक्षां तात्त्विक प्रबल असल्यामुळे व्यावहारिक प्रमाणाने वेदांत प्रमाणाचा बाध होत नाही; त्यामुळे वेदांत स्वतः प्रमाण व तदुक्त अर्थ सर्वप्रधान असे सिद्ध होते ।।४७।।

वेदांताचे अबाधितप्रामाण्य असल्यामुळे तदुक्त उपासनेचे निरूपण करतात.

**अत्राधिकारभेदेन क्रममुक्त्या उपासनम् ।**
**प्रोक्तं त्रिधाङ्गावबद्धप्रतीकाहंग्रहाभिधम् ।।४८।।**

अन्वयः- अत्र अधिकारिभेदेन उपासनं प्रोक्तं क्रममुक्त्यै अंगावबद्धप्रतीकाहंग्रहाभिधं त्रिधा ।

अर्थ :- ह्या वेदांतामध्यें सकाम, निष्काम अशी अधिकारभेदाने उपासना सांगितली आहे. क्रममुक्तीकरतां अंगावबद्ध, प्रतीक व अहंग्रह नामक तीन प्रकारची उपासना आहे.

भावार्थः- सगुणोपासना क्रममुक्तीकरतां व निर्गुणोपासना सद्योमुक्तीकरतां आहे. निष्काम पुरुषास निर्गुणोपासना, उपासनेपासून ज्ञान व ज्ञानापासून सद्योमुक्ति आहे. सकाम, मुमुक्षु यास सगुणोपासना, दिव्यभोगप्राप्तिद्वारा, वैराग्य क्रमाने ज्ञान व नंतर मुक्ति आहे असा क्रम मुक्तीचा प्रकार असून त्याकरतां सगुणोपासना, अंगावबद्ध, प्रतीक व अहंग्रह अशा भेदाने तीन प्रकारची आहे. प्रतीकोपासनेस तटस्थोपासना असेही म्हणतात ।।४८।।

**सद्योमुक्त्यै तुरीयं तु जिज्ञासाख्यं समीरितम् ।**
**निर्गुणोपासनं तत्तु वक्ष्ये शिक्षान्तरेऽग्रतः ।।४९।।**

अन्वयः- तुरीयं जिज्ञासाख्यं निर्गुणोपासनं तु सद्योमुक्त्यै समीरितम् तत्तु अग्रतः शिक्षान्तरे वक्ष्ये ।

अर्थः- क्रममुक्तीकरितां सांगितलेल्या तीन उपासनांच्या अपेक्षेने

चौथी जिज्ञासा नांवाची निर्गुणोपासना सद्योमुक्तीकरितां आहे. ती पुढें वृद्धशिक्षेमध्यें सांगतो ॥४९॥

सगुणोपासनेचे स्वरूप सांगतात -

**उद्गिथादिपदार्थेषु कर्माङ्गेषु जडेषु च ।**
**ब्रह्मादिदृष्टिरङ्गावबद्धोपासनमुच्यते ॥५०॥**

अन्वयः- कर्मांगेषु च जडेषु उद्गीथादिपदार्थेषु ब्रह्मादिदृष्टिः अंगावबद्धोपासन उच्यते ।

अर्थः- कर्माचे अंगभूत व जड असलेल्या अशा उद्गीथादिपदार्थांचे ठिकाणी प्राणादिकाची भावना करणे यांस अंगावबद्धोपासना म्हणतात.

भावार्थः- नित्यादिकर्म चालूं असतांना अनायासाने ह्या उपासना करतां येतात. कोणत्या कर्माच्या कोणत्या अंगावर कोणती दृष्टि शास्त्रांनीं सांगितली आहे याचा विचार करून ती उपासना करावी. म्हणजे कर्म व उपासना दोन्हीही संभवतात. ॥५०॥

द्वितीय प्रतीकोपासना तिचे स्वरूप सांगतात -

**जडेषु कर्मानङ्गेषूक्ता नाममनआदिषु ।**
**या ब्रह्मदृष्टिर्विज्ञेयं प्रतीकोपासनं तु तत् ॥५१॥**

अन्वयः- कर्मानंगेषु जडेषु नाममनआदिषु या ब्रह्मदृष्टिः उक्ता तत् तु प्रतीकोपासनं विज्ञेयम् ।

अर्थः- कर्माचे अंगभूत नसलेले व जड असलेले अशा नाम, मन वगैरे पदार्थांचे ठिकाणी जीं ब्रह्मभावना सांगितली आहे, ती प्रतीकोपासना जाणावी ॥५१॥

**अहंग्रहाख्यं दहरवैश्वानरमुखं स्मृतम् ।**
**वैश्वानरोऽहं दहराकाशोऽहमिति तत्र च ॥५२॥**
**उदितं जीवसगुणब्रह्मध्यानमभेदतः ।**
**महाप्रयासतः साध्यं सगुणब्रह्मलब्धये ॥५३॥**

अन्वयः- दहरवैश्वानरमुखं अहंग्रहाख्यं स्मृतं, तत्र च दहराकाशोऽहं

वैश्वानरोऽहं इति जीवसगुणब्रह्मध्यानं अभेदतः उदितं (तत्) सगुणब्रह्मलब्धये महाप्रयासतः साध्यम् ।

अर्थः- दहरवैश्वानरप्रभृति उपासना अहंग्रहोपासना समजाव्यात. या अहंग्रहोपासनेमध्यें दहराकाश मी आहे, वैश्वानर मी आहे असे जिवाचे व सगुणब्रह्माचे ध्यान अभेदाने सांगितले आहे ते सगुण ब्रह्मप्राप्तीकरतां मोठ्या प्रयत्नाने करावे.

भावार्थः- विहित असलेले अभेदध्यान, अत्यंत प्रयत्नपूर्वक करावे. त्याने सगुण साक्षात्कार घडतो व क्रमाने निर्गुण साक्षात्कार होऊन मानव कृतकार्य होतो ॥५२-५३॥

अंगावबद्धोपासनेची इतिकर्तव्यता सांगतात -

**अग्निहोत्रादि यत्कर्म चोदितं कर्मकाण्डतः ।**
**कर्तव्यात्राप्यर्पणादावुद्गीथादौ च कर्मणि ॥५४॥**
**ब्रह्मदृक्प्रोक्तमङ्गावबद्धोपासनमेव तत् ।**
**ग्राह्यं गुणोपसंहारन्यायाच्छाखान्तरादपि ॥५५॥**

अन्वयः- कर्मकाण्डतः अग्निहोत्रादि यत्कर्म चोदितं अत्र अपि कर्मणि, अर्पणादौ च उद्गीथादौ ब्रह्मदृक् कर्तव्या, प्रोक्तं अंगावबद्धोपासनं एव तत् शाखान्तरादपि गुणोपसंहारन्यायात् ग्राह्यम् ।

अर्थः- कर्मकांडरूपवेदभागामध्यें जें अग्निहोत्रादिकर्म विहित आहे त्या कर्मामध्येंसुद्धां, अर्पणादिकामध्यें व उद्गीथादिकामध्यें ब्रह्मबुद्धि करावी. ही सांगितलेली उपासना अंगावबद्धोपासनाच होय. ती अन्य शाखेतूनसुद्धां, गुणोपसंहार न्यासाने ग्राह्य आहे.

भावार्थः- अग्निहोत्रादि कर्मामध्यें जे अर्पण, हविर्द्रव्य, अग्नि वगैरे पदार्थ असतात त्याचे ठिकाणीसुद्धां ब्रह्मभावना करावी. (एक कर्म असतांना भिन्नभिन्न शाखेमध्यें भिन्नभिन्न गुण सांगितलेले असतात अंगावबद्धोपासनेचे फल सांगतात अशा ठिकाणी स्वशाखेमध्यें नसलेले गुण अन्य शाखेपासून घेणे यास गुणोपसंहारन्याय म्हणतात.) या न्यायाने उपासनेमध्येंसुद्धां

गुणग्रहण करावे ॥५४॥ ॥५५॥

**प्रतिबंधकपापं तन्निवार्याप्रतिबन्धतः ।**
**उत्क्रान्त्यनन्तरं स्वर्गप्रदमाशु तदर्थिनाम् ॥५६॥**

अन्वयः- तत् तदर्थिनां प्रतिबंधक पापं निवार्य, उत्क्रान्त्यनन्तरं अप्रतिबंधतः आशु स्वर्गप्रदम् ।

अर्थः- ती अंगावबद्धोपासना स्वर्गेच्छु पुरुषांना प्रतिबंधक पापाची निवृत्ति करून प्राणोत्क्रमणानंतर प्रतिबंध नसल्यामुळे शीघ्र स्वर्ग देणारी आहे ॥५६॥

**प्रदानवदपापानां प्रददात्यधिकं फलम् ।**
**नैतदादरणीयं तदध्रुवत्वान्मुमुक्षुणा ॥५७॥**

अन्वयः- अपापानां अधिकं फलं प्रददाति प्रदानवत्, एतत् मुमुक्षुणां न आदरणीयं तदध्रुवत्वात् ।

अर्थः- तीच उपासना निष्पाप पुरुषांना स्वर्गापेक्षां अधिक असे ब्रह्मलोकादि फल देते. विशेषणभेदामुळे प्रदान जसे भिन्न होते, त्याप्रमाणे कामनारूप विशेषणभेदाने तीच उपासना भिन्न फळ देते. हे स्वर्गादि फल मुमुक्षुने स्वीकारूं नये. कारण ते अनित्य आहे.

भावार्थः- अंगावबद्धोपासना स्वर्गाच्या इच्छेने केल्यास स्वर्ग, व ब्रह्मलोकाच्या इच्छेने केल्यास ब्रह्मलोक, फल देते. स्वर्गेच्छूपेक्षां ब्रह्मलोकाची इच्छा करणारा निष्पाप समजला जातो. एकच उपासना कर्त्याच्या इच्छाविशेषणामुळे भिन्नभिन्न फळ देते, याविषयी प्रदानाचा दृष्टांत आहे. पूर्वमीमांसेमध्यें इंद्रास उद्देशून त्रिपुरोडाशइष्टि सांगितली आहे; त्यामध्यें तीन पुरोडाशांचे प्रदान एकदम करावे अथवा भिन्नभिन्न करावे, असा संशय निर्माण करून इंद्रास राजा, अधिराजा व स्वराजा अशीं विशेषणे भिन्न असल्यामुळे प्रदान भिन्न करावे असा सिद्धांत केला आहे. यावरून इंद्रविशेषणभेदामुळे प्रदानभेद सिद्ध होतो. यांप्रमाणे कर्त्याच्या इच्छारूप विशेषणभेदाने उपासनेचे फळ भिन्नभिन्न होते असा फलाविषयीं सिद्धांत

आहे. तथापि स्वर्ग, ब्रह्मलोकादि फल अनित्य असल्यामुळे मुमुक्षूने त्या फलाच्या इच्छेने उपासना करू नये ।।५७।।

उपासना कशी करावी ते सांगतात-

**तत्तु प्रमाणबलतो धीशुद्धिद्वारतोऽचिरात् ।**
**इहैव मोक्षसिद्ध्यर्थं कर्तव्यं परमादरात् ।।५८।।**

अन्वयः- तत्तु इहैव अचिरात् मोक्षसिद्ध्यर्थं परमादरात् कर्तव्यं धीशुद्धिद्वारतः (अस्य मोक्ष फलं) प्रमाणबलतः।

अर्थः- ती उपासना ह्या जन्मामध्येंच सत्वर मोक्षसिद्धीकरितां अत्यंत आदराने करावी. बुद्धिशुद्धिद्वारा या उपासनेचे मोक्षफल प्रमाणाने सिद्ध आहे.

भावार्थः- मोक्षार्थ आदराने उपासना करू लागल्यास चित्तांतील राग द्वेषादि दोष नष्ट होऊन चित्त शुद्ध व ब्रह्मविचारसमर्थ होते. विचाराने ज्ञान व ज्ञानाने मोक्ष या क्रमाने उपासना मोक्षदायक आहे ।।५८।।

उपासनेचे मोक्षफल आहे याविषयी प्रमाण दाखवितात -

**ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणाहुतम् ।**
**इति वाक्यबलाद्ब्रह्माप्तिस्तद्दृष्ट्येह नापरा ।।५९।।**

अन्वयः- ब्रह्मार्पणं, ब्रह्म हविः ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतं.. इति वाक्यबलात् इह तदृष्ट्या ब्रह्माप्तिः नापरा ।

अर्थः- ब्रह्मार्पण.. इत्यादि गीतावाक्यावरून, ब्रह्मदृष्टीने केलेल्या उपासनेचे ब्रह्मरूप मोक्षाचीच प्राप्ति होते; अन्य फल नाही हे सिद्ध होते ।।५९।।

प्रतीकोपासनेचे फल सांगतात.

**प्रतीकोपासनेनापि निष्कामस्येह शुद्धितः ।**
**मुक्तिर्वा महराद्याप्तिप्रतीकेति सूत्रतः ।।६०।।**

अन्वयः- निष्कामस्य प्रतीकोपासनेन अपि इह शुद्धितः मुक्तिः (सकामस्य) वा महराद्याप्तिः अप्रतीकेति सूत्रतः।

अर्थः- निष्काम ज्ञानेच्छूस प्रतीकोपासनेने सुद्धां ह्या जन्मामध्यें शुद्धिद्वारा मुक्ति (पूर्वोक्त प्रकाराने) प्राप्त होते अथवा सकामपुरुषास महरादिक लोकाची प्राप्ति अप्रतीकालंबनान्नयति. इत्यादि व्याससूत्राने सिद्ध आहे.

भावार्थः- सकाम पुरुषाने प्रतीकोपासना केल्यास महरादि लोकप्राप्ति फल आहे व तीच ज्ञानोद्देशाने केल्यास, चित्तशुद्धि, विचारसामर्थ्य, ज्ञान अशा क्रमाने मुक्तीस कारण आहे. प्रतीकोपासनेचे महरादिलोकप्राप्ति हे फल अप्रतीकालंबनान्नयति. या सूत्रामध्यें सिद्ध केले आहे. ॥६०॥

**गुणभेदश्रुतेः शाखाभेदेनैक्यं विधीयते ।**
**सजातीयोपासनस्य नानाशाखागतस्य तु ॥६१॥**
**एकत्वाद्ब्रह्मलोकाप्तिफलस्यातो विशेषतः ।**
**ग्राह्या गुणोपसंहाराद्गुर्वनुग्रहतो गुणाः ॥६२॥**

अन्वयः- शाखाभेदेन गुणभेदश्रुतेः नानाशाखागतस्य जातीयोपासनस्य तु (भेदे प्राप्ते) ब्रह्मलोकाप्तिफलस्य एकत्वात् ऐक्यं विधीयते अतो विशेषतः गुणोपसंहारात् गुर्वनुग्रहतः गुणाः ग्राह्याः।

अर्थः- शाखाभेदाने भिन्न भिन्न गुणांचे श्रवण असल्यामुळे नाना शाखेमध्यें असलेल्या सजातीय उपासनेचाहि भेद प्राप्त होत असतांना ब्रह्मलोकप्राप्ति हे फल एक असल्यामुळे ऐक्य सांगितले आहे. ऐक्यरूप विशेषणामुळे गुणोपसंहारन्यायाने व गुरूंच्या अनुग्रहाने अन्यशाखीय गुणांचा स्वीकार करावा.

भावार्थः- सजातीय उपासनेमध्यें भिन्न भिन्न गुण प्रतिपादन केले असल्यामुळे उपासनाभेद प्राप्त होतो, अशी शंका करून फल, स्वरूप, प्रयत्न व संज्ञा एक असल्यामुळे उपासना एकच आहे, असा सिद्धांत केला आहे. त्यामुळे गुणोपसंहारन्याय प्राप्त होतो म्हणून अन्यशाखीय गुणांचा संग्रह करावा व तो गुरूंच्या अनुग्रहाने करावा म्हणजे सुलभ व निश्चित ज्ञान होते ॥६१-६२॥

**श्रद्धयैवं मानसाग्निचयनादेरिहाऽऽमृतेः ।**
**उक्तवद्ध्यायतो नित्यं ब्रह्मलोकगतिः क्रमात् ॥६३॥**

अन्वयः- एवं उक्तवत् श्रद्धया इह आमृतेः मानसाग्निचयनादेः नित्यं ध्यायतः क्रमात् ब्रह्मलोकगतिः।

अर्थः- या सांगितलेल्या प्रकाराने श्रद्धेने इहजन्मांत आमरणांत मानस अग्निचयनाचे प्रत्येक दिवशीं ध्यान करणाऱ्यास उत्तरायण मार्ग क्रमाने ब्रह्मलोकप्राप्ति होते.

भावार्थः- श्रद्धेने निरंतर मानस अग्निपूजनाचे ध्यानरूप उपासनेनेही ब्रह्मलोकप्राप्ति फल आहे ।।६३।।

सर्व उपासना कराव्यात किंवा एकच उपासना करावी याविषयीं व्यवस्था सांगतात-

**भूमवैश्वानरादीनां मध्यादेकतमाऽऽमृति ।**
**ग्राह्योपास्तिस्तु काम्यानां यथाकामं समुच्चयः ।।६४।।**

अन्वयः- भूमवैश्वानरादीनां मध्यात् एकतमा उपास्तिः आमृति ग्राह्या, काम्यानां तु यथाकामं समुच्चयः।

अर्थः- भूम, वैश्वानर प्रभृति उपासनेमध्यें कोणतीही एक उपासना आमरणांत स्वीकारावी. काम्य उपासनेमध्यें आपल्या इच्छेप्रमाणे कितीही स्वीकाराव्यांत.

भावार्थः- ईश्वरप्राप्ति फलाकरतां असणाऱ्या उपासनामध्यें एकच स्वीकारावी. एकापासून ईश्वरसाक्षात्कार होत असल्यामुळे दुसरी व्यर्थ व चित्तविक्षेपासच कारण होते. आपल्या कामनेस अनुसरून काम्योपासना अनेकही करतां येतात; यांत साक्षात्काराचा संबंध नसून अदृष्टद्वारा फलप्राप्ति होत असते ।।६४।।

अहंग्रहोपासनेचे फल सांगतात.

**देहं कालवशात्त्यक्त्वा ध्येयाकार उपासकः ।**
**मुक्त्वा पुण्येतरेऽतीत्य विरजानामकां नदीम् ।।६५।।**
**यात्यमानवनीतोऽसौ पुनरावृत्तिवर्जितः ।**
**अहंग्रहोपासकस्तु ब्रह्मलोकं स्वलङ्कृतः ।।६६।।**

अन्वयः- अहंग्रहोपासकः ध्येयाकारः उपासकः तु कालवशात् देहं त्यक्त्वा, पुण्येतरे मुक्त्वा, विरजानामिकां नदीं अतीत्य, स्वलंकृतः असौ अमानवनीतः पुनरावृत्तिवर्जितः ब्रह्मलोकं याति ।

अर्थः- अहंग्रहोपासना करणारा (उपासना सामर्थ्याने) सगुण ब्रह्मरूप झालेला उपासक, कालवशतेमुळे या देहास सोडून, पुण्यपापांचा त्याग करून, विरजानदीचे अतिक्रमण करून, अलंकृत झालेला हा, अमानव पुरुषाकडून पोंहचविला जाणारा, पुनरावृत्तिरहित असा होत्साता ब्रह्मलोकास जातो.

भावार्थः- 'मनोमयः प्राणशरीरः' इत्यादि वाक्यांनी ईश्वरप्राप्त्यर्थ सांगितलेल्या अहंग्रहोपासनेच्या सामर्थ्याने उपासक ध्येयाकार होतो. कालवशात् देहाचा त्याग व त्याबरोबर उपासनाफलाविरूद्ध असलेल्या पुण्यपापकर्माचा त्याग करून विरजानदीचे अतिक्रमण करतो. अलंकृत अशा त्या पुरुषास अमानव पुरुष ब्रह्मलोकास नेतो ॥६५-६६॥

ब्रह्मलोकाचे व तेथील भोगाचे वर्णन करितात-

**यत्रापराजितपुरं हिरण्यमयगृहाणि च ।**
**अश्वत्थः सोमसवनः सर ऐरंमदीयकम् ॥६७॥**
**अनन्याधिपतिस्तत्र सङ्कल्पादेव कामितान् ।**
**विषयान् स्थूलदेहेन कदाचित्सूक्ष्मदेहतः ॥६८॥**

अन्वयः- यत्र अपराजितपुरं, हिरण्मयगृहाणि, सोमसवनः अश्वत्थः, च ऐरंमदीयकं सरः (अस्ति) तत्र अनन्याधिपतिः (सन्) संकल्पादेव कामितान् विषयान् स्थूलदेहेन, कदाचित् सूक्ष्मदेहतः (भुंक्ते)।

अर्थः- ज्या ब्रह्मलोकामध्यें इतरापासून पराजित न होणारे नगर, सुवर्णाची घरे, अमृतस्राव करणारा अश्वत्थवृक्ष, ऐरंमदीय नांवाचे सरोवर आहे. ज्या सरोवराचे जल अन्नाप्रमाणे असून हर्ष निर्माण करणारे आहे. त्या ब्रह्मलोकामध्यें अन्य अधिपतिरहित असा होत्साता संकल्पाने निर्माण केलेल्या इष्ट विषयांचा, कदाचित् स्थूलदेहाने उपभोग घेतो ॥६७-६८॥

**एकधानेकधा वाऽपि भूत्वाऽप्रतिहतौजसा ।**
**हिरण्यगर्भवद्भोगान् भुञ्जानः सोऽवतिष्ठते ।।६९।।**

अन्वयः- सः अप्रतिहतौजसा एकधा वा अनेकधा अपि भूत्वा हिरण्यगर्भवत् भोगान् भुंजानः अवतिष्ठते ।

अर्थः- तो उपासक अकुंठित सामर्थ्याने एक प्रकारचे अथवा अनेक प्रकारची शरीरे धारण करून हिरण्यगर्भाप्रमाणे दिव्य भोगांचा उपभोग घेत राहतो. योग्याप्रमाणे एकदम नाना शरीरांनींसुद्धां उपभोग घेतो ।।६९।।

**सर्वानन्दास्पदब्रह्मलोकानन्दभुगेव सः ।**
**महाकल्पे ब्रह्मलोके प्रणष्टे ब्रह्मणा सह ।।७०।।**
**पुनरावृत्तिरहितो ब्रह्मभूयाय कल्पते ।**
**अविभागेन स ब्रह्मभावं यास्यत्युपासनात् ।।७१।।**

अन्वयः- पुनरावृत्तिरहितः सः उपासनात् सर्वानंदास्पद-ब्रह्मलोकानंदभुक् एव ब्रह्मभूयाय कल्पते; सः महाकल्पे ब्रह्मलोके प्रणष्टे ब्रह्मणा सह अविभागेन ब्रह्मभावं यास्यति ।

अर्थः- पुनरावृत्तिरहित असा तो उपासक उपासना-सामर्थ्यामुळे सर्व आनंदास आश्रय असलेल्या ब्रह्मलोकाचा आनंद उपभोगणाराच ब्रह्म होण्यास समर्थ होतो; अर्थात् ज्ञानसंपन्न होतो व तो महाप्रलयामध्यें ब्रह्मलोक नष्ट झाला असतां हिरण्यगर्भासह एकरसाने ब्रह्मरूपास प्राप्त होतो. अखंड-एकरस ब्रह्मस्वरूप होतो ।।७०-७१।।

**एवं ह्यहंग्रहोपास्तिफलं परमदुर्लभम् ।**
**महानुग्रहतो यत्नात्साधनीयं मनीषिणा ।।७२।।**

अन्वयः- एवं हि परमदुर्लभं अहंग्रहोपास्तिफलं मनीषिणा महानुग्रहतः यत्नात् साधनीयम् ।

अर्थः- असे हे अत्यंत दुर्लभ अहंग्रहोपासनेचे फल बुद्धिमान् पुरुषाने सज्जनांच्या अनुग्रहाने उपासना मिळवून यत्नपूर्वक अनुष्ठानाने संपादन करावे ।।७२।।

**यथोपास्यकस्येयं गती रश्म्यनुसारिणः ।**
**सुषुम्णया सदान्येषां सा तु स्वप्नेऽपि दुर्लभा ।।७३।।**

अन्वयः- सदा उपासकस्य अस्य रश्म्यनुसारिणः यथा सुषुम्णया इयं गतिः सा तु अन्येषां स्वप्ने अपि दुर्लभा ।

अर्थः- निरंतर उपासना करणारा पुरुष उत्क्रमणकाली सूर्य किरणांनी वर जातो अशा रीतीने रश्मीस अनुसरणाऱ्या ह्या उपासकास जशी सुषुम्ना मार्गाने, ही ब्रह्मलोकप्राप्ति होते, ती अन्यास स्वप्नामध्येंसुद्धां दुर्लभ आहे.

भावार्थः- अहंग्रहोपासकास सुषुम्नानाडीद्वारा उत्क्रमण होऊन रश्मिद्वारा ब्रह्मलोकगति प्राप्त होते. ही ब्रह्मलोकस्थिति अन्य उपासकास मिळत नाही ।।७३।।

**आदित्यादिमण्डलाप्तिप्रदमध्वादिविद्यया ।**
**तत्तल्लोकफलाप्त्यन्ते परत्र गतिरुच्यते ।।७४।।**

अन्वयः- आदित्यादिमंडलाप्तिप्रदमध्वादिविद्यया तत् तत् लोकफलाप्त्यन्ते परत्र गतिः उच्यते ।

अर्थः- सूर्यादि लोक प्राप्त करून देणाऱ्या मधुप्रभृति उपासना केल्याने त्या त्या लोकाची प्राप्ति होते व तेथील भोग संपल्यानंतर पुढील गति सांगितली आहे.

भावार्थः- वैराग्यरहित पुरुषाने पारलौकिक फलांकरतां काम्य उपासना कराव्यात. त्या उपासनेपासून सूर्यादि लोकांची प्राप्ति होते व क्रमाने ब्रह्मलैंकादि गति प्राप्त होते ।।७४।।

**एवं श्रौतोपासनानि मीमांसाद्वितयस्य च ।**
**संमतानि तु वामाख्योपासनानि न सन्ति हि ।।७५।।**

अन्वय :- एवं मीमांसाद्वितयस्य श्रौतोपासनानि संमतानि च वामाख्योपासनानि न सन्ति हि ।

अर्थ :- याप्रमाणे पूर्वोत्तरमीमांसेत श्रुत्युक्त उपासना कर्तव्य म्हणून

मान्य आहेत. आणि वाममार्गाच्या उपासना मान्य नाहीत हे प्रसिद्ध आहे म्हणून त्या करूं नयेत ॥७५॥

**मद्यभक्षादिवामाद्यागमस्य तु न मानता ।**
**मीमांसाद्वितये सर्वशिष्टैश्च तदनादरात् ॥७६॥**

अन्वयः- मीमांसद्वितये तदनादरात् च सर्वशिष्टैः मद्यभक्षादिवामाद्या गमस्य (धर्मे) न तु मानता ।

अर्थः- पूर्व व उत्तर मीमांसेमध्यें वामागमादिकाचा अनादर केला असल्यामुळे व सर्व शिष्टांनीहि अनादर केला असल्यामुळे मद्यसेवनादिविधायक (सांगणाऱ्या) वामादि आगमास धर्माविषयी प्रामाण्य नाही ॥७६॥

**मद्यादियुग्राजसार्चाधिकारो ब्राह्मणस्य न ।**
**सुरामद्याशने देहान्तप्रायश्चित्तकीर्तनात् ॥७७॥**

अन्वयः- सुरामद्याशने देहांतप्रायश्चित्तकीर्तनात् ब्राह्मणस्य मद्यादियुग्राजसार्चाधिकारः न ।

अर्थः- पैष्ट्यादिसुरा व तालादिजमद्य अशा सुरामद्यादिकांचे सेवन केले असतां देहांत प्रायश्चित्त सांगितले असल्यामुळे ब्राह्मणास मद्यादिसेवनयुक्त राजस पूजेचा अधिकार नाही ॥७७॥

**स्पर्शे तदङ्गच्छेदोक्तेर्दोषानपगमोक्तितः ।**
**कृच्छ्राद्यनुष्ठानतोऽपि पातित्यं शिष्टसंमतम् ॥७८॥**

अन्वय :- स्पर्शे तदंगछेदोक्तेः कृच्छ्राद्यनुष्ठानतः अपि
दोषानपगमोक्तितः पातित्यं शिष्टसंमतम् ।

अर्थ :- मद्यादिकास स्पर्श केला असतां स्पृष्ट अवयवाचा छेद करावा असे सांगितले असल्यामुळे व कृच्छ्रादि प्रायश्चित्त करण्यानेही दोषनिवृत्ति होत नाही असे सांगितले असल्यामुळे व (आमरणांत) पातित्य शिष्टसंमत आहे असे असल्यामुळे ब्राह्मणाने वामोपासना करूं नये ॥७८॥

**रहोऽन्यथाचारिणोऽपि नवीना भास्करादयः ।**
**ब्राह्मण्याद्दुर्विधेर्भ्रष्टोऽभवं माऽन्ये भवन्त्विति ॥७९॥**

**सभायां भूतदयया प्रशंसति स्म शिष्टवत् ।**
**परिष्कुर्वन्ति स्म पूर्वग्रन्थानुसृतितः स्वयम् ।।८०।।**

अन्वयः- भास्करादयः नवीनाः, रहः अन्यथाचारिणः अपि दुर्विधेः ब्राह्मण्याद्भ्रष्टः अभवं अन्ये मा भवन्तु इति भूतदयया सभायां शिष्टवत् प्रशंसति स्म, स्वयं पूर्वग्रंथानुसृतितः परिष्कुर्वन्ति स्म ।

अर्थः- भास्करराय प्रभृति नवीन लोक, एकांतामध्यें वामाचार करणारेही, दुर्दैवामुळे ब्राह्मण्यापासून आपण भ्रष्ट झालों; तथापि अन्य भ्रष्ट होऊं नयेत अशा भूतदयेने सभेमध्यें शिष्टाप्रमाणे श्रुतिप्रामाण्याची व आगमाच्या अप्रामाण्याची प्रशंसा करतात व स्वतः पूर्वग्रंथांना अनुसरून श्रौत उपासनेचे व्यवस्थित प्रतिपादन करतात व वाममार्गाची निंदाही करतात।।७९-८०।।

**स धर्मबुद्ध्यान्धपरम्परया तमसागतः ।**
**धर्माभासस्तिरस्कार्य उभयभ्रंशकृद्यतः ।।८१।।**

अन्वयः- सः तमसा धर्मबुद्ध्या आगतः अंधपरंपरया (प्रवृत्तः) धर्माभासः उभयभ्रंशकृत् यतः (अतः) तिरस्कार्यः।

अर्थः- तो वाममार्ग अज्ञानामुळे धर्मबुद्धीने स्वीकारला गेला; तसाच अंधपरंपरेने प्रवृत्त झालेला तो धर्माभास आहे. ऐहिक व पारत्रिक फलाचा नाश करणारा असल्यामुळे त्याचा आदर करूं नये ।।८१।।

मीमांसा अनादृत वाममार्गाप्रमाणे मीमांसा अनुक्त प्रतिमोपासनाही अग्राह्य अशा शंकेचा परिहार करतात-

**मीमांसद्वय्यनुक्तापि पुराणस्मृतिसंमता ।**
**शिष्टादृतेशप्रतिमोपासनोभयसिद्धिदा ।।८२।।**

अन्वयः- मीमांसाद्वय्यनुक्ता अपि ईशप्रतिमोपासना पुराणस्मृति-संमता शिष्टादृता उभयसिद्धिदा (अस्ति अतः ग्राह्या)।

अर्थः- पूर्वमीमांसेमध्यें सांगितली नसतांही ईश्वर प्रतिमेची उपासना पुराणास व स्मृतीस मान्य आहे; शिष्टांनी स्वीकारलेली आहे व ऐहिक

पारत्रिक सिद्धीस देणारी आहे म्हणून ग्राह्य आहे ॥८२॥

**यतो विशेषान्मन्दानां तपःपूजातिशायनात् ।**
**बिम्बाभिरूप्यात्सान्निममूर्तोऽपीश ऋच्छति ॥८३॥**

अन्वयः- अमूर्तः अपि ईशः (प्रतिमायां) तपःपूजाति-शायनात्, बिम्बाभिरूप्यात् सान्निध्यं ऋच्छति, यतः मंदानां विशेषात् (विहिता)।

अर्थः- निराकारही ईश्वर, प्रतिमेमध्यें पूजकाच्या तपश्चर्येमुळे, पूजाविशेषामुळे, प्रतिमासौंदर्यामुळे सान्निध्यास प्राप्त होतो म्हणून अल्पबुद्धि पुरुषांना विशेषेंकरून प्रतिमोपासना विहित आहे ॥८३॥

**ततो वशीकृते चित्ते सगुणब्रह्मशीलनात् ।**
**निरुपाधिकमेवाविर्भवेद्ब्रम्हेडनुग्रहात् ॥८४॥**

अन्वयः- ततः सगुणब्रह्मशीलनात् चित्ते वशीकृते ईडनुग्रहात् एवं निरुपाधिकं ब्रह्म आविर्भवेत् ।

अर्थ :- त्या सगुणब्रह्मोपासनेपासून चित्त स्वाधीन झाले असतां ईश्वरानुग्रहानेच निर्गुण सच्चिदानंद ब्रह्म (उपासकाच्या चित्तामध्यें ) आविर्भूत होते; निर्गुण साक्षात्कार होतो ॥८४॥

**मन्देनापि विरागेण जन्ममृत्युभयादव ।**
**मामीशेति प्रपन्नानामर्चकानां स मोक्षदः ॥८५॥**

अन्वयः- हे ईश मां जन्ममृत्युभयात् अव इति प्रपन्नानां मंदेन अपि विरागेण (युक्तानां) अर्चकानां सः मोक्षदः।

अर्थः- हे परमेश्वरा, माझें जन्ममृत्युरूप संसारभयापासून रक्षण कर अशी प्रार्थना करून शरण आलेल्या, मंदवैराग्यानेही युक्त असलेल्या भक्तांना तो भगवान् मोक्ष देतो.

भावार्थः- परमेश्वर अत्यंत दयाळू व भक्तवत्सल आहे. त्याची संसारदुःखातून मुक्त होण्याकरतां नित्य प्रार्थना करावी. त्यालाच शरण जावे, त्याचेच अर्चन करावे. त्याने भगवान् संतुष्ट होऊन वैराग्यादि साधने अल्प असतांनाही ज्ञान निर्माण करून मोक्ष देतो ॥८५॥

याप्रमाणे प्रतिमापूजन प्रमाणसिद्ध व सफल असतांना प्रतिमार्चन करूं नये; असे नवीनांचे मत त्याज्य आहे असे सांगतात.

**नेशस्य प्रतिमार्च्यैवं नवीनाः केऽपि निर्दयाः ।**

**प्रजल्पन्ति श्वभषितसोदरीभूतमेव तत् ॥८६॥**

अन्वयः- ईशस्य प्रतिमा अर्च्या न, एवं निर्दयाः केपि नवीनाः प्रजल्पन्ति, तत् श्वभषितसोदरीभूतं एव।

अर्थः- ईश्वराची प्रतिमा पूजनीय नाही, असे कांही निर्दय नवीन लोक म्हणतात. त्यांचे ते म्हणणे श्वानशब्दसदृशच आहे. अर्थात् निष्प्रमाण आहे ॥८६॥

प्रतिमापूजनाविषयीं प्रमाण पूर्वीच दाखविले आहे असे सांगतात-

**प्राग्देवताधिकरणन्यायावष्टम्भतस्त्विदम् ।**

**उक्तं पुनरुपन्यासो नेह तस्य प्रतन्यते ॥८७॥**

अन्वयः- इदं तु देवताधिकरणन्यायावष्टंभतः प्राक् उक्तं, इह तस्य उपन्यासः पुनः न प्रतन्यते ।

अर्थः- हे प्रतिमापूजन देवताधिकरणन्यायबलाने पूर्वीच सप्रमाण आहे, असे सांगितले आहे. येथें त्याचे कथन पुनः करीत नाही.

भावार्थः- देवताधिकरणामध्यें देवतेस शरीर आहे असे वेद प्रामाण्या वरून सिद्ध केले आहे. स्मृत्यादिकामध्यें प्रतिमेचे पूजन सांगितले आहे व त्याप्रमाणे फलाचा अनुभवही आहे ॥८७॥

**सगुणेशार्चया रामदासाद्या अधुनातनाः ।**

**अत एवाभवञ्शाब्दपरब्रह्मपरायणाः ॥८८॥**

अन्वयः- अत एव अधुनातना रामदासाद्याः सगुणेशार्चया शाब्दपरब्रह्मपरायणाः अभवन् ।

अर्थः- प्रतिमापूजन सप्रमाण असल्यामुळेच अर्वाचीन श्रीसमर्थ रामदासप्रभृति सत्पुरुष, श्रीरामचंद्रादिकांच्या प्रतिमा-पूजनाने परब्रह्माच्या शाब्दज्ञानामध्यें व अपरोक्षसाक्षात्कारामध्यें निष्णात झाले आहेत (हे प्रतिमा पूजनाचे फल) ॥८८॥

श्रीनारायणस्वामींच्या चरित्रावरूनही प्रतिमापूजन सफल असल्याचे सिद्ध होते म्हणून त्यांचे चरित्र संक्षेपतः सांगतात-

**कृष्णापञ्चनदीयोगेऽभ्यर्च्य श्रीदत्तपादुके ।**

**भक्त्या नारायणस्वामी जीवन्मुक्तोऽधुनाऽभवत् ।।८९।।**

अन्वयः- अधुना नारायणस्वामी कृष्णापंचनदीयोगे श्रीदत्तपादुके भक्त्या अभ्यर्च्य जीवन्मुक्तः अभवत् ।

अर्थः- श्रीरामदासादिकांपेक्षांही अर्वाचीन कालामध्यें श्रीनारायणस्वामी कृष्णापंचगंगा संगमावर असलेल्या नृसिंहवाडी क्षेत्रामध्यें श्रीदत्तपादुकांचे भक्तीने अर्चन करून जीवन्मुक्त झाले. (जिवंत असून विषयजन्य सुखदुःखाचा संबंध नसणे यास जीवन्मुक्त म्हणतात)

भावार्थः- नारायणस्वामी हे पूर्वाश्रमीं विसापूर ग्रामामध्यें राहणारे गार्ग्य देशस्थ ब्राह्मण. विद्याध्ययन व सदाचारसंपन्न असून त्या प्रांतांमध्यें विद्वन्मान्य होते. त्यांची प्रथम भार्या अल्पकांळातच परधामास गेली. नंतर तारळे येथील रामदीक्षित यांचे कन्येबरोबर विवाह होऊन त्यांना विश्वंभर नांवाचा पुत्रही झाला. अशा गृहस्थाश्रम-सुखामध्यें असताना ते एकदा पुण्यास विद्वत्सभेस गेले. तेथें वादामध्यें त्यांचा पराभव होऊन विषण्णता प्राप्त झाली. त्यामुळे यापुढें वादामध्यें आपला पराभव होऊं नये म्हणून अधिक विद्यासंपादनार्थ गृहादिकाचा परित्याग करून त्यांनी काशीस प्रयाण केले. तेथें उत्तम गुरूंचा लाभ होऊन ते विद्येमध्यें पूर्ण निष्णात झाले. गुरूंनी मागितलेली, दुसऱ्याबरोबर वाद करूं नये अशी गुरुदक्षिणा देऊन गुरूंचा शुभाशिर्वाद घेऊन ते ग्रामास प्राप्त झाले. पुढें त्यांना दोन कन्या झाल्या व नंतर त्यांच्या पत्नीने ऐहिकयात्रा संपविली. त्या वेळी विश्वंभरास पुण्यास अध्ययनाकरतां ठेवून दोन मुली बरोबर घेऊन ते कोल्हापुरास आले. तेथें भगवद्भजनाने देवीस संतुष्ट करून, ‘श्रीदत्तमहाराज तुझी इच्छा पूर्ण करतील’ असा देवीचा वर संपादन करून वाडीस आले व सर्व प्रकाराने श्रीदत्ताच्या अर्चनास सुरूवात केली ।।८९।।

**पुत्र्यावादाय विधुरः कारनाटकदेशतः ।**
**नृसिंहवाटिकाक्षेत्रमेत्यार्चनपरोऽभवत् ॥१०॥**

अन्वय :- (सः) विधुरः पुत्र्यौ आदाय, कारनाटकदेशतः नृसिंहवाटिकाक्षेत्रं एत्य, अर्चनपरः अभवत् ।

अर्थ :- ते पत्नीरहित नारायणस्वामी आपल्या दोन मुली बरोबर घेऊन कर्नाटक देशांतून नृसिंहवाडीस येऊन श्रीदत्तार्चनतत्पर झाले. निरंतर चिंतन करूं लागले ॥१०॥

**कर्तुं स्वदासस्य वचो गरिष्ठः शेषस्य सत्यं प्रणिधानतुष्टः ।**
**ईशः प्रसन्नोऽभवदल्पबुद्धिप्रार्थ्यस्ततोऽस्यास समाधिसिद्धिः॥११॥**

अन्वय :- प्रणिधानतुष्टः गरिष्ठः, स्वदासस्य शेषस्य वचः सत्यं कर्तुं, अल्पबुद्धिप्रार्थ्यः ईशः प्रसन्नः अभवत्, ततः अस्य समाधिसिद्धिः आस।

अर्थः- नारायणस्वामींच्या निरंतर चिंतनाने संतुष्ट झालेला सर्व चराचरगुरु, आपला दास शेषावतार जो पतंजलि याचे वचन सत्य करण्याकरतां, अल्पबुद्धि पुरुषासही प्रार्थनेने वश होणारा भगवान् श्रीदत्तात्रेय नारायणस्वामीस प्रसन्न झाला, त्यामुळे यांना समाधिसिद्धि प्राप्त झाली.

भावार्थ :- 'ईश्वरप्रणिधानाद्वा' हे पतंजलीचे वचन सत्य करण्याकरतां भगवान् श्रीदत्तात्रेयाने यांचेवर अनुग्रह केला, त्यामुळे समाधिसिद्धि झाली. ईश्वर निरंतर चिंतनाने संतुष्ट होऊन अनुग्रह करतो व अनुग्रहाने समाधिसिद्धि होते ॥११॥

ईश्वराचे भक्तवात्सल्य सांगतात -

**अप्रत्तपुत्र्यौ निशि पाययित्वा स्वयं यवागूमथ शाययित्वा ।**
**समाहितस्ते अथ मेहनाय बुद्धे प्रभुः प्राप तदाऽवनाय ॥१२॥**

अन्वयः- निशि अप्रत्तपुत्र्यौ यवागूं पाययित्वा, शाययित्वा अथ स्वयं समाहितः, अथ ते मेहनाय बुद्धे, तदा प्रभुः अवनाय प्राप ।

अर्थः- एकदा रात्रीचे वेळी अविवाहित अशा दोन मुलींस पेज पाजवून व निजवून स्वतः नारायणस्वामी समाधियुक्त झाले. नंतर त्या मुली

शौचाकरतां जागृत झाल्या. त्या वेळी भगवान् त्यांचे रक्षण करण्याकरतां प्राप्त झाले ।।९२।।

**नारायणोऽपि स्वयमेव भूत्वा नारायणोऽन्यस्तनये गृहीत्वा ।**
**स्वयंप्रदीपोऽपि धृतप्रदीपो नीत्वा बहिस्ते जनधीप्रदीपः ।।९३।।**
**कृतोत्सृती ते विमले विधाय निधाय वेश्माप्यररं पिधाय ।**
**नारायणो व्युत्थित एति यावन्नारायणोऽद्वैत इवास तावत् ।।९४।।**

अन्वयः- स्वयं एव नारायणोपि, अन्यः नारायणः भूत्वा, ते तनये गृहीत्वा, जनधीप्रदीपः, स्वयंप्रदीपः अपि धृतप्रदीपः, ते बहिः नीत्वा, कृतोत्सृती ते विमले विधाय, वेश्म निधाय, अररं अपि पिधाय व्युत्थितः नारायणः यावत् एति तावत् नारायणः अद्वैत इव आस ।

अर्थः- स्वतः हा नारायण असूनही नारायणस्वामी होऊन त्या मुलींना घेऊन, सर्व जनांच्या बुद्धीस प्रकाशित करणारा, स्वयंप्रकाश असूनही दीप धारण करणारा भगवान्, त्यांना बाहेर नेऊन, शौचविधी केलेल्या मुलींना निर्मल करून, गृहामध्यें शय्येवर निजवून, द्वारही लावून, समाधीतून उठून जोंपर्यंत नारायणस्वामी येतात तोपर्यंत भगवान् अद्वितीय असल्याप्रमाणे झाले. द्वितीयरूप अंतर्हित केले.

भावार्थः- नारायणस्वामी समाधीमध्यें असतांना त्यांच्या मुलीचे प्रक्षालनादि कार्यसुद्धां भगवंताने त्यांचे रूप धारण करून केले व ते समाधीतून व्युत्थित झाले असतां आपण गुप्त झाले. भक्ताच्या समाधीचा भंग होऊं नये व त्याच्या मुलीचे रक्षण व्हावे म्हणून भक्तवत्सल भगवंताने असे निंद्य कर्मही केले. षड्गुणैश्वर्यसंपन्न प्रभूचे केवढें हे वात्सल्य ! भक्ताचे कोणतेही कार्य असो, त्या करतां कोणतेही रूप धारण करावे लागो, त्याविषयीं भगवान् नेहमीं जागरूक असतात. म्हणून सर्वांनी सर्वदा भगवंताचे चिंतन करावे ।।९३-९४।।

**ज्ञात्वाथ तद्गर्ह्यमुभे स्वजाते दत्वा द्विजाभ्यां विधिनैव जाते ।**
**तस्मिन् विरक्ते प्रददौ च तस्मै स प्रैषदण्डाद्यपरोऽपरस्मै ।।९५।।**

अन्वयः- अथ च तद्गर्ह्यं ज्ञात्वा, उभे स्वजाते द्विजाभ्यां विधिना एव दत्वा, तस्मिन् विरक्ते जाते, तस्मै अपरस्मै, अपरः सः प्रैषदंडादि अददौ ।

अर्थः- नंतर ते निंद्यकर्म (मुलीच्या मुखाने) जाणून स्वतःच्या मुली ब्राह्मणांला ब्राह्मविधीने देऊन, ते विरक्त झाले असतां त्या नारायणस्वामींना सर्वश्रेष्ठ भगवान् (एकांतामध्यें) संन्यासाश्रम देते झाले.

भावार्थः- प्रक्षालादि कर्म आपणच केले असे मुलीनी सांगितले असतां हे कर्म प्रभूनेच केले असे त्यांना निश्चित समजले. अशी सेवा प्रभूकडून घेणे सर्वथा अयोग्य असे जाणून त्यांनी आपली एक कन्या सोळांकूर येथील ब्राह्मणास व दुसरी कापशी येथील ब्राह्मणास दिली, तो वंश अद्यापि आहे. याप्रमाणे कन्यांचे दान करून आपल्या पुत्राचाही विवाह करून ते सर्व संसार कार्यापासून विरक्त झाले. नंतर दत्तप्रभुसन्निध, आपणास संन्यासाश्रम मिळावा अशी अनन्याभावाने प्रार्थना केली. त्याच दिवशी रात्री स्वप्नामध्यें दत्तप्रभूने मुहूर्त पाहून संन्यास देतो असे सांगितले. याप्रमाणे कांही दिवस गेल्यानंतर मुहूर्त जवळ आहे, सर्व संसाराची व्यवस्था करून तयार असावे असे प्रभूंनी सांगितले. त्याप्रमाणे सर्व तयारी करून मार्गप्रतीक्षा करीत असतां नित्याप्रमाणे संगमास स्नानाकरतां गेले असतां प्रवाहांत उतरून स्नान करणार इतक्यांत पाय घसरून आंतच गेले. आंत गेल्यानंतर एक दिव्य मंदीर, त्यामध्यें वेद पाठ करणारे ब्राह्मण व विलक्षण तेजस्वी असे यतिसम्राट् त्यांना दिसले. ते पाहून त्यांना आश्चर्य वाटले. नमस्कार करून पाहतात तो त्यांना हे दत्तमहाराज आहेत असे समजले. हे अघटित काय आहे असा अत्यंत विनयाने प्रश्न केला. दत्तमहाराजांनी,'तुला आश्रम येथें द्यावयाचा आहे ', असे उत्तर देऊन संध्यावंदनादि आह्निक करून तयार होण्यास सांगितले. आज्ञेप्रमाणे आह्निक करून सिद्ध झाले असतां स्वतः दत्तमहाराजांनी प्रैषदंडादि देऊन नारायणसरस्वती असे नांव दिले. असा संन्यासाश्रम देऊन त्या आश्रमाचे धर्म सांगून त्यांना कृतार्थ केले. नंतर ज्या स्थानापासून आंत गेले तेथेंच ते वर येऊन मठांत आले।।९५।।

**यशस्यमीशेन कृतं रहस्यमेतत्त्वविद्वान् मठपः प्रहस्य ।**
**मनस्यतीवार्त इवाप्रशस्यं भ्रष्टोऽयमित्याह स तद्रहस्यम् ।।९६।।**
**नारायणोक्तिश्रवणात् प्रबोधपारायणं वेद स तं प्रबोधम् ।**
**नारायणात् प्राप स शिष्यभावपरायणः प्राप परात्मभावम् ।।९७।।**

अन्वयः- यशस्यं एतत् रहस्यं, ईशेन कृतं अविद्वान् मठपः, मनसि अतीव आर्त इव प्रहस्य, अयं भ्रष्टः, अप्रशस्यं (अनेन कृतं) इति आह, सः नारायणोक्तिश्रवणात् तत् रहस्यं प्रबोधपारायणं (आह), सः नारायणात् तं प्रबोधं प्राप, सः शिष्यभावपरायणः परात्मभावं प्राप ।

अर्थः- नारायणस्वामींचे यशवर्धन करणारे हे गुप्त संन्यासाश्रमाचे प्रदान ईश्वरकृत आहे, हे न जाणणारे मठाधिपति मनामध्यें अत्यंत पीडित झाल्यासारखे होत्साते तिरस्कार करून, हा भ्रष्ट आहे, याने गुरूशिवाय केलेले दंडग्रहणादि कर्म अप्रशस्त आहे असे म्हणाले. यानंतर ते रहस्य भगवद्वाक्यश्रवणाने पूर्ण प्रकट होईल असे नारायणस्वामी म्हणाले.त्याप्रमाणे मठाधिपतीस श्रीदत्तात्रेयापासून त्या रहस्याचा बोध झाला. (असे त्याचे महत्व समजल्यामुळे) ते मठाधिपति यांचे शिष्यत्व स्वीकारून ब्रह्मस्वरूपास प्राप्त झाले.

भावार्थः- नारायणस्वामींचे संन्यासग्रहण गुरूशिवाय झाले आहे असे वाटून मठाधिपतिप्रभृति त्यांची निंदा करूं लागले; तेव्हां त्यांना मी संन्यासाश्रम दिला आहे, आपण पीडा देऊं नका असे दत्तमहाराजांनीं स्वप्नांत सांगितले. तेव्हां ह्यांचा लोकोत्तर अधिकार पाहून मठाधिपति त्यांचीच सेवा करूं लागले व त्यांच्या अनुग्रहाने साक्षात्कारसंपन्न झाले ।।९६-९७।।

**इतीट्प्रसादादपरोक्षसाक्षात्कारो बभूवापि परोऽपि साक्षात् ।**
**न्यासं स्वतोऽकारयदप्यपूर्वं यस्याधुनाप्यर्चनमस्ति पूर्वम् ।।९८।।**

अन्वयः- इति ईट्प्रसादात् (अस्य) अपरोक्षसाक्षात्कारः अपि बभूव, परः अपि साक्षात् स्वतः न्यासं अकारयत् (एतत्) अपूर्वं, अधुना अपि यस्य अर्चनं पूर्वं अस्ति ।

अर्थः- दुसऱ्यास ज्ञानसंपन्न करतां येण्यासारखा ईश्वरानुग्रहाने ह्यांना अपरोक्ष साक्षात्कारही झाला होता. परमात्माही साक्षात् स्वतः यांचेकडून संन्यास करविता झाला हे अत्यंत अपूर्व आहे. अद्यापही या नारायणस्वामीं-चे पूजन श्रीदत्तमहाराजांच्या पूजनापूर्वी होत आहे. असे परमदुर्लभ फल ईश्वरानुग्रहाने मिळते ॥९८॥

**शालिवाहनशके भसप्तभूसंमिते (१७२७) स मधुमास्यमातिथौ ।**
**संस्थितोऽभवददृश्यरूपतः स्वार्चकस्य स च दृश्यरूपतः ॥९९॥**

अन्वयः- सः शालिवाहनशके भसप्तभूसंमिते, मधुमासि, अमातिथौ, अदृश्यरूपतः संस्थितः अभवत्, स च स्वार्चकस्य दृश्यरूपतः वर्तते ।

अर्थः- नारायणस्वामी शालिवाहन शके १७२७ चैत्रमास अमावस्या तिथीचे दिवशी अदृश्यरूपाने राहिले. ते भक्तांना दृश्य रूपानेच आहेत ॥९९॥

यांचे महात्म्य संक्षेपतः वर्णन करतात-

**आरब्धे त्वमुना नृसिंहभजने सिंहोऽग्रतः प्राप्तवान् ।**
**योऽन्तःस्थोऽपि बहिष्ठनत्यवसरे नारायणेत्युक्तवान् ॥**
**व्याघ्रस्याधिमपाहरद्द्विजवरं यो वैद्यनाथे मृतम् ।**
**चक्रे सासुमसौ ददातु भजतां नारायणो नोऽमृतम् ॥१००॥**

अन्वयः- अमुना नृसिंहभजने आरब्धे तु अग्रतः सिंहः प्राप्तवान्, यः अंतस्थः अपि बहिष्ठनत्यवसरे नारायण इति उक्तवान्, यः व्याघ्रस्य आधिं अपाहरत्, वैद्यनाथे मृतं द्विजवरं सासुं चक्रे, असौ नारायणः भजतां अमृतं ददातु ।

अर्थः- ह्या नारायणस्वामीने नृसिंहाचे भजन सुरू केले असतां पुढच्या बाजूस (श्रवण करण्याकरतां) भगवान् नृसिंह रूप धारण करून प्राप्त झाले. जो आंत गर्भागारामध्यें असतांही बाहेर नमस्कार करणाऱ्या पुरुषास त्याच वेळी नारायण असा आशिर्वाद देता झाला; जो व्याघ्राची व्याधी नष्ट करता झाला व वैद्यनाथ क्षेत्रामध्यें मृत झालेल्या ब्राह्मणास सप्राण अर्थात् जिवंत करतां झाला. हा नारायणस्वामी भजन करणाऱ्या आम्हांला मोक्ष देवो.

भावार्थः - यांनीं एकदां नृसिंहाच्या भजनास आरंभ केला असतांना भगवान् संतुष्ट होऊन नृसिंह रूपाने यांचेपुढें प्रगट झाले, हे भक्तास प्रत्यक्ष दिसले. साक्षात् महालक्ष्मीने यांना दर्शन देऊन, श्रीदत्ताचे दर्शन होऊन इच्छा पूर्ण होईल असा वर दिला व आपण कृतार्थ झाल्यावर पुनः मला कांही काळ भजन ऐकवावे असे सांगितले. असा ज्यांचा अधिकार त्यांना बाहेरून नमस्कार करणाऱ्यास आशीर्वाद देणे सहज शक्य असल्यामुळे ते तसा आशीर्वाद देतही असत. कृतकार्य झाल्यानंतर श्रीदत्तमहाराजांची अनुज्ञा घेऊन तीर्थयात्रा करीत करीत जनांना अधिकारानुरूप उपदेश करून कृतार्थ केले व महालक्ष्मीच्या आज्ञेप्रमाणे पुनः कोल्हापुरास येऊन भजन करीत राहिले. भजनाचे वेळी महालक्ष्मीने व दत्तात्रेयाने प्रगट होऊन भजन ऐकावे. असा कांही काळ गेल्यावर त्या उभयतांनीं करवीरापासून १३॥ कोसांवर असलेल्या दुर्गमान पर्वतास जाण्याची यांना आज्ञा केली. त्याप्रमाणे स्वामींनी प्रयाण केले. ते कोल्हापुरापासून ८ कोसांवर असलेल्या कौलव गांवास माध्याह्नकाली आले. तेथील नागेश गुळवणी यांचे घरी भिक्षा करून त्या दिवशीं तेथें मुक्काम केला. नागेशाची भक्ति पाहून त्यास कृतार्थ केले. तेथून नागेशादिकांसह स्वामी तारळ्यास आले. पूर्वाश्रमीचे श्वशुर राम दीक्षित यांचे घरी भिक्षा करून दुर्गमानास जाण्यास निघाले. तेव्हां सायंकाळी परत येतां येणार नाही, तेथें लोकांची वस्ती नाही, एक महिना देवीचे पूजनही नाही; कारण तेथें एक मोठा वाघ रात्रंदिवस फिरतो, असे तेथील लोकांनी सांगितले. तेव्हां उद्या जावे, आम्ही बरोबर येतो असे लोक सांगत असतां आजच जाणे आवश्यक आहे, व्याघ्रादिक हे ईश्वराधीन आहेत असे सांगून एक सुई व कांही बिब्बे मागून घेतले व नागेशादि शिष्यांस बरोबर घेऊन बाकीच्या लोकांस तेथेंच राहण्याची आज्ञा करून स्वामी दुर्गमानास आले. तेथील विजयादेवीस वंदन करून संध्यावंदनादि कार्य केले व तेथेंच मुक्काम केला. रात्रीं शिष्यांनीं काष्टें प्रज्वलित केली. स्वामींनीं देवीच्यासमोर भजनास सुरूवात केली. शिष्य एकाग्र होऊन श्रवण करतात इतक्यांत एक महान्

व्याघ्र तेथें आला. स्वामीस पाहून त्याने मोठ्या आर्तस्वराने पीडा प्रगट केली व देवीच्या दारावर मस्तक ठेवून उभा राहिला. शिष्यांचे चित्त भयभीत झाले. त्यांचे सांत्वन करून व्याघ्रास कांही काल तेथेंच राहण्यास स्वामींनी सांगितले. भजन संपल्यावर व्याघ्रास आंत येण्यास सांगितले. त्याप्रमाणे तो आंत आला व स्वामींच्या मांडीवर डावा पाय ठेवून उभा राहिला. त्याच्या पायामध्यें असलेला काटा सुईने काढून स्वामींनीं त्याच्या अंगावरून हात फिरवून समाधान केले व बिब्याचे चरके देऊन त्याची व्याधी नाहीशी केली. त्यास परत जाण्यास सांगितले. तथापि स्वामीस सोडून जाण्यास तो तयार होईना. तेव्हां शिष्यास तुम्ही निजा, याचेपासून पीडा होणार नाही असे सांगून स्वामी निजले. नंतर शिष्य व व्याघ्रही तेथेंच निजला. प्रभातकाळी स्वामीनीं व्याघ्रास,' वत्सा! तूं दिवसा येथें येऊं नकोस, कारण देवीच्या पूजेस प्रतिबंध होतो. रात्रीं आलास तरी कोणासही पीडा देऊं नको ' असे सांगून जाण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणे व्याघ्र तेथून निघून गेला व ते स्थान जनांस निर्भय झाले. नंतर स्वामी करवीरास परत आले व झालेली हकीगत त्यांनी महालक्ष्मीस सांगितली. याप्रमाणे सर्वात्मभावसंपन्न झालेले नारायणस्वामी केवल आपल्या अवलोकनाने हिंस्र पशूंनाही शांत करीत असत. त्यांच्या दृष्टीपाताने पापीजनांच्या पापांचाही नाश होत असे. याप्रमाणे अनेकांना पवित्र करीत स्वामी कोल्हापूराहून वाडीस आले. तेथें अनेकांचा उद्धार केला.

कांही कालानंतर बेळगांवजवळ असलेल्या सुरम्य पर्वतावर स्वयंभू वैद्यनाथलिंग आहे त्याचे दर्शन घेऊन यावे अशी स्वामींस दत्तमहाराजांची आज्ञा झाली. त्याबरोबर स्वामी एकटेच निघाले. तेथें एक ब्राह्मण आचारपरिभूत शिवार्चनतत्पर असा एकांतामध्यें रहात असे. स्वामी तेथें गेले. अत्यंत रम्य शिवलिंगाचे दर्शन घेतले. स्नान करून आन्हिकाकरतां तेथें बसले. तोपर्यंत तो ब्राह्मण तेथें येत आहे व त्याचेमागें महान् कृष्णसर्प धांवत आहे असे पाहिले. ब्राह्मणाने यतीस पाहून स्वामीमहाराज माझें

रक्षण करा इतकें म्हणून महाराजांच्या सन्निध तो प्राप्त झाला. इतक्यांत त्या सर्पाने त्यास दंश केला. त्याच्या तीव्र विषामुळे ब्राह्मण विवर्ण होऊन पडला तो मृतच झाला. एकवार स्वामींनी सर्व बाजूंस पाहिले. कोणी नाही असे पाहून मंत्राने त्यास सजीव केले. नंतर त्या ब्राह्मणाने स्वामींची पुष्कळ स्तुती केली व महाराज तेथून निघाल्याबरोबर त्यांचा वियोग असह्य होऊन तोही महाराजांबरोबर निघाला. ते दोघे येतां येतां एका नदीतीरावर आले तो कालकुंद्री येथील एक ब्राह्मण बैलावर माकण घालून पाणी नेण्याकरितां तेथें आला. स्वामींचे दिव्य रूप पाहून त्याने भक्तीने त्यांना नमस्कार केला. स्वामींनीं वृत्तांत विचारला असतां, 'मी दरिद्री असून श्रीमंताचे घरी पाणी नेण्याचे कार्य करून निर्वाह करतो' असे सांगून कृपा असावी अशी त्याने प्रार्थना केली व आशीर्वाद घेऊन निघाला. तेव्हां स्वामींनीं 'ब्राह्मण क्षुधेने पाडित झाला आहे, याच्या भोजनाची सोय तुमच्या धनिकांच्या घरी होईल काय?' असे विचारल्याबरोबर, 'होईल, माझेबरोबर येऊं दे,' म्हणून त्यास बरोबर घेऊन घरी आला. आसनावर त्यास बसविले व धनिकास बाहेर जाऊन येतो असे सांगून पुनः स्वामींकडे आला. आपल्या भिक्षेची व्यवस्था काय ते मला कृपा करून सांगा, अशी प्रार्थना केली. तुला गृहादिक नसल्यामुळे याचा विचार करूं नको असे स्वामींनीं सांगितले. श्रीमंताच्या घरी मी आपली सोय करतो असे त्याने सांगितले असतां ते नियमयुक्त नसल्यामुळे तसे करतां येत नाही, तूं जा, त्या ब्राह्मणास भोजन घातले असतां माझा संतोष आहे असे त्यांनी सांगितले. आपली भिक्षा झाल्याशिवाय माझ्या मनास शांति नाही; करतां मला कांही उपाय सांगा, अशी पुनः प्रार्थना त्याने केली असतां, 'तूं संपादन केलेल्या द्रव्याने सामग्री मिळवून एका देवालयामध्यें पाक सिद्ध करून त्या ब्राह्मणास इकडे पाठीव, मी त्याबरोबर येतो,' असे स्वामीमहाराजांनी सांगितले. त्याप्रमाणे सर्व होऊन स्वामीमहाराजांनीं तेथे भिक्षा केली. तुझ्या दारिद्र्याचा नाश होईल असा आशीर्वाद त्यास दिला व प्रति वर्षी वाडीस जाऊन दत्तास

महारूद्राभिषेक करावा, गुरुचरित्र रोज वाचावे असे सांगून स्वामी वाडीस परत आले. त्यांच्या आशीर्वादाप्रमाणे दारिद्र्य नष्ट होऊन तो धनधान्यसंपन्न झाला व प्रतिवर्षी दत्तास महाभिषेकादि सांगितल्याप्रमाणे करूं लागला. तो नियम त्याच्या वंशामध्यें अद्यापि चालू आहे. तो वंश कालकुंद्रीकर या नांवाने प्रसिद्ध आहे. असा अनेकांचा उद्धार केला इतकेंच नव्हे तर त्यांच्या अनुग्रहाने कृष्णानंद प्रभृति त्यांचे शिष्य मोक्षास प्राप्त झाले. असे हे नारायणस्वामी भजकास मोक्ष देवोत, अशी प्रार्थना ग्रंथकार करतात. कारण ते भगवद्रूप झाले आहेत. हे सर्व उपासनेचे फळ आहे ।।१००।।

असा हा उपासना मार्ग परंपरासिद्ध व स्वानुभूत सर्वांनीं स्वीकारावा असे कळकळीने सांगणारे महाराज ग्रंथाचा उपसंहार करतात.

**एवं तूपासनानि श्रुतिमुखगदितान्यत्र संदर्शितानि**
**प्राज्यान्येषां यदिष्टं तदिह परमया श्रद्धया भक्तिमत्या ।।**
**योऽङ्गीकृत्वाऽप्युपास्तेऽपि सति कलियुगे तारतम्यादुपास्ते**
**सोऽन्यत्रात्रात्प्राथवेयाच्छ्रुतिमुखगदितां मुक्तिमीशप्रसादात् ।।१०१।।**

अन्वयः- एवं अत्र तु श्रुतिमुखगदितानि प्राज्यानि उपासनानि संदर्शितानि, एषां यत् इष्टं तत् अंगीकृत्वा यः भक्तिमत्या परमया श्रद्धया इह उपास्ते, कलियुगे सति अपि तारतम्यात् उपास्तेः, सः अत्र अथवा अन्यत्र ईशप्रसादात् श्रुतिमुखगदितां मुक्तिं इयात् ।

अर्थः- याप्रमाणे या ग्रंथामध्यें श्रुतिस्मृतिविहित असलेल्या पुष्कळ उपासना दाखविल्या आहेत. यांमध्यें जी इष्ट असेल ती घेऊन भक्तियुक्त परम श्रद्धेने येथें जो उपासना करतो. - कलियुग असतांनाही तारतम्याने उपासना करतो-तो इहजन्मांत अथवा अन्य जन्मांत ईश्वरानुग्रहामुळे श्रुतिस्मृति मध्यें सांगितलेल्या (आत्यंतिक दुःखनिवृत्तिपूर्वक परमसुखावाप्तिरूप) मुक्तीस प्राप्त होतो. कलियुगामध्येंसुद्धां उपासना फलप्रद असल्यामुळे अवश्य करावी।।१०१।।

इति श्रीपरमहंसपरिव्राजकाचार्यश्रीमद्वासुदेवानंदसरस्वतीस्वामिविरचिता

**।। युवशिक्षा समाप्ता ।।**

श्रीगणेशदत्तगुरूभ्यो नमः।।

श्री. प. प. वासुदेवानन्दसरस्वतीस्वामिमहाराजकृत

# वृद्धशिक्षा

(मूळश्लोक)

मराठी भाषांतरासहित

भाषांतरकार-

**वे. शा. सं. पं. आत्मारामशास्त्री जेरे,**

न्यायवेदान्ताध्यापक, तत्त्वज्ञानमंदिर, अमळनेर.

# प्रस्तावना

श्रीगणेशाय नमः।

'दत्तात्रेयश्रीपादवल्लभश्रीमन्नृसिंहसरस्वतीचरणारविंदाभ्यां नमः।'

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते। तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनात्मनि विन्दति' (गीता ४-३८) या उपरिनिर्दिष्ट भगवद्गीता श्लोकांत जिवाला शुद्ध करण्यासाठी ज्ञानासारखे दुसरे साधन वेदांमध्यें किंवा लोकव्यवहारांत नाही, असें निश्चित सांगितले आहे. पवित्र करण्यांत प्रसिद्ध असणारीं गंगास्नानादि, तीर्थयात्रादि किंवा प्रायश्चित्तादि साधने पापनिवर्तक आहेत असें धर्मशास्त्रादि ग्रंथांत सांगितले असले तरी समूळ पापनिवर्तन करण्याचे सामर्थ्य या इतर साधनांत नाही. 'विपापो विरजो' 'अपापविद्धं' इत्यादि श्रुतिसहस्त्रवर्णित निष्पाप निर्विकार निष्क्रिय सच्चिदानंदघन परब्रह्मस्वरूप जिवाला स्वरूपाज्ञानाने किंवा स्वस्वरूप विस्मृतीने जी अहं कर्ता भोक्ता अशी भ्रमात्मक बुद्धि झाली तीच सर्व पापांचे किंवा सर्व व्यवहाराचे कारण आहे. या भ्रमालाच पापांचे बीज, पापांचे हृदय किंवा पापांची वासना अशा नाना प्रकारांनी ठिकठिकाणीं सांगितले आहे. वृक्षाच्या शाखा उपशाखा जरी तोडल्या तरी मूळ तोडल्याशिवाय ज्याप्रमाणें वृक्षाचा नाश होत नाहीं, त्याप्रमाणेंच पापवृक्षाच्या शाखोपशाखा नष्ट केल्या तरी मूळ नष्ट केल्याशिवाय पापवृक्षाचा नाश होणें शक्य नाही. मूळाचाच नाश केला तर मात्र शाखोपशाखेचा नाश जरी न केला तरी वृक्षनाश होईल. पापनाशाकरतां ज्ञानाहून भिन्न अशा इतर साधनांचे म्हणजे प्रायश्चित्तादिकांचे अनुष्ठान करणें हे वृक्षनाशाकरतां शाखोपशाखाच्छेदनाप्रमाणेंच अयुक्त आहे. कारण ही सर्व

साधने पापाला मूळ असणाऱ्या अज्ञानमूलक कर्तृत्वादि भ्रमाला घालविणारीं नव्हेत. उलट गजस्नानवत् व्यर्थ व आयासकर अशींच आहेत. ज्ञानरूप साधनाचे मात्र तसें नाही. ते झाले असतां कर्तृत्वादि भ्रमालाहि कारणभूत असणारे व सर्व अनर्थनिदान असें अज्ञानच नाहीसें होते व मूळच्या निष्पाप अशा स्वस्वरूपांत हा जिवात्मा स्वानंदसुखमग्न होऊन राहातो; म्हणूनच ज्ञानासारखे जिवाला पावन करणारे दुसरे साधन वेदांत किंवा लोकांत नाहीं असें म्हटले आहे. तत्त्वदृष्टीने विचार केला असतां एकमेवाद्वितीय ब्रह्म हीच वस्तुस्थिती आहे. त्यांत अज्ञान, तन्मूलक कर्तृत्वभोक्तृत्वादि व पापपुण्यादि कांहीच कल्पना नाहींत. निर्विकल्प, अखंड आनंदघन असें एकच एक ब्रह्म आहे, परंतु वास्तविक या सिद्ध स्थितीवर आरूढ असूनही मी बद्ध आहे, अशी भ्रांती बाळगणाऱ्या जिवाला, पाण्यांत पडलेले प्रतिबिंब पाहून मी पाण्यांत बुडलो आहे असें म्हणणाऱ्या तीरस्थ माणसाला, तीरस्थिति वास्तविक असून जशी निरुपयोगी आहे, तशीच ही सिद्धस्थिति वास्तविक असूनही निरुपयोगी आहे. प्रतिबिंब भ्रमाने पाण्यांत बुडलेल्या माणसाला तीरावर आणण्यासाठी नौका, भोपळा वगैरे साधने निरुपयोगी असून तूं पाण्यांत पडला नसून वरच आहेस असें ज्ञान करून देणें हेच जसें साधन आहे; तद्वतच अज्ञानजन्य भ्रांतिमूलक पापाने मी अपवित्र आहे असें मानणाऱ्या जिवाला त्याची खरी पवित्रता होण्यासाठी इतर प्रायश्चित्तादि साधने अयुक्त नसून भ्रांति व तत्कारण अज्ञाननाशक जें ज्ञान तेच उपयुक्त आहे. म्हणूनच 'न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते' असें म्हटले आहे. 'वासुदेव म्हणे ज्ञान । होतां होतो नर पावन' असा अभंग महाराजांनी याच अभिप्रायाने केला आहे.

ही पावनता किंवा पवित्रता यालाच मोक्ष किंवा कैवल्य अशी संज्ञा आहे. मलाची निवृत्ती झाली म्हणजे पवित्र झाला असा व्यवहार आहे, त्याप्रमाणें ज्ञानाने जीवस्वरूपावर आलेल्या अज्ञानादि मलांची निवृत्ती झाली म्हणजे जीव पवित्र किंवा पावन झाला असा व्यवहार होण्यास कांही हरकत

नाही. पर्जन्य उंच, सखल सर्व जागीं जरी पडत असला तरी सखोल भूमीतच त्याचे उदक जसें स्थिर राहून उपयोगी पडते, तद्वतच ज्ञानस्वरूप सर्वत्र जरी भरून असले तरी ईश्वरार्पणबुद्धींने कर्मानुष्ठानरूप कर्मयोगाने व समाधियोगाने म्हणजे ईश्वरोपासनेने ज्याच्या चित्तभूमींतील दगडासारखे कठीण असणारे 'दंभो दर्पोभिमानश्च' इत्यादि पदार्थ निघून जाऊन जी चित्तभूमि ज्ञानधारा सांठविण्यासारखी सखोल झाली असेल तेथेच तो ज्ञानाचा झरा स्वतःच वाहूं लागतो; परंतु याला बराच काल लागतो. 'अनेकजन्मसंसिद्धः' या न्यायाने कदाचित् अनेक जन्मही लागतील. ज्ञानझऱ्यापर्यंत जाणाऱ्या सखोलतेवर हे कालमान अवलंबून आहे. हाच अर्थ 'तत्स्वयं ज्ञानसंसिद्धः कालेनात्मनि विंदति.' या उत्तरार्धात भगवंतानी वर्णन केला आहे. ज्ञानप्राप्तीला चित्ताच्या योगसंसिद्धीचीच आवश्यकता आहे. स्थूल देहांतील जाति - कुल - गोत्र हे सर्व अन्यथासिद्ध म्हणजे अनावश्यक आहेत. म्हणूनच दासीपुत्र म्हणून प्रसिद्ध असलेले ज्ञानिश्रेष्ठ विदुर, शूद्र कुलोत्पन्न तुकाराम, नामदेवादि संतशिरोमणि, यवनकुलोत्पन्न म्हणून प्रसिद्ध असणारे कबीरादि, मौंजीबंधनादि संस्काररहित असणारे निवृत्ति - ज्ञानदेवादि महात्मे, ज्ञान्यांचे राजे म्हणून प्रसिद्ध आहेत.

आतां महावाक्याशिवाय तत्त्वबोध होऊं शकत नाहीं व त्रैवर्णि केतरांना महावाक्याचा अधिकार नाहीं. 'घोकाया अक्षर । मज नाही अधिकार' असें प्रांजलपणें लिहून निरभिमानपणें संतशिरोमणि तुकाराम महाराजांनीहि हे अंगीकृत केले आहे. कारण खरे संत 'तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ' या भगवद्वचनाच्या विरूद्ध कधींहि जाणारच नाहीत. संतांच्या वचनाचे आलोचन केले असतां पदोपदी हा सिद्धांत दृग्गोचर होतो. मग महावाक्याशिवाय यांना तत्त्वज्ञान कसें झाले अशी शंका येणें साहजिकच आहे; परंतु थोडा विचार केला असतां ही शंका नाहींशी होईल. जीवब्रह्मैक्यप्रतिपादक वाक्याला महावाक्य असें म्हणतात. त्रैवर्णिकांना तत्त्वज्ञानाधिकार प्राप्त झाला तर स्वशाखीय एका महावाक्यानेच त्याचे कार्य होईल. दुसऱ्या शाखेचीही त्याला गरज नाही. त्रैवर्णिकेतर ज्ञानाधिकाऱ्याला

'राम' या स्वाधिकारानुरूप महावाक्यानेच बोध होईल. 'आद्यो 'रा' तत्पदस्यार्थो 'म'कारस्त्वंपदार्थवान् । तयोः संयोजनमसीत्यर्थे तत्त्व-विदो विदुः'. राम शब्दांतील 'रा' हा ब्रह्मवाचक आहे व 'म' हा जीववाचक आहे. यांचे ऐक्य हे असिपदस्थानी आहे असा या श्लोकाचा अर्थ आहे. यावरून राम शब्द महावाक्यच आहे. रामनामाला सर्वच अधिकारी आहेत. भगवत्पूज्यपादाचार्यांनीसुद्धां शारीरभाष्यांत अपशूद्राधिकरणांत' वेदपूर्वकस्तु नास्त्यधिकारः शूद्राणाम्' असें लिहून वेदांतील महावाक्यांपासून बोध करून घेण्याचा अधिकार शूद्रादिकांना नाहीं असें म्हटले आहे. त्यांनी वेदभिन्न महावाक्यापासून ज्ञान संपादन करण्यास त्यांची हरकत नाहीं. आम्हीं त्यांना प्रतिबंध करूं शकत नाहीं असें सांगून विदुरादिकांचे उदाहरण सांगितले आहे. भगवंतांनी भगवद्गीतेत 'स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः' 'स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः' असें सांगून, संसिद्धि किंवा सिद्धि शब्दाने प्रतीत होणारे ज्ञानसाध्य मुक्तिद्वार 'नरः' किंवा 'मानवः' असें म्हणून मनुष्यमात्राला किंवा प्राणिमात्राला खुले केले आहे. विवाद, ज्ञान कोणत्या साधनाने कोणीं करावे एवढाच आहे; त्याचा निर्णय शास्त्र प्रामाण्यानुरूप तत्तदधिकारानुरूप वैदिक अथवा पौराणिक साधनाने असा आहे व हा निर्णय सर्व संतांना मान्य आहे.

ब्रह्मांडातील सर्व प्राण्यांपेक्षां मानवसृष्टि अत्यंत श्रेष्ठ आहे असें शास्त्र सांगते. कारण मानवबुद्धींत इतर प्राण्यांत नसणारी विचारशक्ति ईश्वराने ठेवली आहे. 'सर्वं खल्विदं ब्रह्म' या सिद्धांताप्रमाणें सर्व प्राणी जरी ब्रह्मस्वरूप असले तरी मी ब्रह्म आहे अशा ज्ञानाने होणारा, किंवा या ज्ञानस्वरूपच असणारा, अज्ञानाने नाहींसा झालेला ब्रह्मभावरूप जो सर्वांत श्रेष्ठ असणारा आत्मलाभ - ज्याला शास्त्रकारांनी 'आत्मलाभान्न परो लाभः' असें म्हटले आहे; तो लाभ होण्याची योग्यता म्हणजे ब्रह्मावलोकधिषणा मात्र मानवदेहांतच आहे व या एका कारणानेच पश्वादियोनीपेक्षां मनुष्य श्रेष्ठ आहे; नाहीं तर 'पश्वादिभिश्चाविशेषात्' या न्यायाने इतर सर्व

गोष्टींत मानव पशुतुल्य किंबहुना पशुपेक्षांहि विकृतच होईल. मानुषानंदादि हिरण्यगर्भानंदान्त आनंद ज्या आत्मलाभरूप आनंदापुढें क्षुद्र आहेत अशा आत्मलाभरूप आनंदाला देणाऱ्या ज्ञानाचे महत्त्व सहस्र वदनांनी शेषालाहि करतां येणार नाहीं; तेथे इतरांचा काय पाड ? अशा परमश्रेष्ठ व मोक्षप्रद ज्ञानाचा सांगोपांग विचार करणाऱ्या ग्रन्थाला अध्यात्मशास्त्र अशी संज्ञा आहे. सर्व शास्त्रांपेक्षां अध्यात्मशास्त्र श्रेष्ठ आहे असें 'अध्यात्मविद्या विद्यानाम्' या भगवद्वचनाने सिद्ध आहे. हीच पराविद्या आहे. ही विचारसाध्य आहे; 'एषा तेऽभिहिते सांख्ये' 'सांख्यानां विचारोऽयं' 'तत्कारणं सांख्ययोगाभिपन्नं' इत्यादि प्रमाणांनी सांख्य व विचार या शब्दांचा अर्थ एकच आहे असें सिद्ध आहे. ज्ञानप्राप्तीला विचार हा मुख्योपाय आहे; परंतु ज्या संन्यासी मुमुक्षूला बुद्धिमांद्याने किंवा बुद्धिकौशल्य असले तरी न्यायव्युत्पादनकुशल अशा आचार्यांची गांठ न पडल्यामुळें विचाररूप सांख्य मार्गाचे अवलंबन करणें शक्य नसेल, त्याला ब्रह्मज्ञानाला साधन म्हणून जगाचा अकारादि क्रमाने परमात्म्यांत लय करून समाधि अभ्यासरूप योग सांगितला आहे. 'यत्सांख्यैः प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते' या भगवद्वचनाने 'योगाभिपन्नं' या श्रुतिवाक्याने हे योगरूप साधनहि ज्ञानद्वारा मुक्ति देणारे आहे.

मांडूक्योपनिषदांमध्यें हा योगाभ्यास सांगितला आहे. त्याचे थोडक्यांत तात्पर्य असें आहे; ॐकारांत अकार, उकार, मकार अशा तीन मात्रा आहेत. शब्द व अर्थ यांचे ऐक्य असल्याने विश्व वैश्वानर व अकार यांचे ऐक्य आहे; म्हणजे सर्व स्थूल जगत् अकार अक्षरात्मक आहे, असें संशय जाईपर्यंत चिंतन करावे; नंतर तैजस हिरण्यगर्भ व उकार हे सर्व एक असल्याने सूक्ष्म जगत् उकारात्मक आहे असें चिंतन करावे; पुढें ईश्वर प्राज्ञ व मकार हे सर्व एक असल्याने सर्व कारणीभूत अज्ञान मकारात्मक आहे असें चिंतन करावे. हे दृढ झाल्यावर अकारादि त्रयाचा उकारामध्यें, उकारादि त्रयाचा मकारामध्यें व मकारादि त्रयाचा अर्धमात्रार्थ जें चिन्मात्र ब्रह्म त्यामध्यें लय करून मी नित्य शुद्धबुद्ध मुक्त सदद्वितीय परमानंद

वासुदेव-स्वरूप आहे असें चिंतन करून त्या चिंतन करणाऱ्या चित्ताचाही चित्ताच्या साक्षीमध्यें लय करून पूर्णाचल समुद्राप्रमाणें स्वस्थ राहावे; याप्रमाणें प्रणवाभ्यास करणाऱ्याला कोणत्याहि प्रकारचे कोठेंहि केव्हांहि भय राहात नाहीं. संन्याशाला ही प्रणवोपासना सांगितली, प्रणवानधिकारी त्रैवर्णक व त्रैवर्णिकेतरांना तत्तदधिकारानुरूप 'राम' नामाने अशी उपसाना करण्यास हरकत नाहीं. फक्त ॐकारांतील अकार उकारादि अक्षराबद्दल 'राम' शब्दांतील र्, आ, म्, अ, असे चार भाग पाडून विश्व तैजस प्राज्ञ तुरीय यांची संगति लावतां येईल. कारण सर्वच शब्द विराट्रूप ईश्वरवाचक आहेत. 'मां विधत्ते अभिधत्ते मां' असें एकादशांत भगवंतांनी उद्धवाला सांगितले आहे. एकंदरींत सांख्य व योग हे दोन्हीही मार्ग अधिकारानुरूप मानवमात्राला ज्ञानद्वारा मुक्तिफल देणारे आहेत. प्रणवोपासना करीत राहिल्यास तो साधक तरून जातो; अशाबद्दल श्रीगुरुमहाराजांचे पत्र त्यांचे परमप्रिय व एकनिष्ठ शिष्य श्रीमन्नृसिंहसरस्वती स्वामीमहाराज (दीक्षित महाराज) यांना आलेले येथे उद्धृत करणें योग्य वाटलेवरून लिहीत आहे. ते असें-"श्रीकृष्णातीरीं निजामशाहींत कोटिलिंग नांवाचे क्षेत्रीं १० दिवस राहणें झाले. तेव्हां, तुम्हांला प्रणव व मात्रा लक्ष्यार्थ वगैरे बरोबर विवेचन सांगण्यास मिळाले नाहीं असें मनांत येऊन वृद्धशिक्षा नामक प्रकरण (पूर्वी कुमारशिक्षा केली व त्याप्रमाणें 'युवाशिक्षाही असावी म्हणून १०० श्लोक युवशिक्षाही श्रीगुरु कृपेने रचली) व गहनार्थ जाणून साक्षात् व्याख्या सांगितल्याप्रमाणें वर सविस्तर व्याख्या सुरू आहे. आतां ७० श्लोकपावेतों व्याख्या पूर्ण झाली. जशी नामस्मरणाकरितां हातांत स्मरणी तशी उपनिषत् सूत्र स्मरणार्थ ही स्मरणी जाणावी. एकदा अण्णा दीक्षित वगैरे मंडळींस तिचा अर्थ जाणून नंतर दिवस-रात्रीं घडेल तितुका विचार करीत जावा. बाकीची टीका अवकाशाप्रमाणें पाठवितां येईल."

दुसऱ्या एका पत्रांतः- "तुम्ही स्वतः वृद्धशिक्षा समयाप्रमाणें पहावी व पहिल्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें प्रणवोपासना ठेवावी. प्रणवाभ्यासाकडे

चित्तवृत्ती ठेवल्याने चित्त शांत होईल. आपण सांगितल्याप्रमाणें प्रणवोपासना चालवावी; तीच तारील.''

या पत्रावरून उपासनारूप योगमार्गाचे महत्त्व लक्षांत येण्यासारखे आहे. अधिकारानुरूप कर्मयोग, उपासनायोग किंवा ज्ञानयोग सांगून सांसारिक दुःखपंकांत मग्न झालेल्या जिवांचा उद्धार करून कैवल्यरूप मोक्ष साम्राज्यपदावर त्यांना आरूढ करण्याकरितां परब्रह्म सच्चिदानंदघन अनंतकोटि ब्रह्मांडनायक षड्गुणैश्वर्यसंपन्न भगवान् परम करुणेने या जगतीतलावर अवतीर्ण होतो. सांसारिक जिवांची अवस्थिति यावत्काल या प्रपंचात आहे. तावत्कालपर्यंत ज्ञानोपदेशाची आवश्यकता असल्याने, ज्ञानप्रद सर्वेश्वर अशा प्रभु दत्तात्रेयांचा अवतार कल्पारंभापासून कल्पांतापर्यंत विद्यमानच आहे. श्रीदत्तप्रभुंचे रामकृष्णादि अन्य अवतार कंस-रावणादि दुष्टहनन शिष्टपरित्राणाकरितांच असल्याने तीं तीं कार्ये झाल्याबरोबर 'कंटकं कंटकेनैव' या न्यायाने मायेंत विलीन झाले, तरी ज्ञानोपदेशकार्याचे सातत्य असल्याने ज्ञानोपदेशार्थ व अखिल तपस्विचक्रवर्ति भगवान् अत्रिऋषि व पतिव्रताशिरोरत्न सती भगवती अनसूयामाता यांच्या तपःसंपत्तिसाफल्यार्थ या कल्पांतील स्वायंभुवमन्वंतरांतील प्रथम सत्ययुगांत अत्रि अनसूयारूप दांपत्यापासून झालेला श्रीदत्तात्रेय प्रभूचा अवतार मात्र आकल्पांत अखंडच आहे. 'यथाऽविदासिनः कुल्याः सरसः स्युः सहस्रशः' या भागवतोक्तिप्रमाणें परिपूर्ण अशा सरोवरांतून जसे हजारो झरे लोकशांत्यर्थ बाहेर पडतात त्या प्रमाणें श्रीदत्त प्रभुस्वरूप अखंड सच्चिदानंदघन सरोवरापासून श्रीपादश्रीवल्लभ, श्रीमन्नृसिंहसरस्वती इत्यादि अनेकावताररूप झरे लोककल्याणार्थ प्रगट होऊन गुप्तरूपाने विद्यमान आहेत. 'क्वचित् प्रगट क्वचिद्गुप्ती । ते ब्रह्मज्ञानी जाणती। मूढमती काय जाणे ॥' या न्यायाने अधिकाऱ्यांशिवाय त्यांचा साक्षात्कार होणें कसें शक्य आहे. 'जे भक्त असती माझ्या प्रेमी । त्यांसी प्रत्यक्ष दिसतों आम्ही । लौकिक मते अविद्यधर्मी । जातों श्रीशैलीं यात्रेसी।' असें प्रत्यक्ष दत्तमहाराजांचे अभिवचन आहे.

या दत्तप्रभूच्या अनेक अवतारांपैकीं कोंकणप्रांतीं निर्मला नदीतीरस्थ माणग्रामांत अत्रिगोत्री श्रीदत्तोपासक गणेशभट्ट - रमासतीरूप दांपत्यापासून श्रीमद्वासुदेवानंदसरस्वतीसंज्ञक योगिराजाख्य दत्तावतार झाला. यांचे सर्व दिव्य चरित्र त्यांच्या चरित्रावरून जाणून घ्यावे. यांनी 'यद्यदाचरति' या न्यायाने स्वतः कर्मोपासना, ज्ञानानुष्ठान करून ऐश्वरभाव प्रकट करून अधिकारानुरूप कर्मभक्तिज्ञानमार्गाच्या उपदेशाने अनेक जनांचे कल्याण केल्याचे यांच्या चरित्रावरून व प्रत्यक्षादिकानेही सर्वांना माहीतच आहे. ज्यांच्या आयुष्यांतील सर्व हालचाली ईश्वराज्ञेनेच होत होत्या. अध्ययन न करतां भगवत्प्रसादाने सर्व शास्त्रार्थ ज्ञान व भगवत्प्रेरणेने झालेली जवळ जवळ पाऊण लाख संख्याक प्राकृत-संस्कृत ग्रन्थनिर्मिति, व्यवहारचातुर्य, कर्मकाण्डनिपुणता, निर्विकल्प समाधिनिष्णातता, भक्तशिरोमणित्व, ज्ञानिराजत्व इत्यादि गोष्टी यांच्या दत्तावतारत्वाला खास व्यंजक आहेत. मर्त्य शरीर टाकून ३६-३७ वर्षे झालीं परंतु भक्ताला अद्यापि स्वप्नादि रूपाने मार्गदर्शन, आदेशादि कार्ये चालूच आहेत, असे अनेकांचे प्रामाणिक अनुभव आहेत. अशा या संतशिरोमणि प्रातःस्मरणीय भगत्वस्वरूप महात्म्याने केलेला हा वृद्धशिक्षा नामक ग्रंथ आहे. याचे ७० श्लोक आहेत. "सत्तर श्लोकांची व्याख्या पूर्ण झाली" "बाकीची टीका अवकाशाप्रमाणें पाठवितां येईल." या पत्रांतील दोन वाक्यांवरून वृद्धशिक्षेंत आणखी कांहीं श्लोक लिहावयाचे मनांत होते असें वाटते; परंतु कांहीं कारणास्तव लिहिले नसतील किंवा व्याख्या सत्तर श्लोकांची झाली असून कांही श्लोकच अवलोकनाकरतां दीक्षित महाराजांकडे पाठवून तशा अर्थाचे पत्र लिहिले असेल. कसेंही असले तरी सत्तर श्लोकात्मकच वृद्धशिक्षा उपलब्ध आहे. हा प्रकरण ग्रंथ असून प्रस्थानत्रयांतील सर्व विषय अत्यंत सूक्ष्मरूपाने यांत ग्रथित केले आहेत. कल्पतरूप्रमाणें जो जो अर्थ यांतून पाहिजे असेल तो तो देणारा हा ग्रंथ आहे. स्वतःच इतर ग्रंथांप्रमाणें या ग्रंथाचेहि संग्रह व विस्ताराने गुरु महाराजांनी व्याख्यान केले असल्याने हे सर्व अर्थ समजणें सुलभ झाले आहे.

अन्यथा या ग्रंथाचे महत्त्व समजणें फार कठीण झाले असते. प्रथम श्लोकांत चित्तस्थैर्याकरतां प्रणवोपासना सांगून साधनचतुष्टयसंपत्ति नसणाऱ्यांनाही, भगवदाश्रित मंदवैराग्यशाली संन्याशालासुद्धां ज्ञानप्राप्ति होते, इत्यादि सिद्धान्त अधिकारवाणीने सोपपत्तिक, सांगून श्रवण-मननांदिकांची व षड्विध तात्पर्याची लक्षणें, प्रयोजन, महत्त्व, तत्त्वंपदार्थविवेचन, महावाक्यार्थ निरूपण, दशोपनिषत्तात्पर्य, जीवन्मुक्तचर्यात्मक दत्तमाहात्म्यादि ग्रंथसाररूप दत्तचरित्र वर्णन करणारा मंगलमय व कल्याणप्रद ग्रंथ म्हणजे हा एक दिव्य हिराच आहे. उपनिषदर्थ व सूत्रार्थस्मरणार्थ हा ग्रंथ स्मरणीच आहे; हे वर्णन खरोखर किती यथार्थ आहे हे अनुभव घेऊन पाहणाऱ्यासच कळेल.

केवळ मूलार्थ मात्र जिज्ञासूकरतां हे मूल श्लोकांचे टीकानुसारी भाषांतर यथामति सद्गुरुमहाराजांची अल्पशी सेवा या न्यायाने केले आहे. 'व्याख्यातृत्वं मद्वचसाम्' या भगवदुक्तीप्रमाणें व्याख्यानरूप एक सेवाच आहे. या योगाने सद्गुरुमहाराजांच्या भक्ताला अल्पशः जरी आनंद झाला तरी तो तदभिन्न सद्गुरूंनाच झाला अशी माझी प्रामाणिकपणें समजूत आहे. येथे झालेलीं स्खलिते माझीं स्वतःची व कांहीं गुण असल्यास तो सद्गुरूंचाच आहे, कारण अन्तर्यामी रूपाने प्रेरक तेच आहेत. असो, अशा या अपूर्व, अमोलिक व परम कल्याणकारक ग्रंथाचे अध्ययन व चिंतन करून मुमुक्षु जिज्ञासूंनी कृतकृत्य होऊन गुरुमहाराजांच्या परिश्रमाचे सार्थक करावे, अशी प्रार्थना करून श्रीदत्तमहाराज व सद्गुरुमहाराजांना वंदन करून हा प्रास्ताविक लेख पूर्ण करतों.

सद्गुरुमहाराज व तदभिन्नतद्भक्तचरणरजोभिषेकाभिलाषी
नारायणसूनु आत्मारामशास्त्री जेरे
न्यायवेदान्ताध्यापक तत्त्वज्ञानमंदिर
अमळनेर, पूर्व खानदेश
शके १८७२ माघ वद्य।। १२ रविवार.

# अनुक्रमणिका


| श्लोक | पृष्ठांक | विषय |
| --- | --- | --- |
| १. | १५७. | ॐकारांतील घटक भाग व त्यांचे अर्थ यांचे संपूर्ण वर्णन. ॐकार हा ज्या सर्वस्वरूपी परमेश्वराचा बोध करून देतो तो परमात्मा श्रीदत्त सर्व श्रोत्यावक्त्यांचे रक्षण करो ! अशी प्रार्थना. |
| २. | १६०. | ब्रह्मविचाराचा अधिकारी कोण याचे स्पष्टीकरण. |
| ३. | १६१. | ब्रह्मविचार करणाऱ्या संन्याशाने, निषिद्ध कर्मे सोडून, स्वाश्रमाला विहित अशीं कर्मे करावींत. |
| ४. | १६२. | श्रीदत्तभक्त संन्याशाने, तीव्र वैराग्य नसतांही सर्व कर्मांचा त्याग करून भगवंताचा आश्रय केल्यास तो ऋणत्रयांतून मुक्त होतो. |
| ५-६. | १६४. | मुमुक्षूने अत्यंत प्रिय असा प्रवृत्तिमार्ग सोडून व संन्यास-पूर्वक निवृत्तमार्गाचा स्वीकार करून सद्गुरूंना शरण जावे. |
| ७. | १६६. | सद्गुरूंना शरण जाऊन, त्यांचेपासून श्रद्धेने श्रवण-मनन करावे. |
| ८. | १६७. | गुरुमुखांतून श्रवण केल्याने होणारे शाब्दज्ञान हे पापहारक व कृच्छ्रादि अनुष्ठानाचे फल देणारे आहे. |
| ९. | १६९. | ब्रह्मतत्त्वाचे प्रत्यक्ष ज्ञान झाले असतां, शोकादिक सर्व विकार नष्ट होतात. |
| १०. | १७०. | परमात्मा, जीव व जगत् यांचा भेद वास्तविक नाहीं; आत्मा हा केवल साक्षिभूत आहे व तो बुद्धीने कळतो. |

११. १७२. श्रवण म्हणजे काय ते सांगून, आत्मा बुद्धिग्राह्य कसा याचे विवेचन.

१२. १७३. आत्मा स्थूलबुद्धीला अग्राह्य असला तरी श्रवणादि संस्कृत अशा सूक्ष्मबुद्धीला तो ग्राह्य आहे या सिद्धांताचे स्पष्टीकरण.

१३. १७४. जग सत्य मानणारे सांख्य, असत्य मानणारे नैय्यायिक व सत्यासत्य उभयरूप मानणारे जैन या तिघांचे खंडन, जगताचे मिथ्यात्व, अद्वितीय ब्रह्मवस्तूची सिद्धि व विचाराचे फल.

१४. १७७. ब्रह्मविचाराचा खरा उपयोग अधिकारी व्यक्तीलाच होतो यासंबंधीं विवेचन.

१५. १७९. अधिकारी शिष्याला एकवार श्रवणानेच जर ब्रह्मज्ञान होते तर श्रवणानंतर मनन व निदिध्यासन कां सांगितले? इत्यादि शंकांचे समाधान.

१६. १८१ 'तत्त्वमसि' इत्यादि महावाक्यांपासून झालेला ब्रह्मसाक्षात्कार मोक्षपर्यवसायी होतो याबद्दल अन्वय व व्यतिरेक दोनहि प्रकारांनी विवेचन.

१७. १८३ जागृति, स्वप्न व सुषुप्ति या अवस्थांचे व अवस्थात्रयांतील आत्मरूपाचे वर्णन.

१८. १८५ मायिक अशा तीन अवस्थांचा द्रष्टा तुरीय, सत्य आहे, शरीराप्रमाणें सर्व विश्व विनाशी आहे. आत्मा हा अनादि, अनंत असा आहे.

१९. १८७ सर्वभासक आत्मा स्वयंप्रकाश, सर्वसाक्षी व निर्विकार - याचे विवेचन.

२०. १८८ आत्मा हा सर्वांपेक्षां प्रिय आहे, तो निर्विकार असल्याने साक्षी आहे. हा तत्त्वमसि या वाक्यांतील त्वंपदाचा अर्थ.

| | | |
|---|---|---|
| २१. | १८९ | महावाक्यांतील तत्पदाचा अर्थ काय याचे विवेचन. |
| २२. | १९१ | तत्पदाला बोधक प्रमाण व त्याच्या स्वरूपाचा विचार. |
| २३. | १९२ | तत्पदाचे संपूर्ण वर्णन. |
| २४. | १९३ | 'तत्त्वमसि' या संपूर्ण वाक्याचा अर्थ सांगण्यास आरंभ. येथे संसर्ग किंवा विशिष्ट हा वाक्यार्थ नाहीं. |
| २५. | १९५ | एकमेव अद्वितीय चैतन्य हा सर्व वाक्याचा अर्थ व त्याच्या ज्ञानाचा उपयोग. |
| २६. | १९७ | तत्पदाचा वाच्यार्थ व लक्ष्यार्थ. |
| २७. | १९८ | त्वंपदाचा वाच्यार्थ व लक्ष्यार्थ. |
| २८. | १९९ | तत् व त्वं या दोन पदांच्या वाच्यार्थांचा विरोध, लक्ष्यार्थ शुद्ध चैतन्य याचे ऐक्य व त्याच्या लाभाने कृतार्थता. |
| २९. | २०० | ब्रह्मज्ञानाने मिळणाऱ्या स्थितीचे वर्णन. |
| ३०. | २०१ | साधकाने ब्रह्मज्ञान होईपर्यन्त श्रवणादि करावे. |
| ३१. | २०२ | श्रवणादि साधनांचा उपोद्घात. जगाचे कारण प्रकृति किंवा परमाणु होऊं शकत नाहींत हे उपपादन. |
| ३२. | २०५ | मायायुक्त ब्रह्मापासून जगाची उत्पत्ति; विवर्तवादाचा स्वीकार. |
| ३३. | २०६ | आत्माच जगाचे विवर्तोपादान आहे याबद्दल 'उपक्रमा सहित उपसंहार' हे तात्पर्यनिर्णयाचे पहिले लिंग. |
| ३४. | २०७ | अभ्यास, अपूर्वता, फल व अर्थवाद हीं चार तात्पर्यलिंगें. |
| ३५. | २०८ | तत्पदार्थ व त्वंपदार्थ यांचे शुद्ध स्वरूप एक सद्रूप तेच कारण अशी उपपत्ति, हे सहावे प्रमाण. याप्रमाणें श्रवणाचे स्वरूप आहे. |
| ३६. | २०९ | मननाचे स्वरूप व त्याचे फल. |
| ३७. | २१० | निदिध्यासनाचे स्वरूप व त्याचे फल. |
| ३८. | २११ | निर्विकल्पक समाधिनिष्ठेचे फल व कारण. |

| | | |
|---|---|---|
| ३९. | २१२ | निर्विकल्पक समाधीच्या शेवटच्या अवस्थेचे महत्त्व. |
| ४०. | २१३ | या शेवटच्या अवस्थेचे, नित्य सावधानता हे कारण व तिचे स्मरणाविषयीं उपपत्ति. |
| ४१. | २१४ | तत्त्वज्ञान हे अज्ञानाचा नाश करून शेवटीं स्वतःहि लीन होते. जाणीव-नेणीवरहित एक आत्मतत्त्वच शिल्लक राहते. |
| ४२. | २१५ | आत्मज्ञान झालेल्या क्षणींच मुक्ति. प्रारब्धानुसार जीवन्मुक्ताचे वर्तन असते. हे अज्ञानांच्या समजुतीकरतां आहे. |
| ४३. | २१६ | योगाने मिळणारी समाधि अवस्था टिकणारी नाहीं. ज्ञानाने मिळणारी नित्य आहे. ती मिळविण्यासच समर्थ असणाऱ्याने भगवान् दत्तगुरूंच्या भक्तिमार्गाचाच अवलंब करावा. |
| ४४. | २१७ | वरील विषयाचे अधिक स्पष्टीकरण. |
| ४५. | २१८ | श्रीदत्तप्रभूंचे कारुण्य. |
| ४६. | २१९ | श्रीदत्तगुरूंनी यदुराजाचा केलेला उद्धार. |
| ४७. | २१९ | सर्व उपनिषदांनी श्रीदत्तस्वरूपाभिन्न परमात्म तत्त्वाचे वर्णन केले आहे. नासदीय सूक्तांत केलेले ते वर्णन. |
| ४८. | २२० | सृष्टीच्या पूर्वी परमात्मा होता याबद्दल वरील सूक्तांचे आधाराने विवेचन. |
| ४९. | २२१ | ऐतरेयोपनिषदात श्रीदत्तपरमात्म्याचे केलेले वर्णन. |
| ५०. | २२३ | ईशावास्योपनिषदात श्रीदत्तप्रभूंचे प्रतिपादन. |
| ५१. | २२५ | केनोपनिषत्प्रतिपाद्य श्रीदत्तात्रेय आहेत. |
| ५२. | २२६ | कठोपनिषदही श्रीदत्तपरमात्म्याचेच प्रतिपादन करते. |
| ५३. | २२७ | प्रश्नोपनिषत्प्रतिपाद्यही श्रीदत्तात्रेयच आहेत. |
| ५४. | २२९ | मुंडकोपनिषदाचाहि प्रतिपाद्य विषय श्रीदत्तात्रेयच आहेत. |

| | | |
|---|---|---|
| ५५. | २३० | मांडूक्योपनिषदातही भगवान् श्रीदत्तच प्रतिपादिले आहेत. |
| ५६. | २३२ | तैत्तिरीयोपनिषत्प्रतिपाद्य श्रीदत्तात्रेयच आहेत. |
| ५७ | २३३ | छांदोग्योपनिषदही अनेक प्रकारांनी श्रीदत्तांचे प्रतिपादन करते. |
| ५८. | २३५ | बृहदारण्यकोपनिषत्प्रतिपाद्य श्रीदत्त परमात्माच आहे. |
| ५९. | २३६ | स्मृति व पुराणांनीहि श्रीदत्तप्रभूचेच प्रतिपादन केले आहे. |
| ६०. | २३७ | मधुकर व अजगर या दोन गुरूंपासून मिळविलेल्या ज्ञानाचा प्रल्हादास उपदेश. |
| ६१. | २३८ | मोक्षसाधक योग मदालसापुत्र अलर्कास सांगितला. |
| ६२. | २३८ | विष्णुदत्त विप्रावर केलेली कृपा. |
| ६३. | २३९ | सकाम अशा आयुराजावर झालेली परम कृपा. |
| ६४. | २४० | पिंगलनाग व श्रीदत्त अवधूत यांचा संवाद. |
| ६५. | २४१ | कार्तवीर्यार्जुनावर केलेली कृपादृष्टि. |
| ६६. | २४१ | साध्य देवांच्यावर केलेला अनुग्रह. |
| ६७. | २४२ | परीक्षा पाहाणाऱ्या दलादन ऋषींना लाभलेली प्रभुकृपा. |
| ६८. | २४३ | श्रीरेणुकामातेवर असणारे श्रीदत्तप्रभूंचे अत्यंत प्रेम. |
| ६९. | २४४ | भगवान् श्रीदत्तगुरूंची दिनचर्या. |
| ७०. | २४५ | निर्गुण निराकार परमात्मतत्त्व हेच श्रीदत्तप्रभूंच्या रूपाने सगुण साकार होऊन जगत्कार्य करते. वास्तविक जगत् हे मायिक मिथ्या असून एक परमात्माच सर्वत्र परिपूर्ण भरून राहिलेला असा सत्य तत्त्व आहे. तोच विश्वरूपाने नटला आहे. जगाच्या आदि, अंतीं, मध्यें तोच एक आहे. त्याच्यावांचून दुसरे कांहींच नाहीं असा उपसंहार. |

# वृद्धशिक्षा

(मराठी अनुवादासहित)

।।ॐ श्रीगणेशाय नमः ।।

श्रीमद्दत्तात्रेयश्रीपादश्रीवल्लभश्रीमन्नृसिंहसरस्वतीचरणारविन्दाभ्यां नमः।

श्रीवासुदेवानंदसरस्वतीयतीश्वरपादपंकजाभ्यां नमः ।

श्रीदत्तं करुणानिधिं नरहरिं श्रीपादराजं विभुम्
काषायांबरदंडमंडितकरं श्रीवासुदेवं यतिम् ।
नत्वा स्वान्तरशुद्धये यतिकृतिं श्रीवृद्धशिक्षामिमां
व्याकुर्वे वचनैर्मुदा ननु महाराष्ट्रीयलोकोचितैः ।।१।।
वासुदेवहृदयं क्व गभीरं मंदधीः शिशुरयं क्व तथापि।
बालकस्य वचनं ननु मातुर्मुग्धमेव रुचिरं जगतीह ।।२।।
याचे साञ्जलिबन्धं यतिपतिपदपंकजं महद्दिव्यम्।
बालोऽयमिति स्खलितं क्षन्तव्यं सकलमेव कृपया मे ।।३।।

अथ श्रीमद्वासुदेवानंदसरस्वतीयतीश्वरविरचितवृद्धशिक्षा
महाराष्ट्रभाषाविवरणायुता प्रारभ्यते ।

यमोमिति पदं व्यस्तं समस्तं च त्रिभिस्त्रिभिः ।
नादैश्चाजं जगौ सोऽव्याच्छ्रीदत्तो विश्वकृत्कविः ।।१।।

अन्वयार्थः-(त्रिभिर्व्यस्तं) अकार, उकार, मकाररूप स्वघटकपदत्रयांनी भिन्नरूपाने स्थित (ॐ इति पदं) ॐ हे पद (त्रिभिर्व्यस्तं) अध्यात्म, अधिदैवत, अधिभूत, विश्व, तैजस प्राज्ञादि तीन प्रकारांनी भिन्नरूपाने स्थित अशा (यं जगौ) ज्या श्रीदत्ताला सांगते झाले (च) आणि (नादैः समस्तं) अकार-उकार-मकाराच्या समासाने युक्त होऊन सूक्ष्मध्वनिरूप नादाने स्थित म्हणूनच समस्त असें ॐ हे पद (समस्तं अजं च) जन्मादिविकारातीत व सर्वात्मक

अशा (यं जगौ) ज्या श्रीदत्ताला सांगते झाले (सः) तो (कविः) सर्वज्ञ (विश्वकृत्) सर्वविश्वसृष्टिस्थितिसंहारकर्ता (श्रीदत्तः) परमात्मा (अव्यात्) आम्हा श्रोत्यावक्त्यांचे संकटांपासून रक्षण करो ॥१॥

भावार्थः- मंगलपूर्वक केलेलीं शास्त्रें निर्विघ्नपणे पूर्ण होतात, त्या शास्त्रांचे अध्ययन अध्यापन करणारे लोक वीर्यवान् व आयुष्मान् होतात. तीं शास्त्रें सर्वत्र प्रसिद्धी पावतात, असें महाभाष्यकारांचे वचन आहे व मंगलाचरणाविषयीं सर्वशिष्ट संप्रदायही आहे, म्हणून ब्रह्मविद्वरिष्ठपरम शिष्टाग्रणी सद्गुरुमहाराजसुद्धां 'यमोमिति' या श्लोकाने आशीर्वाद, नमस्कार व वस्तुनिर्देश अशा मंगलत्रयींपैकीं आशीर्वादात्मक मंगल शिक्षणाकरितां करतात. वास्तविक पाहिले असतां सद्गुरु-महाराजांचे स्मरण करणाऱ्या भक्तांनाहि विघ्नादिकांची बाधा होत नाहीं, मग प्रत्यक्ष सद्गुरूंच्याच ग्रंथांत विघ्ने येतील काय? ग्रंथ समाप्तीला व विस्ताराला पावेल कीं नाहीं अशी शंका असंभवनीयच आहे. परंतु 'यद्यदाचरति' या न्यायाने शिष्टाचारपरिपालनार्थ मंगल केले असें वर वर दाखवून संपूर्ण ग्रंथाने प्रतिपाद्य जें जीव-ब्रह्मैक्य त्याचे उपासनापूर्वक ज्ञान या श्लोकांत सूत्ररूपाने प्रगट केले आहे व उत्तर मीमांसेच्या चारी अध्यायांचे तात्पर्यहि यांत सांगितले आहे पुढील सर्व श्लोक या श्लोकाचे व्याख्यानभूत आहेत असें म्हटले तरी चालेल.

येथपर्यंत पूर्वपीठिका झाली; आतां श्लोकार्थाकडे वळूं. श्लोक म्हणजे पदसमुदायात्मक वाक्यरूप असतो. पदांतहि रूढ, यौगिक, योगरूढ, व यौगिकरूढ असे चार प्रकार आहेत. गोपद हे रूढ आहे; म्हणजे या पदांतील गम् धातु व डो प्रत्ययांच्या अर्थाने गच्छतीति गौः अशी व्युत्पत्ति विवक्षित नाहीं. पाचक हे पद यौगिक आहे. पचति म्हणजे पाक करतो तो पाचक होय. पंकज हे पद योगरूढ आहे म्हणजे पंकात् म्हणजे चिखलापासून ज म्हणजे उत्पन्न झालेले, असा योग व पद्मत्वजातियुक्त असा पंकज या संपूर्ण पदाचा रूढ अर्थ, असे दोन्ही अर्थ विवक्षित आहेत, म्हणजे पंकज पदाने चिखलांत उत्पन्न झालेले पद्म असा बोध होतो. त्या

मुळें या पदाने पद्मत्वजातिरहित अशा चिखलांत उत्पन्न झालेल्या बेडकाची किंवा पद्मत्वजातियुक्त परंतु स्थलांत उत्पन्न झालेल्या कमलाची व्यावृत्ति होते. यौगिकरूढ असें उद्भिद् हे पद आहे. या पदाने योगार्थाने वृक्षादि अर्थाचा बोध होतो व रूढीने यागविशेषाचा बोध होतो. प्रकृतस्थलीं ॐ हे पद योगरूढ आहे, म्हणजे या पदाच्या अवयवाचा अर्थ व समुदायाचा अर्थ अर्थात् योगार्थ व रूढ्यर्थ मिळून एकच अर्थ पंकज पदाप्रमाणे होतो. ॐकार हे नैयायिकांच्या मते वाक्यरूप आहे व पाणिनीच्या मते पदरूपहि आहे. या ॐकारांत साडेतीन पदें अथवा मात्रा घटक आहेत. 'अ'कार हे पहिले, 'उ'कार दुसरे, 'म'कार तिसरे व ँ अशा आकाराचे चौथे पद. या चौथ्या अर्धमात्रारूप पदालाच 'नाद' अशी संज्ञा आहे. प्लुत ओंकाराचा उच्चार केला म्हणजे हा नाद अनुभवाला येतो, तो वास्तविक एकच असला तरी अणु-अणुतर-अणुतम अशा भेदाने बहुत्वालाहि प्राप्त होतो; म्हणून श्लोकांत नादैः अशा बहुवचनाने अर्धमात्रेचे निरूपण केले ते योग्यच आहे. प्लुत उच्चाराने नादस्वरूपाने परिणत झालेल्या अकार-उकार-मकार या वर्णत्रयीलाच अर्धमात्रा, नाद, ध्वनि, समस्त पद अशा संज्ञा आहेत. या समस्त पदाचाच तुरीयत्वोपहित वाच्यार्थ व पदुपलक्षित लक्ष्यार्थ आहे.

प्रत्येक प्राणिमात्राच्या शरीरांत चक्षुरादि इंद्रियांचा जो समुदाय आहे त्याला 'अध्यात्म' अशी संज्ञा आहे. येथे आत्मशब्दाने देह विवक्षित असल्याने आत्मनि म्हणजे देहांत राहणारे ते 'अध्यात्म', म्हणजे इंद्रियें असा अर्थ होतो. या इंद्रियांच्या सर्व विषयांना 'अधिभूत' अशी संज्ञा आहे. या इंद्रियांवर अनुग्रह करणाऱ्या ज्या सूर्यादिदेवता यांना 'अधिदैव' अशी संज्ञा आहे. भिन्न भिन्न उपाधींच्या योगाने आकाशाप्रमाणे भिन्न-भिन्न दिसणारे ब्रह्म वस्तुतः एकच आहे. हा अध्यात्मादि सर्व भेद कल्पित आहे. तसेंच व्यष्टि म्हणजे एक व्यक्ति व समष्टि म्हणजे अनेक व्यक्तींचा समुदाय अशा काल्पनिक भेदानेहि अद्वितीय ब्रह्म भिन्न रूपाने भासते. या व्यष्टि समष्टीला पिंड व ब्रह्मांड अशा संतांच्या वाङ्मयांत संज्ञा आहेत. व्यष्टिस्थूलदेह, समष्टिस्थूलदेह, व्यष्ट्य

भिमानी विश्व, समष्ट्यभिमानी वैश्वानर, त्यांच्या अवस्था वगैरे जे इतर प्रकार, हे सर्व अकाराचे वाच्यार्थ आहेत व या उपाधीने उपलक्षित शुद्ध चैतन्य हा लक्ष्यार्थ आहे. व्यष्टिसूक्ष्मदेह तदभिमानी तैजस, समष्टिसूक्ष्मदेह, तदभिमानी हिरण्यगर्भ, त्यांच्या अवस्थादि हे सर्व उकाराचा वाच्यार्थ व या उपाधीने उपलक्षित शुद्ध चैतन्य हा लक्ष्यार्थ होय. व्यष्टि अज्ञान किंवा कारण देह, तदभिमानी प्राज्ञ, समष्टी माया, तदभिमानी ईश्वर, त्यांच्या अवस्थादि हे सर्व मकाराचा वाच्यार्थ व या उपाधीने उपलक्षित शुद्ध चैतन्य हा लक्ष्यार्थ. नादरूप अर्धमात्रा या स्वरूपाने समस्त म्हणजे समासयुक्त असणारे ॐ हे पद व्यष्टींत-विश्वतैजसप्राज्ञानुगतत्व विश्वतैजसप्राज्ञाच्या अपेक्षेने चतुर्थत्व -धर्माने उपहित प्रत्यक् बोध म्हणजे जीवचैतन्यरूप वाच्यार्थाला सांगते व या सर्वानुगतत्वादिधर्माने उपलक्षित शुद्धचैतन्यरूप लक्ष्यार्थाला सांगते. समष्टींत विराट्-हिरण्यगर्भ-ईश्वरानुगतत्व विराड़ादिकापेक्षया चतुर्थत्वधर्मांनी उपहित अद्वयानंदरूपवाच्यार्थाला व याच धर्माने उपलक्षित शुद्धचैतन्यरूप लक्ष्यार्थाला सांगते. पंकज पदांत अवयवशक्तीने कर्दमोत्पन्न व रूढीने पद्मत्वजातिविशिष्ट अशा दोन अर्थांचा ऐक्यरूप संबंध दाखविला जातो किंवा 'तत्त्वमसि' इत्यादि महावाक्यांत ज्याप्रमाणे तत्त्वंपदार्थांच्या ऐक्यांत तात्पर्य असते, तद्वतच ॐ या पदांत अवयवशक्तीने विश्वविराट् यांचे ऐक्य करून, स्थूलप्रपंचोपहित चैतन्य अकाराचा वाच्यार्थ व शुद्ध लक्ष्यार्थ; तैजस व हिरण्यगर्भ यांचे ऐक्य करून, सूक्ष्मप्रपंचोपहित चैतन्य उकाराचा वाच्यार्थ व शुद्ध लक्ष्यार्थ; प्राज्ञ व ईश्वर यांचे ऐक्य करून, स्थूल व सूक्ष्म प्रपंचाला कारणीभूत मायोपहित चैतन्य मकाराचा वाच्यार्थ व शुद्ध लक्ष्यार्थ; हा सर्व ॐ काराचा अवयवार्थ म्हणजे पंकजपदांत पंकात् जात कर्दमजन्य या स्थानी किंवा तत्त्वमसींतील त्वं पदार्थस्थानी झाला. तुरीयत्व सर्वानुगतत्व म्हणजे सर्वात्मकत्व वगैरे धर्माने उपहित चैतन्य हा अर्धमात्रारूप समस्त पदाचा रूढ्यर्थ पंकज पदांत पद्मत्वविशिष्ट हा जसा रूढ्यर्थ आहे त्याप्रमाणे, व तत्त्वमसींतील तत्पदार्थस्थानापन्न असा झाला. याच धर्माने उपलक्षित

लक्ष्यार्थ झाला. ॐकाराच्या लक्ष्यभूत अवयवार्थाचे व लक्ष्यभूत अर्धमात्रारूप समस्त पदार्थांचे ऐक्यज्ञान झाले, म्हणजे वेदांत जेवढीं महावाक्यें आहेत त्या सर्वांचा शाब्दबोध झाला असें होते; म्हणून सर्व महावाक्यांचा मूलभूत जो ॐकार याचाच ग्रंथारंभीं ग्रंथकाराने निर्देश केला आहे. समस्त व त्रिविध भेदांनी भिन्न, सर्वज्ञ सृष्टिस्थितिलय-कारण अशा ज्या श्रीदत्ताला समस्त व व्यस्त असें ॐ हे पद निरूपण करते तो श्रीदत्त अविद्याकामकर्मादि अनेकविध संकटांपासून आम्हां श्रोत्या-वक्त्यांचे रक्षण करो हे तात्पर्य.॥१॥

**सर्वाभयप्रदः सर्वन्यासपूर्कमग्रजः ।**

**यदाश्रितोऽप्यसम्पद्यं याति दत्तं भजामि तम् ॥२॥**

अन्वयार्थः- (सर्वन्यासपूर्वकं) सर्वत्यागपूर्वक (सर्वाभयप्रदः) सर्व प्राण्यांना अभय देणारा (अग्रजः) ब्राह्मण (असंपदपि) साधनचतुष्टयसंपत्तिरहित असाहि (यं) ज्या दत्ताचा (आश्रितः) आश्रय करणारा (यं) ज्याच्या स्वरूपाप्रत (याति) अभेदाने प्राप्त होतो (तं) त्या (दत्तम्) दत्ताप्रत (भजामि) मी भजतों॥२॥

भावार्थः- 'शुभ कार्यांत विघ्ने फार' या न्यायाने सर्व विघ्नध्वंसार्थ आणखी दोन श्लोकांनी मंगल करतो, असें शिष्टाचारानुसाराने दाखवून दुसऱ्या व तिसऱ्या श्लोकांत या वृद्धशिक्षारूप ब्रह्मजिज्ञासेला अधिकारी कोण आहे हे गुरु महाराज स्पष्ट करतात. या मर्त्य लोकांतील पुत्र-धनादिसाध्य नाना प्रकारची सुखे व यज्ञादि पुण्यकर्मसाध्य स्वर्गादिब्रह्मलोकांपर्यंत दिव्य लोकांतील सुखे स्वार्थाकरितां संपादन करीत असतां सर्व भूतांना फार पीडा होते, असा विचाराने निश्चय झाल्यामुळें हीं क्षयिष्णु व परपीडाकारक सर्व सुखे व तत्साधने मनःपूर्वक टाकून आब्रह्मस्तंबपर्यंत सर्वभूतांना ज्याने अभय दिले आहे असा ब्राह्मण अर्थात् विधिपूर्वक सर्वकर्मसंन्यास केलेला चतुर्थाश्रमी, नित्यानित्यविवेकादिसाधनचतुष्टयसंपत्ति नसतांहि ज्या श्रीदत्ताचे अनन्य भावाने संकीर्तन नामस्मरणादि भजन करून, तदेकनिष्ठ तदाश्रित होतो, तो सुद्धां त्या परब्रह्म अखंड श्रीदत्तस्वरूपाला प्राप्त होतो, अर्थात्

मुक्त होतो अशा त्या परब्रह्म परात्पर व करुणासागर श्रीदत्ताचे मी भजन करतों।।२।।

**षट्कर्ता षड्विहीनो यं श्रितः पावनभावयुक् ।**
**याति मन्दविरागोऽपि यं तं दत्तगुरुं भजे ।।३।।**

अन्वयार्थः- (षट्कर्ता) भिक्षाटनादि सहा कर्मे करणारा, (षड्विहीनः) पातित्यहेतु मंचकादि सहा पदार्थांचा त्याग करणारा, (मंदविरागोऽपि) अल्प वैराग्यशीलसुद्धां (पावनभावयुक्) परमपवित्र परमात्म्याच्या शुद्ध भक्तीने युक्त असा संन्यासी (यं श्रितः) ज्याचा सेवक झाला असतां (यं याति) ज्याला प्राप्त होतो (तं दत्तगुरुं) त्या दत्तगुरूला (भजे) मी भजतों ।।३।।

भावार्थः- पूर्व श्लोकांत वर्णिलेल्या भगवदाश्रित संन्याशाने आश्रमनिषिद्ध कर्मांचा त्याग करून, स्वाश्रमाला विहित अशीं शास्त्रोक्त कर्मे अनासक्तीने शिष्टाचारपरिपालनार्थ करावीं हे मंगलश्लोकाच्या मिषाने दाखवितात. ज्याच्या चित्तांत विषय-वैराग्य मंद असेल अशा ब्राह्मणाला कुटीचकादि चार संन्यासांपैकीं कोणत्याच संन्यासाचा अधिकार नाहीं. इतकेंच नव्हे, तर असा अनधिकाऱ्यांनी संन्यास ग्रहण केला तर त्यांना अधोगति होते, असें जें शास्त्र आहे, ते केवळ उदरंभरणादिकांकरितां संन्यास घेणाऱ्यांच्या निषेधाकरितां आहे. विषयांमध्यें पूर्ण आसक्तीहि नाहीं व तीव्र वैराग्य नसल्याने अनासक्तीहि नाहीं अशा अर्धवट स्थितींत असलेल्या; "देवा ! या विषय-पंकांतून काढून माझें कल्याण कर," म्हणून अनन्यभावाने भगवदाश्रय करणाऱ्या संन्याशाच्या निषेधाकरितां नव्हे. 'अपि चेत्सुदुराचारः' अशा भगवद्वचनाने दुराचारीहि भगवद्भक्तीचा अधिकारी होतो असें सांगितले आहे; मग मंद विरागी भक्तीचा अधिकारी होतो हे काय सांगावे? अशा संन्याशाला श्रवणादिपूर्वक ज्ञानप्राप्तीचा अधिकार जरी संन्यासग्रहणकालीं नसला, तरी निषिद्धवर्जनपूर्वक आश्रमविहित कर्मानुष्ठान व भगवद्भक्ति करीत राहिल्यास ज्ञानलाभयोग्यतादि सर्व क्रमाक्रमाने होणार आहे. म्हणून रोज स्वशाखोपनिषत्, विष्णुसहस्रनाम, गीता, रुद्र,

पुरुषसूक्त, प्रणव व इतरही भगवन्नामाचा जप, स्नान, बाह्याभ्यंतरशुद्धि, देवतार्चन, ध्यान, भिक्षाटनहीं सहा कर्मे भगवदाज्ञापरिपालन बुद्धीने करणारा व शुक्ल वस्त्र परिधान करणे, पलंग वापरणे, बायकांसंबंधी वार्तालाप करणे, इंद्रियविषयाबद्दल लोलुपता बाळगणे, दिवसा निजणे, गाडी, घोडा वगैरे यानसाधन वापरणे अशा सहा शास्त्रनिंद्य कर्मांचा त्याग करणारा मंदवैराग्यशाली संन्यासीसुद्धां ज्या श्रीदत्तगुरूंच्या भक्तीने, सेवेने दत्तगुरुस्वरूप होतो त्या सद्‌गुरूचे मी भजन करतों ॥३॥

**सर्वात्मेशस्य हृत्स्थस्यास्तान्यभावो यमातिगः ।**
**उत्स्वभावोऽनृणो भक्तः प्रियो यस्य नमामि तम् ॥४॥**

अन्वयार्थ :- (हृत्स्थस्य) हृदयांत वसणाऱ्या, (सर्वात्मेशस्य) सर्वात्म स्वरूप व सर्वेश्वरस्वरूप असणाऱ्या (यस्य) ज्या श्रीदत्ताचा (अस्तान्यभावः) हे सर्व जगत् भगवद्रूप आहे अशा भावनेने त्यक्तभेदबुद्धि असा (उत्स्वभावः) उत्कृष्ट आहे स्वभाव ज्याचा असा (यमातिगः) मृत्यूचे किंवा भजनानंदात निमग्न असल्याने यमनियमांचेहि अतिक्रमण करणारा (प्रियो भक्तः) आवडता भक्त (अनृणः) देवऋषिपितृऋणरहित होतो (तं नमामि) त्या श्रीदत्ताला मी नमस्कार करतों ॥४॥

भावार्थः- श्रौतस्मार्तादि सर्व कर्मांचा परित्याग चित्तांत तीव्र वैराग्य नसतांहि करून, भगवदेकशरण संन्यासी भगवद्‌भजनाने मुक्त होतो, असें पूर्वी सांगितले. परंतु "ब्राह्मण जन्मल्याबरोबरच देव, ऋषि व पितर यांच्या ऋणांनी युक्त असतो, तो यज्ञादिकाने देवांचे, स्वाध्यायाध्ययनाने ऋषींचे व प्रजोत्पादनादिकाने पितरांचे ऋण फेडल्याशिवाय, जर मोक्षाविषयीं प्रयत्न करूं लागेल, तर अधोगतीला जातो" असें श्रुतिस्मृत्यादिग्रंथात सांगितले असल्यामुळें ते आपले सांगणे योग्य नाही अशी शंका घेऊन, श्रीदत्तभक्त संन्याशाला हा ऋणत्रयापाकरणाचा नियम लागू नाहीं असें दाखवीत, श्रीदत्तनमस्कारात्मक मंगल, विघ्नसंभावनेने या चतुर्थ श्लोकांत ग्रंथकार करतात. ऋणत्रयापाकरणाने ज्या देव-ऋषि-पितरांचा संतोष जायमान ऋणी

ब्राह्मणाने करावयाचा, त्या सर्वांचा अन्तरात्मा व मालक श्रीदत्तच आहे व तो हृदयस्थ-अति निकट, असल्याने त्याचे भजन अत्यंत सुलभ व सर्वांचा संतोष करणारे असें आहे. कारण सर्व प्राणिमात्र त्याचीच प्रजा आहे व तो सर्वांचे मूळ कारण आहे. ज्याप्रमाणे झाडाच्या मुळाला पाणी न घालतां पत्रपुष्पादिकांवर पाणी शिंपणे, वृक्षाच्या कोणत्याहि भागास संतोषकारक नाहीं; त्याप्रमाणे सर्वांचा मूळ पुरुष व भजनप्रिय अशा श्रीदत्ताचा भजनाने संतोष न करतां, देवादिकांचा संतोष करण्याचा यत्न व्यर्थ आहे. श्रीदत्ताचा संतोष करणारा मात्र सर्वांचा संतोष करतो. तो सर्वात्म्याचे भजन करीत असल्याने त्याच्या मोक्ष-मार्गांत कोणीहि विघ्नें करूं शकत नाहीत. कदाचित् विघ्न आल्यास त्याचे दूरीकरण करण्यासाठी परमात्मा सदैव सिद्ध असतो. हा भजक लवकर संत पदवीला पोंचतो. सर्व वस्तु परमात्म स्वरूपच आहेत असा याचा दृढ निश्चय असल्याने हा नेहमीं अभय अवस्थेंत असतो. कदाचित्, दैववशात् याचेकडून विहितकर्म झाले नाहीं किंवा कांहीं प्रमाद घडला तर हृदयांतरवासी भजनसंतुष्ट परमात्मा तात्काळ ते पाप नाहींसें करतो. ईश-भक्ताच्या वाऱ्यालासुद्धां राहूं नका अशी यम-धर्माची आपल्या दूतांना आज्ञा असल्याने, यमधर्मादिकांच्या दंडाचीसुद्धा श्रीदत्तभक्ताला भीति नाही. पापक्षयाच्या उद्देशाने हा भक्त जरी भगवद्भजन करीत नसला, कारण भगवत्प्रीति हेच त्याच्या भजनाचे उद्देश्य असते, तरी भजनप्रभावाने याची सर्व पापें लयाला जाऊन, ज्या या श्रीदत्ताचा प्रिय भक्त सर्व ऋणांपासून भजन-वैभवाने मुक्त होतो, त्या श्रीदत्तप्रभूला अनन्यभावाने माझा नमस्कार असो ।।४।।

**उपाधिनाऽऽत्मनानात्वं कर्तृतां वीक्ष्य भोक्तृताम् ।**
**विशारदोऽप्यनित्यत्वं लोककालागमात्मनाम् ।।५।।**
**ततो निर्विद्य संन्यस्य प्रवृत्तिं प्रेयसीमपि ।**
**विशारदं ब्रह्मनिष्ठं श्रोत्रियं गुरुमाश्रयेत् ।।६।।**

अन्वयार्थः- (विशारदः) स्वकार्यकुशल मुमुक्षूने, (उपाधिना)

अविद्यारूप उपाधीने आत्म्याचे अनेकत्व, (उपाधिना कर्तृतां भोक्तृतां वीक्ष्य) विज्ञानमयकोशरूप उपाधीने जिवाला कर्तृत्व व आनंदमय कोशरूप उपाधीने त्याला भोक्तृत्व आहे, असें विचाराने निश्चित करून, (लोककालागमात्म नामपि) स्वर्गादिलोक, स्वर्ग-सुखोपभोगकाल, स्वर्गसाधनकर्मबोधकवेद, शरीराद्यनित्योपाधि-युक्त जिवात्मे या सर्वांचेही (अनित्यत्वं वीक्ष्य) विचाराने अनित्यत्व निश्चित करून (ततः निर्विद्य) त्या सर्वांपासून विरक्त होऊन (प्रेयसीमपि प्रवृत्तिं संन्यस्य) अत्यंत प्रिय असणाऱ्याही आपल्या कर्ममार्गाकडील प्रवृत्तीला सोडून (श्रोत्रियं) शास्त्रनिष्णात (ब्रह्मनिष्ठं) ब्रह्मसाक्षात्कार झालेल्या (विशारदं) दृष्टांतादिकांनी शिष्याला तत्त्व पटवून देणाऱ्या अशा (गुरुं) गुरूला (आश्रयेत्) शरण जावे॥५॥६॥

भावार्थः- संन्यासाश्रमाविषयीं वेदांत विधान नाहीं, परंतु लोकांत संन्यासाश्रमपरंपरा अव्याहत चालू आहे ती केवळ अंधपरंपरा आहे, अशा जैमिनि-मताचा अनुवाद करून, चार सूत्रांनी संन्यास, श्रुत्यादिप्रमाणसिद्ध आहे, असा बादराणाचार्यांनी दिलेला संन्यासनिर्णय प्रगट करण्याकरतां, मुमुक्षूने अत्यंत प्रिय असलेला प्रवृत्तिमार्ग सोडून, संन्यासपूर्वक निवृत्ति मार्गाचे अवलंबन करून, सद्गुरूला शरण जावे, हे या पांच व सहा अशा दोन श्लोकांत उपपत्तिपूर्वक ग्रंथकार दाखवितात.

प्रत्येक शरीरांत इदंरूप जडापेक्षां विलक्षण म्हणजे अहंरूपाने भासणारा आत्मा नित्य व प्रति शरीरांत भिन्न असा आहे. स्वर्गादि उपभोग्यविषय व तत्साधनभूत कर्म-वेद वगैरे पदार्थांचा प्रलयांत लोप होत असला तरी पुन्हां त्यांचा प्रादुर्भाव होत असल्याने, ते प्रवाहाप्रमाणे नित्यच आहेत, म्हणून त्याविषयीं वैराग्य होणे संभवनीय नाहीं. सुख-तत्साधनादि पदार्थ अनादि कालापासून या जगांत आहेत व अनंत कालपर्यंत ते असेच प्रवाहरूपाने राहणार. यांचा अत्यंत उच्छेद कधींहि संभवनीय नाहीं. जगत्सृष्टिस्थितिलयकर्ता सर्वेश्वर कोणी आहे, याबद्दल प्रमाण नाहीं. धर्मच फलदाता आहे. आत्मा ज्ञानस्वरूप नसून इंद्रियादिद्वारां होणाऱ्या ज्ञानाचा

आश्रय आहे. सुषुप्त्यवस्थेंत इंद्रियादिकांचा लय झाला म्हणजे आत्मा जडमूढ अशा अंधःकारमय अवस्थेंत असतो, असें आपण रोज पाहतों. वेदान्तिसम्मत मुक्तिदशेंत जर असेच इन्द्रियादिक नसतील, तर ती मुक्ति-अवस्था म्हणजे एक क्षयरोगच आहे. हा क्षयरोग होण्याकरितां सुखमय सर्व प्रपंच सोडून ब्रह्मचर्यादि कष्टमय साधनाने परम कठीण अशा गुरुसेवेत ज्ञानाकरतां आपले अमूल्य आयुष्य व्यतीत करणारे लोक मनुष्यकोटींत गणना करण्यास योग्य नाहींत; अशा जैमिनिमतानुयायांच्या शंकेला उत्तर देण्याकरितांही हे दोन श्लोक सिद्धांत्याचे आहेत. त्यांचे थोडक्यांत म्हणणे असें आहे-जर जिवात्मे उपाधीचा आश्रय न करतां वस्तुतःच भिन्न भिन्न असतील, इंद्रियादिक साधनाने ज्ञानरूप परिणामाला ते आत्मे पावत असतील, कर्तृत्वभोक्तृत्व हा त्यांचा वास्तविक धर्म असेल, जग हे पारमार्थिक सत्य असेल व जगत्सृष्टिस्थितिलयकर्ता ईश्वर नसून धर्मच आहे असें सिद्ध होईल, तर मुक्ति हा क्षय रोग आहे असें म्हणणे व तदर्थ यत्न करणारे अमनुष्य असें तत्त्व सिद्ध होईल; परंतु यांपैकीं एकहि गोष्ट प्रमाणांनी सिद्ध नाहीं. अतींद्रियार्थाचे सूर्यप्रकाशाप्रमाणे स्पष्ट ज्ञान करून देणारी श्रुति व तदनुगृहीत तर्काने विचार केला असतां प्रत्ययाला येणारे जिवात्म्यांचे नानात्व घटमठाद्युपाधीने भासणाऱ्या आकाशाच्या भेदाप्रमाणे औपाधिक आहे. विज्ञानमयकोशाच्या तादात्म्यामुळें त्याला कर्तृत्व व आनंदमय-कोशाच्या तादात्म्याने भोक्तृत्व भासते. जपाकुसुमोपाधीच्या संसर्गाने भासणारा स्फटिकाचा लालपणा जसा औपाधिक, तसेंच अज्ञान व कोशरूप उपाधीने अनेकत्व, कर्तृत्व, भोक्तृत्व, अनित्यज्ञानत्व हे जीवात्म्यावर सर्व औपाधिक आहे. वास्तविक नित्य एक सच्चिदानंदरूप असा हा आत्मा आहे व त्याच्या या वास्तविक स्वरूपाच्या अज्ञानामुळें निर्माण झालेली ही सर्व सृष्टि शुक्तीवर भासणाऱ्या रजताप्रमाणे मिथ्या आहे. अचेतन अतएव देशकालअवस्थादि ज्ञानरहित असा धर्म; सर्वज्ञ, सर्व शक्ति, चेतन ईश्वराच्या प्रेरणेशिवाय देशकाल अवस्थादि सापेक्ष स्वर्गादि फलोपभोग देऊं शकत नसल्याने तशा सर्वज्ञ, सर्व-शक्ति ईश्वराचीहि

आवश्यकता आहे. 'नासदासी' दित्यादि श्रुतीमध्यें प्रलय व उत्पत्त्यादिकांचे वर्णन असल्यामुळें अविद्या असे तोंपर्यंत देश, काल, आगम व विशिष्ट जिवात्म्यांना ऊर्णनाभिप्रमाणे अव्यक्त रूप मायेंत लीन करून पुन्हां बाहेर काढणारा ईश्वर, मायिक जगाचा उपादान व निमित्त कारण असा आहे. आत्मे जरी नित्य असले तरी उपाधींच्या नाशाने प्रलयांत त्यांचाहि नाश होतो असें या श्लोकांत सांगितले आहे. स्वरूपतः तो परब्रह्मच असल्याने कधींहि नष्ट होत नाहीं. केलेले शुभाशुभ कर्म ज्ञानाशिवाय समूळ नष्ट होत नाहीं. ते आपले फळ देण्याकरितां सदैव जागृत असते. "सुख पाहतां जवापाडें दुःख पर्वताएवढें" या न्यायाने सर्व प्रपंच दुःखमयच आहे. म्हणून अत्यंत प्रिय असणारा कर्मकांडात्मक प्रवृत्तिमार्ग वैराग्यपूर्वक सोडून स्वार्थसाधनतत्पर अशा मुमुक्षूने शब्दब्रह्म व परब्रह्मांत निष्णात, लौकिक दृष्टान्तादिकांनी व शक्तिपातांनी सर्वानर्थमूळ अज्ञान निवृत्त करण्यास समर्थ अशा सद्‌गुरूंचा आश्रय करावा असें ठरते ।।५-६।।

**भक्त्या गुरुमुपासीनः श्रद्धालुस्तत्परो वशी ।**
**स्थेयःशमोऽनन्यधिया श्रवणादि ततश्चरेत् ।।७।।**

अन्वयार्थः- (भक्त्या) गुरू प्रत्यक्ष ईश्वर आहेत अशा भावनेने (गुरुं) आपल्या गुरूंच्या (उपासीनः) सर्वदा जवळ असणाऱ्या (श्रद्धालुः) आस्तिक्य बुद्धियुक्त (तत्परः) गुरु किंवा ब्रह्मतत्पर (वशी) जितेन्द्रिय (स्थेयःशमः) अत्यन्त स्थिर, शान्तियुक्त अशा मुमुक्षूने (अनन्यधिया) श्रवणादिकालीसुद्धां मी ब्रह्माहून अभिन्न आहे अशा बुद्धीने (ततः) त्या सद्‌गुरूपासून (श्रवणादि) श्रवण, मनन व निदिध्यासन (चरेत्) करावे ।।७।।

भावार्थः- पूर्व श्लोकांत सांगितल्याप्रमाणे सद्‌गुरूला शरण गेल्यावर तेथे काय करावे हे या श्लोकांत सांगतात. सच्छिष्यांनी सद्‌गुरूचा आश्रय केल्यावर, ईश्वरच गुरुरूपाने प्रगट झाला आहे अशी भावना दृढ धरून नेहमीं सद्‌गुरूंच्या सेवेत, नमस्कारात व सान्निध्यांत तत्पर असावे. प्रसंगविशेषीं मनांतील शंकाहि विचाराव्या. गुरूच्याजवळ योग्य स्थळी दृढासनबद्ध असावे.

चांचल्य टाकून द्यावे. गुरुवाक्य म्हणजे प्रत्यक्ष श्रुतीच आहे, अशी भावना ठेवावी. जिंकण्याकरितां किंवा गुरूला अडविण्याकरितां कांहींहि विचारूं नये. जिज्ञासुपणाने ब्रह्मज्ञान करून घेण्याविषयीं तत्पर असावे. रसनेंद्रियप्रभृति सर्व इंद्रियें आपल्या स्वाधीन ठेवावीं; तदधीन होंऊ नये. विवेक - वैराग्यादि पूर्वांग व दमउपरत्यादि उत्तरांगासहित शांतीचे स्थैर्य वारंवार अभ्यासाने चित्तांत करावे. इतकी सर्व पूर्व तयारी झाल्यावर सर्व साधनांपेक्षां अत्यंत अंतरंग अशा श्रवण, मनन निदिध्यासनरूप साधनांचा गुरूंच्या सांगण्या प्रमाणे अभ्यास करावा. स्वतःच्या स्वतंत्र बुद्धीने त्यांत काहीं कमीजास्त करूं नये. श्रवण व मनन यांचाच पुष्कळ अभ्यास करावा. आपल्या वर्णाचा, जातीचा, कुळाचा व देहाचा अभिमान जर श्रवण-मननाने शिथिल झाला नसेल, तर पुष्कळ काळ निदिध्यासनच करावे. परमेश्वर कृपेने दृढ वैराग्यद्वारा अहंकार शिथिल झाला असल्यास, या साधनांचे स्वल्पानुष्ठान केले तरी चालेल. एकंदरीत आपले दोष किती गेले, किती शिल्लक आहेत, आपण कोठवर आलों, अद्यापि किती मार्ग आक्रमण करावयाचा आहे इत्यादि पूर्वापरविचारपूर्वक श्रवणादि साधनानुष्ठान गुरुसान्निध्यांत, गुरुवाक्यानुसारे मुमुक्षूने तत्पर होऊन करावे ॥७॥

**पापहृत्कृच्छ्रफलदशाब्दज्ञानं तु संशयान् ।**
**निवर्तयेत्स्वयं नश्येदसत्त्वावरणं तदा ॥८॥**

अन्वयार्थः- (पापहृत्) पापनाशक (कृच्छ्रफलदशाब्दं ज्ञानं तु) कृच्छ्राचे फल देणारे शब्दापासून झालेले ब्रह्माचे परोक्षज्ञान, तर (संशयान् निवर्तयेत्) सर्व संशयाला दूर करील (तदा) त्या वेळीं (असत्त्वावरणं) ब्रह्म नाहीं असें भासविणारे अज्ञानकृत आवरण (स्वयं नश्येत्) आपोआपच नष्ट होईल ॥८॥

भावार्थः- पूर्वश्लोकांत ब्रह्मज्ञानाकरितां गुरुमुखाने श्रवणादि साधने करावीं असें सांगितले, परंतु कृच्छ्रादिकांच्या अनुष्ठानाने चित्तांतील पाप नष्ट झाल्याशिवाय ज्ञान उत्पन्न होत नाही असा शास्त्रसिद्धांत असल्याने

पापनाशक कृच्छ्रादि अनुष्ठान सोडून श्रवणादि करणे व्यर्थ आहे, अशी शंका घेऊन तिचे समाधान या श्लोकांत करतात. पापनाशाशिवाय ज्ञान होत नाहीं, हा पूर्वपक्षांनी सांगितलेला शास्त्र-सिद्धान्त सिद्धान्त्यालाहि मान्य आहे. भक्तियुक्तान्तःकरणाने गुरुमुखांतून केलेले वेदान्त-श्रवण प्रतिदिवशीं ऐंशी कृच्छ्राच्या फळाला देते, अशी स्मृति असल्याने श्रवणादि साधन करणाऱ्या मुमुक्षूला कृच्छ्राचे अनुष्ठान सहज घडत असल्याने ज्ञानप्रतिबंधक पापांचा नाश त्यांना अनायासेंच सिद्ध आहे. ज्ञानाग्नि सर्व कर्मांचे भस्म करून टाकतो अशी भगवद्गीता (सांगत) असल्याने, श्रवणादिकांपासून झालेले परोक्षब्रह्मज्ञानसुद्धां सर्व पापांचा नाश करीत असल्याने, त्याला पापनाशाकरितां इतर अनुष्ठानांची आवश्यकता नाही.

'ज्ञानाग्निः सर्वकर्माणि' या स्मृतींत ज्ञानशब्दाने अपरोक्ष साक्षात्काराचाच बोध होतो; कारण भगवत्पादांनी स्वप्नांतून जागा झालेल्या माणसाला ज्याप्रमाणे स्वप्नांतील पातकांची बाधा होत नाही, त्याप्रमाणे अविद्या निद्रेतून जागा झालेल्याला, म्हणजे ब्रह्मसाक्षात्कारी पुरुषाला कांही पातक राहत नाहीं, असें निरूपण केले आहे. म्हणून शब्दापासून होणाऱ्या परोक्ष ज्ञानाने पातकांचा नाश होत नाही, अशीहि शंका अयोग्य आहे. कारण विद्यारण्यांनी, परोक्षब्रह्मज्ञान, बुद्धिपूर्वक केलेल्या सर्व पातकांचे भस्म करते व गुरूंनी सांगितलेल्या महावाक्यापासून झालेल्या ब्रह्मसाक्षात्काराने सर्व संसारमूलकारण अविद्येचा नाश होतो असें स्पष्ट सांगितले असल्यामुळें 'ज्ञानाग्निः' या स्मृतींत ज्ञानपदाने परोक्ष ज्ञानही घेण्यांस कांही हरकत नाही. हे परोक्षज्ञान पापनाशक आहे. इतकेच नव्हे तर इहलोक, परलोक व सुख इत्यादी सर्व कल्याणांचा उच्छेद करणाऱ्या, आत्मा देहाहून अतिरिक्त आहे, कां देह म्हणजेच आत्मा इत्यादि शेंकडो संशयांनाही नाहीसें करते. ब्रह्म नाही असा भ्रम करणारी जी अज्ञानाची असत्त्वावरण नांवाची शक्ति ती सुद्धां या परोक्ष ज्ञानाने नष्ट होते. ब्रह्मसाक्षात्कार नसला तरी ब्रह्म आहे असा दृढ निश्चय श्रवणपूर्वक परोक्ष ज्ञानाने होत असल्याने, ब्रह्म

साक्षात्काराकरितां मुमुक्षु मनन व निदिध्यासनाकडे स्वतःच प्रवृत्त होईल. अतएव अत्यंत उपयोगी अशा परोक्षज्ञानाचे साधन जें श्रवणादि, त्यांचे अनुष्ठान मुमुक्षूने इतर सर्व व्यापार टाकून गुरुशुश्रूषापूर्वक करावे असा आशय येथे आहे ॥८॥

**शुङ्मोहपाशजन्मान्त - क्लेशकामक्रियालयः।**
**स्वात्मन्येकतया दृष्टे संशयानां कुहान्तरम् ॥९॥**

अन्वयार्थः- (स्वात्मनि) स्वरूपभूत आत्मा (एकतयादृष्टे) अखंड एकरूपाने पाहिला असतां (शुङ्मोहपाशजन्मान्त-क्लेशकामक्रियालयः) शोक, मोह, दया, लज्ञा इत्यादि आठ पाश, जन्म, मृत्यु, अविद्यादि पांच क्लेश, सर्व इच्छा, इष्ट, अनिष्ट, मिश्र फळ देणारी सर्व कर्मे यांचा लय होतो म्हणून (संशयानां) संशयांना (कुह अन्तरम्) अवकाश कोठून? ॥९॥

भावार्थः- सद्गुरूंनी सांगितलेल्या, शास्त्रोक्त पद्धतीने केलेल्या श्रवणादिकाने अपरोक्ष ब्रह्मज्ञान झाले असतां शोकादिक नष्ट होतात, हे या नवव्या श्लोकांत सांगतात. वास्तविक पाहिले असतां सच्चिदानंदघन, अद्वितीय ब्रह्माशिवाय दुसरा पदार्थच जगांत नाही. तथापि अविद्यावस्थेंत राहून विचार केला असतां, अनादि अविद्येच्या योगाने निर्माण झालेल्या अहंकाराशीं आत्म्याचे अविवेकाने एकीकरण करून, मी व माझें अशा प्रत्ययरूप आत्मानात्म्याची गांठ बांधून हे असावे, हे मिळावे इत्यादि इच्छा म्हणजे काम व ग्रंथि असें श्रुतीला संमत आहे. ज्यावेळी हृदयांतील हे सर्व काम नाहीसे होतात म्हणजे ज्या वेळीं हृदयाच्या सर्व ग्रंथी तुटतात, त्या वेळीं मर्त्य - भावाला पावलेला आत्मा अमर होतो असें काठकोपनिषदात सांगितले आहे. हे कामरूप ग्रंथीच स्वर्गादि इष्ट फळें देणारी, नरकादि अनिष्ट फळें देणारी व मनुष्य लोकरूप मिश्रफल देणारीं सारी कर्मे जिवाकडून करवितात. अविद्या, काम व कर्म हे प्रामुख्याने संसाराला कारण आहेत. शोक, मोह, कृपा, लज्ञा, भय, शंका, किळस, कुल शील जाति यांचा अभिमान हे आठ जिवाला बांधणारे पाश, जन्म व मरण,

देहादिकांचे ठिकाणी आत्मबुद्धिरूपाविद्या, गर्व, प्रीति, द्वेष, मरणाचे भय, हे पतंजलीने सांगितलेले पांच क्लेश, हेहि जिवाला चौऱ्यांशी योनीतून फिरविणारे आहेत. सद्गुरूंच्या सान्निध्यांत राहून त्यांच्या मुखांतून झालेल्या श्रवणादि साधनानुष्ठानाने मुमुक्षूला अपरोक्ष अखंडस्वरूपसाक्षात्कार झाला असतां जन्ममरणप्रद अशा अविद्याकामकर्मादि व शोकमोहादि अनर्थांची निवृत्ति होते. सर्व संशयांचे मूळ कारण हे अविद्यादिच गेले असतां मग संशयाला अवकाशच नाही, त्यामुळें जीव कृतार्थ होतो. म्हणून मुमुक्षूने सद्गुरुसान्निध्यांत श्रवणादि करावे ॥९॥

**भोक्त्रापत्त्यारम्भणाभ्यामात्मांशजगदेकता ॥**
**उक्ता देहत्रयातीत आत्मा साक्षी धियेष्यते ॥१०॥**

अन्वयार्थः- (आत्मांशजगदेकता) परब्रह्म, जीव व चराचरविश्व या तिघांचाही अभेद (भोक्त्रापत्त्यारंभणाभ्यामुक्ता) भोक्त्रापत्यधिकरणाने व आरंभणाधिकरणाने सांगितला आहे. (देहत्रयातीतः) स्थूल, सूक्ष्म व कारणरूप या तीन देहांच्या पलीकडे असणारा (साक्षी) देहत्रय त्यांचे व्यापार व त्याचे अभिमानी यांना साक्षात् पाहणारा (आत्मा) अखंडैकरस केवल आत्मा (धिया) निश्चयात्मक अन्तःकरण वृत्तीने (ईक्ष्यते) पाहिला जातो॥१०॥

भावार्थः- पूर्वश्लोकांत, जिवाला परब्रह्माच्या स्वतःशीं असलेल्या ऐक्याच्या साक्षात्काराने शोकादिकांची निवृत्ति होऊन कृतकृत्यता येते असें सांगितले, परंतु 'द्वा सुपर्णा' या श्रुतींत जीव हा कर्मफळांचा भोक्ता व ईश्वर केवळ साक्षी असा जीवेश्वरांचा भेद सांगितला आहे. जिवाचे भोक्तृत्व हे नित्य असेल तर भोगसाधने ही प्रवाहरूपाने कां होईना नित्यच मानली पाहिजेत. मग नित्यभोक्ता जीव व नित्य अभोक्ता साक्षी ईश्वर यांचे ऐक्यदर्शन कसें शक्य आहे व कदाचित् तसें ज्ञान झाल्यास ते खरे म्हणजे अबाधित कसें असेल अशी शंका करून; जिवात्मा स्वरूपतः अभोक्ता साक्षीरूपच आहे, उपाधीने भोक्तृत्व त्यावर आरोपित आहे म्हणून

ऐक्यदर्शन होण्यास व ते अबाधित मानण्यास कांहींही हरकत नाहीं हे उत्तर या दशम श्लोकांत सांगतात. भोक्त्रापत्त्यधिकरणांत (२-१-१३) एकमेव अद्वितीय ब्रह्मच आहे, असें सांगणाऱ्या श्रुतीशी भोक्ता व भोग्य यांच्या भेदाला जाणणाऱ्या व परीक्षित अशा प्रत्यक्षादि प्रमाणांचा विरोध येत असल्याने श्रुतिसिद्ध अद्वैतच खोटें मानावे, अशी शंका घेऊन तरंग, फेस, बुडबुडे इत्यादि समुद्रविकार भिन्न दिसत असूनहि समुद्राची एकताही जशी आहे, तद्वत् भोक्ता भोग्य इत्यादि पदार्थ ब्रह्माहून भिन्न दिसत असले तरी भोक्ता-भोग्य होणे किंवा भोग्य भोक्तृस्वरूप होणे ही आपत्ति न येतां एकमेवाद्वितीय ब्रह्मच सर्व आहे असें अद्वैतही सिद्ध होते, असें दाखविले. 'तदनन्यत्वं' या आरंभणाधिकरणांत (२-१-१४) भोक्ता व भोग्य यांचे ब्रह्माशीं असलेले भेदाभेद पूर्वाधिकरणांतील समुद्रतरंगन्यायाने खरेच आहेत अशी शंका करून; श्रुति व युक्तीने ते बाधित असल्याने व्यावहारिकच मानावे व एक अद्वितीय ब्रह्मच तात्त्विक मानावे असें सांगितले आहे. या दोन्हीही अधिकरणांत मिळून परब्रह्म, तदंश म्हणून प्रसिद्ध असलेला जीव व जगत् हे सर्व परब्रह्मच आहे असें सिद्ध झाले. 'आत्म' शब्दाचे 'अत्ति' 'आदत्ते' 'आप्नोति', अशा व्युत्पत्तीने निरूपण केले असतां क्रमाने जाग्रदवस्था, स्वप्नावस्था व सुषुप्त्यवस्थाविशिष्ट सोपाधिक आत्मस्वरूपाचा बोध होत असला, तरी उपाधी मिथ्या असल्याने हे जिवाचे औपाधिकरूप आहे. 'यच्चास्य संततो भावः' या चतुर्थ व्युत्पत्तीने अखंड सत्ता हे आत्म्याचे वास्तविक स्वरूप आहे असा बोध आत्मपदाने होत असल्याने व परब्रह्मही अखंड सत्तारूप असल्याने दोन्ही एकच आहेत. चतुर्थ निर्वचनाने सिद्ध झालेले आत्मस्वरूप देहत्रयातीत व साक्षिरूपच आहे असें हे अखंड आत्म स्वरूप महावाक्यजन्य निर्विकल्प व निश्चयात्मक अशा अन्तःकरणवृत्तीचे विषय होत हा भावार्थ ॥१०॥

**उपक्रमादिषड्ॐलिङ्गर्यत्तात्पर्यावधारणम् ।**
**अद्वैते श्रवणं तत्तसंस्कृता धीस्तदीक्षणे ॥११॥**

अन्वयार्थः- (उपक्रमादिषड्लिंगैः) उपक्रमादि सहा लिंगांनी (अद्वैते) जीवाभिन्न परब्रह्माच्या ठिकाणीं (यत्तात्पर्यावधारणम्) जो तात्पर्यनिश्चय (तत् श्रवणम्) त्याला श्रवण असे म्हणतात. (तत्संस्कृता धीः) त्या श्रवणाने संस्कृत झालेली बुद्धि (तदीक्षणे) त्या अद्वितीय परब्रह्माच्या अपरोक्ष ज्ञानाविषयीं (समर्था) समर्थ आहे ।।११।।

भावार्थः- चक्षुरादि बहिरिन्द्रियें व अन्तःकरण हे पराक् आहेत, म्हणजे यांना अनात्म्याला पाहण्याचीच शक्ति आहे व अनादि कालापासून आजपर्यंत यांना अनात्मदर्शनाचाच अभ्यास आहे. त्यामुळें बुद्ध्यादिकांना आत्मदर्शन होणे शक्य नाही; असे असतां 'धियेक्ष्यते' बुद्धीने आत्मा पाहिला जातो असें पूर्व श्लोकांत कसें म्हटले अशा शंकेचे उत्तर, संस्कृतबुद्धिगम्य आत्मा आहे असें सांगून या ११ व्या श्लोकांत देतात. **उपक्रमोपसंहार१**- ग्रंथारंभ व ग्रंथाचा शेवटचा भाग. **अभ्यास२**- वारंवार तोच विषय सांगणे, **अपूर्वता३**-नावीन्य असणे. **फलम्४**- प्रयोजन दाखविणे, **अर्थवाद५** - स्तुती करणे, **उपपत्ति६**-युक्ति सांगणे अशा सहा प्रमाणांनी कोणत्याहि ग्रंथाचे, प्रकरणाचे, वाक्याचे तात्पर्य समजते. प्रकृत स्थली जिवाहून अभिन्न ब्रह्म आहे असें या षड्विध लिंगांनी तात्पर्य निश्चित करणे यालाच वेदान्तश्रवण असें म्हणतात. श्रद्धा व सद्गुरुप्रसादादिकांनी युक्त मुमुक्षूला जर असें श्रवण घडले तर त्याची बुद्धि श्रवणाने संस्कृत होते; पुढें श्रवणानुसारि मनन व निदिध्यासन घडून बुद्धीला सूक्ष्मपणा प्राप्त होतो. अनात्मदर्शनाला साधन असें बुद्धीचे जाड्य नष्ट होऊन तिला सूक्ष्मपणा आल्याने जिवाभिन्न ब्रह्माचा अपरोक्ष साक्षात्कार होण्याला ती समर्थ होते, म्हणून पूर्व श्लोकांत 'धियेक्ष्यते' असें म्हटले ते योग्यच आहे. मनाने, इन्द्रियाने, बुद्धीने, आत्मा दिसत नाहीं असा निषेध करणारी श्रुति स्थूल बुद्धीला आत्मा दिसत नाही असें सांगणारी असल्याने 'धियेक्ष्यते' हे विधान श्रुतिविरूद्धही नाही ।।११।।

**प्रत्युक्तात्र फलव्याप्तिर्वृत्तिव्याप्तिरपेक्षिता ।**
**ततो धिया कृते वाक्यविचारे स्वात्मदृग्भवेत् ।।१२।।**

अन्वयार्थ :- (अत्र) 'नैव वाचा न मनसा' इत्यादि श्रुतींत (फलव्याप्तिः) चिदाभासप्रकाश्यत्व (प्रत्युक्ता) निषिद्ध केले. (वृत्तिव्याप्तिरपेक्षिता) 'दृश्यते त्वग्र्यया बुद्ध्या' या श्रुतींत वृत्तिविषयत्व अपेक्षित आहे. (ततः) म्हणून (धिया) संस्कृत अशा सात्त्विक बुद्धीने (वाक्यविचारे कृते) तत्त्वमस्यादि वाक्यांचा विचार केला असतां, (स्वात्मदृक् भवेत्) स्वरूपभूत आत्म्याचे ज्ञान होईल किंवा आत्मा बुद्धीच्या योगाने आपणांला पाहणारा असा होईल ।।१२।।

भावार्थः- स्थूल बुद्धीला अग्राह्य व सूक्ष्म बुद्धीला ग्राह्य आत्मा आहे असें सांगून 'न दृश्यते' व 'दृश्यते' या श्रुतींच्या विरोधाचा परिहार पूर्वश्लोकांत जरी केला तरी आत्म्याला दृश्यत्व मानलेच आहे; त्यामुळें आत्मा द्रष्टा आहे, दृश्य नाही या सिद्धान्ताचा विरोध व 'अदृश्यं' इत्यादि श्रुतींचाहि विरोध येतो अशी शंका करून, 'अदृश्यं' या वचनाने फलव्याप्तीचा निषेध केला आहे व 'दृश्यते' या शब्दाने वृत्तिविषयत्वरूपदृश्यत्व सांगितले आहे. त्यामुळें द्रष्टृत्व व वृत्तिविषयत्वरूपदृश्यत्व यांचा व 'अदृश्यं' इत्यादि श्रुतींचाहि विरोध येत नाहीं हे या १२ व्या श्लोकांत सांगतात.

कोणत्याही पदार्थांचे प्रत्यक्ष ज्ञान होण्याचे असल्यास प्रथम प्रत्यक्षसाधन इन्द्रियादिद्वारां तद्विषयाकार अन्तःकरण वृत्ती होते. ती वृत्ती त्या विषयांतील आवरक अज्ञान दूर करून तेथील चैतन्याच्या प्रतिबिंबाचे ग्रहण आपल्या ठिकाणी करते. या प्रतिबिंबास चिदाभास अशी संज्ञा आहे. या चिदाभासाचा संबंध जड विषयाशी झाला म्हणजे हा घट आहे किंवा मी घट जाणतों असा व्यवहार होतो. या चिदाभासाने घटाला प्रकाशित करणे म्हणजे घटाने दृश्य होणे असा अर्थ आहे. अचेतन पदार्थ स्वतःच आपला प्रकाश करण्यास असमर्थ असल्याने त्यांच्या प्रकाशाकरितां चिदाभासरूप प्रकाशाची व हा चिदाभास निर्माण होण्याकरितां आवरणनिवृत्तीची गरज आहे. परंतु ब्रह्म स्वयंप्रकाश असल्याने दिवा पाहण्याला दुसऱ्या दिव्याची जशी गरज नाहीं, फक्त त्या दिव्यावरील आवरण काढले म्हणजे तो दिसतो;

तद्वत् ब्रह्मप्रकाश होण्याला दुसऱ्या प्रकाशाची - चिदाभासाची - गरज नाही. शब्दापासून झालेल्या ब्रह्माकार वृत्तीने त्यावरील आवरण गेल्याबरोबर ब्रह्म स्वयमेव भासूं लागते. ते चिदाभास भास्य नाही. ब्रह्माकारवृत्तींत जरी चिदाभासरूप प्रतिबिंब असले तरी माध्यान्ह कालच्या सूर्याखाली ठेवलेला दिवा जसा सूर्याला प्रकाशित करूं शकत नाही म्हणून ब्रह्म हे दृश्य नाही. अतएव अदृश्य इत्यादि श्रुतीचा व द्रष्टा दृश्य होत नाही, या नियमाचा कांही विरोध नाही. ब्रह्मावर जें अज्ञानाचे आवरण आहे ते घालविण्याकरितां तदाकार वृत्ती करावी लागते. त्या वृत्तीचा ते विषय होते म्हणून बुद्धीने ब्रह्म पाहिले जाते; हेही म्हणणे योग्यच आहे. तत्त्वमस्यादि वाक्याच्या विचाराने अशी ब्रह्माकार वृत्ती होते. या वृत्तीलाच अपरोक्ष ज्ञान म्हणतात. किंवा मंद दृष्टीच्या माणसाला पदार्थ स्पष्ट दिसत नाही. त्याने चष्मा लावला असतां ते स्पष्ट दिसतात; त्याप्रमाणे अज्ञानाने आवृत अतएव मंद आत्म्याला आपले स्वरूप स्पष्ट दिसत नाही. परंतु वेदान्त विचारजन्यबुद्धिवृतिरूप चष्मा लावला असतां, तो आत्मा त्या उपाधीच्या योगाने आपणांला(स्वतःला) स्पष्ट पाहूं शकतो असाहि अर्थ येथे घेता येईल. कसेहि मानले तरी श्रुति व सिद्धान्त यांचा किंचितहि विरोध नाही ।।१२।।

**श्रुत्या युक्त्याप्यपास्यात्र तु सदसदसत्सन्मतं दुष्टमुक्तं ।**
**मिथ्या कार्यं विवर्ताभ्युपगमत इदं जन्मनाशश्रुतेश्च ।।**
**प्राणाद्यस्यपि चेष्टा गुणफणिगतिवत् स्यादभेदोक्तिरैक्य**
**ज्ञप्त्यै सम्बन्ध आध्यासिक इह तदपास्त्यै श्रुता वाक्यचिन्ता ।।१३।।**

अन्वयार्थ :- (अत्र तु) या ठिकाणी तर (दुष्टं) सदोष (सदसत्-असत्-सन्मतं) सदसदुभय स्वरूप, केवल असत्स्वरूप, केवल सद्रूप असें जग आहे असें मतत्रय (श्रुत्या युक्त्या अपि) श्रुतीने व युक्तीने ही (अपास्य) निरस्त करून (इदं प्राणादिकार्यं) हे प्राणादि कार्य (विवर्ताभ्युपगमतः) विवर्तवादाच्या स्वीकाराने (जन्मनाशश्रुतेश्च) व उत्पत्ति आणि नाश दाखविणारी श्रुति असल्याने (मिथ्या उक्तं) मिथ्या आहे असें सांगितले

(अस्य चेष्टा अपि) या प्राणादिकार्यांचे व्यवहार सुद्धां (गुणफणिगतिवत्) रज्जु सर्पाच्या गतीप्रमाणे मिथ्याच आहेत. (ऐक्यज्ञप्त्यै) ऐक्यबोध होण्याकरतां (अभेदोक्तिःस्यात्) कार्यकारणाचा अभेद सांगितला आहे. (संबंधः आध्यासिकः) आत्म्याचा व प्राणादिकांचा संबन्ध आध्यासिकच आहे. (इह) या वेदान्तशास्त्रांत (तदपास्त्यै) आत्मानात्म्यांच्या आध्यासिक संबंधाच्या निवृत्तीकरितां (वाक्यचिंता) तत्त्वमस्यादि वाक्यांचा विचार (श्रुता) श्रुतींत सांगितला आहे ॥१३॥

भावार्थ :- अकराव्या श्लोकांत उपक्रमादि लिंगांनी अद्वैत वस्तूंच्या ठिकाणीं तात्पर्यनिश्चय म्हणजे श्रवण अशी व्याख्या केली, परंतु सत्, असत् व सदसत् असें जगाचे स्वरूप मानणारे वादी निरस्त होईपर्यंत अद्वैत वस्तु सिद्ध होऊं शकत नाही. मग तेथे तात्पर्यनिश्चय असंभवी आहे अशी शंका करून या श्लोकांत वादित्रयाचे खंडन करून, कार्याचे मिथ्यात्व दाखवून, अद्वितीय ब्रह्मवस्तूची सिद्धी करून विचाराचे फल दाखवितात. कार्य हे किंचिद्रूपाने सत् व किंचिद्रूपाने असत् जसें - घट उत्पत्तीच्या पूर्वी प्राप्य म्हणजे मिळवावयाचा आहे अशा रूपाने सत् होता, उत्पन्न झाल्यावर तो प्राप्त झाला म्हणजे मिळाला. परंतु उत्पत्तीच्या पूर्वी प्राप्त या रूपाने तो असत्‌ही होता, उत्पन्न झाल्यावर प्राप्तरूपाने सत् असला, तरी प्राप्य रूपाने असत्‌च आहे. एवंच प्रत्येक पदार्थ सत् व असत् असा सर्वदा आहे असें जैनांचे मत आहे.

जो पदार्थ सत् आहे तो कधी असत् असणे शक्य नाहीं. एका वेळीं सत्त्व व असत्त्व असे विरुद्ध धर्म एका ठिकाणी राहूं शकत नाहीत, म्हणून उत्पत्तीच्यापूर्वी घटादि कार्य हे असत् असते म्हणजे नसते. उत्पत्तीच्या पूर्वीही ते असेल, तर कुंभाराला त्याच्या उत्पत्तीकरतां एवढा खटाटोप कशाला हवा म्हणून कार्य असत्, असे वैशेषिक व नैयायिक यांचे मत आहे.

असत् असूनहि जर कुंभारादिकांच्या उद्योगाने उत्पन्न होत असेल तर शशशृंग, वंध्यापुत्र यांचीही उत्पत्ति कर्त्याच्या खटपटीने होईल

व वाळूतूनही तेल निघून 'प्रयत्नें वाळूचे कण रगडितां तेलहि गळे' हा सिद्धान्तपक्ष होईल. म्हणून पूर्वी कार्य असत् नाहीं तर कारणामध्यें सूक्ष्म रूपाने सत् म्हणजे विद्यमानच आहे हे सांख्य मत आहे. परंतु पूर्वाचार्यांनी तटस्थपणाने तिघांच्याही मतांचा विचार करून प्रत्येक मतांत दोष येत असल्याने एकही मत निर्दोष नाहीं असें जाणून श्रुति व युक्ति यांच्या आधारे जग हे मिथ्या म्हणजे सत्, असत्, सदसत् अशा रूपाने अनिर्वचनीय आहे असें निश्चित केले आहे. सदसत् पक्षांत परस्पर विरोध हा दोष, असत्पक्षांत वंध्यापुत्रोत्पत्तिप्रसंग दोष व सत्पक्षांत कर्त्याच्या व्यापाराला वैयर्थ्य हा दोष. एवंच कोणताही पक्ष दोषरहित नाहीं. वस्तुविचारांत दोष आले म्हणजे ते दोष वस्तूचा वास्तविकपणा घालवितात, म्हणजे मिथ्यात्व सिद्ध करतात. अतएव मिथ्यात्ववाद्याला सर्व दोष भूषणावह असल्याने युक्तीने जगाचे मिथ्यात्वच सिद्ध होते व 'नेह नानास्ति' इत्यादि श्रुतीही जगाचे मिथ्यात्वच दाखवितात म्हणून युक्ति व शास्त्रविरूद्ध पूर्वीचे तीनही पक्ष टाकून हे जग उत्पत्तीच्या पूर्वी भ्रमाचे अधिष्ठान जो सदात्मा तत्स्वरूप होतो व पुढें शुक्तीच्या अज्ञानाने विवर्तरूप रजत जसें निर्माण होते, तसेच सत्स्वरूपात्म्याच्या अज्ञानाने अधिष्ठानापेक्षां विषमसत्ताकपरिणामरूप जो विवर्त या विवर्त न्यायाने (शुक्तिरजत न्यायाने) झाले. अशा रीतीने जगाची उत्पत्ति श्रुतीने दाखविली असल्याने आकाशादिक व प्राणादिक सर्व कार्य मिथ्या आहे. शिवाय सत् व असत् पदार्थांचा जन्म व नाश होऊं शकत नसल्याने व श्रुतींत जगाचे जन्म व नाश सांगितले असल्यानेही जग सदसद्विलक्षण म्हणजे मिथ्या आहे. जग मिथ्या मानले तर जागतिक व्यवहाराची व्यवस्था लागणार नाहीं; कारण मिथ्या रजताचे कडी-तोडे-मुकुटादि व्यवहार होत नसतात व जगाचे तर सर्व व्यवहार सुरळीतपणे चालू आहेत अशी शंका येथे घेऊं नये. स्वप्न खोटें असून जागें होईपर्यंत स्वप्निक व्यवहार जसे सुरळीत होतात किंवा दोरीवर भासलेल्या सापाचा बाध होईपर्यंत त्याची हालचाल इत्यादी व्यवहार जसे अबाधित असतात,

तद्वतच जगाचेहि व्यवहार ब्रह्मज्ञानापर्यंत सुरळीत होण्यास कांही हरकत नाहीं. जर हे सर्व जग खोटें असेल तर हे सर्व आत्मरूप आहे. 'सर्वं खल्विदं ब्रह्म' म्हणजे हे सर्व ब्रह्मरूप आहे असें श्रुतींत कसें म्हटले ही शंकाही कांहीं योग्य नाहीं. कारण या श्रुतींत कार्य हे कारणाहून भिन्न नाहीं, कारणरूप ब्रह्मच एकमेवाद्वितीय आहे असें ब्रह्माचे एकत्वच दाखविले आहे. जसे घट शराव वगैरे मृत्तिकेचे विकार म्हणून कांही पृथक् नसून सर्व मृण्मय मृत्तिकाच आहे असें जसें म्हटले त्याप्रमाणेच हे समजावे. असें जर आहे तर माझा प्राण, माझा देह अशी ममत्वाने जगाची प्रतीति कां येते असें म्हणाल, तर येथे आत्मा व प्राणादि या उभयतांचा दुसरा कोणताही संबंध नसून अहंबुद्धिसिद्ध आध्यासिक म्हणजे काल्पनिक, खोटा संबंध आहे; म्हणूनच तशी प्रतीति होते व त्यामुळें सर्व अनर्थ निर्माण झाले आहेत. या अनर्थमूल मिथ्याभूत संबंधाच्या निवृत्तीकरतांच 'तत्त्वमस्यादि' महावाक्याचा विचार करण्यास श्रुतीने सांगितले आहे ॥१३॥

**शिष्यः शास्त्रानुशिष्टस्त्वमसि न जडदृश्याङ्गगोप्राणहृद्धी -**
**तत्सङ्घात्मा न दुःखादि तव हृदयजं नासि संसार्यतस्त्वम् ॥**
**प्रत्यग्बोधात्मनित्याद्वयचिदिति सकृद्बोधितोऽपीशभक्तो**
**वेत्त्यन्तर्दृक्तथैव प्रमितिजनकवाक्याद्विपर्यासहृपि ॥१४॥**

अन्वयार्थः- हे वत्स, (त्वं) हे बाळा, तूं (जडदृश्यांगगोप्राण-हृद्धीतत्संघात्मा न असि) जड व दृश्य असें जें शरीर, इन्द्रियें, प्राण, मन व बुद्धि आणि त्यांचा समुदाय हे नव्हेस (हृदयजं दुःखादि तव न) ज्या अर्थी दुःखादि तुझ्या मनापासून निर्माण झालेले आहेत त्या अर्थी ते मनालाच आहेत, तुला नाहींत. (अतः त्वम्) म्हणून तूं (संसारी न असि) संसारी नाहीस. (प्रत्यग्बोधात्मनित्याद्वयचित् असि) तर इदं पदार्थाहून वेगळा ज्ञानस्वरूप नित्याद्वितीय चैतन्य जें ब्रह्म तत्स्वरूप आहेस. (इति सकृद्बोधितोऽपि) याप्रमाणे एक वार प्रबुद्ध जागा केला असतांही (ईशभक्तः) ईश्वराचा भक्त (अन्तर्दृक्) आत्मस्वरूप पाहण्याविषयींच तत्पर

(शास्त्रानुशिष्टः शिष्य;) शास्त्राने किंवा गुरूने उपदिष्ट असा उपदेशार्ह मुमुक्षु (प्रमितिजनकवाक्यात्) यथार्थ ज्ञान करून देणाऱ्या महावाक्याने (तथैव वेत्ति) मी अखंड सच्चिदानंदरूप आहे असें जाणतो. (ततः) नंतर (विपर्यासहापि) विपरीत बुद्धीला सोडणारा होतो. ।।१४।।

भावार्थ :- महावाक्यार्थ विचाराने ज्ञान झाले असतां अज्ञान व तन्मूलक सर्व अनर्थ निवृत्त होऊन मोक्षप्राप्ति होते असें तात्पर्याने पूर्व श्लोकांत सांगितले. परंतु मोठ्या प्रयासाने रात्रंदिवस विचार करणाऱ्यांचे अज्ञान व जन्ममरणादि अनर्थ सुटलेले दिसत नाहींत अशी शंका करून; पापबुद्धि अतएव कुतर्क करणाऱ्या लोकांचीच ही दशा आहे. शुद्धबुद्धि, ईश्वरभक्त व अंतर्मुख अशा पुण्यात्म्यांची विचाराने ज्ञानोत्पत्तिपूर्वक अनर्थ-निवृत्ति अवश्य होते हा सिद्धान्त सप्रमाण असल्याने खरा आहे. सर्वत्र अधिकाराची आवश्यकता असते म्हणून विचाराचा सुद्धां अधिकारी व्यक्तीलाच उपयोग होतो हे या चतुर्दश श्लोकांत सांगतात. 'शाब्दे परे च निष्णात' अशा सद्गुरूंनी साधन-चतुष्टय ईश्वरभक्त्यादि सकलसाधनसंपत्तियुक्त सच्छिष्याला 'हे वत्सा, तुला दृश्य होणारे व अचेतन असे जे शरीर - इंद्रियें - प्राण - मन - बुद्धि किंवा यांचा समुदाय हे तुझे स्वरूप नव्हे; कारण हे सर्व तुला दिसणारे आहे. ज्याला जें दिसते त्याहून तो वेगळा असतो. जसे डोळ्याला सूर्य दिसतो म्हणून सूर्याहून डोळा वेगळा आहे. देहेन्द्रियादि सर्व तुला दिसते, म्हणून त्याहून तुझें स्वरूप अत्यंत विलक्षण आहे. सुखदुःखादि व कामसंकल्पादि हे चित्तांतच उत्पन्न होतात व तुला दिसतात. म्हणून तेहि तुझे धर्म नसून सर्व चित्ताचेच आहेत. अतएव तूं जन्ममरणादि संसाररहित आहेस. तूं केवळ सच्चिदानंद अद्वितीय ब्रह्मरूप आहेस' अशा रीतीने एक वार बोध केला असतां, तो अधिकारी अन्तर्मुख शिष्य देहादिकांच्या ठिकाणी असलेली आत्मबुद्धी टाकून, मी केवळ परब्रह्म स्वरूप आहे; असा निश्चय करून सर्व अनर्थापासून मुक्त होतो. श्वेतकेतुप्रभृति अधिकारी शिष्य याप्रमाणे ज्ञानी होऊन अनर्थविमुक्त झाले असें श्रुति सांगत असल्याने

अधिकाऱ्याला सम्यक् बोध करून देणारा विचार निष्फल नाही ।।१४।।

**सद्यो बोधो भवेच्चेत्प्रमितिजनकसद्वाक्यतोऽनेकवारं**
**पप्रच्छ श्वेतकेतुः कुत इतरऋषिः पञ्चवारं पुनश्च ।।**
**शङ्कैवं माऽस्तु बुद्धेः प्रबलतर इवाग्रेः प्रबन्धोऽत्र शश्वत्**
**श्रुत्योक्तं तद्विनष्ट्यै श्रवणमपि महारुन्धतीनीतिबोधः ।।१५।।**

अन्वयार्थ :- (प्रमितिजनकसद्वाक्यतः) यथार्थ ज्ञान करून देणाऱ्या अबाधित वेदवाक्याने (सद्यः) श्रवण केल्याबरोबर (बोधः) ज्ञान (भवेत् चेत्) होत असेल तर (श्वेतकेतुः) श्वेतकेतु नांवाचा ऋषिपुत्र (अनेक वारं) अनेक वेळां - नऊ वेळां (कुतः पप्रच्छ) आपल्या अरूणिनामक पित्याला कां विचारता झाला? (इतर ऋषिः) दुसरा भृगु ऋषि (पुनः पंचवारं) पुनःपुन्हां पांच वेळां वरुणनामक पित्याला कां विचारता झाला?(एवं शंका मास्तु) अशी शंका घेऊं नये (अत्र) या आत्मसाक्षात्काररूप कार्यांत (बुद्धेः) बुद्धीला (प्रबलतरः) अत्यंत बलवान् असा (प्रबंधः) प्रतिबन्ध आहे (अग्रेः इव) अग्नि उत्पन्न होण्यामध्यें जसे मणी, मंत्र, औषधीरूप प्रतिबंध असतात त्याप्रमाणे (तद्विनष्ट्यै) त्या प्रतिबंधांच्या नाशाकरितां (श्रवणं) अनेक वार श्रवण (श्रुत्या उक्तं) श्रुतीने सांगितले (महारुंधतीनीतिबोधः अपि) स्थूलारुंधती न्यायाने भृगूलाहि बापाने बोध केला ।।१५।।

भावार्थ :- पूर्व श्लोकांत, सद्गुरूंनी अधिकारी सच्छिष्याला एकवार ब्रह्मोपदेश केला असतां तो अपरोक्ष साक्षात्कारी होतो असें सांगितले; परंतु हे खरे वाटत नाहीं. कारण तसें जर असते तर श्रुतीने श्रवणानंतर मनन व निदिध्यासन हे सांगितले नसते व सूत्रकारानेही मरेपर्यंत श्रवणादिकांची आवृत्ति करण्यास सांगितले नसते. अशा शंकेला या श्लोकांत उत्तर देतात. दुसऱ्या प्रमाणाने न बाधित होणारे व यथार्थ ज्ञान करून देणारे तत्त्वमस्यादि वेदान्तवाक्य श्रवण झाल्याबरोबरच, शिष्याला अपरोक्ष साक्षात्कार करून देत असते; तर आरुणिपुत्र श्वेतकेतूने, बापाने एकदां 'तत्त्वमसि' असें सांगितले असतां, पुन्हां मला सांगा पुन्हां सांगा असें नऊ वेळां

बापाला पुनःपुन्हां कां विचारले असते? याप्रमाणेच वरुणपुत्र भृगु ऋषीला पित्याने ब्रह्मोपदेश केला असतां व तप हे ब्रह्मज्ञानाचे साधन आहे, त्या तपश्चर्येने ब्रह्म जाण असें साधनहि सांगितले असतां, पुनःपुन्हा पांच वेळां वरुणनामक बापाला ब्रह्म सांगा असें कां म्हटले असते? ज्या अर्थी एक वार सांगूनही पुन्हां प्रश्न केलेला दिसतो त्या अर्थी सकृदुपदेशाने बोध होत नाहीं अशी शंका घेऊं नये. याचे कारण असें की कोणतेही कार्य उत्पन्न होण्यास जशी कारणसामग्री लागते तसा प्रतिबंधकाचा अभावही लागतो. ज्याला कोणताही प्रतिबंधक नाहीं व सर्व कारण सामग्री सिद्ध आहे, केवळ उपदेशाचीच न्यूनता आहे, त्याला एकवार उपदेश केल्याबरोबर तात्काळ ब्रह्मज्ञान होते. श्वेतकेतुप्रभृति शिष्यांला ज्ञानाची इतर सर्व सामग्री होती, पण जडभरत व वामदेवादिकांना जन्मांतरोत्पादक दुरदृष्टरूप प्रतिबंध जसें होते तसें जरी नसले तरी या जन्मांतीलच कांही विलक्षण प्रतिबंध असतात. तसे प्रतिबंध त्यांना असल्याने एकवार श्रवणाने श्वेतकेतु व भृगु यांना ज्ञान झाले नाहीं. त्यात श्वेतकेतूचे प्रतिबंध नऊ वेळ उपदेशाने व भृगु ऋषीचे पांच वेळ उपदेशाने गेले. अग्नि दाह करण्यास समर्थ असला तरी त्याच्या जवळ दाहप्रतिबन्धक मणि, मंत्र, औषधी जर असतील तर तो दाह करीत नाहीं व त्या प्रतिबंधाचे दूरीकरण झाले म्हणजे तात्काळ दाह होऊं लागतो. तद्वतच प्रतिबंध असेंपर्यंत श्वेतकेतुप्रभृतींना ज्ञान झाले नाही. वारंवार श्रवणादिकांनी प्रतिबंध नष्ट झाल्यावर तात्काळ ज्ञान झाले. एतावता सकृदुपदेश ज्ञानाला कारण नाही असें मात्र नव्हे. प्रतिबंध नसेल तर एकवार उपदेशहि ज्ञानोत्पादनसमर्थ आहे. एकवेळ श्रवणाने जर प्रतिबंध गेला नाही तर नऊ वेळ श्रवणाने तरी तो जाईल यावर कसा भरंवसा ठेवावा अशी शंका घेऊं नये. एक वेळ कांडले असतां न गेलेला भातावरील कोंडा पुष्कळ वेळ कांडले असतां जातोच कीं नाही? तसेंच येथेहि समजावे. म्हणूनच पुष्कळ लोक आत्मश्रवण करीत असतांहि आत्म्याला समजत नाहींत असें श्रुति म्हणते. भृगु ऋषीला स्थूल अरुंधती न्यायाने म्हणजे विवाहांत नवऱ्यामुलीला

अरुंधती दाखवितांना सूक्ष्मतर असणाऱ्या अरुंधती ताऱ्याच्या जवळील स्थूलस्थूल ताराच प्रथम अरुंधती म्हणून बोध सौकर्याकरितां दाखवितात व क्रमाने सूक्ष्म अरुंधतीचे दर्शन करवितात; त्या न्यायाने स्थूल - स्थूलब्रह्म सांगून पुढें क्रमाने मुख्य परब्रह्माचा उपदेश वरुण पित्याने केला. ही एक उपदेश करण्याची सुलभ रीति आहे. एकेक उपदेशापासून जसजसा प्रतिबंध क्षय होत जाईल तसतसें ज्ञानहि जवळ जवळ येते. एतावता प्रतिबंध नसेल तर एकवार उपदेशसुद्धां ज्ञानजनक आहे हे सिद्ध झाले ।।१५।।

**नष्टेऽज्ञाने सकार्ये निरतिशयमुदाविर्भवेत्सत्परत्वाद्**
**वाक्यं तस्मात्पुमर्थेश्रुतिशिरउदितं पर्यवस्यत्यवश्यम् ।।**
**एवं नो चेदहंधीभवभवमृतिदुःखादिरूपः कदाचित्**
**संसारो दुर्निवार्यस्तत इह पुरुषार्थैकसत्साधनं तत् ।।१६।।**

अन्वयार्थः- (सकार्ये अज्ञाने नष्टे सति) कार्यासहित अज्ञानाचा नाश झाला असतां (निरतिशयमुद्) निरतिशयानंद (आविर्भवेत्) प्रकट होईल (तस्मात्) म्हणून (सत्परत्वात्) सद्रूपब्रह्मतात्पर्यक असल्याने (श्रुतिशिरउदितं वाक्यं) उपनिषदात सांगितलेले तत्त्वमस्यादि महावाक्य (पुमर्थे) मोक्षरूप परम पुरुषार्थात (अवश्यं पर्यवस्यति) अवश्य पर्यवसान पावते. (एवं नो चेत्) असें जर न होईल तर (अहंधीभवभवमृतिदुःखादिरूपः) अहं बुद्धीपासून होणारा जन्ममरण दुःखादिरूप असा (संसारः) संसार (कदाचित्) केव्हांहि (दुर्निवार्यः) दुःखानेहि निवारण करण्यास अशक्य होईल (ततः) म्हणून (इह) या लोकांत (तत्) ते महावाक्य (पुरुषार्थैकसत्साधनम्) मोक्षाचे मुख्य व अबाधित असें साधन आहे ।।१६।।

भावार्थः- 'तत्त्वमसि' इत्यादि महावाक्यांपासून झालेले अखंड निर्विकल्पक प्रत्यक्ष ज्ञान मोक्षपर्यवसायी आहे हे अन्वय व व्यतिरेक या उभय प्रकारांनी १६ व्या श्लोकांत दाखवितात. अखंडैकरस, त्रिकालाबाधित, अद्वितीय ब्रह्मालाच तात्पर्याने सांगणाऱ्या उपनिषदांतील तत्त्वमस्यादि महावाक्यांचा, अधिकारी शिष्याला सद्गुरूंनी उपदेश केला असतां त्या

वाक्यापासून झालेला निर्विकल्प ब्रह्मसाक्षात्कार आवरणविक्षेपशक्तिसहित व संसाराला कारणीभूत अशा मूल अज्ञानाला घालवितो. सकार्य अज्ञानाचा नाश झाला असतां नित्य निरुपाधिक व निरतिशय अशा स्वरूपभूतानंदाचा आविर्भाव मुमुक्षूच्या चित्तांत होतो हाच आनंद खरा व सर्व दृष्टीने मोठा असा आहे. सार्वभौम राजाच्या आनंदाला म्हणजे मनुष्यानंदाला आरंभ करून, शंभर शंभर पटीने मोठमोठे असणारे इतर सर्व आनंद या स्वरूप-आनंदरूप समुद्राचे बिंदुमात्र आहेत व हे सर्व सोपाधिक, सातिशय व अनित्य असे आहेत. हा स्वरूपानंद सर्वानन्दापेक्षां कांही विलक्षणच आहे. सोन्यांत मिसळलेल्या इतर धातूंचा आगंतुक रंग किंवा वर्ण अग्नीच्या तापाने नष्ट झाला असतां शुद्ध सोन्याचा मूलवर्ण जसा प्रकट होतो, तद्वत् ज्ञानाग्नीच्या तापाने अखंड एकरस ब्रह्मस्वरूप जिवावर आलेल्या अज्ञानरूप मलाचे निराकरण झाले असतां, मूल स्वरूपभूत निरतिशयानंदाचा आविर्भाव होऊन जीव कृतकृत्य होतो. एवढें या तत्त्वमस्यादि वाक्याचे सामर्थ्य आहे. असे सद्गुरु-आश्रयाने वाक्यार्थ ज्ञान संपादन करून स्वरूपानंदात निमग्न व कृतकृत्य अशा विद्वानांच्या अनुभवावरून सिद्ध आहे. उलटपक्षी प्राण पणाला लावून अहोरात्र कष्ट करीत असतांही या सद्गुरूंच्या आधीन असणाऱ्या महावाक्याचा आश्रय न केल्याने देहादिकांच्या ठिकाणी असलेल्या अहंभावाने उत्पन्न झालेल्या अशा जन्ममरण, दुःखशोक युक्त देवदैत्य, मनुष्य, पशुपक्षी व किडामुंगी इत्यादि नानायोनि संचाररूप संसारांत निमग्न झालेल्या या जिवांना अनंत क्लेश होतात हेहि संसारी जिवाच्या अनुभवाने सिद्ध आहे; म्हणून अवांतर वाक्यासहित 'तत्त्वमस्यादि' महावाक्य हेच सकळ-क्लेश-निवृत्तिपूर्वक, स्वरूपानंदरूप परमपुरुषार्थ पर्यवसायी आहे हे वाक्य इतर सर्व प्रमाणांनी अबाधित व मुख्य असें साधन आहे. इतर कोणतींहि साधने परमपुरुषार्थ पर्यवसायी नाहीत असें अन्वय व्यतिरेकाने निश्चित झाले ।।१६।।

**धीर्व्याप्ताङ्गा यदा गा नयति निजनिजार्थान्स्मृता**

**जागृतिस्तद्द्रष्टाऽसङ्गोऽसि**

**गोवृत्तिलय इह हृदि स्वप्न ईक्ष्या मतार्थाः ।।**
**मायामात्रं हि दृक् त्वं सकलविदुपसंहार एषा सुषुप्तिर्**
**बीजत्वेन ध्यवस्थात्र परमसुखदृग्धीगुणज्ञोऽसि तुर्यः ।।१७।।**

अन्वयार्थ :- (यदा) ज्या वेळी (व्याप्तांगा धीः) सर्व शरीरावयांना व्यापणारी बुद्धि (गाः) इंद्रियाप्रत (निजनिजार्थान्) आपापल्या विषयाकडे (नयति) नेते, (तदा) त्यावेळीं (जागृतिःस्मृता) जागृतावस्था असें म्हणतात. (तद्द्रष्टा) हे वत्सा! त्या जागृतीचा द्रष्टा (असंगः असि) तत्संगरहित असा तूं आहेस. (इह) या वेदान्तशास्त्रांत (हृदि) मनांमध्ये (गोवृत्तिलयः) इंद्रियवृत्तीचा लय होणे याला (स्वप्नः) म्हणजे स्वप्नावस्था असें म्हणतात या ठिकाणीं (मतार्थाः) जागृतींत जाणलेले सर्व विषय (ईक्ष्याः) पाहिले जातात. या स्वप्नांतील सर्व पदार्थ (मायामात्रंहि) मिथ्थ्यारूप आहेत. (त्वं) तूं मात्र (दृक्) स्वप्नद्रष्टा आहेस. (सकलविदुपसंहारः) सर्व प्रकारच्या अन्तःकरण वृत्तिरूप ज्ञानांचा उपसंहार (एषा सुषुप्तिः) ही सुषुप्ति अवस्था होय. (अत्र) या ठिकाणी (बीजत्वेन) बीजरूपाने (ध्यवस्था) बुद्धीचे अवस्थान असते. तूं मात्र (धीगुणज्ञः) बुद्धीच्या सत्त्व, रज व तम या तीन गुणांना जाणणारा, (परमसुखदृक्) परमसुखाचा अनुभव घेणारा (तुर्यः असि ) विश्व, तैजस व प्राज्ञ या तीन अवस्थाभिमान्यांपेक्षां चौथा आहेस ।।१७।।

भावार्थः- याप्रमाणे अन्वयव्यतिरेकाने तत्त्वमस्यादिवाक्य स्वार्थबोधपूर्वक मोक्षपर्यवसायी आहे हे पूर्व श्लोकांत सांगितले. वाक्यार्थज्ञान पदार्थज्ञान झाल्याशिवाय होत नाहीं. 'तत्त्वमसि' वाक्यांत 'तत्', 'त्वम्' व 'असि' अशीं तीन पदें आहेत. त्यांतील 'असि' पदाचा अर्थ तत् व त्वं या पदार्थांचे ऐक्य असा आहे. उरलेल्या तत् व त्वं या पदांपैकी त्वं पदाचा अर्थ १७-१८-१९ व २० या चार श्लोकांनी सांगतात.

प्रफुल्लित अशा वृक्षांत आमूलाग्र जसा रस भरलेला असतो तसेंच या शरीरामध्यें नखशिखांत बुद्धि म्हणजे अन्तःकरण भरलेले आहे. या बुद्धीने प्रेरणा केली असतां आदित्यादि त्या त्या देवतेने अनुगृहीत अशी

चक्षुरादि इंद्रियें आपाआपल्या रूपादि विषयांशी संलग्न होऊन त्यांचे ज्ञान ज्या अवस्थेंत निर्माण करतात त्या अवस्थेला जागृति अशी संज्ञा आहे. हे वत्सा, तूं या अवस्थेचा केवळ द्रष्टा आहेस; ही बुद्धीची अवस्था आहे; ही अवस्था व तदाश्रय बुद्धि यांच्याशी तुझा वास्तविक कांही संबंध नाही; तूं असंग म्हणजे सर्व संबंधरहित आहेस. ही जाग्रदवस्था निर्माण करणारी कर्मे लीन झाली असतां सर्व इंद्रियांच्या वृत्ति मनामध्यें जेव्हां लीन होतात व जागृतीतील अनुभवांचे संस्कार घेऊन, बुद्धीच इन्द्रिय व विषय तज्ज्ञान या रूपाने परिणाम पावून जागृतीप्रमाणेच सूक्ष्म प्रपंच निर्माण करिते, त्या ज्ञानज्ञेयात्मक सूक्ष्म प्रपंचालाच स्वप्नावस्था असें म्हणतात. येथेहि तूं केवळ या अवस्थेचा द्रष्टा आहेस; ती अवस्था व तदाश्रय बुद्धि यांचा वास्तविक तुझ्याशी कांहीच संबंध नाही. हा सर्व प्रपंच बुद्ध्याश्रित आहे. या अवस्थेच्या विचारावरून जाग्रदवस्थेचा व्यतिरेक म्हणजे या अवस्थेंत अभाव व तुझा या अवस्थेंत अन्वय म्हणजे सत्ता हेहि सिद्ध होते. पुढील अवस्थेंतहि असेंच अन्वय व्यतिरेक जाणावे. ही स्वप्नावस्था मायामात्र म्हणजे खोटी दिसते; त्या वेळीच असणारी अशी आहे. आपल्या परिणामरूप ज्ञानसहित या बुद्धीचा लय सर्व कारण व तमोगुण प्रधान अशा अज्ञानांत होतो. त्या वेळीं वडाच्या बियांमध्यें सूक्ष्म रूपाने जसें संपूर्ण झाड असते तद्वत् बुद्धि या अज्ञानांत सूक्ष्म रूपाने असते. या अवस्थेला सुषुप्ति असे म्हणतात. ही सुद्धां बुद्धीचीच एक अवस्था आहे. या अवस्थेंत तूं परमसुखाचा आस्वाद घेणारा व जागृतींतील बुद्धीचा रजोगुण, स्वप्नांतील बुद्धीचा सत्त्वगुण व सुषुप्तींतील तमोगुण हे सर्व तूं जाणत असल्याने, गुणज्ञ असेंहि तुला म्हणतात. क्रमाने विश्व तैजस व प्राज्ञ अशा तत्तदवस्थाभिमान्यापेक्षां तूं विलक्षण असल्याने या तिघांच्या अपेक्षेने तुला तुर्य म्हणजे चतुर्थ असें नांव पडले आहे. वास्तविक तूं एकत्वादिसंख्याविरहित अद्वितीय असाच आहेस ।।१७।।

**सापेक्षा तुर्यता ते त्र्यनृतपददृशोऽसत्त्रिधातूद्धृताङ्गं**
**मर्त्यं विश्वं तथेदं पटविलय इवाकर्षणाद्धेतुतन्तोः ।।**

**हेतुद्रव्यापकर्षे जगदपि विकृतं नश्वरं श्रौतसत्त्रि -**
**रूपार्केन्द्वग्निधार्यं घटवदसदनाद्योऽसि स त्वं हि मृद्वत् ॥१८॥**

अन्वयार्थः- (त्र्यनृतपदद्दशः) अनृत अशा जाग्रदादि तीन अवस्थांचा द्रष्टा असणाऱ्या (ते) तुला (तुर्यता) चतुर्थपणा (सापेक्षा) तीन अवस्थांच्या अपेक्षेनेच आहे, (त्रिधातूद्धृतांगं) कफ, वात व पित्त या तीन धातूंनी धारण केलेले शरीर जसें (मर्त्य) मरणशील, अतएव असत् म्हणजे मिथ्या आहे. (तथा इदं विश्वं) तसेंच हे विश्वही विनाशी व मिथ्या आहे. (हेतुतन्तोः) कारण अशा तंतूंच्या (आकर्षणात्) पृथक्करणामुळें (पटविलयः इव) कार्यभूत पटाचा ज्याप्रमाणे नाश होतो तसें (हेतुद्रव्यापकर्षे) जगाच्या कारण अशा द्रव्याचे पृथक्करण झाले असतां (विकृतं जगदपि) कार्यभूत जगत् सुद्धां (नश्वरं) विनाशशील आहे म्हणजे नष्ट होते. (श्रौतसत्- त्रिरूपार्केंद्वग्निधार्य) श्रुतीने सद्रूपाने ज्यांचे वर्णन केले आहे अशा सूर्य, चंद्र व अग्नि या तिघांनी धारण केले जाणारे असे सर्व जगत् (घटवत्) घटाप्रमाणे (असत्) मिथ्या आहे. (हि) निश्चयाने (स त्वं) पूर्वोक्त असा तूं मात्र (मृद्वत्) मृत्तिकेप्रमाणे (अनाद्यः असि) कारणरहित अतएव सत् व निर्विकार आहेस ॥१८॥

भावार्थ :- पूर्व श्लोकांत स्वप्नावस्था मायामय आहे असें सांगितले, कारण ती बदलणारी आहे. अर्थात् तीनहि अवस्था बदलणाऱ्या असल्याने मायामय आहेत हेही सिद्ध झाले. मायामय असल्याने तीन अवस्था जशा असत् आहेत तशी चौथी अवस्थारूप मीही असत् च आहे. अशी कदाचित् कोणाला शंका येईल ती येऊं नये. तुरीयत्व म्हणून कांही अवस्था नाही. तिन्ही अवस्थांना पाहणाऱ्या द्रष्ट्याला तीन अवस्थांच्या अपेक्षेने तुरीय म्हटले आहे. तुरीय या शब्दाने निर्विशेष आत्मस्वरूप श्रुतीला दाखवावयाचे आहे; हे या श्लोकांत सांगतात.

जागृति व स्वप्न या अवस्थांत स्वरूपाचे अज्ञान व मी ब्राह्मण आहे इत्यादि मिथ्या ज्ञान असें दोन्ही असते. सुषुप्तींत फक्त अज्ञानच असते. अन्तःकरण लीन झाल्यामुळें तेथे मिथ्या ज्ञान असत नाही. आत्म

स्वरूप, अज्ञान व मिथ्याज्ञान या उभयांनी रहित स्वयंप्रकाश चैतन्यघन व निर्विशेष आहे असें तुरीय या श्रुतीने सांगितले आहे. जागृति, स्वप्न व सुषुप्ती या तिन्ही अवस्था, अन्तःकरणांतील रज, सत्त्व व तमो गुणांनी निर्माण केल्यामुळें, जरी मिथ्या असल्या तरी या अवस्थात्रयीचा साक्षी जो तुरीय तो सत्यच आहे; खोटा नाहीं. स्थूल शरीर घटक कफ, वात व पित्त यांची विषमता म्हणजे कमी-अधिकपणा झाला म्हणजे शरीराचा नाश होतो व समता असली म्हणजे शरीराचे स्वास्थ्य असते; म्हणून हे शरीर जसें धातुत्रयीने धरलेले आहे व मरणधर्मक अतएव मिथ्या आहे, त्याप्रमाणेच हे सर्व विश्व सुद्धां सूर्य, चंद्र व अग्नि या तिघांनी धरलेले आहे. या तिघांचा अभाव झाल्यास जगांत कोणताहि व्यवहार होणार नाही. सर्वत्र अंधपणा येईल. या जगच्चालक सूर्यादित्रयींचा विचार केला असतां, हे सुद्धां अव्याकृत माया इत्यादि शब्दांनी सांगितल्या जाणाऱ्या मायेची जीं लोहित, शुक्ल व कृष्ण अशी तीन रूपें आहेत, तत्स्वरूपच आहेत; अर्थात् या सूर्यादिकांतील तीन रूपेंच खरी असून सूर्यादि व्यक्ती खोट्याच आहेत. तीनरूपात्मक असणारी माया सुद्धां जन्य व कालान्तराने नष्ट होणारी अशीच आहे. हिला इतर विकारांच्या दृष्टीने सत्यत्व सांगितले आहे. वास्तविक ही मिथ्या आहे. हिला उत्पन्न न होणारी म्हणून श्रुतीने 'अजा' म्हटले नसून, बकरीचे रूपक दाखविण्याकरितां अजा म्हटले आहे; म्हणून हिला उत्पन्न होणारी अशी मानण्यास कांही हरकत नाही. शास्त्रांत हिला अनादि म्हटले आहे, परंतु वास्तविक विचार केला असतां खोट्या वस्तूची उत्पत्ति व अनादित्व सारख्याच किंमतीचे आहे. एकंदरीत अनात्मरूप सर्वच विश्व मायामय व नश्वर आहे. ज्याप्रमाणे वस्त्रांतील एकेक तंतू बाजूला काढले असतां पट म्हणून कांही पदार्थ शिल्लक राहत नाही, त्याप्रमाणे जगाला धारण करणाऱ्या सूर्य, चंद्र व अग्नि यांचे जगांतून पृथक्करण केले असतां जगत् शून्यच आहे. या तीन वस्तूंतून हीं तीन रूपें पृथक् केली असतां हे तीन पदार्थहि शून्यच आहेत व ही तीन रूपेंहि मिथ्याच आहेत. मातीचे विकार घटशरावादि जरी

मिथ्या असले तरी त्यापेक्षां सर्व विकारानुस्यूत माती जशी खरी असते तसें सर्व प्रकृतिविकृत्यात्मक विकाररूप विश्व जरी खोटें व नश्वर असले तरी या सर्वांना अधिष्ठान सर्वानुस्यूत असा तूं मात्र, हे वत्सा, मिथ्या नाहीस, सत्य आहेस. म्हणून तूं अनादि अनंत व या सर्व प्रकृतिविकृत्यात्मक विश्वाची प्रकृति आहेस. तुझें असें स्वरूप दाखविण्याकरितांच तुला श्रुतीने तुरीय म्हणजे चतुर्थ असें म्हटले आहे ॥१८॥

**भास्यङ्गाद्भासकोऽन्योसि घटपटमुखाद्दीपवत्स्वप्रकाशो**
**ऽन्यत्रेतं मे मनोऽद्य स्थिरमिति मतिभूवृत्तिवेत्ता त्वमन्यः ॥**
**यत्सान्निध्याज्जडाङ्गाद्यजडवदवभात्येव स त्वं हृदादिर्यस्यायस्कान्तवच्च**
**प्रचलति पुरतः स त्वमेवाविकारः ॥१९॥**

अन्वयार्थः- (घटपटमुखात् दीपवत्) भास्य अशा घटपट-प्रभृति पदार्थांपेक्षा भिन्न व भासक अशा दीपाप्रमाणे तूं (भास्यांगात्) भास्य अशा स्थूल देहापेक्षां (अन्यो भासकोऽसि) निराळा व भासक असा आहेस, म्हणून (स्वप्रकाशः असि) स्वयंप्रकाशी आहेस. (मे मनः अन्यत्र इतं) माझे मन दुसरीकडे गेले (अद्य स्थिरं) आज स्थिर आहे (इति) याप्रमाणे (मति भूवृत्तिवेत्ता) अन्तःकरणजन्य वृत्तींचा ज्ञाता (त्वं अन्यः) तूं त्या मन व मनोवृत्तीहून वेगळा (असि) आहेस. (यत्सान्निध्यात्) ज्याच्या सान्निध्यामुळें (जडांगादि) जड असे देहादि अहंकारान्त सर्व पदार्थ (अजडवत्) चेतनाप्रमाणे (एव) च (अवभासति) भासतात, (स त्वं) तो तूं आहेस. (यस्य पुरतः) ज्या तुझ्या पुढें (अयस्कान्तवत्) लोखंड जसें लोहचुंबकापुढें चालते तसें (हृदादिः) अन्तःकरणादि (प्रचलित) क्रिया करीत असतात (सः त्वमेव) तो तूंच (अविकारः असि) त्या क्रियेच्या योगाने विकारी होत नाहीस. निर्विकारच आहेस.॥१९॥

भावार्थः- घटपटप्रभृति प्रकाश्य पदार्थांहून वेगळा व त्या पदार्थांना प्रकाशित करणारा जसा दिवा असावा त्याप्रमाणे स्थूल देह, स्थूल देहाभिमान-पूर्वक व्यवहार केले जाणारे जे सर्व दृश्य पदार्थ, या सर्व दृश्य जडपदार्थांहून

दीपाप्रमाणेच तूं वेगळा व तद्‌भासक आहेस, म्हणून तूं स्वयंप्रकाश आहेस. माझें मन काल श्रवणाच्या वेळीं दुसरीकडेच गेले होते, आज अगदीं स्थिर आहे, इत्यादि प्रकारांनी मन व मनाच्या सर्व वृत्तींना जाणणारा तूं, मन व तद् वृत्तीहून अत्यंत वेगळा व त्यांचा प्रकाशक असा आहेस - ज्या तुझ्या स्वयंप्रकाश रूपाच्या सान्निध्याने देह - प्राण - इन्द्रियें - मन - बुद्धि - अहंकार इत्यादि जड पदार्थसुद्धां एखाद्या सचेतन पुरुषाप्रमाणे व्यवहार करीत असलेले दिसतात, असा तूं अचेतनांना चेतविणारा स्वयंचैतन्यरूप आहेस. निर्विकार असणारा लोहचुंबक आपल्यापुढें असलेल्या लोखंडाचे चलन - वलन करून स्वतः अविचलित, स्थिर अशा स्थितींतच असतो, त्याप्रमाणे तूंहि आध्यासिक संबंधाने तुझ्यापुढें आलेल्या मन, बुद्धि, प्रभृति पदार्थांच्या सर्व प्रकारच्या हालचाली करवून स्वतः निर्विकार व कूटस्थ स्वरूपच आहेस॥१९॥

**शेषत्वेनाङ्गनाद्या दृश इह दयिता यस्य सोऽतिप्रियस्त्वं**
**भूयासं मा न भूवं त्वहमिति दृगतिप्रेमपात्रोऽसि स त्वम् ॥**
**प्रज्ञातद्वृत्तिसाक्षी त्वमनिशमुदितः सच्चिदानन्दरूपः**
**साक्षित्वं बोद्धृत्वं तेऽलमविकृतितयेत्थं त्वमर्थोऽवधार्यः ॥२०॥**

अन्वयार्थः- (इह) येथे (दृश्यःयस्य) ज्या तुझ्यांत द्रष्ट्याच्या (शेषत्वेन) अंगभूत तदर्थ किंवा अनुकूल झाल्याने (अंगनाद्याः दयिताः) स्त्रीपुत्रादिक प्रिय आहेत, (स त्वं) तो तूं (अतिप्रियः असि) त्या सर्वांपेक्षा अत्यंत प्रिय आहेस. (अहं मा न भूवं किंतु भूयासं इति दृक्) माझा नाश केव्हांहि होऊं नये, तर मी सर्वदा असावे असें पाहणारा (स त्वं) तो तूं (अतिप्रेमपात्रोऽसि) अत्यंत प्रेमाचे स्थान आहेस. (प्रज्ञातद्वृत्तिसाक्षी त्वं) बुद्धि व तद्‌वृत्ति यांचा साक्षी असा तूं (अनिशं उदितः सच्चिदानंदरूपः असि) निरंतर स्फुरणारा सच्चिदानंदरूप असा आहेस. (ते साक्षित्वं बोद्धृता अलम विकृतितया) तुझें साक्षित्व व बोद्धृत्व बुद्धीप्रमाणे सविकार नसून अत्यंत निर्विकार आहे. (इत्थं त्वमर्थोऽवधार्यः) याप्रमाणे तत्त्वमसि वाक्यांतील त्वं

पदाचा अर्थ समजावा ॥२०॥

भावार्थः- या जगांत प्रत्येक प्राण्याचे वास्तविक व मुख्य असें प्रेम आपल्यावरच म्हणजे आत्म्याच्या ठिकाणींच आहे. पुत्र - स्त्री - धनादि पदार्थ आपल्यास अनुकूल आहेत म्हणूनच प्रीतीचे विषय आहेत; अर्थात् त्यावरील प्रीति आत्मोपाधिक आहे, निरुपाधिक म्हणजे स्वतःच नाही. कारण ते पुत्रादि जर आपणांला प्रतिकूल झाले तर तत्काळ ते प्रेमांतून उतरून द्वेष - विषय होतात. आत्म्याचे मात्र तसें नाही. तो केव्हाही कोठेही व कोणालाही द्वेषविषय नाहीं. म्हणून त्याची प्रीति निरुपाधिक म्हणजे स्वतःच आहे. यासाठीं प्रत्येक प्राण्याला कोणत्याही अवस्थेंत माझा नाश होऊं नये, मी सदा असावे, असें वाटत असते. अत्यंत व्याध्यादिग्रस्त माणसें आत्महत्या करितात ती आत्म्याची नसून आत्म्याला प्रतिकूल अशा देहाचीच आहे. हा देह पडल्यावर आपण सुखांत राहूं असेंच त्या आत्महत्या करणाऱ्याला वाटत असते. असा निरुपाधिक व निरतिशय प्रेमविषय जो पदार्थ, बा शिष्या! तोच तूं आहेस. बुद्धि व तिच्या सर्व वृत्ति यांचा साक्षी निरंतर प्रगटच असणारा, कधींही न मावळणारा असा सच्चिदानंदरूप तूं आहेस. बुद्धीला इंद्रियादिकांचा साक्षीपणा व जाणतेपणा आहे, परंतु तो सापेक्ष विकाररूप वृत्त्यात्मक आहे. तुझें साक्षित्व व द्रष्टृत्व निर्विकार स्वरूपज्ञानात्मक आहे. अशा रीतीने तत्त्वमसि या वाक्यांतील त्वं पदाचा अर्थ महावाक्यार्थबोधांत उपयोगी पडणारा येथे सांगितला ॥२०॥

**द्रष्टा यो नो गुणात्मा न खमपि पवनो नाग्निरापो न च क्ष्मा**
**प्राणो हृद्धीर्न चाक्षाण्युदितसकलसम्बन्धहीनोऽक्षरोऽन्यः ॥**
**दृश्यात्कार्याज्जडाद्योऽगतिरनवयवोऽसङ्ग एको विशुद्धो**
**बुद्धो नित्यो विमुक्तोऽद्वयऋषिवचसारूप्यसौ तत्पदार्थः ॥२१॥**

अन्वयार्थः- (यो द्रष्टा) जो द्रष्टा असा परमात्मा (गुणात्मा नो) सगुण किंवा प्रकृतिरूप नाहीं (खं न) आकाश किंवा शून्यरूप नाहीं (पवनोऽपि न) वायुरूपही नाहीं (अग्निःन आपःन) तेजस्वरूप व जलरूपही

नाही, (क्षमा च न) पृथ्वीरूपही नाही, (प्राणः हृत् धीः अक्षाणि च न) प्राण, मन, बुद्धि, व इन्द्रियस्वरूपही नाही, (उदितसकलसंबन्धहीनः) पूर्वी सांगितलेल्या गुणप्रकृति प्रभृति सर्व पदार्थांचा संबंध नसणारा म्हणूनच (अक्षरः) अविनाशी (जडात् दृश्यात् कार्यात् अन्यः) अचेतन व दृश्य अशा आकाशादि कार्यापेक्षां निराळा आहे; (यः अगतिः) जो मन इत्यादि साधनांनी भास्य नसणारा (अनवयवः असंगः) अवयव नसणारा म्हणूनच संबन्धरहित (एकः) सजातीय, विजातीय व स्वगत अशा तीन भेदांनी रहित असणारा, (अद्वयः) क्षुधा, तृषा इत्यादि द्वैतरहित, म्हणूनच (विशुद्धः बुद्धः नित्यः विमुक्तः) शुद्ध-ज्ञान-नित्य व मुक्त असणारा (ऋषिवचसा) 'अरूपवदेव हि तत्प्रधानत्वात्' या व्याससूत्ररूप वचनाने (अरूपी अस्ति) रूपरहित असा आहे. (असौ तत्पदार्थः) या श्लोकांत व पुढील दोन श्लोकांत सांगितल्याप्रमाणे 'तत्' पदाचा अर्थ आहे ॥२१॥

भावार्थः- सतरा ते वीसपर्यंत चार श्लोकांत त्वं पदार्थाचे विवेचन झाले. २१-२२ व २३ अशा तीन श्लोकांत 'तत्' पदार्थाचे विवेचन करतात. सर्व जगताचे उपादान-कारण अशी प्रकृति, किंवा तिने निर्माण केलेले सर्वज्ञत्व सर्वकर्तृत्वादिगुण, शून्यतत्त्व, आकाशादि प्रसिद्ध पंचम हाभूते, प्राण, मन, बुद्धि, व सर्व इन्द्रियें या सर्वांहून भिन्न व या सर्वांचा वास्तविकसंबंधरहित म्हणूनच अविनाशी, अकार्य व अदृश्य मनःप्रभृति साधनाने प्रकाशित न होणारा निरवयव, म्हणूनच कोणाशींही संबद्ध न होणारा, वृक्षादिकांना दुसरे वृक्ष सजातीय असतात, पाषाणादि विजातीय असतात, व वृक्षान्तर्गत पुष्पफलादि स्वगत पदार्थ असतात. या तिघांचा भेद वृक्षांत असतो, परंतु या तत्पदार्थाला सजातीय व विजातीय कोणीही नसल्याने व स्वतः निरवयव असल्याने स्वगतही कोणी नसल्याने सजातीय, विजातीय व स्वगत-पदार्थ भेदशून्य, क्षुधापिपासा, सुखदुःख, शोक, मोह इत्यादि जागतिक द्वंद्वरहित म्हणूनच नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त स्वरूप श्रीमद् बादरायणाचार्यांनी अरूपवान् असा जो सांगितला तो ज्ञान-घन

परमात्मातत्पदाचा अर्थ आहे ॥२१॥

**योऽतव्द्यावृत्तिसाक्षाद्विधिमुखगदितोऽजोऽस्तसंसारदोषोऽ**
**तर्क्योऽस्थूलादिलक्ष्माऽस्तनिरतिशयमुद्योऽप्रकाश्यो गुणाश्च ॥**
**अद्रेश्यत्वादयोऽस्याप्यगुण इतमलोऽचिन्त्यशक्तिर्निरीहोऽ**
**कर्ताऽभोक्ताऽनपूर्वेऽप्रकृतिरविकृतिः सच्चिदानन्दमूर्तिः ॥२२॥**

अन्वयार्थः- (यः) जो परमात्मा (अतदूव्यावृत्तिसाक्षाद्विधि-मुखगदितः) नेति नेति अशा निषेधाने व नित्य, शुद्ध इत्यादि साक्षात् विधिरूपाने सांगितला जाणारा (अजः) जन्मादि विकारशून्य (अस्तसंसारदोषः) ज्यांनी सर्व संसारदोष टाकलेले आहेत असा (अतर्क्यः) तर्कागम्य (अस्थूलादिलक्ष्मा) अस्थूल अनणु इत्यादि लक्षणे असणारा (अस्तनिरतिशयमुद्) स्वतःच निरतिशय आनंदरूप असल्याने जो माध्वम तवत् निरतिशयानंदरूप धर्मवान् नसणारा (यः अप्रकाश्यः) ज्ञानस्वरूप असल्याने मनःप्रभृतीकडून ज्ञेय न होणारा (अस्य अद्रेश्यत्वादयः गुणा अपि यः अगुणः) ज्याला अद्रेश्य अग्राह्य इत्यादि गुण 'अदृश्यत्वादि गुणकः' या सूत्रांनी सांगितले असले तरी स्वतः जो प्रकृतिसंबंधी गुणरहित असणारा (इतमलः) रागादि दोषरहित (अचिन्त्यशक्तिः) सत्, असत् इत्यादि रूपांनी अनिर्वचनीय ज्याची शक्ति आहे असा (निरीहः अकर्ता अभोक्ता) प्राप्तकाम असल्याने इच्छारहित म्हणूनच कर्ता व भोक्ता नसणारा, (अनपूर्वः अप्रकृतिः) ज्याला पूर्व म्हणजे कोणी कारण नाहीं व प्रकृति म्हणजे जो कोणाचे कारण नाहीं म्हणूनच (अविकृतिः) विकारभिन्न (सच्चिदानंदमूर्तिः) सच्चिदानंदरूप आहे तो तत्पदार्थ जाणावा ॥२२॥

भावार्थः- जो इति न, इति न म्हणजे असा नव्हे, असा नव्हे असा निषेध करून श्रुतीने परंपरेने सांगितला व नित्य आहे, शुद्ध आहे, मुक्त आहे इत्यादि विधिमुखाने साक्षात् श्रुतीने दाखविला आहे. स्वतः जो जन्मादिविकारशून्य असून सर्व सांसारिक दोषरहित आहे; तर्काला अगोचर असणारा व अस्थूल, अणुभिन्न इत्यादि ज्याची लक्षणे आहेत

असा आहे; स्वतः निरतिशयानंदस्वरूप असल्याने निरतिशयानंद हा याचा धर्म होऊं शकत नाहीं, ब्रह्माचा आनंद असा श्रुतींतील प्रयोग राहूंचे शिर याप्रमाणे भेदाची कल्पना करून गौण समजावा. चैतन्यस्वरूप असल्याने मन-बुद्ध्यादिकांनी हा भास्य होत नाहीं, मन - बुद्ध्यादिक पदार्थ केवळ याला वृत्तीने व्यापतात, भासवीत नाहींत. प्राकृतिक म्हणजे मायिक गुणाने हा रहित आहे परंतु अदृश्य, अग्राह्य इत्यादि स्वरूपभूत गुणांनी हा मंडित आहे. हा गुणगुणीभावसुद्धां भेद कल्पूनच आहे. रागद्वेषादि मल याला स्पर्श करूं शकत नाहींत म्हणून तच्छून्य आहे. सत्, असत्, सावयव निरवयव व भिन्न-अभिन्न इत्यादि रूपांनी जिचे वर्णन करतां येत नाहीं अशा अनिर्वचनीय शक्तीने जो आध्यासिक संबंधाने संबद्ध आहे, प्राप्तकाम असल्याने सर्वे च्छाशून्य म्हणून अकर्ता व अभोक्ता असा जो आहे, ज्याला कोणी कारण नाहीं व जो कोणाचेही वास्तविक कारण होत नाहीं म्हणून प्रकृति व विकारात्मकही नाहीं; केवळ सच्चिदानंदस्वरूप असा जो आहे तो तत्पदार्थ जाणावा ।।२२।।

**सर्वज्ञः सर्वशक्तिः सकलपतिरयं कार्यभूतः प्रपञ्चो**
**यस्यातोऽसावनन्तो यमयति य इहाविश्य जीवात्मनास्य ।।**
**ज्ञानात्सर्वज्ञता यः कृतफलदतयास्ते समो यत्नतो विजिज्ञास्यं।**
**ब्रह्ममुक्त्यै यदिति निगदितस्तत्पदार्थोऽयमेव ।।२३।।**

अन्वयार्थः- (सर्वज्ञः सर्वशक्तिः सकलपतिः ) सर्वज्ञ, सर्वशक्तियुक्त व सर्वांचा स्वामी (यस्यायं कार्यभूतः प्रपंचः) हा परिदृश्यमान कार्यरूप प्रपंच ज्याचा आहे (अतः असौ अनन्तः) म्हणूनच हा अनंत आहे, (यः यमयति) जो अन्तर्यामी रूपाने सर्वांचे नियमन करतो, (यः इह जीवात्मना आविश्य स्थितः) जो या स्वनिर्मित भूतांमध्ये जीवरूपाने प्रवेश करून राहिला आहे, (यस्य ज्ञानात् सर्वज्ञता स्यात्) ज्याचे ज्ञान झाले असतां सर्वज्ञता येते, (यः कृतफलदतया समः आस्ते) जो जीवांनी केलेल्या बऱ्या-वाईट कर्मांचे निःपक्षपाताने फल देणारा म्हणून सर्वत्र सम असा आहे, (यत् ब्रह्म

मुक्त्यै विजिज्ञास्यं) जें ब्रह्म मुक्तीकरितां, तप इत्यादि प्रयत्न करून समजून घ्यावे (इति अयं निगदितः तत्पदार्थ एव) याप्रमाणे हा सांगितलेला सर्व तत्पदाचाच अर्थ आहे ।।२३।।

भावार्थः- या परमात्म्याची माया ही शक्ति असल्याने व सर्व मायेचेच कार्य असल्याने हा परमात्मा सर्वज्ञ, सर्वशक्ति व 'एष सर्वेश्वरः' या श्रुतीवरून व पत्यधिकरणन्यायाने हा सर्वेश्वर आहे, हा परिदृश्यमान कार्यरूप सर्व प्रपंच याचाच आहे म्हणून हा अनंत आहे. 'जो पृथिव्यादिकांमध्यें राहून त्यांचे नियमन करतो', अशा श्रुतिवचनावरून व 'अंतर उपपत्तेः' इत्यादि न्यायाने अंतर्यामी रूपाने जो सर्वांचे नियमन करतो, स्वयं निर्माण केलेल्या सर्वभूतांमध्यें जीवरूपाने प्रवेश करून जो सर्वत्र भरून राहिला आहे, ज्याचे ज्ञान झाले असतां ज्ञाता सर्वज्ञ होतो, जो जिवाने केलेल्या चांगल्या व वाईट कर्मांची फळे निःपक्षपातीपणाने देतो, म्हणून ज्याला विषमता किंवा क्रूरपणा वगैरे दोष लागत नाहींत, जो सर्वांशी सारखेपणाने वागतो, 'तद्विजिज्ञासस्व' म्हणून श्रुतीने ज्या ब्रह्माला जाणण्याविषयीं सांगितले ते प्रत्यक्ष ब्रह्म म्हणजेच परमात्मा. याप्रमाणे या तीन श्लोकांनी सांगितलेला सगळा 'तत्त्वमसि' वाक्यांतील तत्पदार्थ झाला. ।।२३।।

**संसर्गो नापि नीलोत्पलमिव न विशिष्टोऽत्र वाक्यार्थ**
**एतद्वैलक्षण्येन तूक्तो व्यभिचरति गुणोऽशब्देऽपि नीलाम्बुजे सन्।**
**तत्वद्द्रव्यं च रक्ते व्यभिचरति न सब्द्रह्मता न प्रतीचोन्यत्र**
**प्रत्यक्त्वमेवं कथमपि हि परब्रह्मणोऽन्यत्र नास्ति ।।२४।।**

अन्वयार्थः- (अत्र संसर्गः न वाक्यार्थः) या महावाक्यांत तत्त्वं पदार्थाचा परस्परांशीं संबंध हा वाक्यार्थ नाहीं. (नीलोत्पलमिव विशिष्टः अपि न) नीलोत्पल या वाक्यांत जसा नील विशिष्ट उत्पल असा विशिष्टार्थ विवक्षित आहे, तसाहि येथे विशिष्टार्थ नाही. (एतदुभयवैलक्षण्येन तु उक्तः) या दोन्ही स्थलांपेक्षा निराळ्याच प्रकाराने महावाक्यांत वाक्यार्थ सांगितला आहे. (गुणः नीलांबुजेऽपि सन् अब्दे व्यभिचरति) नीलगुण नील कमलांत

असला तरी कमलत्वशून्य मेघांतहि असल्याने कमलत्वाचा व्याप्य होत नाहीं. (तद्वत् द्रव्यं च रक्ते अपि व्यभिचरति) त्याप्रमाणे नील गुणाचा आश्रय कमल असले, तरी नीलगुणरहित रक्त कमलामध्यें कमलत्व असल्याने कमलत्वही नीलगुणाचे व्याप्य नाहीं. (सत् न व्यभिचरति) बाधरहित सत् पदार्थ कोठेंहि व्यभिचरित म्हणजे नाहीं असें होत नाहीं. (हि प्रतीचोऽन्यत्र ब्रह्मता नास्ति) कारण प्रत्यगात्म्याहून इतरत्र ब्रह्मता नाहीं. (एवं परब्रह्मणा अन्यत्र प्रत्यक्त्वं कथमपि नास्ति) याप्रमाणे परब्रह्माहून अन्यत्र दुसरीकडे प्रत्यक्त्व कोणत्याही प्रकारे नाही ॥२४॥

भावार्थः- 'तत्त्वमसि' इत्यादि महावाक्यांतील पदांचे अर्थ सांगून आतां वाक्यार्थ काय आहे हे २४ पासून अठ्ठावीसपर्यंत पांच श्लोकांत सांगतात. सर्वत्र वाक्यांत वाक्यांतील पदार्थांचा संबंध हा वाक्यार्थ असतो किंवा एका पदार्थाने विशिष्ट दुसरा पदार्थ हा वाक्यार्थ असतो, जसें नील कमल आहे. या वाक्यांत नीलवर्ण व कमल यांचा संबंध वक्त्याला विवक्षित असतो किंवा नील वर्णाने युक्त कमल असा एक पदार्थविशिष्ट अपर पदार्थ तरी विवक्षित असतो. परंतु 'तत्त्वमसि' या वाक्यांत मात्र हे दोन्ही प्रकार विवक्षित नाहींत; कारण सर्वानर्थाला मूल कारण द्वैतबुद्धि आहे ती घालवून परमपुरुषार्थप्राप्ति जिवाला व्हावी म्हणून महावाक्याची प्रवृत्ति आहे. त्या वाक्यानेही दोघांचा संसर्ग किंवा एक विशिष्ट अपर अशी द्वैतबुद्धीच जर उत्पन्न केली तर ती द्वैतबुद्धि, द्वैतबुद्धीचे निवारण कशी करील, म्हणून अखंड अद्वैतबुद्धीच महावाक्याने झाली पाहिजे. यासाठी महावाक्याचे तात्पर्य, संसर्ग किंवा एक विशिष्ट अपर अशा अर्थांत नसून अखंड अद्वैतांतच आहे. शिवाय 'नीलोत्पल' या वाक्यांत नीलाला उत्पल किंवा उत्पलाला नील विशेषण लावून एक विशिष्ट अपर असा अर्थ करणे योग्य आहे; कारण संभव व व्यभिचार असेल तर विशेषणाचे सार्थक्य असते. जसें आकाशाला 'पातळ' हे विशेषण संभवत नाहीं. पातळपणा हा पाण्याचा धर्म आहे. 'पोकळ' हेही विशेषण आकाशाला लावतां येत नाही; कारण आकाश

पोकळपणास कधींही सोडीत नाहीं, आकाश जर घट्ट असते तर पोकळ हे विशेषण शोभले असते. नील कमले या ठिकाणीं मात्र संभव व व्यभिचार असल्याने नील हे कमलाला किंवा कमल हे नीलाला विशेषण लावणे योग्य आहे. कमले नील असूं शकतात म्हणून संभव आहे व नीलवर्णाला सोडूनही तांबडी वगैरे कमळें असतात, तसेंच कमलांना सोडूनही नीलपणा मेघांत असतो, म्हणून परस्परांचा व्यभिचार असल्याने नीलकमल या ठिकाणीं विशेषणविशेष्यभावाने एक विशिष्ट अपर असा अर्थ करणे किंवा दोघांचा संसर्गरूप अर्थ करणे योग्य आहे. 'तत्त्वमसि' वाक्यांत तत्पदार्थ त्वं पदार्थाला किंवा त्वं पदार्थ तत्पदार्थाला विशेषण लावून, एक पदार्थ विशिष्ट अपर पदार्थ असा अर्थ करण्याला कारण असणारा जो व्यभिचार तोच नाहीं. तत् व त्वं पदार्थ अबाधित, सद्रूप आहेत. सत्पदार्थाचा व्यभिचार म्हणजे अभाव कोणत्याही वस्तूंत नाहीं. सर्वत्र सत् सत् अशी प्रतीति आहे. सताशिवाय कोणाचीच प्रतीति होत नाही. कमलाला सोडून नीलता जशी मेघांत होती तशी तत्पदार्थ ब्रह्माला सोडून त्वं पदार्थ रूप प्रत्यक्ता दुसरीकडे कोठेंही नाही. नीलपणाला सोडून कमलत्व जसें रक्त कमलामध्यें होते तसें प्रत्येकपदार्थाला सोडून ब्रह्मत्वही दुसरीकडे कोठें नाही. त्यामुळें उभयतांचा अव्यभिचार असल्याने व्यभिचाररूप कारणाने होणारा विशेषणविशेष्यभाव व तन्मूलक संसर्ग किंवा एक विशिष्ट अपर असा 'नीलोत्पल' या वाक्याप्रमाणे अर्थ तत्वमसि वाक्यांत नाहीं ।।२४।।

**वाक्यार्थोऽतोऽत्र तादात्म्यमुभयपदयोरर्थयोरस्यखण्डम्**
**प्रत्यग्बोधैकरूपोऽद्वयमुदपि च सोऽद्वैतमुद्रूप एव ।।**
**तादात्म्यज्ञप्तिदार्ढ्ये स्वयमपि हि तदर्थस्य पारोक्ष्यमाशु**
**व्यावर्तेताज्ञतान्यस्य च स च परिपूर्णप्रमोदोऽवतिष्ठेत् ।।२५।।**

अन्वयार्थः- (अतः अत्र) म्हणूनच या अद्वैत मतांत (उभयपदयोः अर्थयोः) तत् आणि त्वं या दोन पदांच्या अर्थाचे (अखंडं तादात्म्यं वाक्यार्थः अस्ति) एकरस असें ऐक्य वाक्यार्थ आहे. (अद्वयमुद् प्रत्यग्बोधैकरूपा)

अद्वयानंद रूप तत्पदार्थ हा प्रत्यग्बोधरूप त्वं पदार्थ आहे व (सः प्रत्यग्बोधैकरूपः) तो प्रत्यग्बोधरूप त्वं पदार्थही अद्वयानंदनरूप तत्पदार्थ आहे. (एवं) याप्रमाणे, परस्पर विशेषणविशेष्यभावाने (तादात्म्य-ज्ञप्तिदार्ढ्ये सति) ऐक्य ज्ञानाचे दार्ढ्य झाले असतां (स्वयमपि हि) खात्रीने आपोआपच (तदर्थस्य पारोक्ष्यं अन्यस्य अज्ञता आशु व्यावर्तेत) तत्पदार्थाचे परोक्षत्व व त्वं पदार्थाचे अज्ञत्व किंवा अल्पज्ञता इत्यादि लवकर निवृत्त होईल. त्यानंतर (स च परिपूर्णप्रमोदः अवतिष्ठेत्) त्वं पदार्थ जीव परिपूर्ण आनंदरूप होऊन चिरकाल राहील ॥२५॥

भावार्थः- पूर्वी सांगितल्याप्रमाणे संसर्ग किंवा विशिष्ट असा अर्थ महावाक्याचा होत नसल्याने अद्वैत वेदान्तात तत्, त्वं पदार्थांचे स्वरूपभूत अखंड एकरसरूप ऐक्य हा वाक्यार्थ आहे. यद्यपि, नीलोत्पलाप्रमाणे तत् व त्वं यांचा परस्पर वास्तविक व्यभिचार नाही, परंतु अज्ञानाने दोन्ही भिन्न आहेत अशी समजूत असल्याने अज्ञांच्या भ्रमात्मक बोधानुसार विशेषण - विशेष्यभाव या वाक्यांत केला म्हणजे अद्वयानंदरूप तत्पदार्थ प्रत्यक् बोधैकरूप त्वं पदार्थ होतो व प्रत्यक् बोधरूप त्वं पदार्थही अद्वयानंदरूप तत्पदार्थ होतो. याप्रमाणे परस्पर विशेषण - विशेष्यभावाने ऐक्यज्ञान दृढ झाले असतां तत्पदार्थ ब्रह्म माझ्याहून निराळे कोठें तरी देशान्तरांत आहे अशी त्यांतील परोक्षता व त्वमर्थ मीमांसा दुःखादियुक्त, अल्पज्ञ असा आहे असें प्रत्यगर्थांतील दुःखित्वकिंचिज्ज्ञत्वादिकही तात्काळ नाहींसे होतात; असें झाले असतां साधक मुमुक्षु त्वं पदार्थ जीव शुद्ध होऊन, परिपूर्ण स्वयंप्रकाशमान आनंदरूपाने चिरकाल राहतो ॥२५॥

**सर्वज्ञत्वादिलक्ष्माऽभवदिह य उपाश्रित्य मां शुद्धसत्त्वाम्**
**विश्वत्पत्तौ निमित्तं श्रितउत य उपादानकं तामसीं ताम् ॥**
**तद्वाच्यार्थः स पारोक्ष्यशबल उत यद्ब्रह्म सर्वत्र पूर्णम्**
**सत्यं ज्ञानं ह्यनन्तं तदिह ऋषिमतस्तत्पदार्थो हि लक्ष्यः॥२६॥**

अन्वयार्थः- (इह विश्वोत्पत्तौ) येथे विश्वाच्या उत्पत्तिरूप

कार्यामध्ये (यः) जो आत्मा (शुद्धसत्त्वां मां उपाश्रित्य) शुद्धसत्त्व-प्रधान मायेचा उपाधिरूपाने स्वीकार करून, (सर्वज्ञत्वादिलक्ष्मा) सर्वज्ञत्वादि लक्षणांनी युक्त होऊन (निमित्तं उत) निमित्तही झाला, (यः तामसीं तां श्रितः उपादानकं च अभवत्) जो तमोगुणप्रधान अशा त्या मायेचा आश्रय करून उपादान कारणही झाला, (सः पारोक्ष्यशबल उत तद्वाच्यार्थः) तो निमित्त व उपादान उभयरूप व परोक्षत्वधर्माने युक्त असा तत्पदाचा वाच्यार्थ समजावा. (यत् हि सर्वत्र पूर्णं सत्यं ज्ञानं अनन्तं ब्रह्म) जें निश्चयाने सर्वत्र व्यापून असणारे, अबाधित ज्ञानरूप व देश-काल-वस्तु-परिच्छेदरहित असें ब्रह्म आहे (तत् इह हि) ते या महावाक्यांत निश्चयाने (ऋषिमतः लक्ष्यः पदार्थः) बादरायणादि ऋषींना संमत असा तत्पदाचा लक्ष्यार्थ आहे ।।२६।।

भावार्थ :- या सव्वीस व सत्तावीस अशा दोन श्लोकांत क्रमाने तत्पदाचा व त्वं पदाचा वाच्यार्थ व लक्ष्यार्थ वेगवेगळ्या तऱ्हेने दाखवितात. त्रिगुणात्मक मायेंतील शुद्धसत्त्वप्रधान मायेला उपाधि रूपाने स्वीकारून ते परब्रह्म सर्वज्ञत्वादि गुणांनी युक्त होऊन या सर्व विश्वाच्या उत्पत्तीला, घटोत्पत्तीला कुलाल जसा निमित्त-कारण होतो; तद्वत् निमित्त-कारण झाले. तमोगुणप्रधान अशा त्याच मायेला उपाधित्वाने स्वीकारून मृत्तिका जशी घटाला उपादान होते त्याप्रमाणे या विश्वोत्पत्तीला ते परब्रह्मच उपादानकारण झाले हे अभिन्न-निमित्तोपादानकारणत्व व परोक्षत्व या धर्माने युक्त असें परब्रह्म, तत्पदाचा वाच्यार्थ आहे. जें सर्वव्यापक, त्रिविधपरिच्छेदशून्य, त्रिकालाबाधित, स्वप्रकाश, ज्ञानस्वरूप, शुद्ध ब्रह्म आहे ते तत्पदाचा लक्ष्यार्थ आहे असें बादरायणप्रभृति ऋषींचे निश्चयाने मत आहे. ।।२६।।

**योहृत्संभिन्नबोधः परकलुषितसत्त्वामुपाध्यात्मना यो**
**रागद्वेषादितुष्टां प्रकृतिमुपगतस्त्वंपदार्थः स वाच्यः ।।**
**कूटस्थः प्रत्यगात्मा करणगुणपरः पंचकोशातिरिक्तो**
**जाग्रत्स्वप्नादिसाक्षी त्रितनुपर इहोक्तस्त्वमर्थो हि लक्ष्यः ।।२७।।**

अन्वयार्थ :- (यः) जो आत्मा, (परकलुषितसत्त्वां) रज व तमो

गुणांनी मलिन केले आहे सत्त्व जिचे अशा, म्हणून (रागद्वेषादि दुष्टां) रागद्वेषादिदोषयुक्त अशा प्रकृतीप्रत (उपाध्यात्मना उपगतः) उपाधिरूपाने घेतां झाला म्हणूनच (हृत्संभिन्नबोधः) अन्तःकरणाच्या तादात्म्याध्यासापन्नबोध म्हणजे किंचिज्ज्ञत्वादि धर्मांनी युक्त झाला, तो त्वं पदाचा वाच्यार्थ आहे. (यः कूटस्थः) जो कूटाप्रमाणे म्हणजे सोनाराच्या ऐरणीप्रमाणे किंवा पर्वतशिखराप्रमाणे राहतो म्हणजे निर्विकार असतो, (करणगुणपरः) करण म्हणजे इंद्रियें व अन्तःकरण व गुण म्हणजे सत्त्वादि गुण, यांहून पर किंवा करणांचे, इन्द्रियादिकांचे जे गुण म्हणजे विषय जे शब्दादि यांच्याहून पर यांचा द्रष्टा यांचा वास्तविक संबंध नसलेला, (पंचकोशातिरिक्तः) अन्नमयादि पंचकोशांहून द्रष्टा (त्रितनुपरः) स्थूल, सूक्ष्म व कारण अशा तीन्ही देहांहून वेगळा असलेला (प्रत्यगात्मा इह लक्ष्यः त्वमर्थः उक्तः हि) जड विषयादिकांहून वेगळेपणाने म्हणजे ज्ञानरूपाने भासणारा असा आत्मा या वाक्यांत त्वंपदाचा लक्ष्यार्थ असें सांगितले आहे हे शास्त्रप्रसिद्धच आहे. ॥२७॥

भावार्थ :- रजोगुण व तमोगुण यांनी मलिन झालेला सत्त्वगुण जिच्यामध्यें प्राधान्यें करून आहे म्हणूनच जी प्रकृति राग-द्वेष-मोहादि दोषांनी युक्त आहे, अशा प्रकृतीला आपली उपाधी समजून अंतःकरणाशीं तादात्म्य पावल्याने किंचिज्ज्ञत्वादि धर्मयुक्त जो आत्मा तो त्वंपदाचा वाच्यार्थ होय. कूट म्हणजे सोनाराची ऐरण. त्यावर अनेक प्रकारचे सुवर्णालंकार जरी घडविले तरी ती निर्विकारच असते किंवा कूट म्हणजे पर्वताचे शिखर जसें कोणत्याहि ऋतूंत निर्विकारच असते, त्याप्रमाणे उपाधीचे कितीहि जाग्रत्स्वप्नादिव्यवहार झाले तरी स्वतः निर्विकार स्वरूपाने असणारा; जड व दृश्य अशा विषयांपेक्षां चेतन व द्रष्टा अशा विपरीत रूपाने अहं अहं असा भासणारा; इन्द्रियें, अन्तःकरण व त्यांचे शब्दादि विषय व सत्त्व, रज, मनोमय, विज्ञानमय, व आनंदमय असा जीव, स्वरूपाला आच्छादित करणाऱ्या पांच कोशांहून अत्यंत वेगळा; जागृति, स्वप्न व सुषुप्ति यांना साक्षात् पाहणारा; स्थूल, सूक्ष्म व कारण अशा तीन देहांहून अत्यंत

विलक्षण असा, शुद्ध, चैतन्यरूप आत्मा त्वंपदाचा लक्ष्यार्थ आहे असें शास्त्राने निश्चयपूर्वक जाणावे. ॥२७॥

**वैरं वाच्यार्थयोर्यद्यपि न भवति तल्लक्ष्ययोस्तत्त्वमोर्वा**
**ऐकात्म्यात्तद्विहाय स्मृतजहदजहल्लक्षणालक्षितार्थम् ॥**
**लक्ष्यं शुद्धं गृहीत्वालमुभयपदयोः सच्चिदानन्दमेकम्**
**वृत्तिव्याप्तेह लब्ध्वाऽस्मृतगलकनकप्राप्तिनीत्या कृती स्यात् ॥२८॥**

अन्वयार्थः- (यद्यपि वाच्यार्थयोः वैरं) जरी तत् त्वंपदांच्या वाच्यार्थांत विरोध आहे; तरी (लक्ष्ययोः तत् न भवति) लक्ष्यार्थांत विरोध येत नाहीं. कारण (तत्त्वमोः ऐक्यात्म्यात्) तत्त्वं पदांचे लक्ष्यार्थ निश्चयाने एकरूपच आहेत. (तद्विहाय) म्हणून विरुद्ध असणारा वाच्यार्थांतील भाग सोडून (स्मृतजहदहजल्लक्षण-लाक्षितार्थं) स्मृतींत सांगितलेल्या जहदजहल्लक्षणेने प्रतिपाद्य असा, (शुद्धं एकं) शुद्ध व अखंडैकरस असा, (उभयपदयोः लक्ष्यं गृहीत्वा) तत्त्वंपदांचा लक्ष्यार्थ घेऊन, (तमेव एकं सच्चिदानन्दं) त्याच एक सच्चिदानंदरूप लक्ष्यार्थाप्रत, (अस्मृतगलकनकप्राप्ति-नीत्या) विस्मृत अशा कंठांतील सुवर्णालंकाराच्या प्राप्तिन्यायाने (इह) शुद्धांतःकरणांत (वृत्तिव्याप्त्या लब्ध्वा) तदाकार अशा अन्तःकरणवृत्तीने प्राप्त करून घेऊन (कृती स्यात्) साधकमुमुक्षु कृतकृत्य होईल. ॥२८॥

भावार्थः- तत् व त्वं पदांचे वाच्यार्थ सर्वज्ञत्व किंचिज्ज्ञत्व, परोक्षत्व, अपरोक्षत्व, अपरिच्छिन्नत्व परिच्छिन्नत्व इत्यादि विरुद्ध धर्मांनी युक्त असल्याने त्यांचे ऐक्य होणे शक्य नाहीं. तथापि उभय पदांचा लक्ष्यार्थ अखंडैकरस एक व शुद्ध असें चैतन्यच असल्याने ऐक्यांत विरोध करणारा वाच्यार्थत्याग करून स्मृतीने सांगितलेल्या जहदजहत्-कांहीं टाकणे, कांही घेणे, अशा ज्या लक्षणेत प्रकार आहे, त्या जहदजहल्लक्षणेने अविरोधी असा अखंड एकरसपदार्थ जें ब्रह्म, त्या ब्रह्माची वृत्ति शुद्ध अंतःकरणांत उत्पन्न झाली असतां पूर्वी स्वस्वरूपच अर्थात् प्राप्त असलेलेच जें ब्रह्म, विसरून नाहींसा झालेला गळ्यांतील सुवर्णालंकार जसा, ज्ञान झाल्याबरोबर प्राप्त

होतो; त्याप्रमाणे वृत्तिव्याप्तीने त्या स्वस्वरूपपरब्रह्माची प्राप्ति झाली म्हणजे साधक मुमुक्षु कृतकृत्य व प्राप्तप्रापणीय असा होतो ॥२८॥

**विक्षेपकावृतिभवे विभवे विनष्टी**
**स्वानन्ददृष्टिरपहाय च दृष्ट्यदृष्टी**
**एकात्मनेह चरति यः कृतार्थ**
**आत्मैव नात्मविदयं सदयं परार्थः ॥२९॥**

अन्वयार्थः- (विक्षेपकावृतिभवे विभवे विनष्टी दृष्ट्यदृष्टी अपहाय) विक्षेप व आवरण यांच्या पासून होणाऱ्या, नाना जन्मांना देणाऱ्या, विशेष हानी करणाऱ्या, विक्षेप व आवरणजन्य जागृती व स्वप्नरूप दोन अवस्था म्हणजे दृष्टि व आवरणजन्य निद्रा म्हणजे अदृष्टी, या तीन अवस्थांचा त्याग करून, म्हणजे गुणातीत होऊन (स्वानंददृष्टीः) बाह्य विषयांहून दृष्टी व्यावृत्त करून स्वरूपानंदाच्या ठिकाणीं ज्याची दृष्टी आहे असा, (स्वरति च) भार्या पुत्रादिकांच्या ठिकाणीं प्रेम न ठेवतां स्वरूपाच्या ठिकाणीं ज्याचे प्रेम आहे असा, (एकात्मना इह यः चरति सः कृतार्थः) केवल आत्मरूपाने जो या ठिकाणीं राहतो त्याला कृतार्थ असें म्हणतात. (अयं न आत्मवित् किंतु आत्मा एव) हा आत्मज्ञानी नव्हे तर प्रत्यक्ष आत्माच आहे (सदयं परार्थः जीवति) केवल दयावशात् लोकोपकाराकरितां याचे जगांत वास्तव्य असते.॥२९॥

भावार्थः- पूर्व श्लोकांत वृत्तिव्याप्तिरूप ब्रह्मसाक्षात्कार झाला असतां मुमुक्षु कृतकृत्य होतो असें जें सांगितले, ते कृतकृत्यत्व या लोकांत दाखवितात. अज्ञानाच्या आवरण व विक्षेप अशा दोन शक्ति आहेत. सद्वस्तूचे आच्छादन करून ती नाहीं असा व्यवहार करविणारी आवरणशक्ति व आवरणानंतर त्या वस्तूला विपरीत रूपाने भासवून विपरीत व्यवहार करविणारी विक्षेपशक्ति - जसें शुक्तीचे आच्छादन करून तीवर शुक्तीच्या विरुद्ध रजत भासविणे, ह्या दोन्ही शक्ति शुक्तीच्या अज्ञानांत आहेत. त्या प्रमाणे सद्रूप ब्रह्माच्या अज्ञानांतही ब्रह्माला आच्छादित करून ते नाहीं असा

व्यवहार करवून, जागृति, स्वप्न व सुषुप्ति अशा ब्रह्म स्वरूपाच्या विरुद्ध असणाऱ्या अवस्था त्या ब्रह्मावर भासविणे या आवरण विक्षेपरूप दोन शक्ति आहेत. या अवस्थांपैकी जागृति व स्वप्न या अवस्था आवरण व विक्षेप या दोन शक्तींनी निर्माण केल्या आहेत. यांना या श्लोकांत दृष्टी अशी संज्ञा आहे. या तीनहि अवस्था देव, मनुष्य, पश्वादि नाना प्रकारांच्या जन्माला देणाऱ्या व नाना प्रकारची हानि करणाऱ्या अशा आहेत. या सर्व अवस्थांचा ज्ञानबलाने त्याग करून, म्हणजे गुणातीत होऊन बाह्य विषयाला टाकून, स्वरूपानंदामध्येंच जो निमग्न असतो, पुत्रभार्यादि अनात्म वस्तूंच्या ठिकाणीं प्रेम न करतां स्वरूपाच्या ठिकाणींच ज्याचे अखंड प्रेम असते व जो या लोकांत विशुद्ध ज्ञानस्वरूप केवळ आत्मस्वरूपाने राहतो त्याला कृतकृत्य असें सिद्धान्तज्ञानी म्हणतात. तो आत्मज्ञानी नव्हे तर प्रत्यक्ष परब्रह्मरूपच आहे. याला स्वार्थ कांहींच नसल्याने केवळ परोपकाराकरितां करुणामय असें याचे जीवित या लोकांत प्रारब्ध असेपर्यंत असते ।।२९।।

**कुर्याच्छमादिसहितोऽवहितः श्रुतार्थ -**
**स्थेम्नेऽसकृच्छ्रवणपूर्वमदोऽकृतार्थः ।।**
**देहात्मवदृढपरात्मधियं रिरक्षुः**
**पूर्णो भविष्यति कृती परवित्तरक्षुः ।।३०।।**

अन्वयार्थः- (अकृतार्थः) एक वेळ श्रवण करून जर कृतार्थ झाला नसेल तर (श्रुतार्थस्थेम्ने) ऐकलेला जीवब्रह्मैरूप अर्थ बुद्धींत स्थिर करण्याकरितां (देहात्मवत्) देहात्मज्ञान जसें दृढ आहे, तसें (दृढपरात्मधियं रिरक्षुः) देहात्मज्ञान बाधक अशा परात्मज्ञानाचे दार्ढ्य, सरंक्षण करण्याची इच्छा करणाऱ्या मुमुक्षूने (अवहितः शमादिसहितश्च) एकाग्र चित्त व शम दमादिकांनी युक्त होऊन, (अदः श्रवणपूर्वम्) पूर्वी सांगितलेले हे श्रवणादि साधन (असकृत् कुर्यात्) पुनः पुन्हां करावे; त्यायोगाने तो (कृती पूर्णः) कृतकृत्य व परिपूर्ण होऊन, (परवित्तरक्षुः) पशूंमध्यें वाघ जसा श्रेष्ठ तसा परब्रह्मविदांमध्यें श्रेष्ठ (भविष्यति) होईल. ।।३०।।

भावार्थः- श्रवणमननादि करीत असतांसुद्धां प्रतिबंधक असल्याने ज्याला असा अखंड ब्रह्मसाक्षात्कार झाला नसेल, त्याने साक्षात्कार होईपर्यंत निष्ठेने श्रवण मननादि साधनच करीत राहावे हे या श्लोकांत सागंतात. एक वेळ ऐकून तत्त्वज्ञान व तज्ञन्य कृतार्थता झाली नसेल, तर ऐकलेल्या अद्वितीय ब्रह्मरूप अर्थाचा हृदयामध्यें देहात्मज्ञानाप्रमाणे दृढ निश्चय होण्यासाठीं व तो कायम राहण्यासाठी चित्ताचे ऐकाग्र्य व शमदमादि साधनांच्या साहाय्याने पूर्वी सांगितलेले श्रवण-मननादि मुमुक्षूने वारंवार करावे. असें झाले असतां मुमुक्षूला तत्त्वसाक्षात्कार होऊन तो कृतकृत्य होईल. सर्व भूतांच्या ठिकाणीं आत्म्याला व आत्म्याच्या ठिकाणीं सर्व भूतांना पाहणारा असा तो आत्मसाक्षात्कारी परब्रह्मज्ञान्यांमध्यें वरिष्ठ असा होईल. भगवत्पूज्यपादांनी वाक्यार्थ बोध दृढ होण्याकरितां शमादिसाधनांनी श्रवणादिकच करावे असें सांगितले आहे. ॥३०॥

**नारम्भकोऽस्य जगतोऽचित एत आत्मा**
**निर्विक्रियो न परिणाम्यतनुश्चिदात्मा ॥**
**नाभिक्रमे तु घटते परमाणुमानं**
**नैकं जडं तु परिणाम्यतानुमानम् ॥३१॥**

अन्वयार्थः- (अचितः अस्य जगतः) जड अशा या जगाला (एकः आत्मा न आरंभकः) एक असा हा आत्मा उत्पादक होत नाहीं. (अतनुः) निरवयव, (निर्विक्रियः) निर्विकार (चिदात्मा) चैतन्यरूपात्मा (परिणामी न) परिणामी होत नाहीं. (परमाणुमानं तु) परमाणु सिद्ध करणारे प्रमाण (अभिक्रमे न घटते) परमाणु जगाला उत्पादक आहे असें सांगण्यास समर्थ नाहीं; उलट विरुद्धच आहे. (एकं) सहायरहित, (जडं) अचेतन, (अमता - नुमानं तु) श्रुतीला संमत नसणारे, केवळ अनुमानांनी सिद्ध होणारे प्रधान, म्हणजे सांख्यांची प्रकृति तर, (न परिणामी) जगद्रूपाने परिणाम पावत नाहीं. ॥३१॥

भावार्थः- श्रवणादि साधन सांगण्यासाठी उपोद्घात म्हणून

आत्माच या सर्व जगाला निर्माण करणारा आहे. प्रकृति किंवा परमाणु नव्हे, हे सांगण्याकरितां प्रथम पूर्वपक्षमताने आत्मा परमाणु किंवा प्रकृति कोणीच जगाला कारण होऊं शकत नाहीं असें या लोकांत दाखवितात. दोन अवयवांच्या संयोगाने दोघांहून विलक्षण तिसरा पदार्थ निर्माण होणे-जसें तंतुसंयोगापासून पट किंवा कपालांच्या संयोगापासून घट, हा नैयायिकांचा आरंभवाद आहे. दुधाचे दहीं, मृत्तिकेचा घट किंवा सुवर्णाचे अलंकाररूप परिणाम होणे हा सांख्यांचा परिणामवाद आहे. आरंभवादाचा अंगीकार करून आत्म्यापासून जग निर्माण झाले असें म्हणतां येत नाहीं. कारण आरंभवादांत दोन वस्तूंचा संयोग होण्याकरितां दोन वस्तूंची गरज आहे. वेदान्तीमतांत अद्वितीय असा एकच आत्मा असल्याने दोन वस्तु नाहींत; म्हणून संयोगरूप कारण नाहीं. शिवाय कार्य हे कारणाशीं सजातीय असते. पटरूप कार्य तंतूशीं सजातीय आहे कारण पट व तंतू दोन्ही द्रव्यरूपच आहेत. वेदान्त्यांच्या मते आत्मा निर्गुण असल्याने द्रव्य नाहीं, चेतनस्वरूप आहे. जग जड व द्रव्यरूप आहे; अतएव आत्मा व जग हे सजातीयही नाहींत म्हणून आरंभवादाने आत्म्यापासून जग झाले, असें म्हणतां येत नाहीं. सांख्यांचा परिणामवाद स्वीकारूनही आत्मा जगाला कारण आहे असें म्हणतां येत नाहीं. परिणामवादांत ज्याचा परिणाम होतो ती वस्तु सावयव, विकारी व जड अशी असते; जशी मृत्तिका, दूध इत्यादि. आत्मा निर्विकार, निरवयव व चेतन असल्याने त्याला परिणामीं कारण मानणे शक्य नाहीं; अतएव परिणामवादही शक्य नाहीं. अर्थात् जगाचे आरंभकारण किंवा परिणामी कारण आत्मा नाहीं असें सिद्ध झाले. नैयायिकांना सम्मत असणाऱ्या पृथ्वी, जल, तेज व वायु या चार भूतांच्या परस्पर विलक्षण अशा परमाणूपासून जगाची उत्पत्ति झाली व हे विश्व जगाचे मूळ कारण जे चतुर्विध परमाणु त्यांवर अधिष्ठित आहे असें मानणेहि योग्य नाहीं. परमाणुसाधक अनुमानानें नैयायिकांनीं सर्व परमाणु निरवयव आहेत असें ठरविले आहे. ते सावयव असतील तर त्यांना 'परमाणु' हे नांव देतां येणार

नाहीं. अवयवरहित असणे हाच परमाणूमधील परमपणा म्हणजे श्रैष्ठ्यत्व आहे. निरवयव अशा परमाणूंचा जर संपूर्णरूपाने संयोग मानला तर एक दुसऱ्यांत, दुसऱ्यांत तिसरा, यांप्रमाणे संयुक्त झालेले सर्वच परमाणु एका परमाणूच्या आकाराएवढे होतील. त्यांना मोठा आकार येणे शक्य नाहीं. जग तर स्थूल आहे म्हणून परमाणूंचे ते कार्य नव्हे. शिवाय लोकांत कार्य व कारण यांचा अभेद सर्वत्र दिसतो. नैयायिकांनी कार्य व कारण यांचा अत्यंत भेद मानला आहे म्हणून त्यांचे मत असंगत आहे. कार्याहून कारण अत्यंत भिन्न मानल्यास दोन-दोन शेर वजनाचे दोन कपाल घेऊन एक घट निर्माण केल्यास त्या घटांत, कपालांत असलेल्या चार शेर वजनाने घटामध्यें दुसरे चार शेर वजन येईल; म्हणजे त्या कपालापासून झालेल्या घटाचे वजन आठ शेर होईल. लोकांत असें झालेले दिसत नाहीं म्हणून हा वाद योग्य नाहीं. नैयायिक असत्कार्यवादी आहेत. नसलेले कार्य उत्पन्न होणे शक्य नसल्याने हा वाद योग्य नाहीं. परिमाणयुक्त द्रव्य आपल्या परिमाणाशीं सजातीय परिमाणांनी युक्त असें आपल्यापेक्षां मोठें द्रव्य बनवितें. जसें कपालाचे महत् परिमाण घटाचेहि महत्परिमाण बनविते. घटाचे महत्परिमाण कपाल परिमाणाशीं सजातीय आहे व त्यापेक्षां मोठें आहे; परंतु परमाणु परिमाण, अणु जातीचे व जगाचे परिमाण महत्जातीचे असल्याने परमाणूपासून जगत् झाले हा आरंभवाद असंगत आहे. प्रकृति जगरूपाने परिणत होते हा सांख्यांचा परिणामवादहि योग्य नाहीं. चेतनाला साहाय्य न घेतां अचेतन एकटेंच परिणाम पावते असें कोठेहि दृष्ट नाहीं. केवळ अनुमानाने मानलेल्या, श्रुतिसम्मत नसलेल्या प्रकृतीला जगाचे कारण मानणे गैर असल्यानेहि हा प्रकृति-परिणाम जग, असा वादहि अयोग्य आहे ।।३१।।

**श्रुत्योर्णनाभिवसुधाद्युपमात्रयेण**
**या कार्यकारणविलक्षणता त्वभाणि ।।**
**सत्येव स्यास्य घटतेऽत्र विवर्तनीत्या**
**नित्यात्मनः प्रकटनं ननु मायिरीत्या ।।३२।।**

अन्वयार्थः- (श्रुत्या) 'यथोर्णनाभिः' इत्यादि श्रुतीने (ऊर्णनाभि वसुधाद्युपमात्रयेण) कोळी, पृथ्वी व पुरुष अशा तीन उपमांनी (या तु कार्यकारणविलक्षणता अभाणि) जें कार्य व कारण यांचे वैषम्य सांगितले (सा सती एव अत्र घटते) ते वैषम्य अबाधित असे जगाच्या उत्पत्तिविषयीं योग्य ठरते. *'दृश्यते तु'* असें अधिकरण या वैषम्यांत प्रमाण आहे. (अतः विवर्तनीत्या) म्हणून अधिष्ठानापेक्षां विषमसत्तायुक्त कार्याची उत्पत्ति असा जो विवर्तवाद या विवर्त न्यायाने (मायिरीत्या) मायावी पुरुष जसें मायामयगारुड निर्माण करतो तसें (नित्यात्मनः) मायावी व नित्य अशा आत्म्यापासून (अस्य प्रकटनं ननु) पूर्वी त्या मायेंत लीन असलेल्या जगाचा आविर्भाव होतो हेच श्रुतिसंमत आहे. आरंभ व परिणामवाद संमत नाहींत असें निश्चित आहे. ॥३२॥

भावार्थः- आरंभवादाचा अंगीकार करून परमाणूपासून जगत् होऊं शकत नाहीं व आत्म्यापासूनहि होऊं शकत नाहीं. परिणाम वादाचा अंगीकार करून प्रकृतीपासून जगत् होत नाहीं व आत्म्यापासूनही होत नाही; असें पूर्व श्लोकांत सांगितले. या श्लोकांत विवर्तवादाचा अंगीकार करून मायायुक्त ब्रह्मापासून आविर्भावन्यायाने जग होते असें सांगतात. जाळें निर्माण करणारा कोळी (किडा) आपल्याच शरीरापासून बाह्य साधन न घेतां जाळें तयार करतो व आपल्या शरीरांतच त्याचा लय करतो किंवा पृथ्वीपासून जशा नाना प्रकारच्या औषधी, पूर्वी तिच्यांत असलेल्याच प्रगट होतात किंवा पुरुषाच्या शरीरांतच असलेले केश व नखादि वारंवार छेदन केले असतांही बाहेर प्रगट होतात. त्याप्रमाणे हे सर्व विश्व ईश्वराच्या मायेंत पूर्वी असलेलेच ईश्वरेच्छेने बाहेर प्रगट होते. येथे ईश्वर हा या विश्वाचे विवर्ताधिष्ठान आहे; विवर्त व विवर्ताधिष्ठान यांची सत्ता भिन्न असते, जसें शुक्ति ही व्यवहार कालांत बाधित म्हणजे मिथ्या अशा रजताचे अधिष्ठान आहे. येथे रजत, व्यवहार कालांत बाधित असल्याने त्याची सत्ता प्रातिभासिक आहे व शुक्तीचा व्यवहारांत बाध नसल्याने तिची सत्ता व्यावहारिक आहे. म्हणून अधिष्ठान

शुक्तीपेक्षां रजत हे विषम म्हणजे भिन्नसत्ताक असून शुक्तीच्या अज्ञानाने झाल्याने त्याला शुक्तीचा विवर्त म्हणतात. तसेंच जगाची सत्ता व्यावहारिक व परमात्म्याची सत्ता पारमार्थिक आहे. परमात्म्याच्या मायेने जगत् झाल्याने व परमात्म्यापेक्षां भिन्नसत्ताक असल्याने ते परमात्म्याचा विवर्त आहे. अशा विवर्तन्यायाने, ऐंद्रजालिक पुरुष जसें खोटें इंद्रजाल दाखवितो त्याप्रमाणे परमात्म्यापासून पूर्वी अनिर्वाच्यरूपाने असलेलेच जग मायेंतून बाहेर प्रकट झाले, हा श्रुतिसंमत विवर्तवाद मानला असतां, आरंभवाद व परिणामवाद यांतील कोणतेहि दोष येत नाहींत. विवर्तवादांत सर्व पदार्थ अनिर्वचनीय, मिथ्या व मायामय असल्याने वास्तविक नसतात. त्यामुळें विचारकालीं येणारे सर्व दोष या वादांत भूषणच आहेत, कारण हे दोष वस्तुत्व नाहींसें करितात. मायावादी, प्रथमच जगाला अवस्तु समजत असल्याने त्याला हे दोष बाधा करीत नाहींत; म्हणून विवर्तवाद स्वीकारून मायावी आत्म्यापासून हे सर्व विश्व मायावी पुरुषाच्या इंद्रजालाप्रमाणे प्रगट झाले; हा वादच श्रुतीने सांगितला आहे असें निश्चितपणाने ठरते ॥३२॥

**जातं यतो जगदिदं तदनुप्रवेशा -**
**त्तेनैव जीवति समस्तमदोऽभवेशा ॥**
**तत्रैव चाहुरविशेषविशेषभङ्गम्**
**सोपक्रमैवमुपसंहृतिराद्यलिङ्गम् ॥३३॥**

अन्वयार्थः- (यतः) ज्या मायोपाधिक आत्म्यापासून (इदं जगत् जातम्) हे जग उत्पन्न झाले (तदनुप्रवेशात्) सत्तारूपाने त्या आत्म्याचा प्रवेश असल्याने (समस्तं अदः जगत्) हे संपूर्ण जग (अभवेशा तेन एव जीवति) मोक्षप्रद अशा त्या आत्म्याच्या योगानेच स्थितीला पावते. (अविशेषविशेषभंगं तत्रैव चाहुः) सुषुप्तींत असणारे जाग्रदवस्थेचे बीज व प्रलयावस्थेंत असणारे जें जन्मान्तराचे बीज म्हणजे विशेष, या विशेषांनी युक्त असणारे जे जीव म्हणजे बद्धजीव, आपले अंगभूत म्हणजे शेष, जे पुत्रभार्यादि ते ज्यांनी न मम म्हणून टाकले आहेत ते विशेष म्हणजे

तत्त्वज्ञानी या दोघांचाहि लय ज्या आत्मस्वरूपांत श्रुति सांगतात; (एवम्) या प्रकाराने (सोपक्रमोपसंहृतिः) उपक्रमासहित उपसंहार हे (आद्यलिंगम्) तात्पर्य निर्णयाचे पहिले लिंग म्हणजे प्रमाण सांगितले ॥३३॥

भावार्थः- पूर्व श्लोकांत विवर्तन्यायाने आत्म्यापासून जगाची उत्पत्ति दाखविली. आतां तीन श्लोकांनी उपक्रमोपसंहारादि षड्विध तात्पर्य लिंगांनी तात्पर्यनिश्चयरूप श्रवण सांगतात. ज्या मायोपाधिक आत्म्यापासून हे जगत् झाले, सत्तारूपाने ज्या मोक्षप्रद आत्म्याचा या जगांत प्रवेश असल्याने या जगाची स्थिति होते, सुषुप्ति व प्रलयांत सत्स्वरूप झाला तरी जागृति व जन्मांत यांच्या संस्कारादिरूप बीजाला कवटाळून असणारा बद्धजीव व आपले-आपले असें मानलेल्या पुत्र-भार्यादिरूप अंगभूत पदार्थांचे ममत्व टाकणारा ज्ञानी पुरुष, ज्या आत्मस्वरूपांतच अंतीं लीन होतो तो एक अद्वितीय आत्माच सत् आहे. असें अद्वितीय आत्म्याविषयीं हे उपक्रम व उपसंहार म्हणजे आरंभ व शेवट रूप एक लिंग श्रुतीने *'यतो वा'* इत्यादि वाक्यांनी सांगितले, हे सहा लिगांपैकीं पहिले उपक्रमोपसंहार रूपलिंग झाले॥३३॥

**दार्ढ्याय तस्य बहुशोऽभ्यसनं द्वितीयं**
**मानान्तरानवगतिः कथितं तृतीयम्**
**मुक्तिः सुतृप्तिरिति तत्फलकं तुरीयम्**
**पञ्चार्थवादयुगु पञ्चमकं वरीयः ॥३४॥**

अन्वयार्थः- (तस्य दार्ढ्याय) त्या श्रवणाच्या अनुभवपूर्वक दार्ढ्याकरितां निरनिराळ्या प्रकारांनी (बहुशः अभ्यसनं द्वितीयम्) अनेक वार आवृत्ति करणे हे दुसरे प्रमाण, (मानान्तरानवगतिः तृतीयं कथितम्) आगमाशिवय दुसऱ्या कोणत्याहि प्रमाणाने ज्ञात न होणे हे तिसरे प्रमाण सांगितले. "अमृतः समवत्" "आत्मानं चेद्विजानीयादयमस्मीतिपूरुषः। किमिच्छन् कस्य कामाय शरीरमनुसंज्वरेत्" इत्यादि श्रुतींवरून (मुक्तिः सुतृप्तिः) अज्ञान तज्जन्यशोकादिनिवृत्ति व निरतिशयतृप्ति (इति) हे (तत्फलकम् तुरीयम्) फलरूप चतुर्थ प्रमाण सांगितले. (पंचार्थवादयुक् उ)

उत्पत्ति, स्थिति, लय, प्रवेश व संयमन-रूप या पांच अर्थवादांनी युक्त असें निश्चित (वरीयः पंचकम्) श्रेष्ठ असें पांचवे प्रमाण आहे ।।३४।।

भावार्थः- श्रवणाला अनुभवाच्या बळाने दृढपणा यावा म्हणून निरनिराळ्या प्रकाराने अनेकवार त्याच सिद्धान्तांची आवृत्ती करणे हे दुसरे प्रमाण. श्रुतीशिवाय इतर कोणत्याहि प्रमाणाने तो सिद्धान्त ज्ञात नसणे म्हणजे अज्ञातत्त्व किंवा अपूर्वत्व हे तिसरे प्रमाण. सिद्धान्त तत्त्वाच्या ज्ञानापासून अज्ञान व तज्ञन्य शोकादिकांची निवृत्ति व निरंकुश तृप्ति असें जें फल श्रुतींत सांगणे याला फलरूप चतुर्थ प्रमाण म्हणतात. आत्म्यापासून उत्पत्ति, स्थिति व आत्म्यामध्यें प्रलय, आत्म्याचा प्रवेश, व आत्म्याने केलेले नियमन, अशा श्रुतींत सांगितलेल्या पांच अर्थवादांना निश्चयाने श्रेष्ठ असें पांचवे प्रमाण म्हणतात. ।।३४।।

**तत्त्वंपदार्थपरिशोधनकं च षष्टं**
**स्याल्लिङ्गषट्कमिदमादरणीयमिष्टम् ।।**
**तात्पर्यकावधृतिरद्वितये परे**
**षड्लिङ्गैरिदं श्रवणमत्र हि संशयद्विट् ।।३५।।**

अन्वयार्थः- (तत्त्वंपदार्थपरिशोधनकं च षष्टं स्यात्) "यदग्ने रूपं" इत्यादि श्रुति विचाराने तत्त्वंपदार्थांचा पूर्ण विचार करणे हे सहावे प्रमाण आहे. (इदं इष्टं लिंगषट्कं आदरणीयम्) वाक्यार्थबोधाला इष्ट असणारीं ही सहा लिंगनामक प्रमाणे आदरणीय आहेत. (अद्वितये परे) अखंड परब्रह्माच्या ठिकाणी (षड्लिंगैः) वरील सहा प्रमाणांनी (तात्पर्यकावधृतिः) वेदान्त वाक्याच्या तात्पर्याचा जो निश्चय (इदं अत्र) ह्याला वेदान्तशास्त्रांत (श्रवणं हि) श्रवण अशा नांवाने प्रसिद्धी आहे. (इदं संशयद्विट्) हे श्रवण संशयभावनेचा नाश करणारे आहे. ।।३५।।

भावार्थ :- अग्नीमध्यें तांबडें, पांढरे व काळें अशी तीन रूपें दिसतात. तीं क्रमाने तेज, जल व पृथ्वी यांची आहेत. या तीन रूपांहून अग्नि म्हणून कांही निराळा पदार्थ नाहीं. केवळ क्रमाने अग्नि असा व्यवहार लोकांत आहे.

वास्तविक तीन रूपेंच खरीं आहेत. अशा दृष्टीने सर्व जगतच विचारांतीं खोटें आहे. फक्त एक सन्मात्र खरे आहे. अशा श्रुतीने दाखविलेल्या विचाराने तत्पदार्थ व त्वं पदार्थ यांच्या खऱ्या स्वरूपाचा, विचाराने निर्णय करणे याला पदार्थ परिशोधकप्रमाणे असे म्हणतात. याप्रमाणे सहा प्रमाणांनी अद्वितीय अखंडैकरस ब्रह्माच्या ठिकाणीं सर्व वेदान्त वाक्याचे तात्पर्य आहे. असा निर्णय करणे याला वेदान्तशास्त्रांत श्रवण अशी संज्ञा आहे. हे श्रवण सर्व संशयभावनानाशक आहे. भगवत्पादांनीहि या षड्लिंगांनी सहित वाक्याच्या योगाने तत्त्वंपदार्थानुसंधान म्हणजे श्रवण असें सांगितले असल्याने श्रवण शब्दाचा हा अर्थ प्रसिद्धच आहे ।।३५।।

**वाक्यैस्तदर्थमनुसन्दधता सुभक्त्या**
**संभावितत्वत उताप्यविरुद्धनीत्या ।।**
**कार्यं सदैव मननं त्वनुसन्धिलक्ष्मा -**
**ऽसंभावना यत इयात्समवर्तिसद्म ।।३६।।**

अन्वयार्थः- (वाक्यैः) तत्त्वमस्यादि वाक्यांनी (तदर्थं) जीव ब्रह्मैक्यरूप त्या वाक्यार्थाप्रत (सुभक्त्या) पूर्ण श्रद्धेने (उत अपि अविरुद्धनीत्या) आणि श्रुतीला अनुकूल अशा तर्काने (संभावितत्त्वतः) संभवनीय आहे असें अनुसंधान करणाऱ्या मुमुक्षूने (अनुसंधिलक्ष्म मननं) युक्त्यनुसंधान चिंतन हे ज्याचे स्वरूप आहे असें मनन (सदैव कार्यं) नेहमीं करावे, (यतः) कारण अशा मननामुळें (असंभावना) अल्पज्ञ असा मी जीव सर्वज्ञ कसा होऊं शकेन, इत्यादि कल्पना (समवर्तिसद्म इयात्) यमगृहाप्रत जाईल म्हणजे नष्ट होईल. ।।३६।।

भावार्थ :- पूर्व श्लोकांत श्रवणाचे स्वरूप सांगितले. आतां या श्लोकांत, युक्तीने, सांगितलेले तत्त्व संभवते असें अनुसंधानरूप मनन सांगतात. 'तत्त्वमस्यादि' वाक्याने त्या महावाक्याचा जो जीवब्रह्मैक्यरूप अर्थ आहे तो जाणून पूर्ण श्रद्धेने व श्रुतीला अनुकूल असलेल्या तर्काने हा अर्थ संभवनीय आहे. असें ठरवून दार्ढ्य होण्याकरितां मुमुक्षूने युक्तीचे

अनुसंधान म्हणजे चिंतनरूप मनन सर्वदा करीत असावे. असें मनन पुष्कळ काळ झाले असतां 'तत्त्वमसि' वाक्यांत मला तत्पदार्थस्वरूपता सांगितली आहे. तत्पदाचा अर्थ सर्वज्ञ ईश्वर असा आहे. मी तर किंचिज्ज्ञ जीव आहे, मग मी सर्वज्ञ कसा होऊं शकेन? इत्यादि असंभावना पार नाहींशा होतात, असा मननाचा उपयोग असल्याने सर्वदा मनन करण्यास श्रुतीने सांगितले आहे ॥३६॥

**निःसंशयार्थगतचेतस एकतान**
**त्वं ध्यानमुज्झितविजातिजवृत्तिभानम् ॥**
**तद्धारणावत इमं विपरीतभावम्**
**उन्मूल्य राति सविकल्पसमाधिभावम् ॥३७॥**

अन्वयार्थः- (निःसंशयार्थगतचेतसः) संशयरहित अशा जीवब्रह्मैक्यरूप अर्थाकडे लक्ष लावणाऱ्या (धारणावतः) नाभ्यादिदेशा-मध्यें चित्तबंधरूप धारणा असणाऱ्या पुरुषाचे (उज्झितविजातिजवृत्तिभानं एकतानत्वं ध्यानं) जें विजातीयप्रत्ययाचे अनुर्तवन याला ध्यान किंवा निदिध्यासन म्हणतात. (तत्) ते ध्यान (इमं विपरीतभावं उन्मूल्य) क्षुधेप्रम णे प्रत्यक्ष पीडा देणाऱ्या देहात्मैक्यादि विपरीत भावनेचा नाश करून (सविकल्पसमाधिभावं राति) सविकल्पसमाधिअवस्थेला निर्माण करते. पुढें हळूंहळूं निर्विकल्प समाधीही होऊं लागतो॥३७॥

भावार्थ :- या श्लोकांत निदिध्यासनरूप ध्यान व त्याचे फल सांगतात. दृढ मननाने जीवब्रह्मैक्यरूप अर्थांतील सर्व संशय दूर झाले असतां नाभ्यादिदेशांमध्यें चित्ताला स्थिर करण्याची, म्हणजे धारणा करण्याची सवय असलेल्या मुमुक्षु साधकाला प्रयत्नाने विजातीय प्रत्ययाच्या मानाने रहित सजातीय प्रत्ययाचे एकसारखे अनुवर्तन, म्हणजे एकतानत्व जें चित्तांत अनुभवाला येते यालाच ध्यान अथवा निदिध्यासन अशी संज्ञा आहे. या ध्यानाने क्षुधेप्रमाणे दृष्ट पीडा करणारी व अगदीं रोजच्या अनुभवांत असणारी देहात्मैक्यादि विपरीत भावना नष्ट होते व सविकल्प समाधि सिद्ध होते.

सविकल्प समाधीच्या अभ्यासाने हळूहळू निर्विकल्प समाधीहि होते. ध्यानाचे याप्रमाणे महत्त्व असल्याने श्रुतीने ध्यान सांगितले आहे. ॥३७॥

**ईशाश्रितश्रुतिमतिध्यनुभावितो यः**
**चिन्त्योपमोऽब्धिरिव तिष्ठति शान्ततोयः ॥**
**ज्ञेयः समाहित इमां परमां सुकाष्ठां**
**मुक्तेर्गतो न स कदापि जहाति निष्ठाम् ॥३८॥**

अन्वयार्थः- (ईशाश्रितः) 'समाधिसिद्धिरीश्वरप्रणिधानात्' या योगसूत्रानुसारे ईश्वराची उपासना करणारा (श्रुतिमतिध्यनुभावितः) श्रवण, मनन, निदिध्यासन किंवा ज्ञान यांचा अभ्यास करणारा (यः) जो (चिन्त्योपमः) ध्याता व ध्यान या दोघांचा त्याग करून अभ्यासाच्या योगाने चिन्त्य जें ध्येय तदाकार झालेला (शान्ततोयः अब्धिरिव तिष्ठति) तरंगरहित समुद्राप्रमाणे जो निश्चल राहतो (स समाहितो ज्ञेयः) त्याला निर्विकल्पसमाधिनिष्ठ असें म्हणावे. (इमां मुक्तेः परमां सुकाष्ठां यः गतः) या मुक्तीच्या शेवटच्या भूमिकेला जो पोंचला (स कदापि निष्ठां न जहाति) तो व्युत्थानदशेंतसुद्धा निष्ठा सोडीत नाहीं॥३८॥

भावार्थः- सविकल्प समाधीचा परिपाक झाला असतां होणाऱ्या निर्बीज समाधिनिष्ठाचे लक्षण सांगतात. सर्व कर्मे ईश्वराला समर्पण करून एकाग्र चित्ताने ईश्वराचे ध्यान करणाऱ्याला समाधिसिद्धि होते असें "समाधिसिद्धिरीश्वर-प्रणिधानात्" या सूत्राने भगवान् पतंजलींनी सांगितले आहे. त्याला अनुसरून ईश्वरोपासना करणारा व श्रवण, मनन, निदिध्यासन किंवा ज्ञान यांचा अभ्यास करणारा सविकल्प समाधींत असलेला, ध्याता व ध्यान यांचा भेद सोडून अभ्यासमाहात्म्याने केवळ ध्येय वस्तूच्या आकाराचा म्हणजे ध्येयरूप झालेला, तरंगरहित समुद्राप्रमाणे जो निश्चल राहतो त्याला निर्विकल्प किंवा निर्बीजसमाधिनिष्ठ असें म्हणतात. या मुक्तीच्या शेवटच्या भूमिकेला पोहोंचलेला ज्ञानी व्युत्थानदशेला जरी प्राप्त झाला तरी आत्मनिष्ठा सोडीत नाहीं, त्याचे सर्व व्यवहार स्वरूपनिष्ठ राहूनच होतात ॥३८॥

**काष्ठामिमां हि चरमां गतमेनस्मान्न**
**च्यावयेत्कथमपीह हि कोऽपि तस्मात् ।।**
**सक्लेशजन्ममृतिहामतिहाय मान्या**
**धन्या गतिर्जिगमिषोरित एव काऽन्या ।।३९।।**

अन्वयार्थः- (हि इमां चरमां काष्ठां गतं एनम्) ज्या अर्थी या शेवटच्या भूमिकेला पोहोंचलेल्या योग्याप्रत (अस्मात् इह हि) या समाधीपासून किंवा निश्चल अशा अद्वैत बोधापासून या ब्रह्मांडांत निश्चयाने (कोऽपि कथमपि न च्यावयेत्) कोणी देवादिक किंवा प्रजापतिसुद्धां कोणत्याहि प्रकाराने त्या अवस्थेपासून च्युत करूं शकत नाहीं, (तस्मात्) त्या अर्थी (सक्लेशमतिहां एतां अतिहाय) अविद्यादि क्लेशसहित जन्ममरणादिकांना दूर करणाऱ्या या निष्ठेचा त्याग करून (जिगमिषोः) ब्रह्मभावाप्रत प्राप्त होण्याची इच्छा करणाऱ्या मुमुक्षूला (इतः अन्या) या निष्ठेहून दुसरी (मान्या धन्या च गतिरेव का?) मान्य व धन्य अशी कोणती गति असणार? अर्थात् कोणतीच नाहीं ।।३९।।

भावार्थः- ज्या अर्थी या निर्विकल्प समाधि किंवा निश्चल अद्वैतब्रह्म बोधरूप चरमावस्थेला प्राप्त झालेल्या योग्याला अवस्थेपासून भ्रष्ट करण्याविषयीं या ब्रह्मांडांत मनुष्यें तर राहोच परंतु, प्रभावशाली देव किंवा ब्रह्मदेवसुद्धां समर्थ नाहीं, त्या अर्थी अविद्यादि पंच क्लेश व जन्ममरणादिक यांचे समूळ नाश करणाऱ्या या चरमावस्थेशिवाय ब्रह्मभाव प्राप्त करून घेऊं इच्छिणाऱ्या मुमुक्षूला दुसरी कोणती श्रेष्ठ व सर्वमान्य अशी गति असूं शकेल बरे? अर्थात् कोणतीच नाहीं. हीच सर्वश्रेष्ठ व सर्वमान्य अशी गति आहे ।।३९।।

**अत्राप्रमत्त उपलब्ध्युपलब्धमोदः**
**शान्तान्यचेष्टगुणकाम उदस्तखेदः ।।**
**आत्मात्मदृष्टिपरितुष्टिमितोऽनुवृत्त्या**
**व्युत्थाय स स्मरति भावितपूर्ववृत्त्या ।।४०।।**

अन्वयार्थः- (अत्र) या समाधीमध्यें (अप्रमत्तः) 'अप्रमत्तः तदा भवति' या श्रुतीवरून निरंतर सावध असणारा, (उपलब्ध्युपलब्धमोदः) बुद्धीने मिळालेला आहे आनंद ज्याला असा, (शान्तान्यचेष्टगुणकामः) 'यदा पञ्चावतिष्ठन्ते' इत्यादि श्रुतीवरून व 'निःस्पृहः सर्वकामेभ्यः' 'उपैति शान्तरजसं' इत्यादि स्मृतींवरून मन इत्यादिकांच्या क्रिया, सत्त्वादि तीन गुण व सर्व इच्छा ज्याच्या शांत झालेल्या आहेत असा व म्हणूनच (उदस्तखेदः) टाकलेला खेद ज्याने असा, (आत्मानात्मदृष्टिपरितुष्टिं इतः सः) 'यत्र चैवात्मनात्मानं' इत्यादि स्मृतीवरून रजस्तमोगुणाने अनभिभूत अशा शुद्धसत्त्वगुणमय अन्तःकरणाने झालेले जें आत्मज्ञान, त्याच्या योगाने संतोष प्राप्त झालेला असा तो समाधिनिष्ठ पुरुष, (व्युत्थाय भावितपूर्ववृत्त्या स्मरति) व्युत्थानदशा प्राप्त झाल्यावर समाधिकालीं केवलात्माकार वृत्ति होती असें व्युत्थानकालच्या स्मरणावरून अनुमानाने जाणतो ।।४०।।

भावार्थः- या चरमावस्थेला सावधानता हेच एक कारण आहे असें सांगतात. या समाधीच्या अभ्यासामध्यें निरंतर सावधान असलेल्या पुरुषाला स्वरूपभूत, आत्यंतिक असें सुख बुद्धिग्राह्य होते. हे सुख मिळाले असतां बाहेर धांवणाऱ्या मनाच्या व इन्द्रियांच्या सर्व हालचाली शान्त होऊन मन व इन्द्रियें निश्चल राहतात. सत्त्व, रज व तमोगुणांच्या ऊर्मि व सर्व प्रकारच्या इच्छा नाहींशा होतात. कोणत्याही प्रकारचा खेद याला राहात नाहीं. विशुद्धान्तःकरणांत प्रगट झालेल्या आत्मदर्शनानेच हा सदैव तृप्त असा असतो. या निर्विकल्प समाधींत मी आतां समाहित आहे, असें भान जरी नसले तरी व्युत्थान कालांत आलेल्या मी, इतका वेळ निरतिशय आत्मानंदांत मग्न होतों अशा स्मरणावरून समाधि अवस्थेंत अखंडानन्दानुभव होता, असें अनुमान काढतां येते. समाधीच्या पूर्वीच्या प्रयत्नाने व शुभ अदृष्टानेच समाधिकालांत प्रयत्न न करताहि समाधि अवस्था स्थिर राहते, म्हणून या समाधीविषयीं सदा सावधान असणे हाच येथे एक मुख्य हेतु आहे.।।४०।।

**अज्ञानमाशु सकलं विनिहत्य**
**भावज्ञानाविरोध्यपि ककान्तगतार्कभावत् ।।**
**मानाहितान्त्यमतिवृत्तिविदद्वयत्वं**
**यात्येक एव परिशिष्यत आत्मतत्त्वम् ।।४१।।**

अन्वयार्थः- (मानाहितान्त्यमतिवृत्तिवित्) यापूर्वी सांगितलेल्या अभ्यासाने महावाक्यरूप प्रमाणापासून उत्पन्न झालेली शेवटची आत्माकार बुद्धिवृत्ति; तींत प्रतिबिम्बित झालेले आत्मस्वरूपज्ञान हे (ककान्तगतार्कभावत्) सूर्यकान्त मण्यांत प्रविष्ट झालेली सूर्यप्रभा ज्याप्रमाणे कापसाला जाळते त्याप्रमाणे (भावज्ञानाविरोध्यपि) स्वरूप ज्ञानाशीं अविरोधी असणारे (यत् अज्ञानं) जें अज्ञान (तत् सकलं आशु विनिहत्य) कार्यसहित अशा त्या अज्ञानाप्रत स्वोत्पत्ति समकालींच नष्ट करून (अद्वयत्वं याति) अद्वितीय आत्मस्वरूपांत लीन होते. (तदा एकमेव आत्मतत्त्वं परिशिष्यते) त्या वेळीं एक आत्मतत्त्वच शिल्लक राहते ।।४१।।

भावार्थः- याप्रमाणे श्रवण, मनन, निदिध्यासन, निर्विकल्प समाध्यादिकांच्या अभ्यासाने संस्कृत व शुद्ध झालेल्या अंतःकरणांत 'तत्त्वमस्या' दि महावाक्यापासून झालेली जी अखंड ब्रह्माकार बुद्धिवृत्ति त्या बुद्धिवृत्तींत प्रतिबिंबित झालेले स्वरूपज्ञान सकार्य अशा अज्ञानाचा आत्यंतिक नाश करते. स्वरूपभूत ज्ञानाच्या योगानेच अज्ञानादिकांची सत्ता सिद्ध होत असल्याने अज्ञान व स्वरूपभूत ज्ञान यांचा स्वरूपतः जरी विरोध नसला तरी तेच स्वरूप-ज्ञान वृत्ति उपारूढ म्हणजे वृत्ति प्रतिबिंबित झाले असतां अज्ञानाशीं विरुद्ध होऊन त्या अज्ञानाचा नाश करते. जसें सूर्यकिरण व कापूस यांचा दाह्यदाहकभाव नाहीं म्हणजे सूर्यकिरणाने कापूस दिसतो, जळत नाही, परंतु तींच सूर्यकिरणे जर सूर्यकांत मण्यांत प्रविष्ट झालीं तर कापसाला जाळतात तसें येथे स्वरूपतः चैतन्य, अज्ञानादि प्रकाशक व आत्माकारवृत्ति उपारूढ झाले म्हणजे अज्ञानादिकांना दाहक असें समजावे. हे अज्ञानदाहक असें वृत्त्युपारूढ ज्ञानहि अज्ञान दाहानन्तर तत्कार्यभूत

अन्तःकरण व तद्वृत्ति यांचाही दाह झाल्यावर पुन्हां अद्वितीय आत्मस्वरूप होते, म्हणून त्या ज्ञानामुळें द्वैत राहिले अशी शंकाही घेऊं नये. जसें कापूस जाळल्यानंतर सूर्यकांत मणी पेटींत ठेवला किंवा फुटला म्हणजे त्या मण्यांतील सूर्यकिरणे मूळ स्वरूपांत अद्वैताला पावतात. तद्वत् अज्ञानादिकांना जाळून ज्ञानही आत्मस्वरूपांत लीन होते. त्यावेळी एकमेवाद्वितीय असें आत्मस्वरूपच शेष राहते ॥४१॥

**आत्मप्रबोधसमकाल विमुक्त एव**
**रोषादिदोषरहितोऽवहितः स्वतोषः।**
**अज्ञार्थमुक्तमहिनिर्ल्वयनीव चास्य**
**प्रारब्धमत्र खलु संसरणं न चास्य ॥४२॥**

अन्वयार्थः- (आत्मप्रबोधसमकाल विमुक्तः) आत्मज्ञानोत्पत्ति क्षणींच मुक्त झालेला, (रोषादिदोषरहितः) क्रोधादिक दोष नसलेला, (अवहित एव) एकाग्रचित्त असा हा ज्ञानी (स्वतोषः) आत्मतृप्त असतो. (अहिर्निर्ल्वयनीव) सापाच्या कातीप्रमाणे (अस्य प्रारब्धं) या ज्ञान्याला प्रारब्ध आहे असें (अज्ञार्थं उक्तं) अज्ञ लोकांच्या समजुतीकरतां सांगितले आहे. (अत्र अस्य संसरणं न खलु) वस्तुतः ज्ञान्याच्या दृष्टीने प्रारब्धादि कांहींच नाही म्हणून ज्ञान्याला या ठिकाणीं पुनर्जन्मादिरूप संसार केव्हांही नाहीं, हेही निश्चित झाले ॥४२॥

भावार्थः- आत्मज्ञानक्षणींच मुक्त झालेला रागद्वेषादि दोषरहित, सर्वदास्वरूपैकनिष्ठ, आत्मतृप्त असा तत्त्वज्ञानी प्रारब्ध संपेपर्यंत या लोकांत व्यवहार करतो असें जें तत्त्वज्ञान्याचे वर्तन प्रारब्धानुसार असें सांगितले ते केवळ अज्ञ लोकांच्या समजुतीकरितां आहे. 'तस्य तावदेव चिरम्' म्हणजे तत्त्वज्ञान्याला मुक्त होण्याला प्रारब्ध संपण्याचाच अवकाश आहे, ते संपल्याबरोबर तो मुक्त होतो असें श्रुतीचे म्हणणेही अज्ञ लोकांकरितांच आहे. ज्ञानसमानकालींच मुक्त झालेल्या ज्ञान्याला प्रारब्ध किंवा पुनः जन्मादिरूप संसार कधींच संभवत नाहीं. तत्त्वज्ञानाच्या पूर्वी सुद्धां याला

वास्तविक जन्ममरणादि नव्हते मग तत्त्वज्ञान झाल्यावर कोठून असणार ? अर्थात् केवळ अज्ञबोधार्थ, श्रुतींत हे निरूपण आहे ॥४२॥

**योगैः समाहितसमाहितता मताऽय**
**स्वर्णोपमा त्वनुपमा प्रथमा मता यः ॥**
**तत्राक्षमः स परमां परमात्मदत्ता -**
**त्रेयाश्रयाद्गतिमियात्सततानुरक्तः ॥४३॥**

अन्वयार्थः- (योगैः) यमनियमादि अष्टांग योगाने (समाहितसमाहितता) उत्पन्न केलेली जी समाधि स्थिति ती (अयःस्वर्णोपमा मता) रसाच्या सामर्थ्याने केलेल्या लोखंडाच्या सुवर्णाप्रमाणे आहे. (या प्रथमा सा अनुपमा मता) जी पहिली ज्ञानी पुरुषाची अखंड समाधि अवस्था सांगितली ती मात्र निरुपम म्हणूनच सर्वमान्य आहे. (यः तत्र अक्षमः) जो मंदबुद्धि मुमुक्षु त्या स्थितीला पोंचण्याला असमर्थ आहे (सः) तो (सततानुरक्तः सन्) निरंतर प्रीतियुक्त होत्साता (परमात्मदत्तात्रेयाश्रयात्) परमात्मा श्रीदत्तात्रेयाच्या आश्रयाने (परमां गतिं इयात्) पुनर्जन्मरहित अशा मुक्तिप्रत पोंचेल ॥४३॥

भावार्थः- श्रवणादि साधनांनी तत्त्वज्ञान संपादन न करितांच केवळ यमनियमाद्यष्टांग योगानेही मुमुक्षूला समाध्यवस्था मिळूं शकते, परंतु ही समाध्यवस्था आत्मज्ञानसाध्य समाध्यवस्थेप्रमाणे कायमची नाहीं. रसाच्या सामर्थ्याने लोखंडाचे सोने केले असतां जोंपर्यंत त्या लोखंडांत रसाचे सामर्थ्य व सान्निध्य आहे तोंपर्यंत ते सोनेच आहे अशी भ्रांति असते; परंतु रसाचे सान्निध्य किंवा सामर्थ्य नाहींसें झाले असतां पूर्वीप्रमाणे ते लोखंडच दिसूं लागते. त्याप्रमाणे ज्ञानरहित अशा योगाभ्यासाने मिळालेली समाध्यवस्था व आनंद व्युत्थान होईपर्यंतच असतात. व्युत्थान झाल्यावर पुन्हां जिवाची पूर्वींचीच दुःखमय स्थिती असते. तत्त्वज्ञानीसुद्धां दृष्ट दुःखाची तात्कालिक बाधा न व्हावी म्हणून केव्हां केव्हां या अष्टांगयोगाचा आश्रय करतात, परंतु कायमचे दुःख नाहीसें होऊन अखंड निरतिशयानंद प्राप्त होण्याचा, योग हा

उपाय नसून पूर्वी सांगितलेला श्रवणादिसाध्य ज्ञानरूपच उपाय आहे. ही ज्ञानसाध्य समाध्यवस्था सर्वदा म्हणजे समाधि व व्युत्थानकाळीही राहणारी अशी आहे, म्हणून हिला कशाचीही उपमा देतां येत नाहीं. ही सर्वश्रेष्ठ अशी आहे व सर्वमान्य आहे. जो मंदमति या अवस्थेला पूर्वीच्या उपायाने प्राप्त करून घेण्याविषयीं असमर्थ असेल त्याने बाकी सर्व साधनांचा परित्याग करून प्रेमाने निरंतर श्रीदत्तात्रेयांच्या भक्तिमार्गाचा अवलंब करावा म्हणजे श्रीदत्तात्रेय प्रभूच्या कृपेने तो या सर्वश्रेष्ठ अवस्थेला निश्चयाने पोंचेल॥४३॥

**योऽनीश एवमतिमन्दमतिर्विधातुं**
**जिज्ञासुरीशमनिशं स भजेद्विधातुम् ॥**
**योऽत्रावतीर्य जगतः स्थितिमत्रिजातः**
**शास्ताखिलस्य भजतोऽनुभजत्यजातः ॥४४॥**

अन्वयार्थ :-(यः जिज्ञासुरपि) जो जिज्ञासु असूनही (अतिमंदमतिः) अत्यंत मंदबुद्धिशाली असल्याने, (एवं विधातुं अनीशः) पूर्वी सांगितल्या प्रमाणे श्रवणादि करण्यास असमर्थ असेल तर (सः अनिशं ईशं भजेत्) त्याने ईश्वराचे निरंतर भजन करावे. (यः जगतः स्थितिं विधातुं) जो प्रभु जगाचे पालन करण्याकरितां (अजातः) स्वतः जन्मादि विकाररहित असूनही (अत्र अवतीर्य) या भूतलावर अवतीर्ण होऊन (अत्रिजातः) अत्रिकुमार दत्तात्रेय (अखिलशास्ता सन्) देवादि अखिलांचे नियमन करणारा होत्साता (भजतः अनुभजति) आपल्या भजकाच्या इच्छेनुरूप वर्तन करतो ॥४४॥

भावार्थ :- वक्त्याला निरूपणाचा कंटाळा नसल्याने सांगितलेलंच तत्त्व प्रकारान्तराने पुन्हां सांगतात. ब्रह्मज्ञानाची उत्कट इच्छा असली तर बुद्धि अतिशय मंद असल्याने हे पूर्वी सांगितलेले श्रवणादि रूप ज्ञानाचे मुख्य साधन करण्याविषयीं एखादा मुमुक्षु असमर्थ असेल, तर त्याने खिन्न न होतां निरंतर ईश्वराचे भजन करावे. हा ईश्वर कोणता असें विचाराल तर सांगतों. ज्याला स्वतः जन्म-मरणादि कोणतेहि विकार नाहींत, जो सर्वज्ञ, सर्वशक्ति असा असून केवळ जगाचे पालन करावे या हेतूने अत्रिकुमार

श्रीदत्त या स्वरूपाने प्रकट झाला; इंद्रादि देवांचे सुद्धां शासन करण्याविषयीं समर्थ असूनही आपल्या प्रेमळ भक्तांच्या इच्छेनुरूप ते म्हणतील, त्याप्रमाणे जो वर्तन करतो तो श्रीदत्तात्रेय सर्व जगाचा ईश्वर आहे ॥४४॥

**यस्यास्त्यतीव सदयं हृदयं स्वमुक्त्ये**
**यः संस्मृतोऽघहृदयं सदयं स्वगुप्त्यै ॥**
**जातं तमत्रिवरदं वरदण्डहस्तं**
**योऽर्चेद्गमिष्यति कृती स न दण्डहस्तम् ॥४५॥**

अन्वयार्थ :- (स्वमुक्त्यै) आपल्या निष्काम भक्तांच्या मुक्तिकरितां (यस्य हृदयं) ज्याचे अन्तःकरण (अतीव सदयं अस्ति) फारच दयाळू आहे; (यः अयं) जो हा प्रभु (संस्मृतः अघहृत्) कसेंहि स्मरण केले असतां पापहरण करणारा आहे; (स्वगुप्त्यै जातं) आपल्या भक्तांच्या रक्षणाकरितां अवतीर्ण झालेल्या (सदयं वरदंडहस्तं) दयालु व वरमुद्रा आणि श्रेष्ठ दंडयुक्त हस्त असणाऱ्या अशा (तं अत्रिवरदं) त्या अत्रिवरद दत्ताचे (यः अर्चेत्) जो भजन अर्चनादि करील (सः कृती सन्) तो कृतार्थ होत्साता (दण्डहस्तं न गमिष्यति) दण्डपाणि अशा यमाच्या सदनाला प्राप्त होणार नाहीं ॥४५॥

भावार्थ :- दोन श्लोकांनी त्या श्रीदत्तात्रेय प्रभूचे वर्णन करितात. आपल्या निष्काम भक्ताच्या मुक्तीकरितां ज्याचे हृदय अत्यंत दयाळू आहे; ज्याचे कसेंहि म्हणजे येतां, जातां, निजतां, बसतां, उठतां, शुद्धाशुद्ध अवस्थेंतही स्मरण केले असतां, जो हा प्रभु स्मरण करणाराचे सर्व पाप नाहींसें करणारा आहे; आपल्या भक्तांच्या रक्षणाकरितांच या भूतलावर अवतीर्ण झालेला, ज्यांनी आपल्या हातांत वरद-अभय मुद्रा व सुंदर दंड धारण केलेला आहे; जो अत्यंत दयाळू अत्रिऋषिवरद असा आहे, अशा दत्ताचे जो भजनपूजनादि करील तो कृतार्थ होत्साता यमसदनाला जात नाही; असें ज्याच्या भक्तीचे माहात्म्य आहे ॥४५॥

**आदेयहेयपरलक्षणलक्षितं यो**
**यायातये परमशिक्षणशिक्षितं सत् ।**

**क्षित्यादितो गुरुधियोरुधियोपि पथ्यं**
**प्रोक्त्वोद्दधार स पुनाति जानाति तथ्यम् ।।४६।।**

अन्वयार्थः- (आदेयहेयपरलक्षणलक्षितं) ग्राह्य व त्याज्य अशा दोन्ही पदार्थांच्या लक्षणांनी युक्त असणारे (गुरुधिया) हे पृथिव्यादि आपले गुरु आहेत अशा बुद्धीने (क्षित्यादितः) पृथ्वी इत्यादि चोवीस पदार्थांपासून (सत्) प्रशस्त असें, (परमशिक्षणशिक्षितं) चांगल्या शिक्षणाने मिळविलेले (उरुधिया अपि पथ्यं) स्थूलबुद्धि अशा साधकालाही हितकारक होणारे तत्त्व, (यः) जो (यायातये प्रोक्त्वा) ययातिकुमार यदुराजाला सांगून, (तम उद्दधार) त्याचा उद्धार करिता झाला (सः अति) तो श्रीदत्तात्रेय अ इव म्हणजे वासुदेवाप्रमाणे आचरति म्हणजे आचरण करतो, तो अति अर्थात् जगत्पालक विष्णुसारखा प्रभु (भोः जन) हे लोकहो! (तथ्यं पुनाति) खरोखर सर्वांना पवित्र करणारा आहे।।४६।।

भावार्थ :- पृथिव्यादि चोवीस पदार्थांना आपले गुरु असें समजून त्यांच्यापासून ग्राह्य काय व त्याज्य काय हे मोठ्या श्रेष्ठ अशा शिक्षणाने मिळविलेले व स्थूल बुद्धीच्या माणसालाही परमहितकर असणारे तत्त्व ययाति कुमार यदुराजाला सांगून त्याचा ज्यांनी उद्धार केला असे विष्णूप्रमाणे सर्व जगत्पालक दत्तात्रेय देव, हे, सर्व लोक हो ! खरोखर सर्वांना पवित्र करणारे आहे. ।।४६।।

**यदा सन्नासन्नाभवदपि गुणाव्याकृतमुखम्**
**यदासन्नांशानां गतय इह नो साधनसुखम् ।**
**न शास्ता नो शास्त्रं न हि सदमृतं नापि च मृतम्**
**तमिस्रा नो घस्रादिकमपि सहस्रांघ्रिरमृतम् ।।४७।।**

अन्वयार्थ :- (यदा सत् न अभवत् असदपि न) ज्या वेळीं सतूही नव्हते व असतूही नव्हते (गुणाऽव्याकृतिमुखं) सत्त्वादि गुण, कारण व कार्य हे कांहींही नव्हते, (शास्ता न) गुरूहि नव्हता (शास्त्रं नो) वेदादि शास्त्रही नव्हते, (सत्) मीमांसकांना मान्य असे स्वर्गादिही नव्हते, (अमृतं) देवांनी

पिण्याचे अमृत किंवा 'विद्यया अमृतमश्नुते' या श्रुतींत सांगितलेले सापेक्ष मरणरहितत्त्वही नव्हते, (अपि च मृतं न) आणखी मृत्युहि नव्हता, (तमिस्रा नो) रात्र नव्हती, (घस्रादिकं न) दिवस, महिना इत्यादि कालाचे प्रमाणही नव्हते (सहस्राङ्घ्रिः अपि न) 'सहस्रशीर्षा' इत्यादि श्रुतींत वर्णिलेला विराट् पुरुषहि नव्हता. (अमृतं न) मोक्षही नव्हता, कारण (यदा इह) जेव्हा हा प्रलय होता त्या वेळीं (आसन्नांशानां) समीप असलेल्या जिवाच्या (गतये) मुक्तीकरितां (साधनसुखं नो) सुखकारक असें साधनही नव्हते।।४७।।

भावार्थ :- येथून पुढें १२ श्लोकांनी उपनिषत्प्रतिपाद्य हा दत्तात्रेय प्रभु आहे असें सांगणार आहेत. त्यांत पहिल्या दोन श्लोकांनी 'नासदासीत्' या श्रुतीच्या आधारे हा परमात्मा जगत्स्रष्टा आहे हे दाखवितात. ज्या वेळीं सत्, स्थूल आकारादि असत्, सूक्ष्म महदादि सत्त्वादि गुण, अव्याकृत असें कारण, व त्याचे कार्य, गुरु, वेदादिशास्त्र, मीमांसकसंमत स्वर्गादि अमृत, विद्येने मिळणारे सापेक्ष अमरत्व, मृत्यु, रात्रि, दिवस, महिना, वर्ष इत्यादि कालमान, 'सहस्रशीर्षा' या मंत्रांनी सांगितलेला विराट् पुरुष वगैरे कांहींच नव्हते व मोक्षही नव्हता. कारण ज्यांचा मोक्ष व्हावयाचा ते जीव परमात्म स्वरूपांत लीन होते व त्या प्रलयकालांत मोक्षाला लागणारी सुखकारक साधनेहि नव्हतीं ।।४७।।

**तदासीद्ध्वान्तारिः श्रुतमतचिदानन्दलहरी**
**हरीशब्रह्मात्मा स खलु परमात्माऽमृतझरी ।।**
**वरीवर्ति स्रष्टुं पुनरपि विलीनं जगदयं**
**स्वयं हैमाण्डं यः सृजति गतिदोऽयं स सदयः ।।४८।।**

अन्वयार्थः-(तदा ध्वान्तारिः आसीत्) त्या वेळीं अज्ञान दूर करणारा असा कोणी तरी होता. हा कोण असावा तर (श्रुतिमतचिदानन्दलहरी) शास्त्राला मान्य असा चिदानन्दलहरीस्वरूप (अमृतझरी) अमृताचा म्हणजे मोक्षाचा प्रत्यक्ष झरा असाच (हरीशब्रह्मात्मा) विष्णु, शंकर व ब्रह्मदेव यांचा आत्माच किंवा या तीन देवतास्वरूप (स खलु परमात्मा वरीवर्ति) असा

तो दत्तात्रेय परमात्माच आपल्या ऐश्वर्ययोगाने असतो. (अयं) हा दत्तात्रेय (विलीनं जगत्) लीन झालेले संस्कारशेष असें जगत् (पुनरपि स्रष्टुं) कर्मभोग देण्यासाठीं पुन्हां उत्पन्न करण्यास (यः स्वयं) जो स्वतःच दुसऱ्या साधनांची अपेक्षा न करतां (हैमाण्डं सृजति) हिरण्यगर्भाला उत्पन्न करतो (सः अयं गतिदः) याप्रमाणे जगाचा स्रष्टा असा हा दत्तात्रेय भक्तांना मोक्षरूपगति देणारा अत्यंत दयाळू आहे।।४९।।

भावार्थ :- ज्यावेळीं पूर्वी सांगितलेले सत्, असत्, वगैरे कांहींही नव्हते, त्या वेळीं अज्ञाननाशक असा कोणीतरी होता. तो कोण असें विचाराल, तर जो श्रुतीला संमत चिदानंदलहरीस्वरूप मोक्षाचा झराच कीं काय असा विष्णु, शंकर व ब्रह्मदेव यांचा आत्मा किंवा या तीन देवतास्वरूप असा परमात्मा दत्तात्रेय होता. आपल्या मायारूप प्रकृतीमध्यें विलीन झालेल्या संस्कारयुक्त जगताला कर्मफळें देण्याकरितां दुसऱ्याचे साहाय्य न घेतां व साधनांतरही न जमवितां हिरण्यगर्भाला ज्याने निर्माण केले असा सर्व जगत्स्रष्टा व अज्ञाननाशक दत्तात्रेय भक्ताला मोक्षरूप गति देणारा व दयाळू असा आहे. याप्रमाणे 'नासदासीत्' सूक्ताने दत्तात्रेयाचे प्रतिपादन केले ।।४८।।

**पुरासीदात्मैको जगदिदमसौ वीक्ष्य च पुरा**
**चतुर्लोकान्सृष्ट्वाऽप्प्रमुखकृतपुंछिद्रजसुरान् ।।**
**जिघत्सूंश्चैभ्योऽन्नान्नद इह विदार्याविशदहग्**
**विदाप्रज्ञानं ब्रह्म भवति विराग्येष स सुहृक् ।।४९।।**

अन्वयार्थ :- (पुरा) सृष्टीच्या पूर्वीं (इदं जगत्) हे जग (एकः आत्मा आसीत्) सजातीय, विजातीय व स्वगत भेदरहित असा आत्मा होता. (असौ वीक्ष्य) या दत्तरूप आत्म्याने विचार करून (चतुर्लोकांश्च सृष्ट्वा) अंभ, मरीचि, मर व आप अशा चार लोकांना उत्पन्न करून (अप्प्रमुखकृतपुंछिद्रजसुरान् सृष्ट्वा) जलप्रभृति पंचमहाभूतांपासून निर्माण केलेल्या विराट् पुरुषाच्या मुखनासिका इत्यादि छिद्रांपासून वागादि इंद्रियांना

प्रेरक अशा व क्षुधादिकांनी युक्त अशा अग्नि-वायु इत्यादि देवतांना निर्माण करून, (एभ्यः अंगान्नदः) त्यांना यथायोग्य अंग किंवा स्थान व अन्न देणारा असा, (विदार्य इह आविशत्) मस्तकाचे विदारण करून या देहादि संघांत प्रविष्ट झाला. (अदृक्) कोणालाहि न दिसणारा परंतु सर्वांना पाहणारा पण देहामध्यें प्रविष्ट झाल्याने अल्पज्ञासारखा जाग्रदादि तिन्ही अवस्था पाहणारा, सुदैवाने त्या अवस्थेंतील कष्टांचे चिंतन करून, (विरागी सन्) वैराग्यशाली होऊन (विदा प्रज्ञानं भवति) 'कोऽयं आत्मा' 'येन वा पश्यति' इत्यादि वाक्यांपासून झालेल्या ज्ञानाने प्रज्ञानब्रह्म म्हणजे त्वंपदार्थ व तत्पदार्थ यांचे जें अखंड ऐक्य तत् स्वरूप जो होतो (स एष सुदृक्) तो हा दत्तच भक्तांवर शुभदृष्टि कृपादृष्टि करणारा असा हा आहे।।४१।।

भावार्थ :- या श्रीदत्ताचे ऐतरेय उपनिषत्तात्पर्याने वर्णन करितात. सृष्टीच्या पूर्वी हे परिदृश्यमान जगत् सजातीय-विजातीय, स्वगतभेदरहित असा जो आत्मा तन्मात्र होता, त्यावेळीं काळहि नव्हता; परंतु जिज्ञासू अज्ञ मनुष्याच्या दृष्टीने काळाची कल्पना करून पूर्वी असा प्रयोग येथे केला आहे; तसेंच हे सर्व जगत् आत्माच होता हे म्हणणेहि अंधारांत दिसणारा जो चोर तो खांब आहे, म्हणजे चोर नसून तो खांबच आहे असें म्हणण्यापैकींच म्हणजे हे सर्व जग नसून केवळ आत्माच होता असें सांगावयाचे आहे. या श्रीदत्तरूप आत्म्याने प्राण्यांच्या-कर्मांची परिपक्वावस्था पाहून, विचार करून, प्रथम पंचभूतांची उत्पत्ति करून अंभ, मरीची, मर व आप, म्हणजे द्युप्रभृति लोक, अंतरिक्ष लोक, भूलोक व पातालादि लोक असे जलप्रधान चार लोक अर्थात् ब्रह्मांड निर्माण केलं. जलप्रधान अशा भूतांपासून निर्माण केलेल्या विराट पुरुषाच्या मुखादि छिद्रांतून खाण्यापिण्याची इच्छा असणाऱ्या वागादि इन्द्रियांना प्रेरक व चेतन अशा अग्न्यादि देवता निर्माण करून, त्यांना राहण्याला योग्य अशीं शरीरे व अन्नें त्या परमात्म्याने निर्माण केलीं. सर्व चालक अशा माझ्या प्रवेशाशिवाय हे शरीर व्यवहारक्षम होणार नाहीं असा विचार करून तो परमात्मा मस्तकाचा भेद करून, म्हणजे

ब्रह्मरंध्रांतून या सर्व शरीरांत प्रविष्ट झाला. येथे अहं असा प्रत्यय म्हणजेच परमात्म्याचा प्रवेश समजावा. घरामध्यें मनुष्य प्रवेश करतो तसा नव्हे; तसें समजल्यास परमात्मा परिच्छिन्न आहे असें मानावे लागेल. शरीरांत प्रवेश झाल्यावर कोणालाही न दिसणारा, सर्वांना प्रत्यक्ष पाहणारा असाही परमात्मा जाग्रत्स्वप्नसुषुप्तादि अवस्थात्रयद्रष्टा असा अल्पज्ञासारखा झाला. पुढें त्या तिन्ही अवस्थांतील कष्टांचा विचार करून सुदैवाने या प्रपंचाविषयीं त्याला वैराग्य झाले; मग माझें स्वरूप वास्तविकच दुःखादियुक्त आहे, कीं हे दुःखादि उपाधीच्या योगाने मला आहेत, इत्यादि विचार करून वास्तविक अद्वितीय तत्त्वंपदलक्ष्य अखंडैकरस निरुपाधिक, दुःखशोकादिरहित, आनंद मात्र प्रज्ञान ब्रह्मरूप माझें स्वरूप आहे; असा निर्णय करून प्रज्ञानब्रह्मरूप जो झाला, असा तो आपल्या भक्तांवर अनुग्रहदृष्टी करणारा परमात्मा दत्तात्रेय, जिवाहून अभिन्न रूपाने ऐतरेयोपनिषदांनी वर्णिला आहे ॥४९॥

**जगद्धीशा वास्यं यदु सुखमनिच्छोऽधनगृधिः**
**सुधीर्भुङ्क्तेऽनेजज्जवदतिगं सर्वगमधीः ॥**
**न वेदैकत्वेनास्य दृगितविशोकोऽस्ति स विभुः**
**प्रभुः शक्रोऽकायोऽसमुचितविदाऽऽप्योऽयमविभुः ॥५०॥**

अन्वयार्थ :- (हि जगत् ईशा वास्यम्) निश्चयाने जगत् दत्ताच्या स्वरूपाने आच्छादित करावे; त्यायोगें (अनिच्छः) सर्व एषणा सोडणारा, (अधनगृधीः) धनाची आकांक्षा नसणारा (सुधीः) विवेकी पुरुष (यत् उ सुखं भुंक्ते) ज्या स्वरूपभूत सुखाचा उपभोग घेतो (तत् अनेजत्) ते आत्मरूप सुख क्रियारहित असें असून (जववदतिगं) वेगवान् अशा मन इत्यादिकांचेही अतिक्रमण करणारे असें आहे. (यत् सर्वगं अपि अधीःन वेद) जें सर्वव्यापक असूनही, श्रवणादिकांनी अपरिपक्व-बुद्धि असा मनुष्य जाणूं शकत नाहीं (अस्य एकत्वेन दृक् इतविशोकः अस्ति) अशा परमात्म्याला एक रूपाने पाहणारा शोकरहित होतो. (विभुः) व्यापक असा (प्रभुः) संवत्सरांना यथायोग्य अर्थ देण्यास समर्थ (शुक्रः) प्रकाशरूप (अकार्यः)

स्थूल-सूक्ष्मशरीररहित (अविभुः) ज्याच्यापेक्षां कोणीहि व्यापक नाहीं असा (असमुच्चितविदा आप्यः) कर्मसमुच्चित नसणाऱ्या म्हणजे केवळ ज्ञानानेच प्राप्त होणारा असा तो दत्तात्रेय आहे ॥५०॥

भावार्थः- ईशोपनिषत्प्रतिपाद्य हा दत्तात्रेय आहे असें या श्लोकांत सांगतात. साधकाने हे सर्व जगत् ईश्वरस्वरूपाने झांकून टाकावे - म्हणजे सर्व ईश्वरस्वरूप आहे, असा निश्चय करावा; म्हणजे त्याच्या चित्तांत कोणत्याही प्रकारच्या इच्छा राहत नाहींत. धनादिकांच्या इच्छा गेल्याने स्थिरबुद्धि झालेला विवेकी पुरुष जें स्वरूपभूत व उत्कृष्ट असें सुख भोगतो ते निष्क्रिय आत्मस्वरूपभूत सुख अतिशय वेगवान् अशा मन इत्यादिकांचेही अतिक्रमण करणारे असें आहे. म्हणजे सर्वत्र व सर्वांच्या आधीं चोहोंकडे पोंचलेले अर्थात् व्यापक असें आहे. परंतु ज्याची बुद्धि श्रवणादि साधनांनी परिपक्व झाली नाहीं, त्याला ते सर्वत्र विद्यमान आत्मसुख मिळत नाहीं. जो त्या सुखाला एकत्वाने जाणतो त्याचे सर्व शोकमोहादि नाहींसे होतात. ‘स पर्यगात्’ इत्यादि श्रुतीने सांगितलेला व्यापक, संवत्सर प्रजापतीला यथायोग्य अर्थ देण्यास समर्थ, ज्योतिस्वरूप, स्थूल-सूक्ष्मशरीर रहित, ज्याच्यापेक्षां कोणीहि व्यापक नाहीं, असा परमात्मा ‘अंधं तमः’ इत्यादि सहा मंत्रांच्या अभिप्रायावरून कर्माने असमुच्चित म्हणजे केवळ ज्ञानाने प्राप्त करून घेण्यास जो योग्य आहे असें कळते, तो परमात्मा श्रीदत्तात्रेयच आहे. या श्लोकांत असमुच्चित असें लिहावयास पाहिजे होते, परंतु तसें केले असतां छंदोभंग होईल, ‘माष’ पदाऐवजीं ‘मष’ असें लिहावे परंतु छंदोभंग करूं नये अशी छंदः-शास्त्राची आज्ञा आहे तिला अनुसरून समुचितः या पदांत दीर्घ ऊकाराऐवजीं पुढें जोडाक्षर न आल्याने तो ऱ्हस्वच राहिला तरी दोषावह नाहीं ॥५०॥

**श्रुतः श्रोत्रादेर्यः श्रुतिमुख इताहंकृतिगतिः**
**गतिर्नात्राक्ष्यादेर्भवति य उपस्थोऽखिलगतिः ॥**

**सुवेद्ये दभ्रात्माऽविदितविदितान्योऽमतमत -**
**स्त्वलविज्ञातो ज्ञातुः स च हृतसुराहं श्रुतिमतः ।।५१।।**

अन्वयार्थः- (यः श्रोत्रादेः श्रुतिमुखः श्रुतः) जो श्रीदत्त श्रोत्रादि इंद्रियांचेहि श्रोत्रादि स्वरूप आहे, (इताहंकृतिगतिः) निरहंकारी पुरुषांनी प्राप्त होण्याला योग्य मोक्षरूप आहे, (अत्र अक्ष्यादेर्गतिर्न) या दत्तस्वरूपी इंद्रियादिकांची गति चालत नाहीं, (यः अखिलगतिः उपास्यः भवति) जो सर्वेंद्रियचालक असल्याने सर्वोपास्य आहे, (सुवेद्ये दभ्रात्मा) हा वेद्य मानला असतां अपूर्ण स्वरूपाचा होतो व ज्ञाताहि अपूर्ण राहतो, (अविदितविदितान्यः) जो अज्ञात व ज्ञात या दोन्हींपेक्षां निराळा आहे, (अमतमतः) जो मनालाही समजत नाहीं, असा निश्चय करणाऱ्याला कळतो, (ज्ञातुः तु अविज्ञातः) मला हा कळला असें मानणाऱ्याला न समजणारा, (हृतसुराहं) अग्नि, वायु, इंद्र इत्यादि देवतांचा गर्व हरण करणारा, (श्रुतिमतः स च) जो श्रुतीला संमत आहे तो हाच श्रीदत्त आहे ।।५१।।

भावार्थः- केनोपनिषत् प्रतिपाद्य हा दत्तात्रेय आहे असें सांगतात. 'श्रोत्रस्य श्रोत्रं' इत्यादि मंत्रांवरून जो श्रोत्रादि इंद्रियांचेहि श्रोत्रादि इंद्रिय म्हणजे ज्याच्या योगाने श्रोत्रादि इंद्रियांना ऐकण्यादिकांचे सामर्थ्य येते असा; 'अतिमुच्य धीराः' इत्यादि श्रुतीवरून निरहंकारी पुरुषांना गम्य होणारा असा; 'न तत्र चक्षुर्गच्छति' इत्यादि श्रुतीवरून इंद्रियाला अगम्य ज्याचे स्वरूप आहे असा; 'येन वागभ्युद्यते' या श्रुतीवरून सर्व इंद्रियांना चालक अशा रूपाने सर्वांना उपास्य असणारा; 'यदि मन्यसे' या श्रुतीवरून हा कळला असें मानल्यास अपूर्ण रूपाचा व मानणारा पुरुष अपूर्णज्ञानी होतो असा जो अज्ञात व ज्ञात या दोहोंहून वेगळा; 'यस्यामतं' इत्यादि श्रुतीवरून मनादिकांना हा आत्मा कळत नाहीं असें समजणाऱ्याला कळणारा; 'अविज्ञातं विजानताम्' या श्रुतीवरून मी आत्मा जाणला असें समजणाराला न कळणारा; इंद्र, वायु, अग्नि इत्यादि देवांचा गर्वहरण करणारा; 'ब्रह्म ह देवेभ्यो' इत्यादि श्रुतींनी वर्णिलेला जो परमात्मा तो श्रीदत्तगुरूच आहे ।।५१।।

**त्र्युपन्यासे धर्मप्रमुखपर ॐ वाच्य उदितः**
**परो व्यक्तात्कार्यादपि चिदविकार्याद्य उदितः ।।**
**य आत्मा सूक्ष्मोत्ताऽगुण इनमुखज्योतिरगति-**
**र्ह्यभीतिः सोऽन्तर्दृग्वरितृवरधीसारथिगतिः ।।५२।।**

अन्वयार्थः- (त्र्युपन्यासे) अग्नि, जीव व परमात्मा यांचा विचार ज्या ठिकाणी आहे अशा कठोपनिषदात (धर्मप्रमुखपरः) धर्मादिकांकडून निराळा म्हणून सांगितलेला, (ॐ वाच्यः यः उदितः) ॐकारवाच्य असा सांगितलेला, (अव्यक्तात् कार्यादपि परः) कारण व कार्य या दोघांपेक्षाही अन्य, (चिदविकार्याद्यः यः आत्मा उदितः) चिद्रूप अविकारी व आद्य असा जो आत्मा सांगितला आहे, (अगुणः) अगुण म्हणून वर्णिलेला, (अत्ता) सर्व जगाचा उपसंहारक म्हणून सांगितलेला, (इनमुखज्योतिः) सूर्यादिकांनाही जो प्रकाशक असा वर्णिलेला, (अगतिः) इंद्रियांना विषय न होणारा म्हणून सांगितलेला (अभीतिः) ज्याच्याशिवाय दुसरी भीति नाहीं म्हणजे अग्नियमादिकांनाही भय दाखविणारा, (अन्तर्दृक्) इंद्रियें, अर्थ इत्यादि सर्वांच्या आंत असणारा व ज्ञानस्वरूप असा वर्णिलेला, (वरितृवरधीसारथिगतिः यः सः) सेवा करणारा व शुद्धिबुद्धिप्रधान अशा साधकाची गतिरूप म्हणून सांगितलेला जो परमात्मा तो हा श्रीदत्तच होय।।५२।।

भावार्थः- कठोपनिषत्प्रतिपाद्य हा भगवान् श्रीदत्तच आहे असें सांगतात. नचिकेत्याच्या प्रश्नाला अनुसरून यमधर्माने अग्नि, जीव व परमात्मा यांच्या ऊहापोहाने जेथे निर्णय केला आहे अशा त्र्युपन्याससंज्ञक कठोपनिषदात 'अन्यत्र धर्मात्' इत्यादि मंत्रांनी धर्माधर्मासंस्पृष्ट, 'सर्वे वेदाः' इत्यादि श्रुतीवरून ॐकारवाच्य, कारण व कार्य यांहून पलीकडचा, चैतन्यरूप अविकारी आद्य, 'अशब्दमस्पर्श' इत्यादि श्रुतीवरून अगुण, 'यस्य ब्रह्म च' इत्यादि श्रुतीने अत्ता म्हणजे सर्वोपसंहार करणारा, 'न तत्र सूर्यः' इत्यादि श्रुतीने सूर्यादि दिव्य तेजांनाही प्रकाशक 'नैव वाचा' इत्यादी श्रुतीवरून

वागादि इन्द्रियांना विषय न होणारा, 'महद्भयं' इत्यादि श्रुतीने इंद्रादिकांना सुद्धां भीतिप्रद म्हणजे त्यांचा शास्ता, 'आवृत्तचक्षुः' 'आत्मानं रथिनं' इत्यादि श्रुतींनी इंद्रियें व अर्थ इत्यादिकांपेक्षां अत्यंत सूक्ष्म व सर्वान्तर, सेवा करणारा भजक व शुद्धबुद्धिप्रधान साधक यांची गति असा जो वर्णन केला तो श्रीदत्तपरमात्माच होय ॥५२॥

**रयिप्राणौ योऽब्दादितनुरसृजत्सृष्ट इमैः**
**स्तुतः खाद्यैर्देवैर्य उत गतगर्वैस्तनुधरान् ॥**
**व्यधात्प्राणांस्तज्ज्ञक्रमगतिद आत्माखिललय-**
**स्त्रिमात्रेक्ष्यं प्राणादिभुवमकलो याति यमसौ ॥५३॥**

अन्वयार्थः- (अब्दादितनुः) संवत्सर, अयन, पक्ष, अहोरात्ररूप प्रजापति, हे दोघे पुष्कळ प्रजा निर्माण करतील अशा अभिप्रायाने (सृष्टयै रयिप्राणौ असृजत्) सृष्टि निर्माण करण्याकरिता रयि व प्राण म्हणजे चंद्र व सूर्य यांना उत्पन्न करिता झाला. प्रथम प्रश्न. (उत यः इमैः गतगर्वैः खाद्यैः देवैः स्तुतः) आणि जो 'सोऽहमभिमानादूर्ध्वं' इत्यादि श्रुतींवरून गर्वरहित अशा 'आकाशो ह वा एष देवः' इत्यादि श्रुतींत वर्णन केलेल्या आकाशादि देवांकडून 'एषोऽग्निस्तपति' इत्यादि वाक्यांनी आरंभ करून द्वितीय प्रश्नाच्या समाप्तीपर्यंत स्तुति केला गेलेला द्वि.प्र.२. (प्राणान् तनुधरान् व्यधात्) 'कत्येव देवाः' इत्यादि श्रुतींत सांगितलेल्या प्राणांना शरीरयुक्त करिता झाला (तज्ज्ञक्रमगतिदः) व जो उत्पत्ति, आयति, स्थान, विभुत्व इत्यादि रूपांनी प्राणाला जाणणाऱ्याला क्रममुक्तिदायक असा आहे तृ.प्र.३. (आत्मा अखिललयः) 'एतस्मिन् पुरुषे कानि' इत्यादि प्रश्नांत 'परे देवे मनसि' या श्रुतीवरून सर्वेंद्रियांपेक्षां श्रेष्ठ म्हणून सांगितलेल्या मनाहूनहि 'सर्व पर आत्मनि' या श्रुतींत सांगितलेला आत्मा मुख्य आहे; कारण पृथिव्यादि पंच स्थूल भूते व तन्मात्रारूप सूक्ष्म भूते या सर्वांचा लय, ज्या परम आत्म्यामध्यें सांगितलेला आहे. च.प्र.४. 'परं चापरं च' या श्रुतीवरून ॐकाराच्या तीनहि मात्रांनी ज्ञात होणाऱ्या अशा पं.प्र.५.

(प्राणादिभुवं यं) 'स प्राणमसृजत' इत्यादि श्रुतीवरून प्राणादिकांना कारण असलेल्या अशा परमात्म्याप्रत (अकलः याति) 'इमाः षेडशकला' इत्यादि मंत्रांत सांगितल्याप्रमाणे सर्व कला नष्ट झालेला म्हणजे नामरूप विमुक्त झालेला ज्ञानी पुरुष अभेदरूपाने ज्याला प्राप्त होतो म्हणजे परमात्मस्वरूप होतो (असौ) हा श्रीदत्तात्रेयच आहे ॥५३॥

भावार्थः- प्रश्नोपनिषत्प्रतिपाद्य दत्तात्रेयच आहे असें सांगतात. प्रश्नोपनिषदात सहा ऋषींचे सहा प्रश्न आहेत. या श्लोकांतहि सहा विशेषणांनी सहा प्रश्नांचा भावार्थ सांगितला आहे. संवत्सर, अयन, पक्ष, अहोरात्र स्वरूप अशा हिरण्यगर्भ प्रजापतीने हे पुष्कळ प्रजा निर्माण करतील अशा अभिप्रायाने रयि म्हणजे सोम व प्राण म्हणजे सूर्य असें द्वंद्व निर्माण केले. या सर्व प्रजा कोणापासून निर्माण होतात यासंबंधी कात्यायनाच्या पहिल्या प्रश्नाला उत्तर म्हणून पिप्पलाद ऋषींनी सूर्य चंद्रादि द्वंद्वापासून अहोरात्रान्तद्वंद्वें सांगून अन्नापासून यांतील जो संवत्सरादिरूप हिरण्यगर्भ तो श्रीदत्त होय. १ भार्गव वैदर्भी ऋषीने किती देव या शरीररूप प्रजेला धारण करतात व यामध्यें कोण श्रेष्ठ आहे, असा प्रश्न केला असतां पिप्पलाद ऋषि म्हणाले, आकाश, वायु, अग्नि, जल, पृथ्वी, वाणी, मन, चक्षु, श्रोत्र या देवांना आम्हीच प्रजा धारण करतों, असा गर्व झाला. प्राणदेव यांना म्हणाला, मीच ह्या प्रजा धारण करतों, उगीच गर्व करूं नका. या वाक्यावर आकाशादि देवांनी विश्वास ठेवला नाहीं. प्राणांनी यांचा गर्व नाहींसा करण्याकरितां शरीरांतून जाण्याला आरंभ केला असतां सर्व देव घाबरले. व 'एषोऽग्निस्तपति' इत्यादि द्वितीय प्रश्न संपेपर्यंत प्राणांची स्तुति केली. गतगर्व देवांनी ज्या प्राणांची स्तुति केली तो प्राणात्मा श्रीदत्तात्रेयच होय. २ आश्वलायन कौसल्याने हा प्राण कोठून उत्पन्न होतो इत्यादि प्रश्न केले असतां आत्म्यापासून हा प्राण होतो व इतर सर्व अपानादि प्राणविभूतींना राहण्याकरितां शरीरांतील तीं तीं स्थाने देतो. या प्राणांची उत्पत्ति, शरीरांत मनःसंकल्पाने येणे, त्या त्या स्थानांत राहणे व व्यापकत्व हे जो जाणतो,

त्याला क्रममुक्ति देणारा म्हणून पिप्पलाद ऋषीने जो सांगितला, तो श्रीदत्तात्रेयच होय. ३ याप्रमाणे तीन प्रश्नांत क्रममुक्तीकरितां उपासना सांगितली; आतां चतुर्थ प्रश्नाने ज्ञान सांगतात. या शरीररूप पुरुषांत कोण निजतात? कोण जागे असतात? कोणता देव स्वप्न पाहतो? जाग्रत्स्वप्नादि सर्व व्यापार बंद झाले असतां निरायास असें सुख कोणाला होते? व हे सर्व बाह्यान्तःकरणादि कोणांत लीन होतात? असे प्रश्न सौर्यायणी गार्ग्यांनी केले असतां, पिप्पलादांनी सांगितले कीं, इंद्रियादिकांहून पर अशा मनोदेवांत सर्व इंद्रियें लीन होतात, म्हणजे निजतात. अग्निस्वरूप असणारे प्राण जागे असतात. हा मनोदेव स्वप्न पाहतो. तो निजला असतां निरायास असें सुख प्रकट होते. पृथिव्यादि पंच स्थूल भूते व पंच सूक्ष्म भूतादि हे सर्व पर आत्म्यामध्यें लीन होतात. पिप्पलादांनी ज्या पर आत्म्यांत सर्व लीन होतात असें सांगितले तो हा मनापेक्षांहि मुख्य असा पर आत्मा दत्तात्रेयच होय. ४ त्रिमात्रओंकारांनी ज्ञात होणारा असा जो परमपुरुष, तो हा दत्तात्रेयच आहे. ५ प्राणादिकांच्या उत्पत्तींचे स्थान असलेल्या ज्या परमात्म्याप्रत षोडशकलारूप उपाधिनिर्मुक्त पुरुष होतो, म्हणजे तत्स्वरूप होतो, तो हा परमात्मा दत्तात्रेयच आहे. ॥५३॥

**अदृश्योऽप्राणादिर्विभुरपि च योनिः परविदाऽ**
**धिमगम्योऽजो योऽन्योक्षरत उत चास्वादिजनकः ॥**
**द्युपूर्वोऽत्र न्यस्तो विगतसकलोपाधिकगति-**
**र्विदा ग्रन्थ्याद्यन्तोऽस्य सकलवित्सोऽयमगतिः ॥५४॥**

अन्वयार्थः- (यः परविदाऽधिगम्यः) जो 'अथपरा' इत्यादि श्रुतीवरून परविद्येने प्राप्त होणारा, (अदृश्यः) 'यत्तदद्रेश्यं' इत्यादि श्रुतिप्रमाणाने दृश्यविलक्षण म्हणून सांगितलेला, (अप्राणादिः) 'अप्राणो ह्यमनाः' या श्रुतिवरून प्राणादिरहित असणारा, (अपि च विभुः अजः योनिः) व्यापक, जन्मरहित व सर्वभूतांचे उत्पत्तिस्थान, (अक्षरतः अन्यः) 'अक्षरात् परतः परः' इत्यादि श्रुतीवरून अक्षररूप मायेहून वेगळा, (उत च अस्वादिजनकः)

'एतस्माज्जायते प्राणः' इत्यादि श्रुतीवरून प्राणादिकांना उत्पन्न करणारा, (अत्र द्युपूर्वो न्यस्तः) 'यस्मिन् द्यौः' इत्यादि श्रुतीवरून ज्याच्या स्वरूपांत पटामध्यें जसे तंतू तसे आकाशादि भूते ओंवलेलीं आहेत, (विगतसकलोपाधिकगतिः) 'यथा नद्यः' इत्यादि श्रुतींवरून सकल उपाधिरहित पुरुषाची गति असणारा, (अस्य विदा ग्रंथ्याद्यन्तः) 'भिद्यन्ते हृदयग्रंथिः' इत्यदि श्रुतींवरून ज्याच्या ज्ञानाने अहंकारादि सकल ग्रंथींचा नाश होतो असा, (सकलविद्, अगतिः सोऽयं) 'यः सर्वज्ञः' इत्यादि श्रुतीवरून जो इंद्रिय व तदभिमानी देवतांनाहि विषय न होणारा फक्त ध्यान करणाऱ्याला कळणारा असें 'ज्ञानप्रसादेन विशुद्धसत्त्वः' इत्यादि श्रुति सांगते हा श्रीदत्तच आहे ॥५४॥

भावार्थः- मुंडकोपनिषत्प्रतिपाद्य दत्तात्रेय आहे असें सांगतात. पर व अपर अशा दोन्ही विद्यांपैकीं पर विद्येनेच ज्याचे ज्ञान होते; जो इंद्रियादिकांनी प्रकाश्य नाहीं; प्राणादिरहित, व्यापक, जन्मरहित सर्वभूतांचे उत्पत्तिकारण, मायारूप अक्षराहून पलीकडे असणारा, प्राणादिकांना उत्पत्तिकारण, मायारूप अक्षराहून पलीकडे असणारा, प्राणादिकांना उत्पन्न करणारा, आकाश, अंतरिक्ष, पृथिव्यादि ज्याच्या स्वरूपांत पटांत तंतूप्रमाणे आडवे उभे विणलेले आहेत, त्यक्तसर्वोपाधि अशा पुरुषांना प्राप्त होणारा, ज्याच्या ज्ञानाने कामादि हृदयग्रंथि संशय व सर्व कर्मे नष्ट होतात, जो स्वतः सर्वज्ञ आहे, परंतु ज्याच्या स्वरूपांत चक्षुरादि इंद्रियांची गति चालत नाहीं, तथापि अनन्य भावाने ध्यान करणाराला ज्ञात होणारा मुंडकोपनिषत्प्रतिपाद्य जो अदृश्यादि गुणक परमात्मा तो हा दत्तात्रेयच आहे ॥५४॥

**इदं सर्वं ह्योमक्षरमिदमपि ब्रह्म खलु चाऽयमात्मा**
**यमात्मा ब्रह्मेति श्रुतिरवददेष श्रुतिवचाः ॥**
**समष्टिव्यष्ट्यात्माऽविकृत उत मात्रामितपद -**
**त्रयातीतोऽद्वैतोऽभवशिवतुरीयोऽयमपदः ॥५५॥**

अन्वयार्थ :- (हि इदं सर्वं ॐ अक्षरमेव) निश्चयाने हे सर्व जगत् ॐ अक्षररूपच आहे. (खलु इदमपि च ब्रह्मैव) ॐकार हे ब्रह्माचे नांव आहे व नाम

व नामी यांचा अभेद आहे म्हणून भूत-भविष्य-वर्तमान काळांत असणारे सर्व जगत् ओंकाररूप असल्याने, ॐकाराहून अभिन्न असें ब्रह्मरूपही आहे. (अयामात्मा ब्रह्म इति यं श्रुतिः अवदत्) हा स्वयंप्रकाश अपरोक्ष व कूटस्थ आत्मा ब्रह्मच आहे असें श्रुति ज्याचे वर्णन करते, (एष श्रुतिवचाः) तो हा श्रीदत्त वेदकर्ता, (समष्टिव्यष्ट्यात्मा) विराट्, हिरण्यगर्भ व अव्याकृत या समष्टींचा व विश्व, तैजस, प्राज्ञ या व्यष्टींचा स्वरूपभूत असणारा, (अविकृतः) जाग्रदादि द्रष्टे जसे विकारी तसा विकारी नाही, किन्तु प्रपंचोपशम झाल्याने अविकारी असणारा, (उत च मात्रामितपदत्रयातीतः) अकार, उकार व मकार या तीन मात्रांनी कथन केलेले 'सोऽयमात्मा' इत्यादि श्रुतींत सांगितलेले जे तीन पाद त्यांच्याहून पलीकडे असणारा, (अद्वैतः) आवरणविक्षेपरहित असल्यानेच द्वैतरहित असणारा, (अभावशिवतुरीयः) प्रपंचरहित शिव आणि पूर्वीच्या तिघांच्या दृष्टीने चतुर्थ असा, (अपदः अयं श्रीदत्तः) नामरहितांत गति नसल्याने अगम्य असा हा श्रीदत्त आहे ॥५५॥

भावार्थ :- मांडूक्योपनिषत्प्रतिपाद्य भगवान् श्रीदत्त आहे असें सांगतात. ॐकारापासूनच सर्व वाङ्मय निर्माण झाले असल्याने ॐकार सर्व वाङ्मयव्यापक आहे. हा ॐकार, ध्येय अशा परब्रंह्माचे अत्यंत प्रिय नांव आहे. नाम व नामी यांचा अभेद असल्याने ब्रह्म व ॐकार हे एकच आहेत. हा सर्व सिद्धान्त निश्चित झाल्यावर भूत, भविष्य, वर्तमान असें कार्यकारणात्मक सर्व जगत्, ॐकाररूप आहे असें श्रुतीने निश्चयाने विधान केले असतां हे सर्व जगत् ब्रह्मरूप आहे असें अर्थातच सिद्ध झाले. तसेंच स्वप्रकाश अपरोक्ष, कूटस्थ असा हा जो जिवात्मा तोहि ब्रह्मरूपच आहे, असें श्रुतीने सर्व चेतनाचेतन स्वरूपाने वर्णिलेले जें ब्रह्म तो हा सर्व वेदकर्ता श्रीदत्तात्रेयच आहे. विराट्, हिरण्यगर्भ, अव्याकृत अशी समष्टि व विश्वतैजसप्राज्ञरूप व्यष्टि यांचा आत्मा; जाग्रदादि अवस्थेला पाहणाऱ्या या विश्वादिकांप्रमाणे तीन मात्रांनी कळणारे चतुष्पाद आत्म्याचे जें समष्टिव्यष्ट्यात्मक पादत्रय त्याहूनहि वेगळा; कारण त्या स्वरूपांत आवरण

व विक्षेपरूप अग्रहण व अन्यथा ग्रहण नाहीं. म्हणूनच अद्वैत-प्रपंचरहित मंगलमय असा पूर्वी सांगितलेल्या पादत्रयाच्या दृष्टीने चतुर्थ म्हटला जाणारा अपद म्हणजे अज्ञेय असा जो वर्ण केला तो श्रीदत्तच होय ॥५५॥

**स सज्ज्ञानानन्तो हृदि निजविदे सर्वसुखदः**
**सहाभ्रादिस्रष्टाऽन्वयत इह कोशेषु नृविधः ॥**
**प्रतिष्ठान्त्ये सृष्ट्वा य उ तदनुविष्टः परममुद्**
**भृगुस्तप्त्वा कोशात्ययत इममापैष भयनुद् ॥५६॥**

अन्वयार्थ :- (सः सज्ज्ञानानन्तः) उपनिष्त्प्रसिद्ध असा जो श्रीदत्त सत्य, ज्ञान व अपरिच्छिन्न स्वरूप असणारा; (हृदि निजविदे सर्वसुखदः) हृदयांत आपणांस अभेदाने जाणणाऱ्या भक्ताला एकाच समयीं सर्व सुखे देणारा; (अभ्रादिस्रष्टा) आकाशादिकांना उत्पन्न करणारा; (इह कोशेषु) या अन्नमयादि आनंदमयान्त पांच कोशांमध्यें (अन्वयतः) अन्वित किंवा संबंध झाल्याने (नृविधः) 'तस्य पुरुषविधतां' इत्यादि श्रुतींवरून अन्नमयादिकोशांप्रमाणे आकार धारण करणारा, (अंत्ये प्रतिष्ठा) 'आनंदमयोऽ-भ्यासात्' या न्यायाने आनंदमय कोशाला पुच्छ म्हणजे आधार प्रतिष्ठा असणारा, (यः उ सृष्ट्वा तदनुविष्टः) 'तत्सृष्ट्वा तदनुप्राविशत्' इत्यादि श्रुतींवरून जगताला उत्पन्न करून त्यांत प्रवेश करणारा, (परममुद्) 'स एको मानुष आनंदः' या वाक्याला प्रारंभ करून 'स एको ब्रह्मण आनंदः' या वाक्यापर्यंत सांगितल्याप्रमाणे जो परमानंदरूप असणारा, (भृगुस्तप्त्वा) वरुणपुत्र भृगूने पित्राज्ञेने तपश्चर्या करून, (कोशात्ययतः) 'एतमानन्दमयमात्मानमुपसंक्रम्य' यांत सांगितल्या-प्रमाणे अन्नमयाद्यानंदमयान्त कोशांना अनात्मत्वाने समजून (इमं आप) ज्या सच्चिदानंदस्वरूप परमात्म्याची अभेदांनी प्राप्ति करून घेतली (यः भयनुद्) 'अथास्मिन्' इत्यादि श्रुतीवरून अभेदज्ञात्याचे भय नाहीसें करणारा तो हा श्रीदत्तच होय ॥५६॥

भावार्थ :- तैत्तिरीयोपनिषत्प्रतिपाद्य हा दत्तात्रेय आहे असें सांगतात. जो परमात्मा सत्य, ज्ञान, अनंतरूप आहे व अशा रूपाने आपल्याला

जाणणाऱ्या भक्ताला एकाच समयीं सर्व सुखे देतो, ज्यांनी आकाशादि सर्व भूते निर्माण करून त्यांत प्रवेश केला, अन्नमयादि आनंदमयान्त पंच कोशांशीं संगत होऊन, अग्नि जसा तत्तदुपाध्याकार बनतो त्याप्रमाणे शिरःपाण्यादि पुरुषाकार जो झाला; मानुषानंदादि शत शतपटीने अधिक असणाऱ्या आनंदांची ज्या ब्रह्मानंदांत सीमा होते तो ब्रह्मानंद ज्याचे स्वरूप आहे; वरुणपुत्र भृगु ऋषीने तपश्चर्या करून अन्नमयादि आनंद कोशांत पदार्थांना अनात्मा असें समजून ज्या सत्य, ज्ञान अनंतरूप परमात्म्याशीं अभेदरूपता मिळविली, आपल्याला अभेदाने जाणणाऱ्या ज्ञात्याचे जो सर्व भय नाहींसें करतो व त्या ज्ञात्याची निर्भय प्रतिष्ठारूप म्हणून जो श्रुतीने सांगितला तो हा श्रीदत्तच होय ।।५६।।

**परो भूमा नामादित उ दहरो ज्योतिरपि**
**चान्तरः प्राणो वैश्वानर उदित आकाश इति यः ।।**
**श्रुतो यज्ज्ञानात् सर्वविदपि हि यत्स्रष्टृ सदिहानुविष्टं**
**व्याकृत्तत्त्वमसि नवधोक्तोऽयमिह सः ।।५७।।**

अन्वयार्थः- (यः नामादितः परो भूमा) 'यो वै भूमा तत्सुखं' इत्यादि भूमप्रकरणांत नामादिकांपेक्षां श्रेष्ठ असा भूमा व्यापक परमात्मा विजिज्ञास्य म्हणून सांगितला तो श्रीदत्तच आहे। (उ दहरः) 'अथ यदिदस्मिन् ब्रह्मपुरे दहरं' या श्रुतीने दहर म्हणजे अन्तःकरणाच्या अल्पत्वाने अल्प असा भासणाराही श्रीदत्तच आहे. (ज्योतिः) 'अथग्रदतः परो दिवो ज्योतिर्दीप्यते' या श्रुतीवरून स्वप्रकाश चैतन्यज्योतिस्वरूप असणारा, (अपि च अंतरः) 'य एषोऽक्षिणि' इत्यादि श्रुतीवरून किंवा 'अभय एषोऽन्तरादित्ये' या श्रुतीवरून सर्वांतर असा (यः प्राणः) 'कतमा सा देवता' 'प्राण इति होवाच' या श्रुतीवरून जो प्राणरूप असलेला, (वैश्वानरः उदितः) 'आत्मानं वैश्वानरमुपास्ते' या श्रुतीवरून सर्व नर ज्याचे आहेत; किंवा सर्व नरस्वरूप असा, (आकाश इति यः श्रुतः) 'अस्य लोकस्य का गतिः' 'आकाश इति होवाच' इत्यादि श्रुतीवरून आकाश म्हणजे चहूकडे प्रकाशणारा, (यज्ज्ञानात् सर्वविद्) ज्याचे ज्ञान झाले असतां साधक सर्वज्ञ होतो, (अपि हि यत्

सृष्ट) 'सदेव सोम्य' 'तत्तेजो असृजत' इत्यादि ठिकाणीं सांगितल्यावरून तेज, जल, पृथ्वी या तत्त्वांना उत्पन्न करणारे जें ब्रह्म (यत् व्याकृत सत् इह अनुविष्टं) जें नामरूप व्याकरण करणारे होत्साते उत्पादित सर्व पदार्थांत 'अनेन जीवेन' इत्यादि श्रुतींत सांगितल्याप्रमाणे प्रविष्ट झाले, (यः तत्त्वमसि इति नवधा उक्तः) जो परमात्मा श्वेतकेतु पुत्राला आरुणि म्हणजे अरुणाचा मुलगा, आरुणि नामक ऋषींनी, 'स य एषो अणिमा' इत्यादि वाक्यांनी नऊ प्रकारांनी सांगितला (इह सः अयम्) या श्लोकांत तोच हा श्रीदत्त म्हणून प्रसिद्ध आहे ।।५७।।

भावार्थः- छांदोग्य उपनिषदात निरनिराळ्या शब्दांनी श्रीदत्ताचेच प्रतिपादन केले आहे असें या श्लोकांत सांगतात. नामादि परिच्छिन्न ब्रह्माहून भिन्न, अर्थात् व्यापक व सुखस्वरूप व जिज्ञास्य म्हणून जो भूमा सांगितला; अल्पशा ब्रह्मनगरांत म्हणजे शरीरांत अल्प अशा अन्तःकरणोपाधींचा आश्रय करून जो दहर म्हणजे अल्प अशा नांवाने श्रुतीने सांगितला; जो उच्च-नीच अशा सर्व विश्वाला सर्वदा प्रकाशित करणारा व जड असा, विश्वाहून विलक्षण म्हणून ज्योति या संज्ञेला पात्र झाला; सूर्यादि ज्योतिर्मंडलाच्या व पृथिव्यादिकांच्या आंत राहून सर्वांचे नियमन करणारा हिरण्यश्मश्रु इत्यादि दिव्यरूपधारी जो अंतर्यामी-अंतर, म्हणून श्रुतीने सांगितला; जो प्राण या शब्दाने सांगितला, सर्व नर ज्याचे आहेत किंवा सर्व नरस्वरूप जो आहे म्हणून वर्णिले; ज्याला जाणले असतां ज्ञाता सर्वज्ञ होतो, सर्वांना निर्माण करणारे, निर्मित पदार्थांत प्रविष्ट होऊन नामरूपाने ज्याला पृथक् करणारे जें ब्रह्म, अरुणाचा नातू व आरुणीचा मुलगा जो श्वेतकेतू त्याला आरुणिपित्याने परमसूक्ष्म व 'तत्त्वमसि' असे नऊ वेळां निरनिराळ्या दृष्टान्तादिकांनी ज्या परमात्म्याचा उपदेश केला तो हा भूमादि सर्वपदप्रतिपाद्य भगवान् श्रीदत्तात्रेयच आहे ।।५७।।

**अहं ब्रह्मास्मीति प्रतिपदितिसाक्षी श्रुतिमतोऽ**
**मृतोऽन्तर्याम्यात्माक्षरमखिलधृक् शास्तृ जगतः ।।**

**द्वयात्मा चाकाशो य उत सवियत्पञ्चजनभू-**
**र्जगद्भूर्ज्ञातेऽस्मिन्विदितमखिलं सोयमधिभूः ।।५८।।**

अन्वयार्थ :- (अहं ब्रह्मास्मि इति) 'अहं ब्रह्मास्मि' या वाक्याने ब्रह्माहून अभिन्न म्हणून सांगितलेला, (प्रतिपदितिसाक्षी श्रुतिमतः) बुद्धिवृत्तीचा साक्षी म्हणून श्रुतीला मान्य असलेला, (अंतर्यामी अमृतः) 'यः पृथिव्यां तिष्ठन्' इत्यादि श्रुतींवरून अंतर्यामी व अमृतस्वरूप असणारा, (अक्षरं) 'एतद्वा अक्षरं गार्गि' यावरून अक्षर म्हणून वर्णिलेला (अखिलधृक्) 'एतस्मिन्खल्वक्षरे' या श्रुतीने आकाशादि सर्वांना धारण करणारा शब्दरूपाक्षराहून भिन्न (जगतः शास्तृ) 'एतस्य वा अक्षरस्य' या श्रुतीवरून चेतन अशा सूर्यादिक जगाचे नियमन करणारा सांख्यांच्या प्रकृतीहून भिन्न (द्वयात्मा) मधु ब्राह्मणांत सांगितलेली 'इयं पृथिवी' 'सर्वाणि भूतानि' इत्यादि वाक्यप्रतिपाद्य पृथिवी तदभिमानी भूत म्हणजे प्राणी अशीं जीं द्वंद्वें त्याच्याशीं एकभावापन्न असा 'अयमेव सः', इत्यादि वाक्यांनी प्रतिपादन केलेला, (यः आकाशः) 'आकाशो ह वै' इत्यादि श्रुतीने आकाश म्हणून सांगितलेला (उत च यः सवित्पंचजनभूः) 'यस्मिन् पंच पंचजनाः' इत्यादि श्रुतीवरून आकाशासहित असलेल्या प्राण, चक्षु, श्रोत्र, अन्न किंवा तेज, व मन असे पंचजन किंवा गंधर्व, पितर, देव, असुर, राक्षस, किंवा ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व निषादरूप पंचजनांचा आधार व प्राणादिकांचाही प्राण म्हणून वर्णिलेला, (जगद्भूः) 'यो वै बालाके' इत्यादि श्रुतीवरून बालाकीने सांगितलेले पुरुष व सर्व जगत् यांचे उत्पत्तिस्थान असणारा, (अस्मिन् ज्ञाते अखिलं विदितं) 'आत्मा वारे द्रष्टव्यः' इत्यादि श्रुतीवरून ज्याचे ज्ञान झाले असतां सर्व जाणले जाते (सोऽयमधिभूः) तो हा श्रीदत्त 'सर्वस्येशानः' या श्रुतीवरून सर्वांचा अधिपति आहे ।।५८।।

भावार्थ :- बृहदारण्यकप्रतिपाद्य श्रीदत्त असें सांगतात. *अहं ब्रह्मास्मी*तील ब्रह्म शब्दार्थ असणारा, सर्व पृथिव्यादिकांचा अन्तर्यामीं, पृथिव्यादि ज्याचे शरीर आहे, परंतु पृथिव्यादि देवता ज्याला जाणूं शकत

नाहींत असा, कधींही नष्ट न होणारा व सर्व व्यापक म्हणून ज्याला श्रुतीने अक्षर म्हटले, सांख्यसंमत प्रधानरूप किंवा लोकसंमत ॐकारादि शब्दरूप अक्षर नव्हे, कारण आकाशादि सर्व जगाला धारक किंवा आधारभूत व चेतन सूर्यादि सर्व जगाचे नियमन करणारा असा पृथिवीजलादिरूप मधु व सर्व प्राणिस्वरूप मधु व पृथिव्याद्यभिमानी व प्राणिशरीराभिमानी जे मधु अशीं जीं मधाची द्वंद्वें, त्या सर्व मधु द्वंद्वांचा आत्मा म्हणून मधु-ब्राह्मणांत सांगितलेला, ज्याला आकाश अशी संज्ञा दिली; प्राण, चक्षु, श्रोत्र, अन्न किंवा तेज, व मन असे पंचजन किंवा गंधर्व, पितर, देव, असुर, राक्षस किंवा ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, निषाद असे पंचजन, आकाशासहित ज्याच्या स्वरूपांत प्रतिष्ठित आहेत, ज्याच्या योगाने प्राणाला प्राणनशक्ति, चक्षूंना दर्शनशक्ति, श्रोत्राला श्रवणशक्ति, मनाला मननशक्ति येते असा प्राणादिकांचाहि प्राण म्हणून वर्णिलेला, दृप्तबालाकीने अजातशत्रूला ब्रह्म म्हणून सांगितलेले सर्व पुरुष व हे सर्व जगत् ज्याच्यापासून निर्माण झाले, ज्याला जाणले असतां ज्ञाता अखिलज्ञ होतो; तो हा भगवान् सर्वेश्वर श्रीदत्तच आहे ॥५८॥

**श्रुतिशिरोभिरिति प्रतिप्रादितः स्मृतिभिरेव हि सोऽयमपादितः ।**
**क इतरो भजतो निजतोषकृत् स्मरणमात्रत एष हि रोषकृत् ॥५९॥**

अन्वयार्थः- (इति श्रुतिशिरोभिः स्मृतिभिः प्रतिपादितः) याप्रमाणे उपनिषदांनी व स्मृतींनी वर्णिलेला, (स एव हि अयं) तोच हा श्रीदत्त आहे. (इतः इतरः कः) याच्याहून दुसरा कोण (भजतः अपात्) भजकांचे संसारभीतीपासून रक्षण करतां झाला बरे ? अर्थात् कोणीहि नाहीं. म्हणूनच (निजतोषकृत्) आपल्या भक्तांना संतोष देणारा (एष हि) हाच (स्मरण मात्रतः) केवळ स्मरणानेच (रोषकृत्) क्रोधाच्या उपलक्षणाने कामादि सर्व विकारांचा कृत् म्हणजे छेदन करणारा, भक्तांच्या अनर्थांचे निवारण करून त्यांना संतोष देणारा असा हा दत्त आहे ॥५९॥

भावार्थः- याप्रमाणे दशोपनिषत्प्रतिपाद्य हा भगवान् श्रीदत्त

आहे असें सांगितले. आतां दहा श्लोकांनी म्हणजे साठाव्या लोकापासून एकोणसत्तर लोकांपर्यत स्मृतिरूप अनुमानांनी प्रतिपाद्य म्हणजे पुराणप्रतिपाद्य हा दत्तात्रेय आहे असें या एकोणसाठाव्या श्लोकांत सांगतात. याप्रमाणे श्रुतींनी व पुढें दाखविलेल्या स्मृतींनीहि भगवान् दत्तात्रेयच प्रतिपादिला आहे. याच्याहून अन्य कोणत्या देवांनी भक्तांचे संसारभयापासून रक्षण केले आहे? अर्थात् दुसऱ्या कोणींही केले नाहीं. भजन पूजनादिकही न करितां केवळ याचे स्मरण करील त्या भक्ताचे कामक्रोधादि अनर्थकारक सर्व विकार नाहींसे करून परमानंदरूपस्वरूपाची प्राप्ति करून देणारा श्रीदत्त भक्तानर्थनिवारणपूर्वक भक्तसंतोषकारी आहे. ॥५९॥

**मधुकराजगराप्तविरागतासुपरितुष्टिहृताऽसुधनात्मता ।**
**ननु कयाधुभुवे कथिताऽर्पिता हृतभयेन तु येन विमुक्तता ॥६०॥**

अन्वयार्थः- (मधुकराजगराप्तविरागतासुपरितुष्टिहृताऽसुधनात्मता) मधुकर व अजगर यांच्यापासून अनुक्रमें मिळविलेले जें वैराग्य व संतोषरूप साधनद्वय या दोन साधनांनी टाकलेला जो प्राणाभिमान व धनाभिमान तो (कयाधुभुवे येन कथिता ननु) ज्याने कयाधुपुत्र प्रल्हादाला सांगितला, (हृतभयेन येन तु कयाधुभुवे विमुक्तता अर्पिता) भक्तांची भीति हरण करणाऱ्या ज्याने प्रल्हादाला विमुक्तावस्था अर्पण केली तो हा श्रीदत्त आहे ॥६०॥

भावार्थः- मधुमक्षिकारूप गुरूपासून संपादिलेले वैराग्य व अजगर गुरूपासून संपादन केलेला संतोष या दोहोंपैकीं पहिल्या वैराग्यरूप साधनाने प्राणादिकांच्या ठिकाणीं आत्मीयत्व बुद्धि टाकली म्हणजे हे प्राणादि माझे नव्हते असा निश्चय केला व संतोषरूप दुसऱ्या साधनाने धनाविषयी आसक्ति टाकिली. कारण धनादिकांच्या संपादनाने संतोषच मिळवावयाचा, तो जर स्वयंसिद्धच आहे, तर धनासक्ति कशाला? याप्रमाणे दोन साधनांनी टाकलेले जे प्राणाभिमान व धनाभिमान हे ज्यांनी स्वशिष्य कयाधुपुत्र प्रल्हादाला निश्चयपूर्वक सांगितले व भक्तभीति दूर करणाऱ्या ज्या सत्पुरुषाने त्या प्रल्हादाला मोक्ष साम्राज्यपद समर्पिले, तो हा भगवान्

श्रीदत्त प्रभूच आहे. ॥६०॥

**परमयोगमुवाच मदालसाभुव इतो झटितीह मुदालसाः ।**
**अपि लभन्त इमां परमां गतिं न पितृयाणगवत्पुनरागतिम् ॥६१॥**

अन्वयार्थः-(मदालसाभुवे परमयोगमुवाच) 'आन्वीक्षिकी- मलर्काय प्रह्लादादिभ्य ऊचिवान्' या भागवतोक्तीप्रमाणे मदालसापुत्र अलर्काला मोक्षरूप अशा ज्ञानयोगाला तो सांगता झाला, (इतः इह) या योगामुळें या अधिकारी लोकांत (झटिति अलसाः अपि) मंदबुद्धीचे आळशी लोकहि लवकर (मुदा) श्रमाशिवाय सहज आनंदाने (इमां) विद्वद्बुद्धिगम्य अशा (परमां) पुनर्जन्मरहित अशा (गतिं) 'सा काष्ठा सा परां गतिम्' या श्रुतीवरून मोक्षगतीप्रत (लभन्ते) मिळवतात. (पितृयाणगवत्) धूम रात्री या मार्गाने जाणाऱ्या कर्ममार्गी मनुष्याप्रमाणे (पुनरागतिं न लभन्ते) पुनः संसाराला प्राप्त होत नाहींत; असा ज्ञानयोग सांगणारा श्रीदत्तच आहे ॥६१॥

भावार्थः- मदालसानंदन अलर्काला मोक्षसाधनीभूत व भागवतादिवर्णित आन्विक्षिकीसंज्ञक ज्ञानयोग ज्यांनी सांगितला तो हा भगवान् श्रीदत्तच आहे. हा ज्ञानयोग मोक्षाचे सर्वांत श्रेष्ठ साधन व मंदबुद्धि असले, तरी श्रमाशिवाय सहज आनंदाने मोक्षरूप परमगतीला पोंचतात. ही परमगति पराकाष्ठा परागति म्हणून श्रुतींत वर्णिलेली व विद्वदनुभवगम्य आहे. धूम-रात्रि-कृष्णपक्ष इत्यादि मार्गांनी जाऊन चंद्रमंडळादिरूप स्वर्गांतील उपभोग घेऊन कर्ममार्गी लोक जसे पुन्हां या जन्ममरणप्रबंधरूप संसारांत पडतात, तसे ज्ञामार्गावलंबी मंदही पडत नाहींत. अशा परमश्रेष्ठ ज्ञान मार्गाचा उपदेष्टा भगवान् श्रीदत्त आहे. ॥६१॥

**समनयद्य उ विष्णुपदान्वित - स्वपरमाह्वयमालिनमन्वितः ।**
**सुरुचिना शुचिनाऽपि च कव्यभुक् सुगममागममानितहव्यभुक् ॥६२॥**

अन्वयार्थः- (सुरुचिना) प्रकाशमान अशा ब्राह्मणवेषधारी सूर्याबरोबर, (शुचिना अपि च अन्वितः) ब्राह्मणवेषधारी अग्निबरोबर बसून (कव्यभुक् सन्) श्राद्धान्न भक्षण करणारा होत्साता (विष्णुपदान्वितस्व

परमाहवयमालिनम्) विष्णुपदाने युक्त स्वतःचे 'दत्त' असें जें नांव, त्यांनी शोभणाऱ्या, म्हणजे विष्णुदत्तनामक ब्राह्मणाप्रत (सुगमं समनयत्) उत्तम अशा मोक्षरूप गतीप्रत पोंचविता झाला. (आगममानितहव्यभुक्) वेदांच्या द्वाराने हव्यभुक् म्हणजे देव, कव्यभुक् म्हणजे पितरांचाही ज्याने सन्मान केला आहे, असा श्रीदत्तच होय ।।६२।।

भावार्थः- विष्णुदत्ताचे घरीं अमावस्येच्या दिवशीं, दर्शश्राद्धीं ब्राह्मण वेशधारी तेजस्वी अशा सूर्य व अग्नीसहित स्वतः श्राद्धान्न भोजन करणाऱ्या ज्या परमात्म्याने, विष्णुदत्त भक्तावर संतुष्ट होऊन त्याला पुनरावृत्तिरहित अशी मोक्षरूप परमगति दिली, तो परमात्मा भगवान् श्रीदत्तच होय. पितरांनी भक्षण करण्यास योग्य असें श्राद्धीय अन्न परमात्म्याने भक्षिले हे अयोग्य केले अशी शंका करणे योग्य नाहीं. कारण, पितर व देव या सर्वांचा आत्मा हा श्रीदत्त आहे. श्राद्धिय अन्न समर्पणाचे वेळीं सुद्धां 'जनार्दनवासुदेवः प्रीयतां' असेंच म्हणावयाचे असते. मग प्रत्यक्ष सर्वात्मा अशा परमात्म्यानेच ब्राह्मण वेषधारी सूर्य अग्न्यादिसहित स्वतः तृप्त होऊन स्वांतर्गत असणाऱ्या देव पितरांची तृप्ति केल्यास कव्यभुक् व हव्यभुक्पणाचा दोष त्याला कसा लागणार? उलट सर्वतृप्तिप्रद झाल्याने हा एक गुणच झाला. असा श्राद्धान्न भोजनाने देव पितरतृप्तिप्रद व विष्णुदत्तमुक्तिप्रद श्रीदत्त परमात्माच आहे.।।६२।।

**तनयकामनया व्ययमायुषः कृतवतो नमतोऽव्यमायुषः**
**क्षितिभृतो हि यतोऽभवदुत्तमं फलमलं तुमशन्ति हि सत्तमम् ।।६३।।**

अन्वयार्थः- (तनयकामनया) पुत्राच्या इच्छेने सेवेत (आयुषः व्ययं कृतवतः) आपले सर्व आयुष्य खर्ची घालणाऱ्या (अव्ययं नमतः) नेहमीं भक्तीने नमन करणाऱ्या (आयुषः क्षितिभृतः) आयु नांवाच्या राजाला (यतो हि) ज्याच्यापासून (अलं उत्तमं फलं अभवत्) अत्यंत उत्तम असें ऐहिक पुत्रप्राप्तिरूप फळ व आमुष्मिक अव्यय असें मोक्षरूप फळही मिळाले; (तं हि सत्तमं उशन्ति) अशीं उत्तम फळें देणाऱ्या ज्या प्रभूला निश्चयाने

संतशिरोमणि म्हणून वर्णन करतात तो हा श्रीदत्तच होय ॥६३॥

भावार्थः- पुत्र व्हावा याच केवळ इच्छेने आपले सर्व आयुष्य सेवेत खर्च करणाऱ्या व रोज भक्तिभावाने नमन करणाऱ्या आयुराजाला सर्वगुणसंपन्न पुत्रलाभरूप ऐहिक सुख देऊन अविनश्वर व अत्यंत श्रेष्ठ असें मोक्षफलही ज्या परमात्म्याने दिले, अशा उत्तम व अयाचित परंतु अत्यंत इष्ट अशा अनंतफल देणाऱ्या त्या दत्तप्रभूला संतशिरोमणि असें म्हणतात.॥६३॥

**क्षितिसुरादिकलिङ्गविवर्जितं यमहिराश्रमलिङ्गविवर्जितम् ।**
**स्म परिपृच्छति पिङ्गल आश्रमं य उ शशंस च पञ्चममाश्रमम् ॥६४॥**

अन्वयार्थः- (क्षितिसुरादिकलिङ्गविवर्जितं आश्रमलिङ्ग-विवर्जितं च यं) ब्राह्मणादिक वर्णाचे चिह्न नसलेल्या व ब्रह्मचारी वगैरे आश्रमांचेही चिह्न नसलेल्या ज्याप्रत (पिङ्गलः अहिः) पिंगल नांवाचा नाग, (परिपृच्छति स्म) वर्ण व आश्रमाचे चिह्न नसलेला असा तुझा कोणता आश्रम आहे; असें विचारता झाला. (उ यश्च) अशा तऱ्हेनेही परिपृष्ट असा तो भगवान् (पञ्चमं आश्रमं शशंस) उपनिषदात प्रसिद्ध असलेला असा स्वतःचा पंचम आश्रम म्हणून सांगता झाला, तो हा श्रीदत्तच आहे ॥६४॥

भावार्थः- छंदःशास्त्राचा आचार्य अशा पिंगल नागाने फिरतां फिरतां अकस्मात् गांठ पडलेल्या, ब्राह्मण क्षत्रियादि चिन्हाने रहित व ब्रह्मचारी गृहस्थादि आश्रमचिन्हाने रहित अशा भगवान् प्रभूला, तुझा आश्रम कोणता असा प्रश्न केला असतां, उपनिषत्प्रसिद्ध असलेला असा माझा हा पंचम आश्रम आहे; ज्या आश्रमांत दंडशिखा-यज्ञोपवीत-आच्छादन कांहींच नसते; ज्यांत शीतोष्ण, सुख-दुःख, मानापमान या सहा ऊर्मि नसतात; निंदा, गर्व, मत्सर, दंभ, दर्प, राग, द्वेष, काम, क्रोध, लोभ, मोह, हर्ष, असूया, अहंकारादि सर्व टाकून आपले शरीर प्रेताप्रमाणे पाहिले जाते, असा माझा हा पंचमाश्रम आहे; असें ज्याने पिंगल नागाला सांगितले, तो हा भगवान् श्रीदत्तच आहे ॥६४॥

**य उशतेऽखिलयौगिकवैभवं ध्रुवमदात्सबलाक्षयवैभवम् ।**

**भुजसहस्रमजस्रनिजस्मृतिं स कृतवीर्यसुवीर्यभुवे मृतिम् ॥६५॥**

अन्वयार्थ :- (अखिलयौगिकवैभवं उशते) योगाच्या अणिमादि सर्व सिद्धींची इच्छा करणाऱ्या (कृतवीर्यसुवीर्यभुवे) कृतवीर्य राजाचे अनंतव्रत व सूर्याराधनाजन्य जें तेज, त्यापासून झालेल्या कार्तवीर्यार्जुनाला (ध्रुवं) निश्चयाने (सबलाक्षयवैभवम्) बलयुक्त अविनाशी असें परचित्तज्ञान, अनेक देह धारण, वायुप्रमाणे संचरणादि अखिल योगसिद्धीरूप सामर्थ्य, (भुजसहस्रं) इच्छा केल्याबरोबर हजार हात (अजस्रनिजस्मृतिं) निरंतर दत्तस्मरण (मृतिं च) आपल्यापेक्षां प्रसिद्ध योद्ध्यापासून मरण किंवा अमृतिं असें पद मानून मोक्षही (यः अदात्) जो देता झाला तो हा श्रीदत्तच आहे ॥६५॥

भावार्थ :- अनंतव्रत व सूर्याराधनेच्या योगाने कृतवीर्य राजाच्या शरीरांत प्रविष्ट झालेलं जें तेज त्यापासून झालेल्या व अणिमादि अष्टयोगसिद्धींची इच्छा करणाऱ्या, स्वभक्त कार्तवीर्यार्जुनाला ज्या प्रभूने परचित्तज्ञान, अनेक देह धारण, वायूप्रमाणे अप्रतिबद्ध संचार इत्यादि सर्वयोगसिद्धिबल, इच्छा झाल्याबरोबर तात्काळ हजार हात होणे, निरंतर आपले स्मरण, स्वतःपेक्षां अधिक कीर्तीच्या योद्ध्यापासून मरण व अखेर पुनरावृत्तिरहित असें पद जो मोक्ष हे सर्व दिले तो हा भगवान् भक्तवत्सल भक्तकामकल्पद्रुम श्रीदत्तच होय ॥६५॥

**कुजनसंगमुपेक्ष्य मरुद्धनैः सुजनसंगमपेक्ष्य सुसाधनैः ।**
**इह हि साध्यसुरेभ्य उपादिशत् परगतिं य इहाखिलमाविशत् ॥६६॥**

अन्वयार्थ :- (इह हि) या भूलोकांत (साध्यसुरेभ्यः) शरणागत साध्य देवांना (कुजनसंगं उपेक्ष्य) आसुरी किंवा राक्षसी संपत्तिप्रद अशा दुर्जनसंगतीची उपेक्षा करून (सुजनसंगं अपेक्ष्य) दैवी संपत्ती देणाऱ्या संतसंगतीच्या योगाने झालेल्या (मरुद्धनैः) 'अभयं सत्त्वसंशुद्धिः' इत्यादि गीतेत सांगितलेल्या दैवी संपत्तीने (सुसाधनैः) अंतरंग अशा शमादि साधनांनी मिळणाऱ्या व ज्ञात होणाऱ्या (परमगतिं य उपादिशत्) मोक्ष गतीला जो सांगता झाला (यः अखिलं आविशत्) जो ब्रह्मांडांतील सर्व

भूतभौतिक पदार्थांत जीवरूपाने व अंतर्यामी रूपाने प्रविष्ट आहे, तोच हा श्रीदत्त होय ॥६६॥

भावार्थः- या भूलोकांत श्रीदत्तावतार झाल्यावर अंतकाळ न्हदम-ज्ञनादि सामर्थ्य पाहून अनन्य शरण झालेल्या साध्य देवांला 'दंभो दर्पोऽ-भिमान च' इत्यादि दुर्गतिप्रद आसुरी व राक्षसी संपत्तीला देणाऱ्या दुर्जन संगतीला टाकून, 'अभयं सत्त्वसंशुद्धिः' इत्यादि सुगतिप्रद दैवी संपत्ति देणाऱ्या संत संगतीच्या योगाने झालेली जी दैवी संपत्ति व अंतरंग अशी शमदमादि साधने, यांनी मिळणारी व या साधनांवरून ओळखली जाणारी जी मोक्षरूप परमगति ती ज्या प्रभूने सांगितली, जो प्रभु अखिल ब्रह्मांडांतील सर्वभूतभौतिकांमध्यें जीव व तन्नियामक अंतर्यामी या रूपाने व्यापून राहिला आहे तो हा साध्यदेवबोधप्रद व सर्वांतर्यामीं सर्वस्वरूप भगवान् श्रीदत्तात्रेयच आहे ॥६६॥

**स्मरणमात्रत आगममात्मनः श्रुतवतः स्मरतश्च यतात्मनः ।**
**पुरत आप यतो दलभक्षणः कवचमाप स एष शुभेक्षणः ॥६७॥**

अन्वयार्थः- (स्मरणमात्रतः आत्मनः आगमं श्रुतवतः) स्मरण केल्याबरोबर आत्मस्वरूपी श्रीदत्त भक्ताकडे येतो, असें ऐकलेल्या (स्मरतश्च) 'वामहस्तेन वरदो दक्षिणेनाभयप्रदः' इत्यादि ध्यानांचे स्मरण करणाऱ्या व (यतात्मनः) दत्तात्रेयाच्या आगमनाकरितां एकाग्र चित्ताने यत्न करणाऱ्या अशा दलादन ऋषींच्या (पुरतः) अग्रभागीं (आप) जो प्राप्त झाला, (यतो) स्मरणमात्राने अग्रभागीं प्राप्त झालेल्या ज्या प्रभूपासून (दलभक्षणः) दलादन ऋषि (कवचं आप) (दत्तात्रेय-) वज्रकवचाला प्राप्त करून घेता झाला, (स एष शुभेक्षणः) भक्तावर अनुग्रह व करुणादृष्टि ज्याची आहे, असा तो श्रीदत्तच आहे ॥६७॥

भावार्थः- रुद्रयामलरूपस्मृतीच्या अनुरोधाने दलादन ऋषीवर अनुग्रहरूप दत्तमाहात्म्य सांगतात. दलादन ऋषीने, दत्तात्रेय स्मर्तृगामी आहेत ही वार्ता ऐकून ही वार्ता खरी आहे का याची परीक्षा करावी

असें ठरविले व एकाग्रचित्ताने भगवान् दत्तप्रभूचे स्मरण करीत आपल्या आश्रमांत राहिले. दत्तप्रभूने त्यांची निष्ठा व भक्ति पाहून त्यांच्यावर अनुग्रह करण्याकरितां दलादन जसें वराभयकर दिगंबर व सिद्ध मूर्तीचे स्मरण करित होते त्याच रूपाने त्यांच्यापुढें अकस्मात् प्राप्त झाले व त्यांच्यावर अनुग्रह केला. स्मर्तृगामी अशा दत्तात्रेय प्रभूपासून दलादन ऋषींनी दत्तवज्रकवच नामक मंत्र (स्तोत्र?) आपल्या व सर्व लोकांच्या कल्याणाकरितां प्राप्त करून घेतला, असा हा भक्तानुग्रहकारी व करुणारसाने पूर्ण दृष्टि असलेला श्रीदत्तात्रेय आहे ।।६७।।

**हतपतिं च इवार्तकरेणुकां अतिविलापवतीं ननु रेणुकाम् ।**
**द्रुतमुपेत्य तयार्थित आदिशत् स्वपतिना सह दाहविधिं स्वयम् ।।६८।।**

अन्वयार्थ :- (हतपतिं) कार्तवीर्यार्जुनाच्या पुत्रांनी जमदग्नि- नामक जिचा पति नष्ट केला आहे अशा (ननु आर्तकरेणुकामिव) हत्तीरूप स्वपति नष्ट झाल्याने अत्यंत दुःखी झालेल्या हत्तिणीप्रमाणे (अतिविलापवतीं) अत्यंत शोक करणाऱ्या अशा (रेणुकाम्) रेणुकेजवळ (यः द्रुतमुपेत्य) जो करुणेने स्वतःच येऊन, (तयार्थितः) 'आपण माझ्या सहगमनविधीचे आचार्य व्हावे' याप्रमाणे प्रार्थना केला गेलेला (स्वयं) स्वतःच, शिष्यादिद्वारा नव्हे, (स्वपतिना सह, दाहविधिं आदिशत्) तिच्या पतीसह दाहाचा म्हणजे सहगमनाचा विधी रेणुकेला सांगता झाला, तोच हा श्रीदत्त आहे ।।६८।।

भावार्थः- परशुरामाने दत्तवराला अनुसरून सहस्त्रार्जुनाला मारले असतां, त्याच्या मुलांनी क्रोधाविष्ट होऊन परशुरामपिता जमदग्नि ऋषींचा 'कृते प्रतिकृतं' या न्यायाने वध केला ते पाहून एखाद्या स्वपालक व पतिरूप हत्ती नष्ट झाला असतां हत्तीण ज्याप्रमाणे पीडित होऊन शोक करते, त्याप्रमाणे अनाथ होऊन शोक करणाऱ्या जमदग्निभार्या रेणुकेजवळ स्वतःच येऊन तिची स्तुति करून, त्या स्तुतीमध्येंच आत्मबोध प्रकट करून तिचा शोक नाहींसा केला. तिने मी पतीसह सहगमन करणार आहे तरी त्या सहगमनविधीचे आचार्यत्व आपण स्वीकारावे अशी प्रार्थना केली

असतां तिच्या प्रार्थनेनुरूप, शिष्यादिकांकरवीं हे कार्य न करितां, स्वतःच आचार्य होऊन जमदग्नि पतीसह रेणुकेचा दाहविधी ज्यांनी तिला व तद्द्वारां परशुरामालाहि सांगितला; तो अत्यंत कारुणिक भगवान् श्रीदत्तप्रभूच आहे. येथे सांगितलेलीं व आणखीहि श्री दत्तलीलामृतचरित्रें श्रीदत्तमाहात्म्यावरून जाणून घ्यावींत ॥६८॥

**निद्रा मातृपुरेऽस्य सह्यशिखरे पीठं मिमङ्क्षापुरे**
**काशाख्ये करहाटकेऽर्घ्यमवरे भिक्षाऽस्य कोलापुरे**
**पाञ्चाले भुजिरस्य विठ्ठलपुरे पत्रं विचित्रं पुरे**
**गान्धर्वे युजिराचमः कुरुपुरे दूरे स्मृतो नान्तरे ॥६९॥**

अन्वयार्थः- (अस्य मातृपुरे निद्रा) या भगवान् श्रीदत्तात्रेयांची निद्रा सह्याद्रीच्या पायथ्याशीं रेणुकानगरांत आहे. (सह्यशिखरे पीठम्) सह्याद्रीच्या शिखरावर राहण्याचे ठिकाण आहे. (काशाख्ये पुरे मिमंक्षा) काशी क्षेत्रांत भागीरथींत स्नान आहे. (करहाटकेऽर्घ्यम्) कऱ्हाड क्षेत्रांत अर्घ्यप्रदान म्हणजे प्रातःकालचे संध्यावंदन आहे. (अवरे कोलापुरे अस्य भिक्षा) साक्षात् लक्ष्मीच्या निवासामुळें सर्वश्रेष्ठ दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध अशा कोल्हापुरांत श्रीदत्तांची 'भिक्षां देही' होते. (पांचाले भुजिः) कोल्हापुराहून आणलेल्या भिक्षेचे भोजन पांचालेश्वर नगरांत होते. (विठ्ठलपुरे अस्य विचित्रं पत्रं) पंढरीक्षेत्रांत भीमातीरावर तिलकधारण म्हणजे चंदनचर्चन होते. (गांधर्वे युजिः) भीमा-अमरजा संगमावर गाणगापुरांत यांचा योग म्हणजे ध्यान होते. (कुरुपुरे आचमः) कुरुक्षेत्रांतील स्यमंतपंचकतीर्थांत आचमन होते. याप्रमाणे निरनिराळ्या ठिकाणीं संचार करणारा जरी प्रभु असला तरी (यः स्मृतः दूरे न, किं तु आन्तरे) स्मरण केले असतां तो दूर नसतो; तर स्मरण केल्याबरोबर सर्वत्र असलेलाच परमात्मा हृदयकमलांतही जो आहे तोच, स्वरूपाने प्रकट होतो॥६९॥

भावार्थः- श्रीदत्तप्रभूची दिनचर्या सांगतात ती अशी कीं, सह्याद्रि पर्वताच्या पायथ्याशीं रेणुका नगरांत श्रीदत्तात्रेयाची निद्रा होते, म्हणजे हे

निद्रास्थान आहे. ज्या ठिकाणीं जें आचरण होते त्या ठिकाणाला ते स्थान असें समजावे. सह्याद्रि शिखरावर प्रभूचे आसन अथवा निवास आहे. काशी क्षेत्रांत भागीरथी नदींत स्नान आहे. कऱ्हाड क्षेत्रांत प्रातःकालचे संध्यावंदन व अर्घ्यप्रदान आहे. साक्षात् महालक्ष्मीचे वास्तव्य असल्याने सर्वांत श्रेष्ठ व दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या कोल्हापुरांत देवाचे भिक्षाटन आहे. पांचाल नगरांत श्रींचे भोजन होते. पंढरपुरांत चंदनलेपन होते. गाणगापुरांत भीमा-अमरजा संगमावर ध्यानयोग होतो. कुरुक्षेत्रांत स्यमंतपंचक तीर्थांत महाराजांचे आचमन आहे. याप्रमाणे रोज भिन्न भिन्नकाळीं निरनिराळ्या ठिकाणीं संचार करणारा हा परमात्मा जरी आहे तरी स्मरण करणाऱ्याला अत्यंत जवळच आहे; कारण सर्वांतर्यामी परमात्मा हृदयस्थ असल्याने स्म रण केल्याबरोबर आपल्या दिव्यस्वरूपाने अनन्य अशा भक्ताच्यापुढें प्रकट होतो।।६९।।

**इत्यत्रैजति निर्गुणोऽपि गुणिवन्नित्योऽमना मायया**
**सर्वात्मा विभुरेकधापि बहुधा भात्यप्शशीवानया ।।**
**नानाख्यात्मककुण्डलादिषु सदा सत्कांचनत्वं यथा ।**
**प्राङ्मध्यान्तत एष सन्विकृतिषु कूटस्थ एकस्तथा ।।७०।।**

अन्वयार्थः- (सर्वात्मा) ब्रह्मादिस्तंब सर्व भूतांचा अंतरात्मा म्हणूनच (विभुः) व्यापक किंवा विविध रूपांनी होणारा सर्वात्मा विभु व निर्गुण असूनहि स्वेच्छेने अवतार धारण करून (इति) अशा पूर्वी सांगितलेल्या प्रकाराने (मायया गुणवान् अत्र एजति) मायेने गुणयुक्त अशा वस्तुप्रमाणे या लोकांत क्रियाशील दिसतो. वस्तुतः हा निष्क्रिय आहे. आत्मा द्रव्य असल्याने ज्ञानादि गुणांनी तरी गुणी मानलाच पाहिजे. शिवाय भिन्न भिन्न अवतारांत अनेक लीला केल्या असल्याने निर्गुणत्व, निष्क्रियत्व कसें सिद्ध होईल अशी शंका करूं नये; कारण (नित्यः) 'नित्यं सर्वगतं सूक्ष्मम्' या श्रुतीवरून आत्मा नित्य आहे असें ठरते. मग नित्य आत्म्याला अनित्य अशा ज्ञानादि गुणांचा संबंध कसा असावा? अनित्य गुणांनी युक्त असा पदार्थ

मानण्यास तर्कदृष्टान्त वगैरे नाहींत. आकाश व मुसळ यांच्या संयोगाप्रमाणे आत्मा व मन यांचा संयोग मानण्यास काय हरकत आहे, असें म्हणाल तर, (ह्यमनः) 'अप्राणो ह्यमना' या श्रुतीवरून ज्याला मन नाहीं असा हा आत्मा आहे. आत्मा निरवयव असल्याने कोणाचाहि संयोग त्याला होत नाहीं. 'असंगो ह्ययं पुरुषः' अशी श्रुति आहे. शरीरादिकांच्या भेदाने आत्मभेदाचा भ्रम होत असला तरी वास्तविक आत्मा एक आहे. (एकधा अपि) एकरूप असूनहि (अप्शशीव अनया बहुधा भाति) पाण्यातील चंद्राप्रमाणे मायेच्या योगाने भिन्नभिन्न भासतो. निराकार व निर्विकार आत्म्याहून भिन्न हे साकार भूतभौतिक पदार्थ विद्यमान असतां आत्मैकत्व कसें सिद्ध होईल? असें म्हणाल, तर (नानाख्यकुंडलादिषु) जसें अनेक नामरूपांनी युक्त अशा कटककुंडलादि विकारांमध्यें (सदा) आदि, मध्यें व शेंवटींही (कांचनत्वं) सुवर्णरूप (सत्) बाधरहित असें आहे. (तथा प्राङ्मध्यान्ततः) तसेंच आदि, मध्यें व शेंवटीं (विकृतिषु) आभासमात्र असणाऱ्या भूत-भौतिक विकारांमध्येंहि (कूटस्थः) ऐरणीप्रमाणे किंवा पर्वतशिखराप्रमाणे निर्विकार असणारा (एकः) सजातीयविजातीयस्वगतभेदरहित असा श्रीदत्त हा (सन्) बाधरहित असा आहे. याच्या अस्तित्वाचा केव्हांहि अभाव नाहीं. हा सदा सच्चिदानन्दरूप आहे. ॐ तत्सत्।।७०।।

भावार्थः- सद्गुरुमहाराज, ग्रंथालंकाराकरितां ग्रंथांतीं सर्वात्मक परब्रह्म श्रीदत्ततत्त्वस्मरणरूप मंगल करतात. ब्रह्मादिस्तंबपर्यंत सर्व भूतांचा अंतरात्मा म्हणूनच स्थिरचर व्यापून दशांगुल किंवा त्रिपात् उरलेला म्हणजे विभु किंवा नाना विश्वनाटकी लीलावतारी असा हा परमात्मा, सर्वात्मा, निर्गुण, विभु असूनही स्वेच्छेने या ठिकाणी भक्तोद्धारार्थ अवतीर्ण होऊन पूर्वी सांगितल्याप्रमाणे मायेच्या योगाने एखाद्या सगुणाप्रमाणे नाना प्रकारच्या लीला करतो. आत्मा बुद्ध्यादि गुणांनी वस्तुतःच गुणवान् आहे; कारण तो द्रव्यरूप आहे अशी शंका करूं नये. अनित्य गुणांनी युक्त नित्य द्रव्य असूं शकत नाहीं. समवायाचे खंडन झाल्याने गुणगुणींचा संबंध अभेदच

मानला पाहिजे. अनित्य गुणांशीं अभेद मानल्यास आत्माहि अनित्य होऊं लागेल म्हणून गुणगुणीचा मायिक भेदाभेद मानावा लागतो. अर्थात् मायेनेच गुणगुणीचा भाव सिद्ध झाला, वास्तविक नाहीं. श्रुतीने आत्मा हा नित्य म्हणून सांगितला आहे. याला मन वगैरे कांही नाहीं असें श्रुतीने सांगितले आहे. याच्या ज्ञानाकरितां मनाची गरज नाहीं; कारण हा स्वयंप्रकाशित असा आहे. म्हणून मनःसंयोगाने याच्या ठिकाणी ज्ञानादि उत्पन्न होणे शक्य नाहीं व हा असंगहि आहे. प्रत्येकाच्या शरीरामध्यें बद्धमुक्तादि सुखी, दुःखी इत्यादि भेदांनी हा भिन्न आहे अशीहि शंका करूं नये; कारण वास्तविक हा एक असूनहि आकाशांतील चंद्र जसा जलपूर्ण घटांत प्रतिबिंबल्यावर भिन्नभिन्न दिसतो, तसा हा परमात्मा त्या त्या अंतःकरणाद्युपाधींच्या योगाने बद्धमुक्ताद्यनेक भेदांनी भिन्न दिसतो; तो वास्तविक एकच आहे, अद्वितीय आहे. भूतभौतिकादि सर्व द्वैते आत्म्याहून भिन्न व सत्य असतां आत्मा अद्वितीय कसा होईल अशीही शंका करूं नये; कारण आभासमात्रस्वरूप अशा कटक कुंडलादि विकारांत आदि, मध्यें व शेवटीं एक निर्विकार सुवर्णच जसें व्यापून असते, दिसणारे विकार केवळ वाचारंभण मिथ्या मात्र आहेत, त्यामुळें सुवर्णाचे विकाररहित्य सर्वदा अढळ आहे तसेंच वाचारंभण आभासमात्र भूतभौतिक मिथ्या विकारांत आदि, मध्यें व अंतीं व्यापून असणारा कालत्रयाबाधित, सजातीय, विजातीय स्वगतभेदशून्यय परमात्मा कूटस्थ असा, एकमेवाद्वितीय आहे. त्याशिवाय या जगांत दुसरे कांहींच नाहीं. सर्वात्मा, सर्वव्यापक, स्वयंप्रकाश सच्चिदानंदघन एक श्रीदत्तच आहे. ॐ तत्सत् ॥७०॥



प. प. श्री टेंबेस्वामी महाराज



प. प. श्री लोकनाथतीर्थ स्वामी महाराज



प. पू. श्री गुळवणी महाराज



प. पू. श्री कवीश्वर महाराज


श्रीवासुदेव निवास

४२/१७ एरंडवणे, महर्षी कर्वे पथ, पुणे -४११ ००४.

मोबा: +९१ ७२७६६५१५३५

Website : www.vasudevniwas.org

Email : info@vasudevniwas.org

SHREE VASUDEV NIWAS

UPI ID. SHREEVN@IOB